सभापतीस्थानी - माननीय सभापती

नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी...

सभापती : प्रश्नोत्तरे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्यापूर्वी मी आज नियम 289 अन्वये एक प्रस्तावाची सूचना आपणाकडे दिलेली आहे. विषय गंभीर असल्यामुळे तो मांडण्यासाठी मला दोन मिनिटांचा अवधी द्यावा अशी मी विनंती करतो. खरीप आणि रब्बी या दोन हंगामामध्ये विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर महाराष्ट्रामध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे दुष्काळ पडला. 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी 12034 गावांमध्ये जाहीर करण्यात आली. त्यापैकी विदर्भामध्ये 10339, मराठवाडयामध्ये 1278 आणि सातारा, सांगली या भागामध्ये 35 गावांचा व कोकणातील काही गावांचा समावेश आहे. मागील वर्षी पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील 11 जिल्हयांमधील 5022 गावांमध्ये खरीपाची आणेवारी 50 टक्क्यापेक्षा कमी होती. त्यावेळी केंद्र सरकारकडे 5 हजार कोटींची मागणी करुन प्रत्यक्षात दुष्काळासाठी 1500 कोटी रुपये मिळविले. याठिकाणी माझे मित्र माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील उपस्थित आहेत, त्यांनी ही मागणी केली तिचे मी समर्थन करतो. 12034 गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असल्यामुळे सर्वांनाच मदत मिळाली पाहिजे. कापसाचे पिक आल्यानंतर आणेवारीबाबत नोटिफिकेशन काढण्यात आले, परंतु त्यावर कारवाई झाली नाही. काल संसदेमध्ये केंद्रीय कृषि मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी जे उत्तर दिले ते मी आपल्याला याठिकाणी वाचून दाखवितो. प्रश्न असा विचारण्यात आला होता की, " क्या कृषि मंत्री यह बताने की कृपा करेंगे कि क्या महाराष्ट सरकार ने महाराष्ट्र के कई जिलों में सूखे की गंभीर स्थिति को ध्यान में रखते हुए राहत और बचाव उपायों के लिए धनराशि के आबंटन का आग्रह किया है" ? त्यावर माननीय श्री. पवार साहेबांनी दिलेले उत्तर ऐकून आम्हाला वाईट वाटते. ते उत्तर असे आहे की, " महाराष्ट्र सरकार से 2004-05 में पड़े सूखे के लिए केंद्रीय सहायता के लिए कोई अनुरोध प्राप्त नहीं हुआ है".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरीजी आपण नियम 289 अन्वये जी सूचना दिली आहे त्यामध्ये आपण आपले मत स्पष्ट केले आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या राज्यामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. नापिकी झाल्यामुळे व कर्जबारीपणामुळे त्यांच्यावर संकट आले आहे. मी हे स्वत: सांगत नाहीतर शासनाच्या महसूल विभागाने दिलेली आकडेवारी आहे. तेव्हा दुष्काळासारखे गंभीर संकट राज्यावर आले असल्यामुळे नियम 289 मध्ये या सर्व बाबी अंतर्भूत होतात. तेव्हा आपण आजचे प्रश्नोत्तरासहीत सभागृहापुढील सर्व कामकाज स्थगित करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने या विषयावर सदनामध्ये चर्चा घ्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी नियम 289 अन्वये मांडलेला प्रस्ताव सदनासमोर आहे. त्याच्या पाठीमागची कारणे त्यांनी सांगितली आहेत. आपल्या महाराष्ट्रात आज जवळजवळ 12 हजारपेक्षा अधिक गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे याची शासनाने दखल घेतली आहे. एकदा शासनाने दुष्काळग्रस्त गावे जाहीर केल्यानंतर त्या गावांना मदत करण्याची आवश्यकता होती. ती मदत देण्यासाठी राज्य सरकारला केंद्र सरकारच्या मदतीची आवश्यकता नसेलतर आमची काही तक्रार नाही. परंतु ती मदत जाहीर केली पाहिजे. अन्यथा, ही मदत मिळविण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता होती. त्याकरिता शासनाने केद्र सरकारकडून मदत मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले आहेत हे इथे जाहीर करावे. माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांनी परवा लोकसभेमध्ये दिलेले उत्तर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी वाचून दाखविले ते अत्यंत दुर्दैवी आहे. याचे कारण महाराष्ट्र सरकारने या सर्व समस्या केंद्र सरकारपुढे मांडल्या नसल्यामुळे केंद्र सरकार त्यासाठी काही करु शकत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

शेवटी तुम्ही मागणी केली तर ते पैसे देतील, तुम्ही जर मागणी केली नाहीतर ते कशाला पैसे देतील ? हा प्रश्न येतो. हा शेतक-यांच्या दृष्टीने मुलभूत आणि जीवनमरणाचा प्रश्न आहे. म्हणून याचे महत्व विचारात घेऊन आम्ही आपल्यासमोर 289 अन्वये सूचना मांडलेली आहे. प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन दुस-या विषयावरील चर्चा सुरु करावी असे सांगण्यामध्ये आम्हालाही काही आनंद वाटत नाही. पण शेवटी विषयाची तातडी विचारात घेऊन आम्हाला अतिशय नाईलाजाने अशा प्रकारचे प्रस्ताव सदनासमोर ठेवावे लागतात. म्हणून आपण आजचे सर्व कामकाज स्थगित करुन नियम 289 खाली ही चर्चा करण्यासाठी अनुमती द्यावी अशी आम्हा सर्वांतर्फे आपल्याला नम्र विनंती करतो.

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, राज्याच्या विशेषत: विदर्भ, मराठवाडा या परिसरामध्ये चालू वर्षी जो गंभीर दुष्काळ पडलेला आहे, त्याबाबतीत शासन अतिशय गांभीर्याने पाहत आहे. 50 पैसे आणेवारी घोषित व्हावयाच्या अगोदर, त्या भागातील नजर पैसेवारी धान्यात घेऊन महाराष्ट्राच्या इतिहासात गेल्या वर्षीनंतर यावर्षी पहिल्यांदा दुष्काळी परिस्थिती घोषित करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. गतवर्षी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ होता. त्यामध्ये लोकांना जे लाभ देण्यात आले होते, ज्या सवलती देण्यात आल्या होत्या, ते सर्व लाभ, त्या सर्व सवलती या विभागासाठी लागू करण्याचा निर्णय शासनाने काही दिवसापूर्वी घेतला आहे. हे सर्व लाभ त्या परिसरामध्ये मिळतील. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी गावांची संख्या जवळजवळ दुप्पटीने जास्त आहे. पण गेल्या वर्षी त्या परिसरामध्ये दुष्काळ होता, पण तेथील दुष्काळाचे ते सलग चौथे वर्ष होते. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता खूप मोठया प्रमाणात होती. यावर्षी राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी 468 टँकरव्दारे पाणी पुरवठा करीत आहोत आणि गेल्या वर्षी याच तारखेला 2900 टँकरव्दारे पाणी पुरवठा करावा लागत होता. आज 4 लाख 20 हजार मजूर रोजगार हमी योजनेवर काम करीत आहेत. गेल्या वर्षी साधारणत: ही संख्या 9 लाखापर्यंत पोहोचलेली होती, त्याहूनही जास्त होती.गावे जास्त आहेत, पण त्या परिसरामध्ये दुष्काळाचे पहिले वर्ष आहे. दुस-या बाजूला केंद्र शासनाने मुबलक धान्य देण्याची भूमिका स्विकारलेली आहे. आपण ई.जी.एस.वरील कामगारांना ते धान्य देऊ शकतो. पण असे असले तरी सुध्दा गावांची व्याप्ती आणि मोठया प्रमाणात असलेला दुष्काळ लक्षात घेऊन केंद्राकडे मदत मागण्याची भूमिका राज्य शासनामार्फत घेण्यात येईल आणि 1 हजार कोटी रुपये

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : आता इतके दिवस संपल्यानंतर काय मिळणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 1 हजार कोटी रुपये केंद्राकडून मागितले जातील आणि तोपर्यंत . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने आजपर्यंत का मागितले नाहीत ?

श्री.आर.आर.पाटील : गडकरीसाहेब, माझे ऐकून घ्यावे. आजपर्यंत त्या परिसरातील दुष्काळग्रस्तांना न्याय देण्यासाठी, सवलती देण्यासाठी जी भूमिका राज्य सरकारने घेतली होती,

. . . .बी-3

श्री.आर.आर.पाटील. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासाठी राज्य सरकार सक्षम आहे. राज्य सरकारने आपल्या बजेटमधून दुष्काळासाठी ज्या प्रोव्हीजन केलेल्या आहेत, त्यातून या तदतूदी करुन दुष्काळग्रस्तांना योग्य न्याय देण्याची भूमिका स्विकारलेली आहे. ज्यावेळी राज्य सरकारकडील निधी कमी पडेल, त्यावेळी हक्काने हा निधी केंद्राकडून आणला जाईल. पूर्वी निधी मागण्यासाठी वारंवार जावे लागत होते, कारण निधी मिळेल की नाही याबद्दल साशंकता असावयाची. आज ज्यावेळी अडचण निर्माण होईल आणि आपल्या फंडातून आपण दुष्काळाचा सामना करु शकत नाही असे राज्य शासनाला वाटेल, त्यादिवशी राज्य सरकारचा एखादा मंत्री दिल्लीला जाईल आणि दुस-या दिवशी मदत घेऊन येईल. आता दिल्लीमध्ये राज्याच्या बाबतीत पैसे ठेवल्यासारखी परिस्थिती आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्तांच्या बाबतीत . . . .

(गोंधळ)

सभापती महोदय, त्यामुळे अडचण येऊ दिली जाणार नाही आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी ग्वाही देतो . . . .

(गोंधळ)

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी ग्वाही देतो की . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आतापर्यंत काही केले नाही आणि . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळग्रस्तांना ज्या काही सवलती दिल्या, त्या सगळया सोयीसवलती विदर्भातील मराठवाडया- तील लोकांना दिल्या जातील , मागेल त्याला काम दिले जाईल. गावात पाणी नसेल तर टँकर पाठविले जातील.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

जनावरांच्या चा-यासाठी अनुदान दिले जाईल. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ज्या सवलती दिल्या होत्या, त्या सर्व सवलती याही भागासाठी दिल्या जातील.

श्री.गडकरी : सभापती महोदय, टँकर नाही, काही नाही. नुसती पत्रके काढली आहेत. . . . .बी-4

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, टँकर नाही, लोकांना पाणी नाही, तेव्हा जर गाववाईज् विरोधी पक्षनेत्यांनी तक्रार दिली तर त्याची चौकशी केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, नुसती चौकशी केली जाणार नाही,टँकर तर दिले जातीलच पण शासनाचे स्थायी आदेश असतांना सुध्दा ज्या यंत्रणा कार्यरत नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या बद्दल काल चांगले बोललो, त्यांचे अभिनदन केले. पण ते प्रवचन करुन अडचणीत येतात त्यात माझा दोष नाही. मी मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारतो की, मी प्रवचन ऐकायला आलो नाही....

सभापती :नियम 289 कसा आवश्यक आहे त्याबाबतीत विरोधी पक्ष नेते, श्री. नितीन गडकरी आपण बोललात, त्यानंतर सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील आपले म्हणणे मांडत आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, दुष्काळ जाहीर केल्या नंतर एकही गोष्ट झालेली नाही. टँकर आलेले नाहीत. मदत दिली नाही. दुष्काळ जाहीर झाल्या नंतर ज्या ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्या गोष्टी झालेल्या नाहीत. उलट आमचे पैसे कापून घेतले आहेत. दुष्काळाच्या बाबतीत केंद्र सरकारकडे कागदावर निळ्या शाईचे एकही पत्र पाठविलेले नाही पण केंद्रसकारकडे केव्हाही गेलो तरी मदत मिळेल, केंद्रात आमचे सरकार आहे असे सांगितले जात आहे. आपण संवेदनशील, जाणते मंत्री आहात. 12 हजार गावात दुष्काळ असतांना राज्य शासनाने केंद्र सरकारला एक पत्र सुध्दा कां पाठविलेले नाही आणि केंद्र सरकारकडे कां मागणी केली नाही? हे सांगा.

सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, आपले म्हणणे ऐकलेले आहे. आता मी माझा निर्णय देतो.

श्री. दिलीप देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन दुष्काळावर आणि टंचाईच्या विषयावर चर्चा करण्याच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी परवानगी मागितली आहे. ती परवानगी आपण त्यांना दिली आहे काय? आपण परवानगी देण्याच्या अगोदरच या चर्चेला सुरुवात झालेली आहे. तेव्हा सभापती महोदय, आपला यावर काय निर्णय आहे तो सांगावा.

सभापती : नियम 289 कसा आवश्यक आहे याचे समर्थन करण्यासाठी मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची परवानगी दिली. त्यावेळेला नियम 289 अन्वये चर्चा कशी आवश्यक आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

याबद्दल त्यांनी सांगणे आवश्यक होते. त्याबाबतीत ते बोलले. त्याशिवाय अन्य ते जे बोलले ते नियम 289 खाली चर्चा घेणे कसे आवश्यक आहे या अनुषंगाने आवश्यक नव्हते. तथापि नियम 289 अन्वये चर्चा करणे कसे आवश्यक आहे याबाबतीत ते बोलले. त्यानंतर सनमाननीय उपमुख्यमंत्र्यांनी या दुष्काळी व टंचाई सदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत काय केलेले आहे, पैसेवारी किती गावांची जाहीर केलेली आहे, विदर्भ, मराठवाडा व अन्य विभागात टंचाई सदृश्य परिस्थितीत प्राथमिक ज्या गोष्टी केल्या आहेत तेवढेच सांगितलेले आहे. तथापि खरीप टंचाईच्या परिस्थितीच्या अनुषंगाने अजून पुष्कळ गोष्टी जरुर करण्यात येणार आहेत असेही सांगितले. अशा त-हेने मी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर यासंदर्भातील निर्णय देतो. नियम 289 खाली ही चर्चा आता घेता येणार नाही. त्यामुळे आता प्रश्नोत्तराचा तास पुढे सुरु राहील.

श्री. आर. आर. पाटील :सभापती महोदय, नियम 101 खाली ही चर्चा घेण्यात यावी.

सभापती : आज नियम 97 अन्वये श्री. सावंत आयोगा संबंधीची चर्चा आहे. म्हणून दुष्काळ व टंचाई सदृश्य परिस्थिती बाबतची चर्चा सोमवार, दिनांक 21 मार्च, 2005 रोजी प्रश्नोत्तराचा तास झाल्या नंतर घेण्यात येईल. विदर्भ मराठवाडा आणि अन्य ठिकाणी या पुढच्या काळात कोणत्या गोष्टी कराव्या लागतील या अनुषंगाने साधक-बाधक चर्चा होईल. म्हणून मी नियम 97 अन्वये या चर्चेला सोमवार, दिनांक 21 मार्च, 2005 रोजी प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर परवानगी देत आहे. आता आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, श्री. आर.आर.पाटील परवानगी देत नाहीत, कमीत कमी तुम्ही तरी ही चर्चा करण्यास परवानगी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती : श्री. आर.आर. पाटल यांनी सुध्दा ही चर्चा करण्याची तयारी दर्शविली होती. ठीक आहे. यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक 1675 चर्चेला घेण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

अमरावती शहर एज क्त्मज रस्ते विज ास योज बाबतचा िधी

(1) * 1675 **श्री. -ातिज ोद्दी-न जातिब , श्री. वसंतराव जोटरे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. कम्ह. यू. डायजव्हाजे , श्री. वसंतराव जोटरे , श्री. -ा-ासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील** : स-मा-न-ीय सार्वजनि बांध ाम (सार्वजनि उप म) मंत्री पुढील ष्टींचा ुलासा रतील ाय :-
(1) "विदर्भ विज ास पॅज ेज" मध्ये अंतर्भूत असलेल्या अमरावती शहर एज क्त्मज रस्ते विज ास योज ेसाठी ज रज्यात आलेल्या 25 ज ोटी रुपयांच्या विशेष तरतुदींपैज ी आतापर्यंत ज िती नि िधी वितरीत ज रज्यात आला आहे,
(2) असल्यास, सदरहू ज ामाची सद्य:क्स्थती ज ाय आहे,
(3) सदरहू ज ामे त्वरित पूर्ज ज रज्याच्या दृष्टी-े उर्वरित नि िधी त्वरीत उपलब्ध ज रु-न देज्याबाबत शास-ाची भूमिज ा ज ाय आहे ?

श्री.अि ल देशमुज : (1) विदर्भ विज ास पॅज ेज अंतर्ज त अमरावती शहर एज क्त्मज रस्ते विज ासासाठी रु.25 ज ोटी ज र्ज रोजेद्वारा उभारावयाचे होते ते उभारज्यात आले आहेत.
(2) प्रज ल्पात समाविष्ट असलेल्या ज ामापैज ी रेल्वे उड्डाज पुलांचे ज ाम व भुयारी मार्जाचे ज ाम वज ळू-न सर्व ज ामे प्रज तीपथावर आहेत.
(3) विदर्भ विज ास पॅज ेज मध्ये प्रस्तावित रु.25 ज ोटी ह्या प्रज ल्पासाठी उपलब्ध आहेत.

श्री नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, इस प्रश्न का जो जवाब आया है, वह काफी दिशाभूल करने वाला है. माननीय मुख्यमंत्री ने विदर्भ विकास पॅकेज के संबंध में जो निवेदन किया था, उसमें " कर्जरोखे " का उल्लेख नहीं था, बल्कि "अधिक निधि देने संबंधी " का उल्लेख था.ऐसा होते हुए भी कर्ज रोखे दिए गए है. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि ये कर्ज रोखे क्यों दिए गए, कितनी राशि के कर्ज रोखे दिए गए है और ये कर्ज रोखे किस तारीख को दिए गए हैं ?

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे.कारण हा पुन्हा जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयोग होऊ नये. विदर्भ विकासाचे जे पॅकेज आहे, त्या पॅकेजमध्ये सरकारने निरनिराळया ठिकाणी अनुदान दिले असले तरी. . . .

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावतीचे पॅकेज जाहीर करण्याच्या आधी अमरावतीची एकात्मिक विकास योजना मंजूर झाली होती. त्याकरिता बँकेबल प्रोजेक्ट कसा करावयाचा ते झाले. त्यामध्ये कर्जरोखे काढावयाचे होते ते ठरले. त्याप्रमाणे ते पैसे उभे करीत आहेत. काही कामे सुरु आहेत. काही अडचणी आहेत. काळीवेळा सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख आणि आम्ही अनेक वेळा विचारविनिमय केला. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील देशमुख यांना सर्व माहिती आहे. विदर्भ पॅकेजमध्ये 25 कोटी कर्जरोख्यांव्दारे देणे हा कोणता नवीन चमत्कार आहे ? यामध्ये विदर्भ पॅकेजचा काय संबंध ? आजपर्यन्त तुम्ही हे इथे कशाला लिहिता ? विदर्भ पॅकेजमध्ये तुम्ही 25 कोटी रुपये जाहीर केले होते ते आधी वापस घ्या. त्यांनी चुकीचा उल्लेख केला आहे आणि तुम्हीही चुकीचा उल्लेख केला आहे. तो एमएसआरडीसी, आयआडीपी प्रकल्पाचा भाग आहे. त्यावर तुम्ही कर्ज काढता. मग हे पॅकेज तुम्ही नंतर जाहीर केले आहे काय ? आपण हे उत्तर दुरुस्त करावे. हे पॅकेज आहे की नाही ? ही काय भानगड आहे ? आम्हाला लिफाफा सुध्दा मिळालेला नाही. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दुरुस्त करावे ? हे खरे आहे की नाही ते सांगावे. तुम्ही जे लिहिले आहे ते चुक आहे की बरोबर आहे हे सांगितल्याशिवाय पुढे कसे जाणार ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अमरावती आयआरडीपीबद्दल प्रश्न विचारला. हा मूळ 114.47 कोटीचा आयआरडीपी प्रकल्प अमरावती शहराचे संपूर्ण रस्ते आणि सौदर्यीकरणासाठी मंजूर झाला होता. जवळजवळ 102 कोटीची कामे सध्या हातामध्ये घेतलेली आहेत. त्या ठिकाणी कामे जोरात चालू आहेत. हा 114 कोटीचा प्रकल्प होता तो संपूर्ण प्रकल्प आता एकूण 142 कोटीपर्यन्त गेलेला आहे. यामध्ये 25 कोटी रुपयांच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला त्यामध्ये 25 कोटी रुपये कर्जाव्दारे कॅनरा बँकेतून आपण उभे केलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : ते पॅकेजमध्ये कसे आले ?

श्री. अनिल देशमुख : यामध्ये विविध योजनांच्या माध्यमातून पैसे उभे केले आहेत. त्यामध्ये खासदार निधी, आमदार निधी, महापालिका, नगरविकास खाते, डीपीडीसी यांच्या माध्यमातून आपण संपूर्ण पैसे उभे केले आहेत. त्याच्या माध्यमातून ही संपूर्ण कामे आपण अमरावतीमध्ये करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहोत. मूळ प्रकल्प 114 कोटीचा होता त्याऐवजी 142 कोटीचा प्रकल्प केलेला आहे. 53 कामे हाती घेतलेली आहेत त्या 53 कामांपैकी 51 कामे चालू आहेत.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्याला उत्तर दिले पाहिजे. 14 फेब्रुवारी, 2002 चा मूळ शासन निर्णय आहे त्याप्रमाणे 40-50 कोटीचे कर्जरोखे काढावयाचे तो हा प्रश्न नाही. प्रश्न असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी विदर्भासाठी जे विशेष पॅकेज जाहीर केले त्यातील 25 कोटी रुपये मिळाले काय हा प्रश्न आहे. त्यामध्ये कर्जरोख्याचा संबंध नाही. मी जो प्रश्न दिला होता त्यामध्ये चौथ्या क्रमांकाचा प्रश्न असा होता की, मानव विकास अहवाला 2002 प्रमाणे विदर्भातील सर्व जिल्हे राज्य सरासरीच्या खाली आहेत व राज्यपालांनी नेमलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालाप्रमाणे विदर्भात मोठया प्रमाणावर अनुशेष आहे या दोन गोष्टी लक्षात घेऊन मंत्रिमंडळाने 17 डिसेंबर, 2004 रोजी विदर्भ विकास पॅकेज बाबतचा निर्णय घेतला ही गोष्ट खरी आहे काय ? जरी तो प्रश्न डिलीट झाला असला तरी विदर्भ पॅकेजबद्दल यामध्ये प्रश्न आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीलाच सभागृहामध्ये जाहीर केले की, " महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल सन 2002 तयार करण्यात आला असून त्यामध्ये विदभातील नागपूर वगळता सर्व जिल्हे हे मानव विकासाच्या बाबतीत राज्य सरासरीच्या खाली आहेत. तसेच माननीय राज्यपालांनी नेमलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार विदर्भात मोठया प्रमाणावर अनुशेष आहे हे देखील स्पष्ट झालेले आहे." पुढे त्यांनी असे म्हटले आहे की," राज्यास आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोत. आर्थिक अडचण आहे म्हणून आम्ही गप्प बसणार नाही. विदर्भाचा विकास करणे हे आमचे ध्येयच आहे." हे माननीय मुख्यमंत्र्यांचे वाक्य आहे. पहिल्यांदा ते पाटबंधाऱ्याबाबत बोलले त्यानंतर रस्त्यांबाबत बोलले. त्याविषयीचे वाक्य आहे ते मी वाचून दाखवतो. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, " रस्ते विकासाच्या बाबतीत नागपूर एकात्मिक रस्ते प्रकल्पासाठी 35 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अमरावतीच्या एकात्मिक रस्ते प्रकल्पासाठी रुपये 25 कोटींची तरतूद केली आहे." हे वाक्य आहे. यामध्ये कर्जरोख्याबाबत काही नाही. मूळ 2002 च्या निर्णयाप्रमाणे जे आहे त्याप्रमाणे कर्जरोखे तुम्ही काढा. हे निवेदन 18.12.2003 चे आहे. आम्ही विदर्भातील सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ RJW/ SBT

ता. प्र. क्र. 1675..... प्रा. बी. टी. देशमुख .....

आमदारांची बैठक बोलाविली होती. विशेष निधी म्हणून हे 25 कोटी दिलेले आहेत. तर तसे ते दिले आहेत काय असा प्रश्न आहे. मानव विकास अहवालाबद्दल मंत्रिमंडळाने विचार करुन हा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1675.. प्रा.बी.टी.देशमुख..

तुम्ही जे कर्जरोखे काढणार होते ते पुन्हा काढण्यासाठी 2-2 जी.आर.काढण्याची आवश्यकता नाही. या मानव विकास अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, सबंध महाराष्ट्राचा जो निर्देशांक आहे तो 0.58 इतका आहे. नागपूर जिल्हा सोडला तर विदर्भातील सर्व जिल्हे निर्देशांकाच्याखाली आहेत. महाराष्ट्र शासनाचा अधिकृत अहवाल आहे त्याबाबत सांगण्यास वाईट वाटते, पण दुर्दैवाने ही गोष्ट खरी आहे की, पिण्याच्या पाण्याची सोय किती कुटुंबांना उपलब्ध आहे तर 68.49 टक्के लोकांना आणि विदर्भातील सर्व जिल्हे या राज्य सरासरीच्या खाली आहेत. संडास ही सुविधा किती लोकांना उपलब्ध आहे, याचा निर्देशांक राज्याचा 29.56 टक्के इतका आहे, याबाबत नागपूर जिल्हयाचा अपवाद सोडला तर विदर्भ, मराठवाडयातील सर्व जिल्हे राज्यसरासरीच्या खाली आहेत. या परिस्थितीचा विचार करुन मंत्रिमंडळामध्ये या पॅकेजबाबत निर्णय घेतला. या पॅकेजमध्ये असे म्हटले आहे की, 25 कोटीची अधिकची तरतूद केली जाईल. हे मुख्यमंत्र्यांचे शब्द आहेत. त्यांनी दि.18.12.2003 रोजी जे म्हटले आहे ते कार्यवाहीच्या पृष्ठ क्र.4आय-1 वर आहे. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, " दि.17.12.2003 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विदर्भ विकासाचा आढावा घेण्यात आला व हाती घेतलेली कामे कशी पूर्ण करता येतील, याबाबत सखोल चर्चा केली व आर्थिक अडचण आहे म्हणून गप्प न बसता त्यावर मात करुन चालू वर्षी रु.748 कोटी विदर्भात अधिकचे खर्च करुन विदर्भाचा सर्वांगीण विकास करण्याचे ठरले आहे." म्हणजे अधिकचे खर्च करु, कर्ज नाही. मी पॉईन्टेड प्रश्न विचारतो. तुम्ही आम्हाला कर्जरोख्याचे सांगू नका, ती 2002 ची गोष्ट आहे. मा.मुख्यमंत्र्यांनी निवेदन करुन या योजनेसाठी 25 कोटी रुपयाचा निधी अतिरिक्त उपलब्ध करुन देऊ असे जे म्हटले त्याबाबतचे आदेश आठ दिवसामध्ये काढले जातील काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.अनिल देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगत आहे की, जवळजवळ 102 कोटीची कामे हाती घेतली आहेत...

प्रा.बी.टी.देशमुख : हा प्रश्न नाही. माझे म्हणणे असे आहे की, किती कोटीची कामे चालू आहेत हे मी विचारलेले नाही. मी या सभागृहाचे आभार मानतो. हा प्रश्न थांबवून ठेवल्यानंतर मा.मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर त्या एमएसआरडीसीने आदेश काढले होते. ते आदेश

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहामध्ये दाखल केले होते, मी श्री.विक्रमसिंह पाटणकर आणि सभागृहाचे मी आभार मानतो, आम्हाला न्याय मिळाला.

श्री.अनिल देशमुख : मा.सदस्यांचे माझ्या उत्तराने समाधान झाले नाही तर ते पुन्हा प्रश्न विचारु शकतात.

सभापती : मंत्रिमहोदय, या चर्चेमध्ये अमरावती एकात्मिक रस्ते विकास यासाठी 25 कोटीचा उल्लेख होता त्यासंबंधीचा प्रश्न मा.सदस्यांनी विचारलेला आहे. त्या मुद्दाला धरुन आपण उत्तर देण्याचा प्रयत्न करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, 102 कोटीचा प्रकल्प उभा केला आहे तो पूर्ण करण्यासाठी विविध माध्यमातून पैसे उपलब्ध करीत आहोत.

श्री.नितीन गडकरी : अगोदर 25 कोटीची माहिती द्यावी.

श्री.अनिल देशमुख : यामध्ये कर्जरोखे आहेत, बँकेकडून कर्ज घ्यावयाचे आहे, महानगरपालिका, नगरपालिकाकडून पैसे जमा करणार आहेत, तसेच आपण कॅनरा बँकेतून 25 कोटीचें कर्ज सुध्दा उभे केलेले आहे. मा.मुख्यमंत्र्यांनी जो अतिरिक्त निधी अमरावतीसाठी 25 कोटी आणि नागपूरसाठी 35 कोटी देऊ असे जाहीर केले होते, त्या 60 कोटीची अतिरिक्त तरतूद बजेटमधून करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अतिरिक्त तरतूद बजेटमध्ये करण्यात येईल म्हणजे हा सगळा गोपाळकाला झाला. गोपाळकाला कसा झाला ते सांगतो. मा.सदस्य श्री.रावतेसाहेबांनी त्या चर्चेनंतर सरळ प्रश्न विचारला होता. ते असे म्हणाले होते की, "सभापती महोदय, मा.मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले त्याबद्दल धन्यवाद देण्यासारखी परिस्थिती आहे. परंतु माझ्याकडे पहिल्या दोन मुख्यमंत्र्यांची भाषणे आहेत आणि आताचेही भाषण आहे, अगोदरची परिस्थिती होती ती आता होणार नाही "असे सांगितल्याने मी त्यांना धन्यवाद देतो. तसेच हे काम स्पील ओव्हरमध्ये केले जाईल त्याबद्दल सुध्दा धन्यवाद देऊ इच्छितो. हे मा.मुख्यमंत्र्यांच्या निवेदनातील शब्द आहेत.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / परिपृच्छासाठी नाही

(ता.प्र.क्र. 1675 पुढे सुरु...) (प्रा. बी.टी.देशमुख पुढे सुरु...

सभापती महोदय, मा. मुख्यमंत्र्यांचे 18.12.2003च्या निवेदनातील शब्द मी पुन्हा वाचून दाखवतो. ते म्हणाले, "साधारणपणे विदर्भासाठी पॅकेज तयार होते, परंतु निधी उपलब्ध होत नाही अशी तक्रार नेहमी केली जाते. यावेळी मात्र असे निश्चित होणार नाही असे मी सांगू इच्छितो. यातील काही कार्यक्रम पुढच्या वर्षी स्पिलओव्हर होतील. परंतु कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत आणि निधी बाबत कोणीही मनात संदेह बाळगू नये" असे मा. मुख्यमंत्री म्हणाले. आमच्यावतीने मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मा.मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. आता माननीय मंत्री महोदय म्हणतात की, तरतूद करु. हे असे चालणार नाही. पॅकेजबाबतचा जी.आर. माझ्या हातात आहे. तेव्हा मा.सदस्यांनी यासंदर्भात 8-10 दिवसामध्ये हा निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे स्पष्ट मुदत बंद निवेदन सभागृहात केले पाहिजे. एक वर्ष वाया गेलेले आहे. चार-चार हजार कोटीचे प्रकल्प एकेका महसूली विभागात झाले आणि येथे फक्त 114 कोटीचे कौतुक चालू आहे. हे कौतुक थांबवा. निधीची तरतूद करा. तेव्हा 8-10 दिवसामध्ये हा निधी उपलब्ध करुन दिला जाईल याबाबतचे निवेदन सभागृहात केले जाईल काय ? मा. मुख्यमंत्र्यांची तसेच मंत्रिमंडळाची शान राखण्यासाठी हे निवेदन करणे आवश्यक आहे आणि म्हणून हा माझा प्रश्न आहे.

श्री. अनिल देशमुख : मी उत्तरामध्ये सांगितले आहे की, मा. मुख्यमंत्र्यांनी शब्द दिलेला आहे. 25 कोटी रु. अमरावतीसाठी आणि 35 कोटी रु. नागपूरसाठी असे एकूण 60 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातील.... लवकरात लवकर उपलब्ध करुन दिले जातील.

श्री. नितीन गडकरी : मघाशी मा. मंत्री महोदय म्हणाले की, नागपूरसाठी 35 कोटी रु. आणि अमरावतीसाठी 25 कोटी रु., याची तरतूद बजेटमध्ये करण्यात येईल. मग 21 तारखेला जे बजेट सादर होणार आहे त्या बजेटमध्ये नागपूरसाठी 35 कोटी रु.ची आणि अमरावतीसाठी 25 कोटी रु.ची विशेष तरतूद होणार आहे असे मी समजतो.

श्री. अनिल देशमुख : याची तरतूद आम्ही नक्की करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासावे. मंत्री महोदय असे म्हणाले की, 25 कोटी रु. अमरावतीसाठी आणि 35 कोटी रु. नागपूरसाठी, याची बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल. याचा अर्थ 21 तारखेला जे बजेट सादर होणार आहे त्यामध्ये ही तरतूद होणार आहे, असे मी समजतो. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1675 पुढे सुरु...)

श्री. अनिल देशमुख : नागपूरसाठी 35 कोटी रु.आहेत याची मी आठवण करुन दिली. तेव्हा अमरावतीसाठी 25 आणि नागपूरसाठी 35 असे 60कोटी रु. येत्या बजेटमध्ये समाविष्ट करण्यात येतील...

प्रा. बी.टी.देशमुख : या बजेटमध्ये मंत्री महोदयांनी तरतूद करतो असे सांगितले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

श्री. नितीन गडकरी : 21 तारखेच्या बजेटमध्ये 60 कोटी रु.ची तरतूद करण्यात येणार आहे, त्याबद्दल मी मा. मंत्री महोदयांना धन्यवाद देतो.

श्री. दिलीप देशमुख : बजेटमध्ये काय तरतूद होईल हे मा.मंत्री महोदयांना आताच कसे सांगता येईल ? प्रयत्न करतो असे म्हटले तर ते समजण्यासारखे आहे. तेव्हा मा. मंत्री महोदयांना नेमके काय म्हणावयाचे आहे ?

श्री. अनिल देशमुख : याची तरतूद करण्यात येईल. या बजेटमध्ये तरतूद केली नसेल तर सप्लीमेंटरी बजेटमध्ये तरतूद करु.

श्री. नितीन गडकरी :.... सभापती महोदय, मला संरक्षण हवे....

सभापती : माननीय सदस्यांनी सातत्याने मांडलेल्या भावना पूर्णत: मान्य करण्याच्या दृष्टीने मंत्री महोदयांनी वक्तव्य केलेले आहे. तांत्रिक चूक राहू नये याचीही दखल घेणे आवश्यक आहे. आता या सदनामध्ये "तरतूद केली " असे म्हटले तर तो हक्कभंग होईल. तेव्हा अशा प्रकारची कोणतीही अडचण न येता मा. सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने मंत्री महोदय प्रयत्न करतील.

...नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : आपण जो मुद्दा मांडला तो माझ्या लक्षात आला आहे..

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे..

प्रा. बी.टी.देशमुख : आपण जो मुद्दा मांडला तो माझ्या लक्षात आलेला आहे. मी ठामपणे एकच प्रश्न विचारु इच्छितो की, याबाबतीत निधीची तरतूद केली जाईल असे सांगण्याचा माननीय मंत्र्यांना म्हणायचे आहे. ती तरतूद केल्याबाबतचे निवेदन येत्या 15 दिवसात सभागृहात करण्यात येईल काय ?

श्री. अनिल देशमुख : ठीक आहे. बजेटची पुस्तके छापली गेली असतील व बजेटमध्ये तरतूद येण्यास अडचण निर्माण झाली तर या संदर्भात 15 दिवसात तरतूद करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता. सभापती महोदय,मी पुन्हा सांगतो 15 दिवसात यासंबंधी तरतूद करुन देण्यात येईल. बजेटमध्ये ही बाब येणार असेल तर अडचण नाही. परंतु अडचण येणार असेल तर 15 दिवसात या अनुषंगाने तरतूद करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : 15 दिवसात तरतूद करण्यात येईल असे सांगितले गेले. आता माझ्या दृष्टीने एकच महत्वाचा प्रश्न शिल्लक आहे तो म्हणजे याबाबतचे निवेदन सभागृहात करण्यात येईल काय ? जवळपास या गोष्टीस एक वर्ष होऊन गेलेला आहे..

श्री.अनिल देशमुख :सभापती महोदय, आता मी फ्लोअरवर कबूल केलेले आहे. यानंतर दुसरा शब्द देण्याची काय आवश्यकता आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : यासंबंधीच्या कार्यवाहीबाबतचे 15 दिवसांनी सभागृहात निवेदन केले जाईल काय ?

सभापती : याबाबतीत सभागृहात 15 दिवसात निवेदन करा.

श्री. अनिल देशमुख : निवेदन करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये जेव्हा एखादा प्रश्न विचारतो. तेव्हा अनेका वेळेला असे उत्तर दिले गेलेले आहेत की, या संदर्भाची तरतूद बजेटमध्ये करण्यात येईल. असे शंभर दाखले माझ्याकडे उपलब्ध आहेत. बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल असे म्हटल्यामुळे बजेट फुटत नाही. या आधी 100 आश्वासने या सभागृहात दिले गेलेले आहेत. "ही बाब बजेट तरतूदीसाठी अडलेली आहे,या वर्षी बजेटमध्ये तरतूद करण्यात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येईल." अशा प्रकारच्या आश्वासनांचे 100 दाखले मी देऊ शकतो. सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, मी सन्माननीय श्री.अनिल देशमुख साहेबांचे अभिनंदन केले. त्यांनी माझ्या प्रश्नाला उत्तर देत असताना त्यांनी असे सांगितले आहे की, या वर्षीच्या बजेटमध्ये 35 कोटी रुपये नागपूरसाठी व 25 कोटी रुपये अमरावतीसाठी तरतूद करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांची क्षमा मागून सांगतो की," अशा प्रकारे तरतूद करण्यात येईल " असे आश्वासन देणे हा आश्वासन समितीचा भाग आहे. त्यासाठी वेगळा विभाग आहे. त्यांच्या विभागाच्या बजेटमध्ये अशा प्रकारचे पैसे देण्याचे ते आत्मविश्वासने ते बोलले. त्या अर्थी तरतूद करण्यात येईल असे म्हणाले आहेत. आश्वासने अनेक वेळा दिली जातात. त्यांनी असे म्हटले नाही की, 35 कोटी नागपूरचे आणि 25 कोटी रुपये अमरावतीचे येणा-या बजेटमध्ये तरतूद आहे. असे जर त्यांनी म्हटले असते तर बजेट फुटला असता. त्यांनी सांगितले की, तरतूद करण्यात येणार आहे.या दोन बाबतीतील फरक लक्षात घेता व मंत्री महोदयांचे रेकॉर्डवरचे वाक्य लक्षात घेता ते काहीही चुकलेले नाही. त्यांचे मी समर्थन करतो. त्यांनी दिलेले आश्वासन रेकॉर्डवर तसेच राहिले पाहिजे. मला निश्चितपणे विश्वास आहे, ते विदर्भातील बाणेदार मंत्री आहेत, ते निश्चितपणे आम्हाला न्याय देतील. त्यांच्यावर आपण अन्याय करु नका. त्यांचे जे रेकॉर्डवरील वाक्य आहे ते तसेच ठेवा.सन्मानीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांनी सिक्रेसी ऑफ बजेटचा मुद्दा उपस्थित केला. यात सिक्रेसी ऑफ बजेटचे उल्लंघन झालेले नाही.

सभापती : सिक्रेसीच्या अनुषंगाने येत्या बजेटमधील कोणतीही गोष्ट फुटणार नाही याची दक्षता घेऊन त्यांनी जे भाष्य केलेले आहे ते तपासून घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांना सांगतो की, माननीय मंत्र्यांनी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे असे ते म्हणाले.

सभापती : माझे विरोधी पक्ष नेत्यांना सांगणे आहे की, आपण आता शब्दच्छल न करता हा विषय येथे संपवून टाकू. फक्त एवढी आपण काळजी घेऊ त्यांनी अशा पध्दतीच्या शब्दामध्ये न अडकता सदनाला जे शब्द दिले आहेत ते पाळायचे आहेत.

श्री. अनिल देशमुख : सदनाला जो शब्द दिलेला आहे तो शब्द शासन नक्की पाळेल.

सभापती : या प्रश्नावरील चर्चा संपलेली आहे आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

यानंतर श्री.उपरे..

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

अमरावती जिल्ह्यातील सातखिराडी परिसरात गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन जिवित व वित्त हानी झाल्याची घटना

(२) * ३५०९ श्री. जगदिश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) अमरावती जिल्हयातील स्थानिक सातखिराडी परिसरातील जुनी टाकसाळ येथील झवर बिल्डींगमध्ये लागलेल्या भीषण आगीत दि. १६.१.२००५ रोजी वा त्यासुमारास स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन घरे तसेच लाखो रुपयांचे नुकसान होऊन वित्त हा-ी व म-ुष्यहा-ी झाली आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. आर.आर.पाटील : (१) होय हे खरे आहे. रु.९,७०,००० इतक्या रक्कमेची वित्त हानी झाली आहे. जिवित हानी झालेली -ाही.

(२) होय.

(३) उपरोक्त इमारतीत घरगुती गॅससिलेंडरचा स्फोट होवून घरांना आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी घरातील गॅस सिलेंडर मधून आगीपूर्वी गॅसची गळती झाली किंवा कसे याचे तपासणी करीता फुटलेले गॅस सिलेंडरचे तुकडे व जळालेली रबरी ट्युब ही -यायसहाय्यज वैज्ञानिज प्रयोगशाळा, नागपूर येथे तपासणीस पाठविलेली आहे अहवाल प्राप्त झालेला -ाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जगदिश गुप्ता : सभापती महोदय, हा प्रश्न विचारण्याचे मूळ कारण असे आहे की, या घटनेमुळे अत्यंत गरीब अशी तीन कुटुंबे उद्वस्थ झाली आहेत. त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी दिलासा देऊन कोणी कपडे आणि भांडी देऊन त्यांना मदत केलेली आहे. त्यांना मदत करणे हे आपल्या नियमामध्ये आणि कायद्यामध्ये बसत नाही. परंतु खास बाब म्हणून त्यांना शासन मदत करील काय ?

श्री.आर.आर.पाटील : या कुटुंबाच्या संदर्भात आपल्याला जे जाणवले ते ब्रिफिंगच्या वेळी मलाही जाणवले. म्हणून यामध्ये कोणी गरीब आहे काय ? यासंदर्भात जिल्हाधिका-यांकडून आजच अहवाल मागविला आहे. ही गरीब माणसे असतील तर निकषांमध्ये बसत नसले तरी मुख्य मंत्र्यांच्या सहाय्यता निधीमधून त्यांना मदत करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ RJW/ SBT

औरंगाबाद शहरातील नुपूर टॉकीजचे मालक व बुलढाण्याचे डी.वाय.एस.पी. श्री.हिरासिंग जाधव यांनी दारुच्या नशेत एका व्यक्तीस बेदम मारहाण केल्याबाबत

(३) * १६७८ श्री. श्रीकांत जोशी , श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्री. नितीन गडकरी : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील नुपूर टॉकीजचे मालक व बुलढाण्याचे डी.वाय.एस.पी. श्री.हिरासिंग जाधव यांनी दिनांक २६ डिसेंबर,२००४ रोजी वा त्या सुमारास दारुच्या नशेत नारंगी दिव्याच्या स्वत:च्या गाडीतून येऊन टॉकीजमधून बाहेर निघण्याच्या कारणावरुन श्री.पंकज भारसाखळे हया व्यक्तीस बेदम मारहाण केल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त प्रकरणी चौकशी केली नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.आर.आर.पाटील : (१) होय.

(२), (३) व (४) या प्रकरणी पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे गु.र.क्र.२३०/०४ भादंवि कलम १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयात पोलीस उपअधिक्षक हिरासिंग बिसुजी जाधव यांच्यासह १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1678.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पोलीस खात्यामध्येसुध्दा अत्यंत भ्रष्ट आणि अत्यंत मस्ती आलेले अधिकारी आहेत. खरे म्हणजे त्यांना गब्बरसिंगचीच उपमा दिली पाहिजे. असे अधिकारी अजून त्या ठिकाणी टिकून आहेत आणि त्यांच्यावर काहीच ॲक्शन होत नाही. यासंदर्भात एक प्रकरण मी आपल्याला सांगतो. 26 डिसेंबरला बुलढाणा येतील डी.वाय.एस.पी. श्री. हिरासिंग जाधव हे खाजगी गाडीला नारंगी दिवा लावून संभाजी नगरला आले. तेथे पावणेचार कोटी रुपयांचे एक थिएटर त्यांनी विकत घेतलेले आहे. त्या थिएटर मालकाने असे सांगितले की, मी आतापर्यंत ब-याच जणांशी व्यवहार केले. बजाजशीसुध्दा व्यवहार केला. पण पावणे चार कोटी रुपयांच्या नोटा टेबलवर ठेवणारा एकच माणूस बघितला आणि तो म्हणजे डी.वाय.एस.पी. श्री.हिरासिंग जाधव . एवढेच नाही तर त्यांचे गारखेडा येथे मंगल कार्यालय आहे, 35 एकर बागायती जमीन आहे. त्यांची संपत्ती किती आहे? या विषयी सांगणेसुध्दा अवघड आहे. आणि याची जेव्हा जेव्हा चौकशी झाली त्यावेळी ती चौकशी तेथल्या तेथे दाबली गेली. त्यांची आतापर्यंत कोणीही चौकशी करू शकले नाही. हे सगळ्या वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. त्याची कात्रणे आहेत. एक राजकीय पक्षाचा कार्यकर्ता इंटरव्हलमध्ये बाहेर जाण्याचे म्हणत होता. त्यावेळी त्याने असे सांगितले की, इंटरव्हलमधून तुम्हांला बाहेर जाता येणार नाही. आमचा तसा नियम आहे. ज्यावेळी त्यांनी आमदारांची ओळख सांगण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, असे 40-50 आमदार मी खिशात ठेवतो. अख्खे गृह मंत्रालय मी विकत घेतलेले आहे. माझे कोणीच वाकडे करू शकत नाही. असे सांगून त्याने त्याला बेधम मारहाण केली. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला आणि संभाजी नगरचे खासदार श्री.खैरेसाहेब यांना 9 तास पोलीस स्टेशनमध्ये बसावे लागले. तरी त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल होत नव्हता. गुन्हा दाखल केल्यानंतर आम्ही त्यांना सांगितले की, साधे खरचटले तर नॉन बेलेबल ऑफेन्स दाखल केला जातो. या ठिकाणी तर त्या माणसाला मरेपर्यंत मारले होते आणि रक्तबंबाळ केले होते. अक्षरश: रक्तबंबाळ होऊन तो 12 दिवस हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होता. त्याचा डोळा फुटला आहे. मी त्याचा फोटो आपल्याला दाखवू शकेन. संपूर्ण डोळा आणि संपूर्ण शरीर रक्तबंबाळ झालेले आहे. एका विद्यार्थ्याला एवढे मरेपर्यंत मारल्यानंतरसुध्दा नॉन बेलेबल ऑफेन्स दाखल करण्यात आलेला नाही. त्यानंतर मी स्वत: माननीय गृह मंत्र्यांची भेट घेतली. माननीय गडकरीसाहेबांनी फोन केला आणि पत्रही दिले. त्याच्यावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1678.

(श्री.श्रीकांत जोशी)

ताबडतोब चौकशी करा म्हणून गृहमंत्र्यांनी एंडॉर्समेंट दिले पण आतापर्यंत काही झालेले नाही. हा मदमस्त अधिकारी आजसुध्दा मोकाट फिरत आहे. पिवळ्या दिव्याच्या गाड्या घेऊन बिनधास्त फिरत आहे. दारूच्या नशेत त्यांने मारहाण केलेली आहे. त्यामुळे मला दोन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. पिवळ्या गाडीच्या अवैध वापराचा गुन्हा दाखल का करण्यात आला नाही ? त्याचबरोबर मी निवेदन दिले होते त्याप्रमाणे कलम 307, 341, 395 चे नॉन बेलेबल ऑफेन्स होते. रक्तबंबाळ अवस्थेत ग्रिव्हीयस इंज्युरिची कलमे लावून नॉन बेलेबल ऑफेन्सने त्याला गजाआड करण्याची गरज होती. पण तसे न करता सोपी कलमे लावून त्याला लगेच चार तासात जामीन मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली. तरी आतापर्यंत याची चौकशी का करण्यात आली नाही आणि मी सांगितलेली कलमे का लावण्यात आली नाहीत ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संपूर्ण घटनेची माहिती मी घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या पध्दतीने जे गुन्हे केलेले आहेत त्याप्रमाणे कलमे लावली नसतील तर हा संपूर्ण तपास पुन्हा एकदा तपासण्यात येईल. ही गोष्ट सिध्द झालेली आहे की, दारु पिऊन मारहाण करण्यात आलेली आहे आणि महाराष्ट्राच्या पोलीस दलाला ही गोष्ट भूषणावह नाही. तरी या डी.वाय.एस.पी.ला निलंबीत करण्याचे आदेश आजच काढले जातील. त्यांची जी जादा संपत्ती आहे त्याबाबत ए.सी.पी.मार्फत चौकशी केली जाईल आणि हा गुन्हा कशा पध्दतीने तपासला आहे, कोणती कलमे लावली आहेत याची ॲडीशनल डी.जी.मार्फत चौकशी केली जाईल.

(यानंतर श्री.गायकवाड)

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1678..

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु आपण अशी कल्पना करु या की, जर या संबंधीचा प्रश्न विधिमंडळात विचारला गेला नसता तर काय झाले असते ? या प्रकरणातून चुकीचा मेसेज बाहेर जात आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या संदर्भात जो काही विलंब लागलेला आहे त्याची संगती कशी लावावयाची? ज्यांनी विलंब लावला आहे त्या ... अधिका-याविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात ? सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी येथे जे काही सांगितलेले आहे त्याची बातमी वर्तमानपत्रात येऊन गेलेली आहे.माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो परंतु या प्रकरणात विलंब झाला आहे हे तरी आपण मान्य करणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : त्यांच्याविरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहे, त्यांना अटक करण्यात आलेली आहे तसेच ते डी.वाय.एस.पी असतांनासुध्दा त्यांची वैद्यकीय चाचणी घेण्यात आलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियमानुसार शासकीय नोकराला कोणताही धंदा करता येत नाही.प्रश्नामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, औरंगाबाद शहरातील नुपूर टॉकीजचे मालक व बुलढाण्याचे डी.वाय.एस.पी.श्री.हिरासिंग जाधव यांनी एका व्यक्तीला मारहाण केलेली आहे. जो शासकीय कर्मचारी आहे त्याला धंदा करता येतो अशी नवीन तरतूद नियमामध्ये करण्यात आलेली आहे काय ? त्याचबरोबर डी.वाय.एस.पी.श्री.हिरासिंग जाधव हे एकाच ठिकाणी किती कालावधीपासून होते आणि आता ते कोणत्या ठिकाणी आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : सध्या ते बुलढाणा जिल्हयामध्ये आहेत. ते औरंगाबाद जिल्हयात नाहीत.पोलीस अधिका-याचे कुटूंबीय अन्य व्यवसाय करु शकतात.

श्री.जयंत प्र.पाटील : त्यांच्या नावावर हे थिएटर आहे. का ?

श्री.आर.आर.पाटील : त्यांच्या नावावर नसून त्यांच्या कुटूंबियांच्या नावावर आहे.

श्री.वसंतराव काळे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी उपस्थित केलेला मुद्दा मुलभूत आहे तेव्हा सरकार यासबंधी गंभीरपणे काही भूमिका घेणार आहे की नाही? या संबंधी जर याठिकाणी प्रश्न उपस्थित केला गेला नसता तर श्री.जाधव बाहेर असेच ओरडत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राहिले असते की माझे हात वर पर्यन्त पोहोचलेले आहेत, संपूर्ण गृह खाते माझ्या ताब्यात आहे.पोलीस खात्यात असे अनेक नग,महानग आहेत. तेव्हा अशा व्यक्तिविरुध्द जेव्हा तक्रार करण्यात येते तेव्हा त्याबद्दल त्वरित दखल घेण्यात आली पाहिजे.त्यासंबंधीचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात येवो अथवा न येवो, परंतु अशा व्यक्तीविरुध्द आलेल्या तक्रारीच्या बाबतीत गृह खात्यामार्फत अशा व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी एक स्वायी स्वरुपाची यंत्रणा शासन निर्माण करणार आहे काय ?अशा प्रकारे एखाद्या व्यक्तीच्या संपत्तीच्या बाबतीत तक्रार करण्यात आली असेल तर त्यासंबंधीचा प्रश्न येथे उपस्थित होण्याच्या आत त्याची चौकशी करुन ती संपत्ती शासन जप्त करणार आहे काय ?तसेच यासबंधीची चौकशी करणार आहे काय व त्यासाठी स्थायी यंत्रणा उभी करण्यात येणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील :पोलीस दलामध्ये अशा प्रकारचे अनेक नग आहेत असा उल्लेख संपूर्ण पोलीस दलाची बदनामी करणारा आहे. या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत नाही.चुकीच्या पध्दतीने वागणारे लोक सगळयाच क्षेत्रात असतात. कोणतेही क्षेत्र असे नाही की ज्या ठिकाणी 100 टक्के साधू आहेत. जे लोक चुकीचे वागतात त्याच्या विरुध्द कठोर कारवाई करण्याची भूमिका निश्चितपणे घेतली आहे.अधिकृतपणे एखाद्याच्या विरुध्द पुराव्यानिशी माहिती दिली तर तो अधिकारी कोणत्याही स्तरावरील असला तरी वा कोणत्याही विभागाचा असला तरी त्याच्या विरुध्द कारवाई करण्याचे शासनाचे धोरण आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : या संबंधीचा चौकशी करण्यात येईल तसेच त्या अधिका-याला निलंबित करण्यात येईल असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे परंतु.यासंबधीचा कालावधी सांगण्यात यावा. याकरता काही तरी टाईम बाऊन्ड प्रोग्राम असला पाहिजे असे मला वाटते. तेव्हा दोन महिन्याच्या आत ही कारवाई पूर्ण करणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : जो गुन्हा घडलेला आहे त्या बाबतीत व्यवस्थितपणे तपास केला आहे काय ? तसेच कलमे बरोबर लावलेली आहेत काय ? याची चौकशी दोन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल तसेच ॲन्टी करप्शन बुरोकडील चौकशी सहा महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहमदनगर शहरातील बेपत्ता झालेल्या शालेय विद्यार्थि□ी

(४) * ३८५६ श्री. यशवंतराव गडाख : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील □ाय :-

(१) अहमदनगर शहरातील कन्या विद्या मंदीर शाळेतील दोन विद्यार्थींनी दिनांक १-२-०५ रोजीचे दरम्या-ा बेपत्ता झाल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेपत्ता मुलींचा शोध लागला आहे काय,

(३) यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक घटना अहमदनगर शहरात घडल्या असून त्याकरिता केलेली प्रतिबंधक उपाययोजना कोणती ?

श्री.आर.आर.पाटील : (१) होय, अहमदनगर शहरातील कन्या विद्यामंदिर शाळेतील दोन विद्यार्थींनी दिनांक ३१.१.२००५ रोजी त्यांच्या शाळेतील निरोप समारंभाचा कार्यक्रम संपल्यानंतर त्या दोघी मैत्रिणी नाशिक येथे देवदर्शनासाठी घरातील नातेवाईकांना अगर शिक्षकांना काही न सांगता निघून गेल्या होत्या.

(२) होय. सदर मुली दिनांक ३.२.२००५ रोजी परत आल्या आहेत.

(३) अशा घटना घडू नयेत म्हणून शहरात बिट मार्शल पथक नेमले आहे तसेच सेक्शन हद्दीतील अधिकारी व कर्मचारी यांनी शाळा / कॉलेज यांचे मुख्याध्यापकांची समक्ष भेट घेऊन चर्चा करुन प्रत्येक शाळा / कॉलेजमध्ये तक्रारपेटया लावल्या असून छेडछाडीचे प्रकार घडू नये याकरिता छेडछाडविरोधी पथक नेमण्यात आले आहे.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती रेल्वे स्टेशन बंद करण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने संमती न देणे

(५) * १६७९ श्री. रमेश निकोसे , श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती रेल्वे स्टेशन बंद करण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने संमती द्यावी अशी विनंती करणारे एक पत्र मध्य रेल्वेच्या मुख्य प्रशासकिय अधिकारी (बांधकाम) यांनी दिनांक १९ ऑगस्ट २००४ रोजी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना पाठविले हे खरे आहे काय,

(२) रेल्वेच्या उपरोक्त प्रस्तावास तीव्र विरोध करणारे एक निवेदन अमरावती रेल्वे स्थानक संघर्ष समितीच्या वतीने दिनांक २८-१२-२००४ रोजी किंवा त्या दरम्यान मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग यांना सादर केले हे खरे आहे काय,

(३) शास-ाच्या विनंतीवरुन याबाबतची समग्र वस्तुस्थिती स्पष्ट करणारे एक तपशीलवार पत्र मा.विभागीय आयुक्तांनी दिनांक ७ जानेवारी २००५ रोजी किंवा त्या दरम्यान शासनाला पाठविले हे खरे आहे काय,

(४) असल्यास शासनाने याबाबतीत काय निर्णय घेतलेला आहे ?

श्री.सुरुपसिंग नाईक : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर विषयाबाबत मध्य रेल्वे प्रशासनाने दिनांक १९ ऑगस्ट, २००४ रोजी शासनास पत्र पाठविले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने मध्य रेल्वे प्रशासनास दिनांक १९.१.२००५ रोजी बडनेरा-अमरावती-नारखेड नवीन रेल्वे पूर्ण होऊन प्रवासास व मालवाहतूक कार्यान्वित झाल्याशिवाय जुना मार्ग बंद करण्याचा विचार करता येणार नाही असे कळविले आहे. या विषयावर संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची एक बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय,या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या उत्तरामध्ये शासनाने अतिशय चुकीची भूमिका घेतली असल्याचे दिसून येत आहे.माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, शासनाच्या विनंती वरुन समग्र वस्तुस्थिती स्पष्ट करणारे एक तपशीलवार पत्र विभागीय आयुक्तांनी 7 जानेवारी 2005 रोजी वा त्या दरम्यान शासनाला पाठविले होते हे खरे आहे काय ?.त्या पत्रामध्ये निरनिराळी पाच सहा कारणे देऊन विभागीय आयुक्तांनी असे म्हटलेले आहे की,हे रे-ल्वेस्टेशन बंद करणे चुकीचे आहे हे रेल्वेस्टेशन बंद करण्यात येऊ नये उलट परिच्छेद 4 मध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की,हे स्टेशन बंद करण्या ऐवजी त्या स्टेशनचे अपग्रेडेशन केले पाहिजे ही गोष्ट खरी आहे काय ?

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरुपसिंग नाईक : विभागीय आयुक्तांनी पत्र दिले होते हे खरे आहे परंतु शासनाचे 100 टक्के मत असे आहे की जोपर्यंत नवीन लाईनचे काम पूर्ण होऊन त्यावरील वाहतूक सुरु होत नाही तोपर्यन्त बडनेरा येथे हे स्टेशन स्थलांतरीत करु नये. त्यांचेसुध्दा असेच मत होते आणि तेच शासनाचे मत आहे . त्याप्रमाणे त्यांनी कळविलेले आहे.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1679 पुढे सुरु ....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांनी शासनास असे कळविले नाही की, नवीन रेल्वेलाईन नरखेडवरुन येते.ती अमरावती स्टेशनवर येत नाही. अमरावती रेल्वेस्टेशनवरुन नरखेड लाईन आणि वलगांव हे अंतर 10-11 कि.मी.आहे.

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, अमरावती स्टेशन बंद करावयाचे नाही. लोकप्रतिनिधींसमवेत एक बैठक आयोजित करण्यात येईल. कारण यासंदर्भात महापौरांचे पत्र आले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वत: सभागृहात उपस्थित आहे. बैठक कशाला हवी. महापौरांनी स्टेशन बंद करा असे कळविले आहे काय ?

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना नवीन लाईनचा उल्लेख याठिकाणी केला. नवीन लाईनचा आणि अमरावती रेल्वे स्टेशनचा अजिबात संबंध येत नाही. मग अमरावती स्टेशन बंद करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नवीन लाईन टाकण्यात येणार असली तरी त्याचा अमरावती रेल्वे स्टेशनशी काडीचाही संबंध नाही.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, मा. सदस्य श्री. गुप्ता यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. मंत्रीमहोदयांनी प्रश्न समजून घ्यावा आणि उत्तर द्यावे. विभागीय आयुक्तांनी तपशीलवार कळविले आहे. शासनाने दिलेले उत्तर हास्यास्पद आणि पोरकटपणाचे आहे. कंडीशनल उत्तर आम्हांला नको आहे. रेल्वेला कदाचित माहीत नसेल परंतु शासनाजवळ सर्व नकाशा आहे. ठामपणाने अमरावती रेल्वे स्टेशन बंद करणार नाही असे उत्तर शासनाने द्यावे. रेल्वेने पोरकटपणा केला तो शासनाने रिपीट करु नये. रेल्वे स्टेशन बंद करणार नाही असे उत्तर द्या नसेल तर कारणे सांगा.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मा. सदस्य श्री. बी.टी.देशमुख ज्या आवेशाने प्रश्न विचारत आहेत त्यामुळे मंत्रीमहोदय घाबरलेले दिसतात. सोप्या भाषेत आणि शांतपणाने प्रश्न विचारला तर मंत्रीमहोदयांना उत्तर देता येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1679 पुढे सुरु....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नावर सारा गाव पेटला आहे. लोकांनी निदर्शने केली आहेत. आम्हांला कंडीशनल रिप्लाय नको. अमरावती रेल्वेस्टेशन बंद करणार नाही असे ठामपणाने सांगा. नसेल तर त्यासाठीची कारणे सांगा.

यानंतर श्री. सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, अमरावती-नरखेड रेल्वे मार्ग जो आहे त्यातील दोन्ही स्टेशन्स.. अमरावती, वलगाव ही 11 कि.मी. दूर आहेत. त्यामुळे ती अमरावती शहरातील वा शहराची स्टेशन्स होऊ शकत नाहीत. त्यामुळे ही दोन्ही स्टेशन्स झाली तरी अमरावती रेल्वे स्थानक हे बडनेराला स्थानांतर होऊ शकत नाही. म्हणूनच अमरावतीचे मूळ रेल्वे स्टेशन हे कायम राहिलेच पाहिजे, ती लोकल सर्व्हिस चालू राहिलीच पाहिजे ही तेथील जनतेची मागणी आहे. नवीन रेल्वे लाईन आहे ती शहरापासून खूप दूर आहे. त्यामुळेच ती अमरावतीची पर्यायी स्टेशन्स होऊ शकत नाहीत. आपल्याला याबाबतची माहिती बरोबर दिली गेलेली नाही. म्हणून अमरावतीचे हे मूळ स्टेशन रद्द करू नये अशी जनतेची आणि सदस्यांची देखील मागणी आहे ती मान्य कराल का ?

प्रा. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी भूगोल पाहून ठामपणे उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. आयुक्तांनी आपल्या पत्रामध्ये लिहिलेले आहे ...

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण याबाबत सर्व काही एक्स्प्लेन आपण केलेले आहे तेव्हा आता आपण मंत्री महोदयांना उत्तर देण्याची संधी द्यावी.

श्री. सुरूपसिंग नाईक : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी मी घाबरून गेलो आहे असे सांगितले पण मी काही घाबरलेलो नाही. या प्रश्नाबाबत मी आता एवढेच सांगतो की, सन्माननीय सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन अमरावती रेल्वे स्टेशन कदापि बंद होणार नाही असे पत्र पाठविण्यात येईल.

****

.... के 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शालेय पोषज आहार योज□तील सात वर्षापूर्वी झालेल्या तांदुळ घोटाळयाची चौज शी

(6) * 3423 श्रीमती ज ांता -लावडे , श्री. वि-ोद तावडे , श्री. श्रीज ांत जोशी , श्री. न्ति-ा जडज री , श्री. राम-ाथ मोते , श्रीमती संजीव-ी रायज र , डॉ. अशोज मोडज , श्री. प्रतापराव सो-ावजे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया जा-ा , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रजजितसिंह मोहिते-पाटील : स-मा-ा-नीय उप मु□य मंत्री पुढील □ाष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) शालेय पोषज आहार योज-ोत सुमारे 7 वर्षापूर्वी झालेल्या सव्वादो-ा ज ोटी रुपयांच्या तांदूळ घोटाळा प्रज रजी ज ोल्हापूर परिषदेचे मुज्य ज ार्यज ारी अधिज ारी यां-ा दि.1.2.2005 रोजी रात्री जु-हा अ-वेषज शाजेच्या पोलिसां-ी अटज ेली हे जरे आहे ज ाय,

(2) तसेच याच प्रज रजी सातारा येथे अतिरिक्त जिल्हाधिज ारी यां-ा व दो-ा सेवा-िवृत्त महसूल अधिज ारी यां-ा दि.1.2.2005 रोजी अटज ज रज्यात आली आहे हे ही जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, प्रश-ा भाज (1) व (2) बाबत शास-ा-े चौज शी ेली आहे ज ाय,

(4) असल्यास, चौज शीचे न्ि्ष्र्ष ज ाय आहेत व त्या-ुसार सबंधितांवर पुढे ज ोजती ज ारवाई ेली वा ज रज्यात येत आहे,

(5) अद्याप ज ोजतीच ज ारवाई ेली -ासल्यास विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (1) होय.

(2) होय. सातारा येथील अतिरिक्त जिल्हाधिज ारी यां-ा दि-ांज 1.2.2005 रोजी आजि दो-ा सेवा-िवृत्त महसूल अधिज ारी व तत्ज ालि-ा लिपिज यां-ा दि-ांज 2.2.2005 रोजी अटज ज रज्यात आली आहे.

(3), (4) व (5) होय. सदर प्रज रजी सदर बाजार पोलीस ठाजे, सोलापूर शहर येथे जु.र.क्र.222/98 अ-वये जु-हा दाजल ज रज्यात आला आहे. प्रस्तुत जु-हयाचा तपास राज्य जु-हा अ-वेषज विभाजाज डे वर्ज ज रज्यात आला असू-ा पोलीस उप अधीजज, जु.अ.वि.भरारी पथज, म.रा.पुजे हे तपास ज रीत आहेत. प्रस्तुत प्रज रजी एज ूज आठ आरोपी न्ि्षपन झाले असू-ा त्यापैजी पाच लोज सेवज आहेत. सदर जु-हयात उपरोक्त आरोपीं-ी ेंद्र शास-ाच्या शालेय पोषज आहार योज-े अंतर्ज त सोलापूर महा-ाजर पालिज ा ज ार्यजेत्रातील प्राथमिज शाळेतील विद्यार्थ्यां-ा तांदूळ वाटपाचे ंत्राट प्रज रजी ठेज ेदार व लोज सेवज ां-ी संज -ामता-े एज ूज 12,468.78 ख्क्वटल तांदळाचा अपहार ेला. सदर प्रज रजी तांदूळ शाळेला वाटप ेल्याच्या ब-ावट पावत्या तयार ज रु-ा योज-ेतील ेंद्र शास-ाज डू-ा प्राप्त मोफत पुरविज्यात आलेला तांदूळ मुज्य आरोंपीशी आरोपी लोज सेवज ां-ी संज -ामता-े आपल्या -ोज राच्या -ावे बोजस फर्म ज ाढू-ा त्याद्वारे अपहारित तांदळाची विक्री ेल्याचे न्ि्षपन झाले आहे. सदर जु-हयाचा तपास हा क्क्लष्ट व जुंताजुंतीचा असू-ा तपासाची व्याप्ती फार मोठी आहे. पुढील तपास सत्वर ज रु-ा आरोपींविरुध्द -यायालयात दोषारोपपत्र दाजल ज रज्याच्या सूच-ा तपासी अधिज ाऱ्यां-ा देज्यात आल्या आहेत.

श्रीमती कांता नलावडे : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी सोलापूरला शालेय पोषण आहारांतर्गत तांदूळाचा जो घोटाळा झाला होता तो 7 वर्षापूर्वी झाला होता आणि 7 वर्षानंतर आता

..... के 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोल्हापूरच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलेले श्री.वसंत पोरेड्डीवार यांना फेब्रुवारी 2005 मध्ये अटक करण्यात आलेली आहे. ज्यावेळेस हा तांदूळ घोटाळा झाला त्यावेळी हे श्री.वसंत पोरेड्डीवार सोलापूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. आता 6-7 महिन्यापूर्वी त्यांना प्रमोशन देवून कोल्हापूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पाठविण्यात आलेले आहे. मग या 7 वर्षामध्ये हा घोटाळा आपल्या लक्षात आला नाही काय ? तसेच त्यांना कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्रमोशन दिले तर त्यासाठी निकष काय लावले ? दुसरे असे की, आपण या प्रकरणी 8 लोक दोषी आहेत म्हणून सांगितले आहे व त्यातील 5 जण लोकसेवक आहेत व त्यांना पकडले आहे म्हणून म्हटलेले आहे, तर लोकसेवक म्हणजे काय ? तसेच या प्रकरणामध्ये दोन तहसिलदार देखील सहभागी होते पण त्यांचा उल्लेख यामध्ये झालेला नाही किंवा त्यांना अटक केलेली आहे का ?

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, या प्रकरणी तपासाला विलंब झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. त्यामागे काही कारणेही आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून जी माहिती यायला पाहिजे होती ती वेळेवर उपलब्ध झालेली नव्हती आणि या प्रकरणातील मुख्य आरोपी जो मुंदडा आहे त्याला कोर्टाने अटकपूर्व जामीन मंजूर केलेला असल्यामुळे खऱ्या आरोपींपर्यंत वा दोषींपर्यंत पोहोचण्यास सीआयडीला वा पोलीसांना वेळ लागला. या प्रकरणी जे अधिकारी व कर्मचारी पकडले आहेत त्यामध्ये श्री.वसंत पोरेड्डीवार, तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी,सोलापूर होते आणि त्यांना अटक केली तेव्हा ते कोल्हापूर येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्याचप्रमाणे श्री.वाघमारे, जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.पी.व्ही.माने,जिल्हा पुरवठा अधिकारी,सोलापूर ., श्री.विद्याचंद्र होमकर, अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा शाखा,सोलापूर., श्री.संजय भोसले,लिपिक, तलाठी शाखा,सोलापूर या कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे. लोकसेवक म्हणजे हेच कर्मचारी आहेत.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हटलेले आहे की. सदर गुन्ह्याचा तपास हा क्लिष्ट व गुंतागुंतीचा असून तपासाची व्याप्ती फार मोठी आहे. तेव्हा मंत्री महोदयांना नेमके यामध्ये काय म्हणावयाचे आहे ? 7 वर्षे झाली या प्रकरणाला आणि आज 7

..... के 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत (पुढे चालू...) ता.प्र.क्र.3423...

वर्षांनी हे लोक पकडले गेले आहेत. तसेच आपण म्हटले आहे की, सत्वर तपास करून आरोपींविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येईल.. तर त्याचा कालावधी किती राहणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, यातील मुख्य आरोपी श्री.मुंदडा याला हायकोर्टाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे त्याच्या विरोधात सुप्रीम कोर्टात जाऊन तो जामीन रद्द करण्याची प्रक्रिया 15 दिवसात सुरू करण्यात येईल आणि मुख्य आरोपी ताब्यात आल्यानंतर सहा महिन्याच्या आत पूर्ण चार्जशीट करून कोर्टामध्ये सादर करण्यात येईल.

(यानंतर श्री. जागडे .... एल 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या ठिकाणी 12,468 क्विंटल तांदळाचा अपहार झाला आहे. याचा अर्थ जवळपास दीड कोटी रुपयाचा अपहार झाला आहे. एका कार्पोरेशनच्या एरियामध्ये हा अपहार झाला आहे. या अपहारामध्ये अकाऊंट डिपार्टमेंट, फुड आणि सिव्हील सप्लाय विभागाला जबाबदार धरले नाही. त्यांची चौकशी केली नाही. महानगरपालिकेच्या कॅफोनी ही बाब नजरेस का आणून दिली नाही ? महानगरपालिकेतील सर्व शाळांत हा तांदुळ दिला गेला आहे. म्हणून या अपहारामध्ये जे जे होते, त्या सर्व अधिका-यांना पकडण्यात आले आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, यामध्ये कोणालाही सोडलेले नाही. सभापती महोदय, हे धान्य गोरगरीब मुलांना दिले जात आहे. या धान्यावरही डल्ला मारण्याचा जर कोणी प्रयत्न करीत असेल तर त्या बाबत कठोर कारवाई करण्याची शासनाची तयारी आहे. त्या प्रमाणे या ठिकाणी कठोर कारवाई शासनाने केली आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, हा फार मोठा घोटाळा आहे. मंत्रालयातील सचिव पातळीवरील मोठा अधिकारी यामध्ये गुंतलेला आहे. गेल्या सात वर्षात या राज्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे घोटाळे झालेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात दोन कोटी रुपयाचा घोटाळा झाला आहे. म्हणून माझी या ठिकाणी अशी मागणी आहे की, या सर्व प्रकरणाची मा. उपमुख्यमंत्री महोदय, सीआयडी मार्फत चौकशी करणार आहेत काय ? कारण संपूर्ण राज्यात अशा प्रकारचे घोटाळे घडत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात तर दोन ठिकाणी दोन-दोन कोटी रुपयाचा घोटाळा झाला आहे. म्हणून या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी पोडेट्टीवार यांची आपण चौकशी करुन त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे. त्यांना अटक करण्यात आली आहे.

श्री. अनंत तरे : त्यांना निलंबित करण्यात आले आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : जो कर्मचारी 48 तासापेक्षा जास्त पोलीस कोठडीत असतो, तो निलंबित होत असतो. तो कर्मचारी निलंबित झाला असे आपण गृहीत धरतो.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी 12,468 क्विंटल तांदळाचा अपहार झाला आहे. मुलांना तांदुळ दिला नाही. तसेच या ठिकाणी खोट्या पावत्या देण्यात आल्या आहेत. सभापती महोदय, खिचडी शिजविण्यासाठी 1 रुपया 50 पैसे दिले जाते. आता या ठिकाणी हे पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे.....

देण्यात आले आहेत काय ? नसेल तर या ठिकाणी देखील अपहार झाला आहे. म्हणून या बाबतही चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मुलाना शिजवून अन्न देण्याची योजना अलिकडच्या काळातील आहे. ही घटना 1996-97 आणि 1097-98 या कालावधीतील आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी समाधानकारक उत्तर दिले आहे. अशा प्रकारच्या अनेक योजना स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत राबविल्या जात आहेत. चांगल्या योजनांमध्ये भ्रष्टाचर येतो, पैशाला पाय फुटतात. म्हणून या सर्व प्रकरणाचा अर्थबोध घेऊन याबाबतचे निश्चित असे नॉर्म्स शासन ठरविणार आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, या योजनेमधील तांदळाची वाहतूक करण्यासाठी केंद्र शासन मदत करीत असते. हे एकच प्रकरण आपल्यासमोर आहे. याशिवाय इतरही अनेक प्रकरण असू शकतील. परंतु त्या बाबतची काहीच चौकशी होत नाही. हा विषय केंद्र शासनाशी संबंधीत असल्यामुळे आपण या सर्व प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : सरसकट सीबीआय सर्वच बाबी स्वीकारीत नाही.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

28-05-2004 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M 1

DGS/ MHM/ SBT/ 13:00

ता.प्र.क्र. 3423....

श्री. आर. आर. पाटील...

केंद्र सरकारच्या प्रत्येक योजना राज्य सरकारकडे येतात त्या प्रत्येक योजनेचे प्रकरण सी.बी.आय. कडे सोपविले पाहिजे असे नाही. शाळांमधील मोफत धान्य वाटप योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचारा बाबतचे पुरावे जर आपण दिले तर त्याची चौकशी करण्यास राज्यातील पोलीस दल सक्षम आहे. त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. आपण दिलेल्या पुराव्यांची राज्याच्या पोलीस यंत्रणेने समाधानकारक चौकशी, तपास केला नाहीतर आपण केलेल्या सूचनेबाबत जरुर विचार करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील सातरस्ता व विक्रोळी येथे विषारी दारु प्याल्यामुळे अनेक व्यक्तींचा झालेला मृत्यू

(७) * १६८८ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्रीमती संजीवनी रायकर , डॉ. अशोक मोडक , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , श्री. वसंतराव काळे , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख , श्री. धनाजी साठे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , प्रा. फौजीया खान , श्री विलासराव शिंदे , डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हाण , श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी , श्रीमती सुधा जोशी , मेजर सुधीर सावंत : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सातरस्ता व विक्रोळी येथे माहे डिसेंबर, २००४ मध्ये वा त्या सुमारास विषारी दारु प्याल्यामुळे अनेक व्यक्तींचा मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना शासनातर्फे कोणती मदत दिली वा देण्यात येत आहे,

(५) राज्यात पुन्हा अशा घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. आर.आर.पाटील : (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी अनुक्रमे ना.म.जोशी मार्ग पो.ठाणे मुंबई व विक्रोळी पो.ठाणे येथे गुन्हे दाखल केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात १३ आरोपींना व विक्रोळी पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच हलगर्जीपणा करणाऱ्या एकूण १८ पोलीस अधिकारी व कर्मचारी व रा.उ.शु.विभागातील दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) सदर दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबियास मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून प्रत्येकी रु.५०,०००/- प्रमाणे अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** १६८८ .....**

(५) राज्यात पुन्हा अशा घटना घडू नयेत म्हणून राज्यात आढळून येणाऱ्या अवैध दारु धंद्यावर वेळोवेळी धाडी घालून अशी ठिकाण नष्ट करण्याच्या तसेच ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे आढळतील त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याविरुध्द कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित पोलीस घटकांना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : राज्यामध्ये असे एखादे प्रकरण घडल्यानंतर शासनाकडून त्याबाबत तात्पुरती कारवाई होते. या सदनातील जवळ जवळ एक तृतियांश पेक्षा अधिक माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारला असल्यामुळे या प्रश्नाचे महत्व अधिक आहे. त्यामुळे या प्रश्नाचा अवधी संपायला आला तरी आपण थोडा अधिक अवधी द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरही मी हा प्रश्न पुकारला याचा अर्थ मी या प्रश्नाला वेळ दिलेला आहे...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईत अशाप्रकारची एखादी घटना घडल्यानंतर शासनाच्या पोलीस खात्यातर्फे काही दिवस धाडसत्र सुरु असते व नंतर पूर्वीसारखेच प्रकार होत रहातात. यापूर्वी मुंबईत छाया बार प्रकरण घडल्याचे आपल्याला माहीत आहे. त्या प्रकरणाबाबत पुढे काय कारवाई केली? ते प्रकरण नंतर विसरुन गेले. राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या आरे डेअरीच्या मोठया जंगलामध्ये टाकलेल्या धाडीमध्ये पोलीसांना किती दारुच्या हातभट्टया सापडल्या याची आपण चौकशी करावी. शासनाच्या जमिनीवर या हातभट्टया चालतात. म्हणून प्रश्न असा आहे की, आपल्या अधिकाऱ्यांवर वचक बसला पाहिजे याकरिता शासनाने ठोस कारवाई केली पाहिजे. तशी कारवाई आपण करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : काही ठिकाणी शासनाच्या जागेमध्ये हातभट्टया सापडल्या परंतु त्या शासनाच्या हातभट्टया नाहीत. काही ठिकाणी असे प्रकार झाले असतील परंतु आपण म्हणता त्यामध्ये तथ्य आहे. आणि अशाप्रकारची एखादी दुर्घटना घडल्यानंतर त्याबाबत तात्काळ कारवाई केली जाते. मोठया प्रमाणात रेड टाकल्या जातात. आणि काही दिवसानंतर पूर्वी सारखे प्रकार सुरु रहातात. मी आपणाला यानिमित्ताने एकच सांगतो की, शासनाने याची गंभीरपणे दखल घेतल्यामुळे गेल्या तीन महिन्यात मोठया प्रमाणात अवैध दारुवर निर्बंध आणण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली.. त्यामुळे शासनाच्या महसूलामध्ये देखील मोठया प्रमाणात वाढ झाली. शासनाचे महसूल 64 कोटींनी वाढले. याचा अर्थ राज्यातील हातभट्टी व अवैध दारु व्यवसाय बऱ्यापैकी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** १६८८ .....**

श्री. आर. आर. पाटील...

नियंत्रणाखाली आणला गेला. आज हातभट्टी व अवैध दारुच्या संदर्भात असलेल्या कायद्यामधील तरतुदी थोडया कमी तीव्र आहेत. आपण आरोपींना पकडल्यानंतर त्याला ताबडतोब जामीन मिळतो आणि मग पुन्हा त्याची हातभट्टी सुरु रहाते. म्हणून दारु व्यवसायाच्या संदर्भातील गुन्हा नॉन बेलेबल, कॉग्निजेबल करण्याचा शासन निश्चितपणे विचार करीत आहे. आणि असा कडक कायदा केला तर आणि त्याला लवकर जामीन मिळाला नाही तर अशापध्दतीच्या गुन्हयांवर आपल्याला नियंत्रण आणता येईल. तशाप्रकारच्या कायद्याची प्रक्रिया, प्रारुप अहवाल करण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मूळ माझा प्रश्न विचारला होता तो आपल्या कार्यालयाने म्हणजे विधानमंडळ सचिवालयाने गायब केलेला आहे.

सभापती : मी ही बाब तपासून पहातो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा मूळ प्रश्न मी आपल्याला वाचून दाखवितो. "दिनांक 22 डिसेंबर 2004 रोजी मिथेनॉलमिश्रित दारु प्याल्यामुळे मुंबईतील ना.म.जोशी मार्गावरील परिसरात दहाहून अधिक जणांचा बळी गेल्याचे माहीत असूनही पुन्हा दोन दिवसांनी याच प्रकरणातील दोघा आरोपींनी कडक पोलीस बंदोबस्ताला गुंगारा देत विक्रोळीत विषारी दारु पुरविल्याची धक्कादायक माहिती दिनांक 2 फेब्रुवारी 2005 रोजी उघडकीस आली होती हे खरे आहे काय? असल्यास या दारुमुळे 100 हून अधिक जणांचे बळी गेले हेही खरे आहे काय?" हा माझा प्रश्न गायब करुन टाकला, त्याची प्रत माझ्याकडे आहे. या माझ्या प्रश्नाचे आपण उत्तर द्या...

सभपती : मी तपासून पहातो.

श्री. आर. आर. पाटील : त्यांचा प्रश्न गायब केला त्याचे उत्तर मी कसे देणार..

सभापती : त्या प्रश्नाचे निम्मे उत्तर तुमच्या हातामध्ये आलेले दिसते...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1688 . . . .

श्री.नितीन गडकरी . . . .

माझी आपल्याला विनंती आहे की, आपण याबाबतीत रेकॉर्ड तपासून घ्यावे.

सभापती : ठीक आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, विषारी दारु विकून लोकांचे बळी घेणे हा फार मोठा गुन्हा आहे. यासंदर्भात शासन अतिशय कडक कायदा करणार आहे हे आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि ही अतिशय स्तुत्य गोष्ट आहे. पण शासनाने लवकरात लवकर याबाबतीत कडक कायदा करावा आणि त्याची अंमलबजावणी सुध्दा अतिशय जोरदारपणे करावी अशी मी विनंती करते. याठिकाणी चौथ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सदर दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांस मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी 50 हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे." तर माझा असा प्रश्न आहे की, हे अर्थसहाय्य केव्हा मंजूर करण्यात आले आणि त्याचे वाटप कधी आणि किती व्यक्तींना केलेले आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी पहिली जी सूचना केली आहे की, यासंदर्भात लवकर कायदा करण्यात यावा. तर याबाबतीत लवकर कायदा केला जाईल. तसेच पहिल्या घटनेमध्ये 20 आणि दुस-या घटनेमध्ये 91 व्यक्ती मृत्युमुखी पडलेल्या असल्याने, त्यांच्या कुटुंबियांना कोणत्या तारखेला मदत दिली, याची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवेन.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारलेला होता, त्यातील पहिला प्रश्न असा आहे की, "दि.22 डिसेंबर 2004 रोजी मिथेनॉल मिश्रित दारु प्यायल्यामुळे मुंबईतील ना.म.जोशी मार्गावरील परिसरात दहाहून अधिक जणांचा बळी गेल्याचे माहित असूनही पुन्हा दोन दिवसांनी याच प्रकरणातील दोघा आरोपींनी कडक पोलीस बंदोबस्ताला गुंगारा देत विक्रोळीत विषारी दारु पुरविल्याची धक्कादायक माहिती दिनांक 2 फेब्रुवारी 1005 रोजी उघडकीस आली होती, हे खरे आहे काय ? या दोन्ही घटनेतील दोन आरोपींनी पुन्हा ही विषारी दारु विकली आहे अशी माझी माहिती आहे. तर हे खरे आहे का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही माहिती खरी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे गंभीर आहे. तेव्हा . . . .

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1688 . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पहिल्या घटनेनंतर दोन दिवसांनी यातील काही आरोपींनी पुन्हा विक्रोळी परिसरामध्ये दारु विकली ही माहिती खरी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे गंभीर आहे. एन.एम.जोशी मार्ग येथे विषारी दारु पुरविल्यामुळे जी घटना झाली, त्यातील माणसे डिटेक्ट झाली. त्यानंतर पुन्हा दोन दिवसांनी विक्रोळी येथे विषारी दारु पुरविली जाते आणि तेथे 100 लोक मरतात. हे लक्षात आल्यानंतर संबंधितांना अटक का केली नाही ?

सभापती : मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला आहे की, दारुबंदी कायद्याच्या अंतर्गत ज्या तरतूदी आहेत, त्या कडक केल्या तरच या प्रवृत्तीला आळा बसू शकेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एन.एम.जोशी मार्गावर जी घटना घडली, त्याठिकाणी 10 लोक मृत्यूमुखी पडले. त्यातील दोन आरोपींनी दोन दिवसांनी विक्रोळीमध्ये जाऊन विषारी दारु विकली आणि त्यामुळे 100 लोक मरण पावले. ही गंभीर बाब आहे. मग या दोन लोकांना ताबडतोब अटक का केली नाही ? याबाबतीत पोलिसांना जबाबदार धरले पाहिजे. त्यांनी संबंधितांना का सोडले ? त्यांना का पकडले नाही ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यातील काही आरोपी दोन्ही घटनांमध्ये कॉमन आहेत. या विषारी दारुचे विक्रेते हे त्या-त्या भागातील आहे. अशा प्रकारची दारु गाळणारे श्री.विष्णू म्हात्रे, हे भिवंडी तालुक्यातील विघटणे या विभागातील आहेत. यांनी गाळलेली दारु पहिल्या घटनेमध्ये आणि विक्रोळी येथील घटनेमध्ये पुरविलेली आहे. पहिल्या ठिकाणी घटना घडल्या नंतर त्याचा तपास लागण्यापूर्वी दुस-या ठिकाणी घटना घडली आहे. पण या दोन्ही घटनांमधील विक्रेते वेगळे आहेत. पण दारु आणून त्याचे मिक्सींग करणारे आणि ती पुरवणारे लोक कॉमन आहेत. पहिली घटना घडल्यानंतर त्यातील आरोपी निष्पन्न झाल्यानंतर ही दारु कुठे गाळली, त्याचे मिक्सींग कुठे केले इ.बाबींचा तपास लागण्यापूर्वीच विक्रोळी येथे विषारी दारु पुरविण्यात आली होती आणि ती प्यायल्यामुळे लोक मरण पावले आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एकूण 22 आरोपींना अटक केली आहे. त्यांनी आम्हाला लोकप्रतिनिधींचे संरक्षण आहे आणि त्यांच्या संरक्षणाखाली आम्ही दारु पुरवितो अशी कबूली पोलिसांजवळ दिली आहे हे खरे आहे का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशी माहिती माझ्याजवळ नाही.

अशुद्धित प्रत / अशुद्धिमुक्त नाही

ता.प्र.क्र.1688...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी या ठिकाणी उत्तर देतांना सांगितले की, अवैद्य दारु बंद केल्या नंतर 64 कोटी रुपये उत्पन्न शासनाला मिळाले आहे.सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे गोव्यामध्ये मोठया प्रमाणावर अवैद्य दारु सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये येते. पोलीस आणि एक्साईज अधिका-यांच्या संगनमताने कोटयावधी रुपयाची अवैद्य दारु सिंधुदुर्ग जिल्हयात येते. ती दारु बंद करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, अवैध दारु बंद केल्यामुळे मागील दोन महिन्यात एक्साईजचे 64 कोटी रुपये उत्पन्न वाढले. सभापती महोदय, उत्पन्नाचा धागा पकडून गोव्याकडून जर महाराष्ट्रात टॅक्स चुकवून दारु येत असेल एक्साईज चुकवून दारु येत असेल तर गस्ती पथके आणखी वाढविले जातील आणि येणारी अवैध दारु आणि टॅक्स चुकवून येणारी दारु या दोन्हीवर नियंत्रण आणले जाईल.

श्री. जोगेंद्र कवाडे :सभापती महोद, दारु निर्मितीचे अवैध धंदे ज्याला आपण हातभटया म्हणतो. हातभटयातून दारु निर्माण करणे हा परंपरागत वैदिक काळापासून चालत आलेला व्यवसाय आहे. तेव्हा तो कुटिरोद्योग होता, आता तो जीव घेणा कुटिल उद्योग झालेला आहे. ही विषारी दारु पिऊन लोक मरतील आणि 50/50 हजार रुपये अनुदान त्या परिवाराला शासन देईल पण विषारी दारुमध्ये मिथेल नावाचे विष मिसळले जात, त्यामुळे असे प्रकार घडतात. ते मिथेल उत्पन्न कुठे होते, त्याचे वितरण कुठे केले जाते, याचे खरेदीदार कोण आहेत याचा शोध लावून सरकार त्यावर नियंत्रण ठेवणार आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या दारुमध्ये मिथेल अल्कोहोल होते, त्यात ते सापडले आहे. अनेक कामासाठी मिथेल वापरले जाते, त्यामुळे त्यावर नियंत्रण आणणे मुष्कील आहे. वेगवेगळया कामासाठी ते लागत असते, पण ते पिण्याच्या दारुत दुर्दैवाने वापरले जाते त्यामुळे असे ॲक्सिडंन्ट होतात.

(काही सदस्य एकाचवेळी प्रश्न विचारण्याची परवानगी मागतात)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपत असतांना मी या प्रश्नाला परवानगी दिली. त्यामुळे आता फक्त श्री. मधुकर चव्हाण आणि श्री. मधुकर सरपोतदार या दोन सदस्यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येईल.श्री. मधुकर चव्हाण आपण प्रश्न विचारावा. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1688..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हया घटना घडत असतांनाच वर्तमानपत्रात अशा बातम्या येत होत्या की, मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांनी मंत्रिमंडळासमोर एक प्रस्ताव आणला होता. अवैध दारु पिऊन माणसे मरु नयेत म्हणून देशी दारुला मुक्त हस्ते परवानगी देण्यात येईल हे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे काय, शासनामध्ये अशी चर्चा झालेली आहे काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, "नाही".

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुधकर चव्हाण यांनी विचारलेला प्रश्नच मला विचारावयाचा होता. मंत्रिमहोदयांनी त्याचे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.पण ही गोष्ट जगजाहीर झाल्यानंतर आणि वर्तमानपत्रात सगळी बातमी आल्या नंतर याचा खात्याने इन्कार केलेला नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,. . . .

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तुमच्या मंत्रिमंडळातील तुमचेच एक सहकारी दारुच्या धोरणावर उत्पन्न वाढावयास पाहिजे म्हणून लोकांना घरपोच दारु मिळावी अशा पध्दतीने दारुची केंद्रे उभारली जातील आणि दारु विकली जाईल असे स्टेटमेंट करतात आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया कोणीही दिलेली नाही. जर प्रतिक्रिया असेल तर आपण ती खुलाशाने जाहीर करावी. माझी एक सूचना मी माझ्या भाषणात केली होती की, जर तुम्ही हे धोरण स्वीकारणार असाल तर जसे नोटांवर महात्मा गांधीजींचे चित्र असते त्याप्रमाणे त्या दारुच्या बाटलीवर महात्मा गांधीजींचे चित्र लावा आणि त्याप्रमाणे दारु विकण्यासाठी ठेवणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : असे बिलकुल नाही. घरपोच दारु ही भूमिका शासन कधीच स्वीकारणार नाही आणि यावर शासनाने कधी विचारही केलेला नव्हता. याबाबतीत आपण निश्चिंत असावे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी घोषणा.

सभापती : राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक 21 मार्च, 2005 रोजी सकाळी 11.00 वाजता, चौथा मजला, मध्यवर्ती सभागृह, विधान भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेचे निमंत्रण पत्र सन्माननीय सदस्यांना गुरुवार, दिनांक 17 मार्च, 2005 रोजी टपाल खणाव्दारे वितरित करण्यात आली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

पृ.शी./मु.शी.: पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाच्या सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. अकोला महापालिकेच्या जकातीच्या संदर्भामध्ये त्या महापालिकेने युनॅनिमस निर्णय घेऊन ही जकात महापालिकेनेच जमा करावी असा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे ते चालू होते. कर्मचारी बेकार होऊ नये म्हणून अशा प्रकारचा निर्णय घेतला. परंतु हा निर्णय अमान्य करुन शासनाने ते खाजगी ठेकेदाराला देण्याच्या संदर्भात निर्णय घेतल्यामुळे आज अकोल्यामध्ये कडकडीत बंद आहे. त्या निदर्शनामध्ये आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया आणि विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री. गोवर्धन शर्मा यांना आज अटक झालेली आहे आणि शासनाने महानगरपालिकेचा अधिक्षेप करुन त्या निर्णयाला हरताळ फासून कोणत्या दबावाखाली, कोणत्या लक्ष्मीदर्शनाने असा निर्णय घेऊन आज तिथल्या जनतेवर लादलेले आहे ? त्याच्या विरोधात आज ही निदर्शने झालेली आहेत आणि हे सन्माननीय सदस्य अटकेमध्ये आहेत एवढेच मी या पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशनच्या निमित्ताने आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: : न्यायमूर्ती श्री. पी. बी. सावंत यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल विचारात घेणे.

मु.शी.: न्यायमूर्ती श्री. पी. बी. सावंत यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल विचारात घेणे या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, मधु चव्हाण, दीपक सावंत, विनोद तावडे, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री विलास अवचट, रामनाथ मोते, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनिल परब व अनंत तरे यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

सभापती : या विषयावर मतदानाकरिता कोणताही औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. केवळ चर्चा होईल. या चर्चेसाठी एकूण अडीच तासाचा वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार चर्चेला सुरुवात करतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा अहवाल इंग्रजीमध्ये आहे तो आम्हाला मराठीमध्ये मिळाला पाहिजे. नियम 22 प्रमाणे विधान परिषदेचे कामकाज मराठी किंवा हिंदी किंवा इंग्रजीत चालेल. सभापती महोदय, हा अहवालच मला वाचता आला नाही त्यामुळे यावर काय चर्चा करणार ? मला अजिबात इंग्रजी येत नाही. त्यामुळे ही चर्चा निरर्थक ठरेल. हा अहवाल इंग्रजीमध्ये आहे. जोपर्यन्त या अहवालाचे भाषांतर होत नाही तोपर्यन्त चर्चा करु नये.

सभापती : आपल्याला असे करावे लागेल की, मराठी अहवाल देण्यास किमान 7-8 दिवसांचा अवधी लागण्याची शक्यता आहे आणि एवढा गंभीर अशा पध्दतीचा हा विषय आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण सरकारला संरक्षण देऊ नका.

सभापती : मी देणार नाही.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आजपर्यन्तची प्रथा आणि परंपरा अशी आहे की, ज्यावेळी या सभागृहामध्ये एखादा रिपोर्ट सादर होतो तेव्हा इंग्रजी आणि मराठी अशा दोन्ही प्रतीमध्ये रिपोर्ट मिळतात. सभापती महोदय, असे कधी होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. याकरिता 7 दिवस लागण्याचे काहीही कारण नाही. वास्तविक हा रिपोर्ट दिल्यानंतर अनेकवेळा ही चर्चा झाली होती. सरकारकडून ही चूक झालेली आहे. शासनाने दिलगिरी व्यक्त केली पाहिजे आणि 24 तासाच्या आत याच्या मराठी प्रती आम्हाला दिल्या पाहिजेत अशी माझी आपल्यामार्फत विनंती आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी

सभापती महोदय, त्यामुळे अनेक सभासद बोलू शकणार नाहीत.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, हा मुद्दा आजच उपस्थित केलेला नाही. दोन दिवसापूर्वी हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी हे मान्य केले होते.

श्री.हर्षवर्धन पाटील : हा प्रश्न या सदनामध्ये यापूर्वीही उपस्थित केला होता. या अहवालाचे मराठीमध्ये भाषांतर करण्याचे काम आम्ही सुरु केलेले आहे. ना.सावंत आयोगाने हा अहवाल इंग्रजीमध्ये सादर केला होता त्याचे मराठीत रुपांतर करण्याचे काम चालू आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर तातडीने मराठी प्रत सभागृहामध्ये उपलब्ध करुन देऊ.

श्री.नितीन गडकरी : शासनाला अहवाल कोणत्या तारखेला सादर झाला आणि मराठीत रुपांतर करण्यासाठी तुमच्याकडे कर्मचारी नाहीत काय ? आजपर्यंतची ही प्रथा, परंपरा नाही काय, केवळ इंग्रजीमध्ये अहवाल सादर करण्याची प्रथा आहे काय ? याबाबत मा.संसदीय कार्यमंत्र्यांनी खुलासा करावा आणि याबाबत दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मा.ना.सावंत आयोगाने हा अहवाल मुख्य सचिवांकडे दिला होता, त्याची तारीख माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु हा अहवाल सभागृहामध्ये सादर करण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला त्यानंतर..

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून पहा. राज्यपालांच्या भाषणाच्या इंग्रजी प्रती मा.सदस्यांना वितरित करण्यात आल्या होत्या. त्याबाबत सभागृहात हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यावेळी कै.टिळकसाहेब सभापती होते. त्यांनी सुध्दा जोपर्यंत भाषणाची मराठी प्रत येत नाही तोपर्यंत अभिभाषणावरील चर्चा तहकूब केली होती. हा अहवाल 23 फेब्रुवारी, 2005 रोजी सादर झाला. मी तीन दिवसापूर्वी हा मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा मा.मंत्रिमहोदय आता मान डोलवित आहेत त्याप्रमाणे त्यांनी तेव्हाही डोलविली होती आणि ते रेकॉर्डवर आले आहे किंवा नाही माहीत नाही. त्यामुळे आज देखील मी पिजन होलमध्ये अहवालाची मराठी प्रत शोधत होतो, परंतु ती काही सापडलेली नाही. इंग्रजी प्रतीमुळे त्याचे आकलन होणे अवघड आहे. कारण इंग्रजीचे वेगवेगळे अर्थ काढले जातात. म्हणून मराठीतून अहवालाची प्रत मिळेपर्यंत ही चर्चा तहकूब करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. कारण यापूर्वी तसे केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : इंग्रजी अहवालाचे मराठीमध्ये भाषांतर करण्याचे काम चालू आहे. ते पूर्ण होताच मराठीतील अहवालाची प्रत सभागृहात वितरित केली जाईल.

सभापती : किती दिवसामध्ये वितरित केली जाईल ?

श्री.विनोद तावडे : दिनांक 23 तारखेला मुख्य सचिवांना अहवाल सादर झाला. लगेच पुढच्या बुधवारच्या मंत्रिमंडळामध्ये विधिमंडळामध्ये अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. आज 17 मार्च ही तारीख आहे. 15-20 दिवसानंतरही इंग्रजीचे मराठीत भाषांतर होत नाही, म्हणजे सरकार मराठीच्या बाबत गंभीर आहे किंवा नाही, शासनाचे कामकाज मराठीमध्ये करण्याचे ठरलेले आहे. मराठीला गंभीरपणे घ्यावयाचे नाही असे सरकारने ठरविले आहे काय यादृष्टीने शासनाला खुलासा करावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सदनाची परंपरा आहे की, इंग्रजी भाषेतून अहवाल सादर झाल्यास त्याची मराठी प्रत मा.सदस्यांना वितरित केली पाहिजे हे बरोबर आहे.परंतु खालच्या सभागृहामध्ये ज्यांनी इंग्रजीच्या शिकविण्या लावल्या आहेत, ज्या लोकांनी इंग्रजीच्या शिकविण्या ठेवल्या आहेत आणि त्याठिकाणच्या विरोधी पक्ष नेत्यांनी जर चर्चेसाठी परवानगी दिली असेल आणि याठिकाणी तर मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार असतील, मा.सदस्य श्री.दिवाकर रावते असतील, मा.विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी हे इंग्रजी जाणणारे लोक आहेत. म्हणून चर्चा थांबविण्यासाठी हे कारण गृहित धरु नये.

श्री.नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. खालच्या सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या बाबतीत मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी काढले आहेत की, विरोधी पक्ष नेत्यांनी इंग्रजी विषयाची शिकवणी लावली आहे. माझी खालच्या सभागृहाच्या मा.विरोधी पक्ष नेत्यांबरोबर चर्चा झाली आहे. तेथील कोणत्याही मा.सदस्यांनी इंग्रजीची शिकवणी लावलेली नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

सभागृहाचे संकेत, प्रथा आणि परंपरा यानुसार खालच्या सभागृहामध्ये कोण काय करतो, काय बोलतो, तेथे काय घडले याचा उल्लेख या सभागृहामध्ये करता येत नाही. असे असताना मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे काही व्यक्तव्य केलेले आहे त्यामुळे खालच्या सभागृहातील मा.सदस्यांचा उपहास आणि अपमान झालेला आहे. प्रत्यक्षात तशी वास्तवता नसताना याठिकाणी व्यक्तव्य केले गेले आहे. तेव्हा मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी काढलेले उद्गार रेकॉर्डवर ठेवू नये.तसेच त्यांनी अशा प्रकारे काढलेल्या उद्गाराबद्दल सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त करावी.

(दोन्ही बाजूचे काही मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : या सदनामध्ये चर्चा करीत असताना विधानसभेच्या तसेच विधानसभेच्या मा.सदस्यांच्या अनुषंगाने किंवा मा. विरोधी पक्षनेत्याच्या अनुषंगाने इतर कोणतीही चर्चा या सदनामध्ये आपणाला करता येणार नाही. विधानसभा हे सार्वभौम सभागृह आहे. तेव्हा मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे वक्तव्य केले त्यातील एक भाग "या अहवालावर त्याठिकाणी चर्चा सुरु आहे" हा ठीक आहे. परंतु कोणी ऊर्दूची, कोणी इंग्रजीची, कोणी मराठीची शिकवणी लावली अशा आशयाचे जे विधान त्यांनी केलेले आहेत ते मी रेकॉर्डवरुन काढून टाकतो.

डॉ. दीपक सावंत : मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

(विरोधी पक्षाचे काही मा.सदस्य दिलगिरी व्यक्त करावी असे एकाच वेळी सांगत असतात.)

सभापती : खालच्या सभागृहातील सदस्यांनी इंग्रजीची शिकवणी लावली, अशा प्रकारचे जे शब्दप्रयोग केलेले आहेत त्याबद्दल मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी दिलगिरी व्यक्त करावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, खालच्या सभागृहामध्ये जस्टीस सावंत आयोगाच्या अहवालावर चर्चा चालू आहे. म्हणून मी सांगितले की, तेथे चर्चा होते तर मग येथेही ती सुरु करावी. मी कोठेही विरोधी पक्षनेत्याचे नाव घेतलेले नाही.

श्री. नितीन गडकरी : आता माझा एक नवीन हरकतीचा मुद्दा आहे. या सार्वभौम सभागृहाच्या माननीय सभापतींनी आदेश दिल्यानंतर देखील मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी दिलगिरी व्यक्त केली नाही. मा.सभापतींच्या आदेशाचे त्यांनी पालन न केल्यामुळे मा.सभापतींचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु....)

त्यांनी अपमान केलेला आहे. तेव्हा मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना आजच्या दिवसाकरिता निलंबित करावे.

सभापती : तशी आवश्यकता नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्या वक्तव्याने जर विरोधी पक्षाची मने दुखावली असतील तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती : मा.सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अहवालाची मराठी प्रत मिळावी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सदर अहवालाची इंग्रजी प्रत मिळालेली आहे. मराठी प्रत मा.सदस्यांना मिळालेली नाही. यापूर्वीही अशा प्रकारची चर्चा होत असताना ज्या ज्या वेळी मराठी प्रती मिळाल्या नाहीत त्या त्या वेळी ती चर्चा थांबविण्यात आलेली आहे. त्यामुळे न्यायमूर्ती सावंत आयोगाच्या अहवालावरील चर्चा मी थांबवित आहे. सदर अहवालाच्या मराठीच्या प्रती येईपर्यन्त मी ही चर्चा घेणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2001-2002 चा पाचवा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : पाचवा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 1998-99 व 1999-2000 चा महालेखापाल यांचा लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती :महालेखापाल यांचा लेखा परीक्षा अहवाला सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2000-2001 व 2001-2002 चा महालेखापाल महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी. : हरकतीच्या मुद्दयासंबंधी.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले होते की, न्यायमूर्ती श्री.पी.बी.सावंत यांच्या चौकशी आयोगाच्या अहवालावर दोन्ही सभागृहांमध्ये एकाच वेळी चर्चा करण्यात यावी असे ठरले होते. परंतु आपल्या सभागृहात या अहवालावरील चर्चा पुढे ढकलण्यात आलेली आहे. परंतु विधाननसभेत या अहवालावर चर्चा सुरु आहे. आपण ही चर्चा दोन्ही सभागृहात एकाच दिवशी घेण्याचे ठरविले आहे. विधानसभेत या अहवालावर चर्चा सुरु आहे ती ताबडतोब थांबवावी.

सभापती : विधानसभेत कामकाज पत्रिकेत दाखविल्याप्रमाणे कामकाज चाललेले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये न्यायमूर्ती श्री.पी.बी.सावंत यांच्या चौकशी आयोगाच्या अहवालावर दोन्ही सभागृहात एकाच दिवशी चर्चा घ्यावी असे ठरलेले आहे. त्याप्रमाणे दोन्ही सभागृहात आज या विषयावर चर्चा ठेवण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे विधानसभेत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी चर्चेस सुरुवात केलेली आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये या अहवालावर दोन्ही सभागृहात एकाच दिवशी चर्चा घ्यावी असा निर्णय घेतलेला आहे एवढीच माहिती मी आपल्याला देऊ इच्छितो.

सभापती : ठीक आहे. आता नियम 93 च्या सूचना पुकारतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

पृ.शी.व मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी " शासनाने कुळ वहिवाटेची रक्कम दिनांक 31 मार्च,2005 पूर्वी सर्व थकबाकीसह एक रकमी भरण्याची केलेली सक्ती अशी रक्कम न भरल्यास जमीन ताब्यात घेणे, यामुळे शेतक-यांमध्ये पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी " सातपाटी,डहाणू,उंबरगावपर्यंत भूकंपीय तेल संशोधनाचा सर्वे सुरु असल्याबाबत गेल्या चार महिन्यांपासून परिसरातील मच्छिमारांची मासेमारी बंद असल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व इतर सदस्य यांनी " दिनांक 10.2.2005 रोजी वडगाव गड, ता.जळगाव (जामोद),जि.बुलढाणा येथील एका दलित अल्पवयीन मुलीवर बलात्काराची घटना घडणे, गुन्हेगाराला अद्यापही पकडण्यात आलेले नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती)

माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर यांनी "अकोला महापालिकेची जकात वसुली महापालिकेकडून न करता खाजगी ठेकेदाराकडून करण्यात येणे याच्या निषेधार्थ गेल्या 3 दिवसांपासून अकोला शहरातील बाजारपेठ बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने यासंदर्भात गांभिर्याने लक्ष घालावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्या ठिकाणी आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्याना अटक करण्यात आली आहे. तेथील स्टॅण्डींग कमिटीने विरोध केला आहे. तरी यासंदर्भात आपण निवेदन करण्यास सांगावे.

सभापती : या विषयावर मा. मंत्र्यांनी निवेदन करावे. यानंतर माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जागवानी व इतर यांनी "दिनांक 15 मार्च, 2005 रोजी सिंधी कॉलनी, नंदूरबार येथील श्रीमती ज्योती दुसेजा यांच्या घरात नगरपरिषदेच्या कर्मचा-यांनी घरपट्टी भरली नसल्याचे कारण सांगून जबरदस्तीने घुसून त्यांचा केलेला विनयभंग व बेदम मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर मा. मंत्र्यांनी निवेदन करावे.

माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "शाहू महाराजांची सरकार दरबारी होणारी अवहेलना थांबली नाही तर मंत्रालयाच्या 6 व्या मजल्यावरुन उड्या मारण्याची शाहूप्रेमी कार्यकर्त्यांनी दिलेली धमकी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर मा. मंत्र्यांनी निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे व इतर यांनी "दिनांक 16.3.2005 रोजी नागपूर येथील ऑरेंजसिटी हायस्कूलमधील गैरव्यवहार मिटविण्यासाठी उपशिक्षणाधिका-याने मागितलेली लाच घेतांना पिटर उबाळे या दलालास पकडण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर मा. मंत्र्यांनी निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या संदर्भातील निवेदनाबाबत

सभापती : व्यवसाय अभ्यासक्रमाकडील विदर्भ विभागातील शिक्षक/निदेशक शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन मिळाले नसल्याबाबतच्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन आलेले आहे. परंतु हे निवेदन नंतर घेण्यात येईल.

पृ.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रोहयो खंडीत बेरोजगार हजेरी सहाय्यकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेले उपोषण.

मु.शी.:सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रोहयो खंडीत बेरोजगार हजेरी सहाय्यकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेल्या उपोषणाबाबत सर्वश्री विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील (रोजगार हमी योजना मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी " सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रोहयो खंडीत बेरोजगार हजेरी सहाय्यकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये उचित निर्णय घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. तरी उचित निर्णय म्हणजे काय ? हजेरी सहाय्यकांचे आंदोलन झाले आणि या आश्वासनावर तेथील लोकांनी आपले उपोषण मागे घेतले आहे. तरी उचित निर्णय घेण्यात येणार आहे हा निर्णय कोणता असेल आणि हा निर्णय कधी घेण्यात येईल ? याचा खुलासा सन्माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये खंडीत हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून घेण्याबाबत आमच्याकडे 26 जिल्ह्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. अजून सहा-सात जिल्ह्यांची माहिती आलेली नाही. जिल्हाधिका-यांना एक महिन्याची मुदत दिली आहे. त्या मुदतीमध्ये त्यांनी माहिती पाठवावयाची आहे. ही माहिती येताच त्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता घेऊन ते मंत्रिमंडळासमोर ठेवून निर्णय घेण्यात येईल.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा.उप सभापती)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणी शासनाने 1995 साली निर्णय घेतलेला आणि आणि शासनाने घेतलेल्या निर्णयावर सन्माननीय सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब केलेले आहे. त्यानंतर 26 जिल्हयातील 5 हजार 684 हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे. परंतु बाकीच्या जिल्हयातील हजेरी सहाय्यकांची यादी न मिळाल्यामुळे त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही व त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. मला माननीय मत्रिमहोदयांना विनंती करावयाची आहे की,या संदर्भात शासनाने पूर्वी निर्णय घेतलेला आणि आणि सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब केलेले आहे. त्यानुसार काही हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेतले आहे परंतु अजूनही जे कोणी हजेरी सहाय्यक बाकी राहिलेले आहे त्यांची माहिती आपल्याकडे आलेली नाही. तेव्हा ती माहिती आल्यानंतर त्या सर्वांना पुढील तीन महिन्याच्या आत शासकीय सेवेत सामावून घेतले जाईल अशा प्रकारचे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. तेव्हा या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय आश्वासन देतील काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी खुलासा करतो की , आपण जे सांगितले आहे तशी वस्तुस्थिती नाही. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर त्यांनी 1995 ही कट ऑफ डेट सांगितली होती.त्यानुसार 5 हजार 684 हजेरी सहाय्यकांना ताबडतोबीने राज्य सरकारने कायम स्वरुपी शासकीय सेवेत सामावून घ्यावे असे कोर्टाने सांगितले होते.त्यांना सामावून घेण्यासाठी आतापर्यन्तचा काळ लागला. मागच्या सहा महिन्यात संपूर्ण राज्यातील एकूण 5 हजार 684 हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले होते . 1995 सालानंतर म्हणजे कट ऑफ डेटच्या नंतरचे जे खंडीत हजेरी सहाय्यक होते त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासंबंधीचा दुसरा प्रश्न आहे.तेव्हा संपूर्ण राज्यात असे हजेरी सहाय्यक किती आहेत याची माहिती एकत्रित करावयाची आहे ही माहिती एकत्र करण्यात येत आहे.26 जिल्हयातील माहिती शासनाकडे आलेली आहे आणि 6 जिल्हयातील माहिती अजून यावयाची आहे ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर पुढचा निर्णय करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय.,आम्ही जी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे त्यामध्ये सिंधुदूर्ग जिल्हयासंबंधीची माहिती विचारलेली आहे.या निवेदनामध्ये सिंधुदूर्ग जिल्हयाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबतीत फक्त एक वाक्य आहे आणि बाकीची सर्व माहिती संपूर्ण राज्यासंबंधीची आहे. संपूर्ण राज्याची माहिती आम्ही विचारलेली नसतांना ती माहिती निवेदनात देण्यात आलेली आहे.सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी असे विचारु इच्छितो की,8 वर्षा पूर्वी जिल्हाधिका-यानी कोकणच्या आयुक्तांना यासबंधीची माहिती पाठवलेली आहे.आठ वर्षापासून सातत्याने हे हजेरी सहाय्यक आंदोलन करीत आहेत, मोर्चे काढत आहेत, उपोषण करीत आहेत, काहीनी तर आत्मदहनाचा इशारा दिला आहे. असे असतांना निवेदनात असे म्हटले आहे की या बाबतीत "उचित निर्णय" घेण्यात येईल. नियम 93 ची सूचना मांडत असतांना आमचा पूर्ण भर हा सिंधुदूर्ग जिल्हयावर असतांना संपूर्ण राज्याची माहिती आपण का देत आहात ? 8 वर्षा पूर्वी ज्यांच्या संबधीची माहिती देण्यात आलेली आहे. त्यांच्या बाबतीत काय निर्णय घेण्यात येणार आहे ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात कोणता ठोस निर्णय घेणार आहात याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयाची माहिती शासनाकडे प्राप्त झालेली आहे.64 खंडीत हजेरी सहाय्यक उपोषणाला बसलेले होते त्यांच्या सबंधीची माहिती शासनाकडे प्राप्त झालेली आहे. पंरतु संपूर्ण राज्यामध्ये खंडित हजेरी सहाय्यकांची संख्या निश्चितपणे किती आहे यासबंधीची माहिती कोणाच्या मार्फत तरी रेकॉर्ड घ्यावयाची आहे म्हणून . ती माहिती गोळा करण्यात येत आहे.या संदर्भात माझ्या दालनात यापूर्वी 4 वेळा बैठका घेण्यात आल्या आहेत आणि 26 जिल्हयाची माहिती शासनाकडे प्राप्त झाली असून बाकीच्या 6 जिल्हयाची माहिती अजून प्राप्त व्हावयाची आहे. तेव्हा ही सगळी माहिती प्राप्त झाल्यानंतर या व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून घ्यावयाचे असल्यामुळे वित्त विभाग आणि नियोजन विभागाकडून त्या सबंधीची माहिती घेऊन आपल्याला मंत्रिमंडळासमोर हा विषय न्यावा लागेल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

उप सभापती : नियम 93 च्या सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी एखादा प्रश्न विचारावयाचा असतो.ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे :सभापती महोदय, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला न्याय्य हक्कासाठी भांडण्याचा अधिकार आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील हजेरी सहाय्यक उपोषणाला बसले होते असे असतांना त्या ठिकाणची वीज बंद करणे, स्वच्छतागृहाची सुविधा बंद करणे असे प्रकार तेथील जिल्हा प्रशासनाने केले होते.तेव्हा या सबंधीचे आदेश कोणत्या अधिका-याने दिले होते आणि त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ? ते लोक उपोषणाला बसले होते हा त्यांचा गुन्हा होता काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सिंधुदूर्गच्या जिल्हाधिका-यांकडून मी माहिती घेतली असून त्यांनी अशा असे सांगितले की, अशा प्रकारचे कोणतेही आदेश दिलेले नव्हते. जिल्हाधिका-यांच्या दालनातच उपोषणकर्त्याचे उपोषण सुटले होते.

नंतर श्री.कानडे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात पडलेल्या दुष्काळामुळे फळबागांचे झालेले नुकसान.

मु.शी.: राज्यात विशेषत: पंढरपूर,बार्शी,सांगोला,मंगळवेढा या तालुक्यात पडलेल्या दुष्काळामुळे फळबागांचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,धनाजी साठे,नतिकोद्दीन खतिब,सुधाकर गणगणे, विलासराव शिंदे,जितेंद्र आव्हाड,श्रीमती फौजिया खान यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीक डे आपल्या अनुमतीने मा.फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

"राज्यात विशेषत: पंढरपूर,बार्शी,माळशिरस,सांगोला,मंगळवेढा या तालुक्यात पडलेल्या दुष्काळामुळे शेतक-यांचे डाळींब,बोर,चिकू,पेरु,लिंबू,द्राक्ष या पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे,फळाची झाडे पूर्णत: जळून जाणे,अवकाळी पाऊस,द्राक्ष दराची घसरण,महागडी खते व औषधे,मजुरी व पाण्याचे दुर्भिक्ष्य यामुळे शेतक-यांची अवस्था दयनीय होऊन कर्जबाजारी होणे,त्यासाठी शेतक-यांनी शासनाकडे मदतीची मागणी करणे,याकडे शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. विनय कोरे (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ज्या विभागात दुष्काळी परिस्थिती असते त्या विभागातील शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ? नुकसानीमुळे बाधित झालेल्या 34 गावांतील सर्वेक्षणाचे काम सुरु झालेले आहे ते केव्हा पूर्ण करण्यात येईल ? सर्वेक्षणाचे काम झाल्यानंतर बाधित शेतक-यांना नुकसान भरपाईचे वाटप किती कालावधीत पूर्ण होणार आहे ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, दोन प्रश्न विचारण्यात आले आहेत. दुष्काळामुळे नुकसान झालेल्या भागाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेंले आहे. परंतु परवाच्या गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल आल्यानंतर सर्वेक्षणाचे काम सुरु होईल. सरकारच्या सध्याच्या स्थायी आदेशानुसार ज्या ठिकाणी 50 टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे तेथे नुकसान भरपाई दिली जाईल.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, गारपिटीमुळे फळबागांचे आणि द्राक्ष बागांचे नुकसान झालेले आहे. यामध्ये शासनाची भूमिका केवळ थोडीशी मदत देऊन त्या शेतक-यांना दिलासा देणे अशी न राहता गेल्या 3 वर्षामध्ये जेथे दुष्काळ होता आणि त्यामुळे ज्यांच्या द्राक्ष बागा वाया गेल्या त्यांच्या कर्जाचे पुनर्वसन करुन त्यांना नवीन हप्ते बांधून देऊन आणि पुन्हा थोडेसे कर्ज देऊन द्राक्ष बागा उभ्या केल्या पाहिजेत. आता द्राक्ष बागा पुन्हा गारपिटीमुळे नष्ट झालेल्या आहेत. शेतक-यांच्या डोक्यावर एक लाखाचे कर्ज आहे. वर्तमानपत्रामध्ये आम्ही वाचले की शासन हेक्टरी 2 हजार रुपयांची नुकसान भरपाई देणार आहे. आमची अशी मागणी आहे की, पूर्वीच्या कर्जाचे पुनर्वसन करणे आणि ज्या शेतक-यांच्या डोक्यावर पुन्हा कर्ज आहे अशा शेतक-यांच्या बाबतीत शासनाने भूमिका घेऊन दिलासा द्यावा. हा दिलासा शासन कशा पध्दतीने देणार आहे ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही. सविस्तर अहवाल आल्यानंतर शासन याबाबत गंभीरपणाने विचार करुन मदत देण्याचा प्रयत्न करील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अहवाल येईपर्यंत शासन शेतक-यांची बँकांकडून जी कर्ज वसुली होत आहे त्याला स्थगिती देणार आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्ज वसूलीस स्थगिती देण्यासंबंधी शासन विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये दिलेल्या निवेदनासंबंधी.

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे: सभापती महोदय, उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. यासंबंधीचे निवेदन प्राप्त झालेले आहे. परंतु संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

उपसभापती : ठीक आहे. हे निवेदन सोमवारी घेण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

....2

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. गायकवाड 13:45

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

श्री. जयंत प्र. पाटील : 50 टक्के नुकसान झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. असे असताना आणखी कोणता अहवाल येणार आहे ? बँकाकडून जी तातडीने कर्ज वसूली केली जात आहे त्या वसुलीला शासन ताबडतोब स्थगिती देणार आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे अशा शेतक-यांना मोबदला दिला जाईल. नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे. त्यानंतर सर्वेक्षणाचे काम सुरु होईल. 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे अशा शेतक-यांच्या बाबतीत सध्याचे स्थायी आदेश आहेत त्याप्रमाणे जरुर मदत केली जाईल. कर्ज वसुलीच्या अनुषंगाने आदेश लागू केले जातील.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, स्थायी आदेश म्हणजे काय ? 2002-03 आणि 2003-04 या दोन वर्षामध्ये 18 जिल्हयातील 71 तालुक्यांमध्ये टंचाई होती. त्यावेळी सुध्दा राज्यातील द्राक्ष बागांचे नुकसान झालेले होते. त्याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे...

यानंतर श्री. सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना शासनाने स्थायी आदेशानुसार कोणत्या सवलती दिलेल्या आहेत ? त्याचप्रमाणे सोलापूर जिल्हयामध्ये गारपिटीमुळे जसे द्राक्षां-डाळिंब पिकांचे नुकसान झालेले आहे तसेच सांगली जिल्हयातील आटपाडी वगैरे भागातील द्राक्षांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे तेव्हा त्याचेही सर्वेक्षण करण्याचे काम शासन करील काय ?

श्री. विनय कोरे : अध्यक्ष महाराज, दुष्काळामुळे झालेले जे नुकसान आहे त्याबाबतचा संपूर्णपणे अहवाल प्राप्त झालेला आहे. स्थायी आदेशानुसार दुष्काळाविषयी मदत देता येत नाही. परंतु गारपीट, अवेळी झालेला पाऊस, पूर या सारख्या नैसर्गिक आपत्ती आहेत त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देता येते. सोलापूर जिल्हा, खानापूर तालुका, आटपाडी तालुका येथील डाळिंब पिकाच्या नुकसानीबाबत मी सांगेन की, ही डाळिंबाची मोठ्या प्रमाणात लागवड आपण रोजगार हमी योजनेमार्फत केलेली होती. म्हणून दुष्काळ पडल्यानंतर दुष्काळामुळे डाळिंबाचे झालेले नुकसान लक्षात घेऊन रो.ह.यो.च्या माध्यमातून जी लागवड झालेली आहे त्यांच्या बाबतीत पीक व्यवस्थित आले नाही तर शेतकऱ्यांकडून जी वसुली करण्यात येते ती 162 कोटी रुपयांची वसुली शासनाने माफ करण्याचे ठरविले आहे. 2002 मध्येसुद्धा जी वसुली होती त्यामध्येही सवलत देण्याचे सरकारने ठरविले आहे आणि त्यानंतरच्या लागवडीचासुद्धा मजुरीचा खर्च वसूल करावयाचा नाही असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

****

..... डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ठाणे जिल्ह्यातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्याचे काम.

मु.शी. : ठाणे जिल्ह्यातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्याचे काम यासंबंधी सर्वश्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, डॉ.अशोक मोडक, श्री.मधुकर चव्हाण, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो. ..

" ठाणे जिल्ह्यातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्ता वाहतुकीसाठी अयोग्य झाला असून त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याची उघडकीस आलेली घटना, हे काम तातडीने सुरू करून या भागात राहणाऱ्या सुमारे 20 लाख नागरिकांना दिलासा देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, परंतु निधीच्या कमतरतेमुळे उक्त रस्ता रखडण्याची शक्यता असल्यामुळे हे काम खाजगीकरणाच्या माध्यमातून करावयाचा शासनाने घेतलेला निर्णय, डिसेंबर 2004 च्या लक्षवेधी सुचनेवरील चर्चेच्या दरम्यान माननीय सभापती महोदयांनी हे काम 30 दिवसांच्या आत ताबडतोबीने सुरू करण्याचे दिलेले निर्देश, हे काम प्रचलित पद्धतीने केल्यास लागणारा वेळ लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरहू काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्याचा घेतलेला निर्णय, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सभागृहात दिलेले आश्वासन, तसेच माननीय सभापतींच्या निर्देशा नंतर अद्यापही या रस्त्याचे काम सुरू न होणे, त्यामुळे रस्त्याची अवस्था अधिकच खराब होणे, आगामी पावसाळा व या रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ पाहता येत्या पावसाळ्यात हा रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी अयोग्य होण्याची निर्माण झालेली शक्यता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सदरहू रस्ता हस्तांतरित झाला असल्यामुळे त्यांनी हा रस्ता कायम स्वरूपी वाहतुकीसाठी योग्य होईल या दृष्टीने त्वरित काम सुरू करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, प्रत्यक्षात अद्यापही या रस्त्याचे काम सुरू न झाल्यामुळे त्या भागातील रहिवाशांमध्ये पसरलेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाममंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..... डब्ल्यू 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. सा.बांधकाम मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, हे सरकार आहे की काय आहे ? आपण आदेश दिल्यानंतर देखील ते आदेश पाळले जात नाहीत. हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. विशेषत: डोंबिवली-कल्याण परिसरातील 20 लाख जनतेला वेठीस धरण्याचा हा प्रयत्न आहे. अध्यक्ष महाराज, हा शीळफाट्याचा रस्त्याचे मी मंत्री असताना टेंडर काढले होते. आता त्याला 7 वर्षे झाली. त्या रस्त्यावर अजूनही खड्डे मोठ्या प्रमाणात आहेत. डोंबिवलीच्या लोकांनी निवेदन दिले आहे की, आम्हाला मुंबईला जायचे असेल तर गाडी घेऊन जाता येत नाही. त्यामुळे लोकलने आम्हाला दादर येथे जाऊन मग तेथून दुसरी गाडी घेऊन पुढे जावे लागते आणि तशाच प्रकारे पुन्हा परत यावे लागते इतकी भयानक स्थिती तेथील रस्त्यांची झालेली आहे. गेली 7 वर्षे यामध्ये हलगर्जीपणा झालेला आहे. अध्यक्ष महाराज, आपण या भागातीलच आहात. आपण यापूर्वी एक महिन्याच्या आत काम सुरू करण्याचे आदेश दिलेले होते पण त्याबाबत नेमकी काय कारवाई करण्यात आलेली आहे हे तरी आम्हाला मंत्र्यांनी सांगावे.

श्री. अनिल देशमुख : अध्यक्ष महाराज, या रस्त्याच्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, शीळफाटा-डोंबिवली-कल्याण या रस्त्याचे जवळ जवळ 134 कोटी रुपयांचे टेंडर 2001 मध्ये देण्यात आलेले होते. परंतु काही अडचणी आल्यामुळे सदर ठेकेदार ते काम पूर्ण करू शकलेला नाही. त्यामुळे पीडब्ल्यूडीच्या माध्यमातून हे काम आतापर्यंत चालू होते. परंतु आता आपण एमएसआरडीसीला हे काम घेण्याची विनंती करण्यात आली आहे आणि नुकतेच ते काम आमच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे आणि आता हा रस्ता लौकरात लौकर कसा करता येईल या दृष्टीने पुढील कारवाई चालू आहे.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, त्या ठेकेदाराने 11 कोटी रुपयांचा क्लेम टाकलेला आहे त्यामुळे तो प्रश्न केव्हा सुटेल अशी शक्यता नाही. दुसरे असे की, या ठिकाणी जो पूल बांधावयाचा आहे त्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी नाही. आणि यासाठी जे 5 कोटी रुपये लागतात तेवढे पैसे एमएसआरडीसीकडे नाहीत. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून आपण जी बैठक घेतली होती त्यामध्येही मी सुचविले होते की, 134 कोटी रुपयांचे काम जे टेंडरने निश्चित झालेले होते तोच बेस पकडून आजचा डीएसआर प्रमाणे किती कालावधीची तरतूद आहे त्याप्रमाणे तरतूद करून यासाठी आता एमएसआरडीसीने जो दुसरा कंत्राटदार ठरविला आहे तो हे मान्य करीत असेल... (यानंतर श्री.जागडे ...एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

व तो कंत्राटदार भूसंपादनाचे पैसे देत असेल तर याबाबतचा विचार करावा लागेल. मात्र याबाबतचे क्लेम्स मात्र आपणाला सेटल करावे लागणार आहेत. याप्रमाणे आपण नियमानुसार काम देऊ शकता. याबाबतचे टेंडर एकदा निघालेले आहे. ते फायनल झाले आहे. तेव्हा हे काम एक महिन्याच्या आत सुरु करता येऊ शकते. हे मी मा. सभापती महोदय, आपणाकडे येऊन सांगितले आहे. त्यामुळे हे काम का सुरु करीत नाही ? यामध्ये कंत्राटदाराला काही कंडीशन्स टाकून या पावसाळ्यापूर्वी हा रस्त्याचे काम करण्याची आवश्यकता आहे. पावसाळ्यात हा रस्ता चांगल्या स्थितीत राहिला पाहिजे, याची काळजी आपण घेतली पाहिजे. नाहीतर पावसाळ्यात कल्याण आणि डोंबिवलीची सर्व वाहतूक बंद होईल आणि एक मोठे संकट निर्माण होईल. तेव्हा या प्रकारचा प्रयत्न शासन करणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, हे काम आमच्या खात्याकडे आताच हस्तांतरीत झाले आहे. तेव्हा नियमानुसार टेंडर काढून याचे काम लवकरात लवकर कसे करता येईल हे पाहिले जाईल. या ठिकाणी हा जो वळण रस्ता करावयाचा आहे, त्यासाठी पर्यावरण खात्याचे क्लिअरन्स, पोल्युशन बोर्डाचे क्लिअरन्स इ. काही बाबी करावयाच्या आहेत. यामध्ये जवळ जवळ एक वर्ष लागणार आहे. एका वर्षाच्या आत आम्ही या रस्त्याचे काम सुरु करु आणि पुढील वर्षात हा रस्ता पूर्ण करु. म्हणजेच या कामासाठी दोन वर्षे लागतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही गंभीर गोष्ट आहे. पहिले टेंडर काढून आता सहा वर्षे झाली आहेत. अजून हा रस्ता पूर्ण करण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे. म्हणजे आठ वर्षे लागणार आहेत. म्हणजे या रस्त्याची किंमत 300 कोटी रुपये होणार. याचा भूर्दण्ड जनतेवर पडणार आहे. सभापती महोदय, आपणाला याची माहिती आहे. कारण आपण त्या भागात राहत आहांत. जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. या प्रश्नाविषयी या सभागृहात चर्चा होत आहे. त्यांनी टाकलेला क्लेम, पर्यावरणाच्या अडचणी व यासाठी लागणार पैसा याचा विचार करता संबंधीत कंत्राटदार ते काम करु शकतात की, नाही याची मला माहिती नाही. परंतु यातून मार्ग काढला पाहिजे. सभापती महोदय, हा प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर आपण यामध्ये लक्ष घातले पाहिजे. यापूर्वी या बाबत चर्चा झाली असता मा. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एक महिन्यात या बाबत कार्यवाही करतो. अजून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. आता हे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

कामाचे टेंडर निघाले होते. आणि हे काम पूर्ण करण्यास 9 वर्षाचा कालावधी जाणार असेल तर कोणत्या प्रकारचे राज्य आपण करीत आहोत ? सभापती महोदय, मला आपणाला विनंती करावयाची आहे की, आपण यामध्ये लक्ष घातले पाहिजे. आपण या बाबतचे काही निर्देश दिले पाहिजेत. त्याशिवाय हा प्रश्न सुटू शकत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनात या प्रश्नावर खूप चर्चा झाली आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. त्या मार्गावरुन जाणे जीवाला धोकादायक आहे. डिसेंबरच्या अधिवेशनात या सर्व गोष्टींची चर्चा सदनात झाली होती. त्यावेळी एक महिन्यात हे काम सुरु करु, अशा प्रकारचे आश्वासन आताचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी दिले होते. परंतु माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत, त्याप्रमाणे या बाबतची प्रोसीजरच अजून फायनल झालेली नाही. या ठिकाणी निवेदनात असे म्हटले आहे की, बीओटी तत्वावर मेसर्स रुबी या कंपनीला सदरचे काम 2001 मध्ये दिले होते. आता याच कंपनीकडून हे काम करुन घेण्याचा प्रयत्न का होत नाही ? हा कंत्राटदार आपण टर्मिनेट केला आहे. म्हणजे आता नवीन प्रोसीजर सुरु झाली आहे. एमएसआरडीसीकडे या रस्त्याचे काम देऊन या रस्त्याचे काम करण्यात येईल, असे अभिवचन यापूर्वी आपण दिलेले आहे. तसेच आश्वासन आता देऊन त्यांच्याकडून हे काम करुन घेण्यात येणार आहे काय ? या ठिकाणी नुसतेच वचन आम्हाला नको आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्याचे काम झाले पाहिजे. तेथील नागरिकांनी जेव्हा या बाबतची मागणी केली होती, तेव्हा मी स्वत: जाऊन या रस्त्याची पाहणी केली आहे. त्या ठिकाणी लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. सभापती महोदय, हा खरोखर गंभीर प्रश्न आहे. सात वर्षापूर्वी या रस्त्याचे काम मे. रुफीट कन्स्ट्रक्शनला देण्यात आले होते. परंतु त्यामध्ये काही अडचणी आल्यामुळे रुफीट कंन्स्ट्रक्शन हे काम पूर्ण करु शकले नाही. त्यामुळे त्यांचे कॉन्ट्रक्ट आपण टर्मिनेट केले आहे. त्यानंतर हे काम आतापर्यन्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होते. आता नुकतेच म्हणजेच दोन महिन्यापूर्वी हे काम आमच्या खात्याकडे आले आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुद्धलिखित प्रत / मुद्रणेतर नाही

श्री. अनिल देशमुख...

आमच्या खात्यामार्फत म्हणजे एमएसआरडीसीमार्फत सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरात लवकर या रस्त्याचे काम एमएसआरडीसीमार्फत केले जाईल.

डॉ. अशोक मोडक : मुळात नागपूरच्या अधिवेशनामध्ये दिलेले उत्तर माझ्याकडे आहे. त्यामध्ये अगोदर कल्याण महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाबरोबर पत्र व्यवहार केला त्याची प्रत माझ्याकडे आहे. माझा असा समज झाला आहे की, दुर्दैवाने याची जी अर्जन्सी जाणवायला पाहिजे ती कुठेही रिफ्लेक्ट होत नाही. आमची त्याठिकाणी रहाणाऱ्या नागरिकांची अपेक्षा अशी आहे की, तुम्ही आम्हाला काहीतरी डेडलाईन सांगा. समजा आता सांगता येत नसेलतर महिना पंधरा दिवसांनी संबंधितांची बैठक बोलावून त्याचे वेळापत्रक तयार करणार काय? अन्यथा त्याठिकाणी चालणे आम्हाला मुष्किल होणार आहे. आपण केवळ अडचणींची जंत्री वाचली हे उत्तर आपल्याकडून आम्हाला अपेक्षित नाही. उदा. वळण रस्ता बांधावा लागेल, पर्यावरण खात्याची मंजूरी घ्यावी लागेल. हे सर्व आम्हाला माहीत आहे. हे सर्व आपण किती वेळात करणार याची डेडलाईन सांगू शकाल काय? किंवा या महिन्याभरात संबंधितांची बैठक बोलावून त्याचे वेळापत्रक आपण करणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माझ्या छापील उत्तरामध्ये दिले आहे त्याप्रमाणे जवळ जवळ एक वर्षामध्ये या रस्त्याचे काम सुरु करु शकू.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील रस्त्यांची प्रचंड दुर्दशा झाली आहे त्यापैकी हा एक रस्ता आहे. प्राप्त झालेल्या अहवालाप्रमाणे एमएसआरडीसी अशा किती रस्त्यांची दुरुस्ती करणार आहे? त्या रस्त्यांच्या कामांच्या अंतिम निविदा केव्हा निघतील. आणि अग्रक्रमाने ठाणे जिल्हयातील एमएसआरडीसी मार्फत केल्या जाणाऱ्या सर्व रस्त्यांची कामे केव्हा सुरु करण्यात येतील? आणि त्याचा अंतिम टप्पा केव्हा गाठला जाईल याचा खुलासा करण्यात येईल काय?

श्री. अनिल देशमुख : या रस्त्याव्यतिरिक्त बाकीच्या रस्त्यांचे उत्तर दिले आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील घोडबंदर रस्ताच्या दुरुस्तीचे सव्वा दोन कोटी रुपयांचे काम टेंडर मंजूर करुन सुरु करण्यात येणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अतिशय दुर्दैवी बाब आहे. माझ्याकडे ठाण्याचे पोलीस आयुक्त श्री. शिवानंदन यांचेकडून अपघाताचे स्टॅटिस्टिक आले आहे. मृत्यूचा सापळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

बनलेला हा रस्ता आहे. एवढेच नव्हे तर या रस्त्यावरुन नाशिकला जातांना मी सुध्दा अपघातातून वाचलो आहे. त्याठिकाणी कल्याणच्या चौकामध्ये वरुन रस्ता खाली येतो त्या पॉईंटवर वारंवार अपघात होतात व लोक मरतात. त्या रस्त्यावर गड्डे पडले आहेत, तेथील लोकांना वेठीस धरण्यात आले आहे. या संदर्भात मी आपणाकडे बैठक बोलावून विनंती केली व यामधून मार्ग सांगितला होता. एकदा टेंडर निघाल्यानंतर कुणालाही विदाऊट टेंडर काम देता येत नाही. याठिकाणी दुसरे लिटिगेशन महत्वाचे आहे. रुफिट इंडस्ट्रिजने याठिकाणी क्लेम दाखल केला आहे. त्याचा निकाल लागेपर्यंत दुसऱ्यांना काम देता येणार नाही. हा प्रश्न सरकारच्या प्रचलित नियमाने सोडविता येऊ शकत नाही. उद्या जर रुफिटने क्लेम केलातर हे पैसे कोण भरणार? अशा क्लेमचे टेंडर कोण विकत घेणार? याठिकाणी तो व्हाएबल नाही. अशा स्थितीमध्ये 7-8 वर्षे गेली आहेत. माझी विनंती आहे की, वर्तमान नियमांचा आधार घेऊन एक महिन्याच्या आत काम सुरु करण्याची आवश्यकता आहे. त्याठिकाणी एमएसआरडीसी 300 कोटीचे मोठे काम करीत आहे. तेव्हा एक महिन्याच्या आत सर्व रस्ते रिपेअर करुन सर्व काम सुरु करुन ज्याप्रमाणे रुफिटचे टेंडर बी.ओ.टी. वर दिले होते त्याच कंडिशनप्रमाणे आजचा डी.एस.आर. रेट काढून टेंडर फायनल करुन त्याला देता येऊ शकते. त्यामध्ये अडचण नाही, तशी नियमात तरतूद आहे. माझी विनंती अशी आहे की, आपण त्या भागातील आहात. आपल्याला परिस्थिती माहीत आहे. त्या संदर्भात आपण बैठक घेतली होती. यापुढे जनतेचे हाल होऊ नयेत, अपघात होऊ नये, लोक मृत्युमुखी पडू नयेत म्हणून एकच विनंती आहे की, रुफिटचे जेवढे टेंडरमधील काम होते तेवढे काम द्या. त्या व्यतिरिक्त ठाणे्-भिवंडी बायपासवर गड्डा पडला आहे, तेथील फ्लायओव्हरचे काम सुध्दा घेतले पाहिजे. लोकांचे प्राण वाचले पाहिजेत. डी.एस.आर. प्रमाणे त्याची किंमत काढता येईल आणि त्या नियमाप्रमाणे आपल्याला टेंडर देता येऊ शकतें.तेव्हा माझा मंत्रिमहोदयांवर विश्वास राहिलेला नाही. मुळात 6 वर्षाचा कालावधी गेला आहे, त्यानंतर 1 वर्षांनी टेंडर निघणार, त्यानंतर 1 वर्षानी वर्क ऑर्डर निघणार आणि त्यानंतर 2 वर्षांनी काम सुरु होणार. हे 150 कोटींचे काम तोपर्यंत 500 कोटींवर जाणार. त्यानंतर हे व्हाएबल होण्याची शक्यता नाही. म्हणून सभापती महोदय, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून मंत्रिमहोदयांना निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे. तरच हे काम होईल अन्यथा हे काम होणार नाही, मध्येच अडकून राहील. म्हणून आपण निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख :सभापती महोदय,मी पहिल्यादांच सांगितले की, हे काम महत्वाचे आहे आणि नियमानुसार लवकरात लवकर ते सुरु करीत आहोत. नुकतेच आमच्याकडे हे काम हस्तांतरीत झाले आहे. तसेच नागपूर येंथील अधिवेशनामध्ये या विषयाच्या संदर्भात माननीय श्री.छगन भुजबळसाहेबांनी उत्तर दिले होते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री आणि आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. आमचा माननीय मंत्री महोदयांच्या आश्वासनावर विश्वास नाही. आतापर्यंत आठ वर्षे अशीच घालविली आहेत. तुम्ही काम करु शकत नाही, त्यांच्या शब्दावर आमचा विश्वास नाही. त्यामुळे सभापती महोदय, आपण याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना निर्देश द्यावेत की, हे काम झाले पाहिजे आणि लोकांचे प्राण वाचले पाहिजेत.

उप सभापती : या लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या संदर्भात मी देखील स्वत: माननीय मंत्री महोदयांबरोबर, संबंधित अधिका-यांबरोबर या भागाची पाहणी केली होती. तसेच घोडबंदर रस्त्याची पाहणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी देखील माननीय मंत्री महोदयांबरोबर केली होती. ठाणे जिल्हयातील ब-याचशा रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. एक निश्चित आहे की, मुंबईच्या जवळचे हे शहर आहे. जशी मुंबई या देशाची आर्थिक राजधानी आहे, त्याचप्रमाणे ठाणे शहर आणि ठाण्याच्या जवळचा सर्व भाग हा देखील महाराष्ट्रातील एक औद्योगिक नगरी म्हणून ओळखला जातो की ज्याठिकाणी लाखो कामगार रोजगारासाठी दररोज येत असतात आणि माल वाहतुक . . .

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मेगासिटी प्रकल्पामध्ये कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ या शहरांचा समावेश आहे.

उप सभापती : या सर्व गोष्टींचे शासनाने ख-या अर्थाने गांभीर्य ओळखण्याची गरज आहे. या भागाला मी स्वत: माननीय मंत्री महोदयांबरोबर भेट दिली होती. हा प्रश्न सात-आठ वर्षापासून प्रलंबित आहे आणि ही बाब या शासनास भूषणावह नाही. एखाद्या कामाचे टेंडर निघाल्यावर 7-8 वर्षे त्याची अंमलबजावणी होत नसेल, एखादे टेंडर काढून त्याची कार्यवाही सुरु होत नसेल तर राज्य शासनाने याबाबतीत ताबडतोब काही पर्याय शोधला पाहिजे. म्हणून नागपूर येथील अधिवेशनामध्ये हा प्रश्न निर्माण झाला होता, तेव्हा देखील मी हे काम एम.एस.आर.डी.सी.कडे द्यावे असे निर्देश दिले होते आणि हे काम तातडीने हाती घ्यावे असा त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती . . . .

वेळी निर्देशामध्ये सहभाग होता. परंतु खेदाने म्हणावे लागेल की, याबाबतीत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या ठिकाणी मी आणखी एक गोष्ट स्पष्टपणे सांगू इच्छितो की, शीळ-कल्याण-भिवंडी फाटा हा रस्ता फक्त त्या भागापुरता मर्यादित नसून त्याठिकाणाहून अन्य शहरांमध्ये जाण्यासाठी म्हणजे उल्हासनगर, अंबरनाथ, कर्जत, नेरळ इ. भागांमध्ये जाण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. मला त्याठिकाणच्या महानगरपालिका, नगरपालिका, आमदार या सर्वांनी पत्र लिहून या बाबतचे गांभीर्य माझ्या निदर्शनास आणून दिले आहे. यासंदर्भात माझी माननीय पोलीस आयुक्तांबरोबर चर्चा झाली असताना त्यांनी मला जो तक्ता पाठविलेला आहे, त्यानुसार 2002, 2003,2004 व 13 मार्च 2005 पर्यंत याठिकाणी झालेल्या अपघातांमध्ये जवळपास 146 लोक मृत झाले आहेत. या अपघातांत साधारणत: 250 ते 300 लोक गंभीर जखमी झाले आहेत आणि 500 ते 600 च्या वर किरकोळ जखमी झाले आहेत. किरकोळ अपघातांची संख्या देखील एक हजाराच्या वर आहे. एकंदरीत हा तक्ता पाहिल्यानंतर मला असे वाटते की, या कामाच्या बाबतीत फारसा अधिक वेळ न घालवता हे काम त्वरित होण्याच्या दृष्टीकोनातून मी पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे.

या कामाच्या (शीळ-कल्याण-भिवंडी) निविदा काढून प्रत्यक्षात काम चालू करण्यासाठी निदान सात ते आठ महिने लागतील असे शासनाने सांगितलेले आहे. आता तर माननीय मंत्री महोदयांनी 2 वर्षे लागतील असे सांगितले आहे . . . .

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी ते काम संपण्यासाठी लागतील असे सांगितले आहे. काम सुरु करण्यासाठी 1 वर्ष लागेल.

उप सभापती : काम सुरु होण्यासाठी एक वर्षे लागेल, मग काम पूर्ण होण्यासाठी किती काळ लागेल हे माहिती नाही. परंतु 2005 सालच्या पावसाळयात हा रस्ता वाहनांसाठी संपूर्णपणे बंद होण्याची शक्यता आहे आणि यामुळे डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ या शहरातून येणा-या, जाणा-या 20 लाख लोकांची गैरसोय होणार हे लक्षात घेऊन, शिळफाटा-कळंबोली रस्त्याचे काम पण म.रा.र.वि.महामंडळाने सुरु केले आहे. तेथे काम करीत असलेल्या कंत्राटदाराची मशिनरी आणि सर्व यंत्रणा आज त्या जागेवर उपलब्ध आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

उपसभापती .....

म्हणून त्या सदरच्याच कंत्राटदाराला हे काम दिले तर ते पावसाळया आगोदर सुरु करता येईल. तेव्हा सदर कंत्राटदाराला तो हे काम करकण्यास तयार असेल तर एम.एस.आर.डी.सी.च्या नियमानुसार आणि त्यांच्या अटी नुसार त्याला प्रथमत: विचारावे. जर तो तयार असेल तर रुफीटला काम देतांना निविदा मागविल्या होत्या असे माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म्हटले आहेच,.त्या निविदेचा, वाढीव कामाचा, किंमतीचा व सद्याच्या प्रचलित दरांचा आधार घेऊन या कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन हे काम सदर कंत्राटदारस देण्याचे आदेश शासनाने महामंडळास द्यावेत, जेणेकरुन हे काम लगेच सुरु होऊन कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ येथील नागरिकांची गैरसोय टळेल.

कल्याण बायपासवरील पुलाचे कामास उशीरा होणार असल्याने जनतेची गैरसोय टाळण्यासाठी रस्त्याचे काम पूर्ण करुन शासकीय धोरणानुसार पथकर वसूल करता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय आमदार श्री. जितेंद्र आव्हाड यांनी देखील घोडबंदर रस्त्याच्या संदर्भात आपल्या ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यात त्यांनी सांगितले की, टेंडर काढलेले आहे. त्याला किती वेळ लागणार आहे?

श्री. अनिल देशमुख : एप्रिलमध्ये आम्हाला टेंडर मिळत आहे..

उपसभापती :पावसाळयाच्या आत हे काम सुरु करता येणे शक्य असेल तर ते काम सुरु करावे नाही तर सदरच्या रस्त्याची, कारण याठिक्राणी देखील गुजरात हायवेला जाणारा प्रचंड ट्रॅफिक आणि त्या ठिकाणची नागरीवस्ती हे सगळे विचारात घेता सदरची कामे त्वरित सुरु करावीत अशा प्रकारचा...

श्री. अरविंद सावंत :सभापती महोदय, पुन्हा पावसाळा तोंडावर येईपर्यंत कामाची सुरुवात झालेली नसणार म्हणून तोपर्यंत त्या रस्त्याची डागडुजी तात्काळ करावी.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या कामच्या बाबतीत दोन टेंडर्स काढलेली आहेत. पहिले टेंडर घोडबंदर ते ठाणे व इतर रस्त्यांचे काढलेले आहे आणि ते काम चालू होईपर्यात रिपेअर्सचे काम करण्यासाठी रिपेअर्सचे सुध्दा टेंडर काढलेले आहे. रस्ता दुरुस्तीचे काम सुध्दा आठ ते दहा दिवसाच्या आत सुरु करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी या संदर्भात आता आपल्याला स्पष्टपणे निर्देश दिलेले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी शासनाने ताबडतोषीने करावी, अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना मी आज आपणास सदनात देत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी अपघात बघितलेला आहे. आज त्याचा मला किती त्रास होतो याची गेल्या तीन-साडेतीन वर्षापासून मला जाणीव आहे. माझे सगळे आयुष्यच त्यामुळे मागे गेलेले आहे.मी सार्वजनिक बांधकाम मंत्री असतांना या अपघाताच्या बाबतीत 2500 स्पॉट दुरुस्त केले होते. ज्या ठिकाणी तीनशे-तीनशे आणि चारशे-चारशे लोक मृत्यूमुखी होतात आणि आम्ही शासन म्हणून बघत आहोत.कशाचे नियम आहेत? सभापती महोदय, माझी एक विनंती आहे. आपण ठाण्यावरुन नाशिककडे जावयास निघतो तेव्हा तेथे असा चढ आहे. आपण तिकडून 100 च्या स्पीडने येतो आणि एकदम कल्याणला जंक्शन आहे. ..

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय नितीन गडकरी भिवंडीच्या बायपासबद्दल बोलत आहेत. ती खरी गोष्ट आहे. मी सुध्दा याची नोंद केली आहे. तेथे जो फ्लायओव्हर आहे तो एकदम भिवंडी जंक्शनवर निघतो. भिवंडी जंक्शनलासुध्दा फ्लायओव्हर घेण्याचे आम्ही प्रस्तावित केलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : त्याला हा फ्लायओव्हर जोडून घ्या.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्याप्रमाणे हा रस्ता करु. पण त्यामध्ये भिवंडी जंक्शनच्या बाबतीत सुध्दा काम करण्यात येणार आहे.

श्री. नितीन गडकरी : भिवंडी जंक्शनचे काम याला जोडणार आहात काय?

श्री. अनिल देशमुख : भिवंडी जक्शनचे काम याला जोडता येणार नाही. पण त्याचे अलग टेंडर काढून ते काम करावे लागेल.

उपसभापती :एम.एस.आर.डी.सी.कडून पत्र प्राप्त झाले आहे.ठाण्याचे कापूरबावडी जंक्शन आहे. आज मलापालिकेचे 20 कोटी रुपये एम.एस.आर.डी.सी.कडे पडून आहेत. वास्तविक पाहता त्या 20 कोटी रुपयातून हे काम त्वरित हाती घ्यावे, व एम.एस.आर.डी.सी.ने ते मान्य केलेले आहे. माझ्याकडे एम.डीं.चे पत्र आहे. म्हणून माझे शासनाला या संदर्भात क्लिअरकट निर्देश आहेत की,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ....

सदरच्या कापूरबावडी येथील 20 कोटी रुपयाच्या ब्रिजच्या कामासाठी आणखी काही थोडे फार पैसे लागले तर आपण महापालिकेला कळवा. शक्य असल्यास आम्ही कॉन्ट्रीब्यूट करु परंतु हे काम घोडबंदर रस्त्याच्या जोडीने हाती घ्यावे, अशा प्रकारचे निर्देश मी आपल्याला देत आहे. कृपया या संदर्भातील आपली पुढील कारवाईची कल्पना येत्या पंधरा दिवसाच्या आत या सदनाला प्राप्त व्हावी एवढेच सांगतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पंधरा दिवसाच्या आत ही कारवाई होते की नाही ते या सदनाला कळवावे. नाही तर पुढच्या अधिवेशनापर्यंत आम्हाला वाट पाहात बसावे लागेल.

श्री. अनलि देशमुख : सभापती महोदय, आपण जे निर्देश दिलेले आहेत त्याचे पालन आम्ही करु आणि त्याबाबत काय कारवाई केली याची माहिती पंधरा दिवसात सदनाला देऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर क्रमांक 3 च्या समोर सन्माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डयगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापूरे, प्रमोद नवलकर, सुरेश जेथलिया, दीपक सावंत, दिवाकर रावे, मधुकर सरपोतदार, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "इयत्ता 12 वी च्या परीक्षेतील गलथान व नियोजनशुन्य कारभाराची उच्च स्तरीय चोकशी" या विषयावर दिलेली लक्षवेधी सूचना दाखविलेली आहे. तथापि ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना महत्वाची आहे. आपण ती आज पुढे ढकललेली आहे, पण ती सोमवारी घेण्यात यावी.

उपसभापती :ही लक्षवेधी सूचना महत्वाची आणि मोठी आहे. त्यामुळे त्यासंबंधीची माहिती येण्यासाठी थोडासा वेळ लागणार आहे. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना निश्चितपणे पुढच्या आढवडयात घेण्यात येईल. ती कधी घेण्यात येईल यासंबंधात मी आपल्याला सोमवारी किंवा मंगळवारी सांगतो.

यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून देशभरात लागू होणाऱ्या "व्हॅट" चा औषधांच्या किंमतीवर होणारा परिणाम.

मु. शी. : दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून देशभरात लागू होणाऱ्या "व्हॅट" चा औषधांच्या किमतीवर होणारा परिणाम याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ. दीपक सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"देशभरात 1 एप्रिलपासून लागू होणाऱ्या व्हॅटचा परिणाम औषधांच्या किंमतीवर होणार आहे. तसेच सी.एस.टी., ऑक्ट्रॉय, सेस, टीओटी, प्रवेशकर आदिंचेही बंधन असणे, त्यात भर म्हणून राज्य सरकारने मेडिकल स्टोअर्सचे वार्षिक उत्पन्न विचारात घेऊन त्यानुसार त्रिस्तरीय करांची आकारणी करण्याचे जाहीर करणे, याचा परिणाम एकाच औषधाची किंमत वेगवेगळया औषध विक्रेत्यांकडे वेगळी असेल. या व्हॅटमुळे औषधांवर कराचा जादा बोजा पडल्याने मेडिकल स्टोअर्स चालविणाऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून ग्राहकांमध्येही गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. अशा प्रकारे उद्‌भवणारी गुंतागुंत पूर्णपणे टाळण्यासाठी औषधांना व्हॅटमधून सूट मिळावी किंवा एकदम सुरुवातीच्या टप्प्यात एमआरपीमध्ये व्हॅटची आकारणी व्हावी, अशी मागणी होत आहे. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून देशभरात लागू होणाऱ्या व्हॅटचा औषधांच्या किंमतीवर परिणाम या विषयावर विशेष उल्लेख मांडत आहे. सभापती महोदय, ज्यावेळी या सभागृहात व्हॅटच्या संदर्भात ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी औषधावर व्हॅट नको अशा प्रकारची मागणी मी आणि अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी केली होती. देशभरामध्ये 1 एप्रिलपासून व्हॅट लागू होणार आहे. आपल्याला प्रत्येकाला औषधे लागतात. दैनंदिन जीवनामध्ये जसा आहार लागतो तशी औषधे लागतात आणि ही रोजची गरज आहे. आपण रोज केमिस्टकडे जाऊन औषधे घेतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

डॉ. दीपक सावंत ....

आज या केमिस्टमध्ये आणि लोकांमध्ये फार संभ्रमाचे वातावरण आहे. ही औषधे व्हॅटपासून मुक्त होणे अतिशय आवश्यक आहे. निदान जी जीवन रक्षक औषधे आहेत ती तरी व्हॅटपासून मुक्त इ ाली पाहिजेत. होमियोपॅथिक ऑषधे असू द्या, ॲलॉपॅथिक औषधे असू द्या, आयुर्वेदिक औषधे असू द्या, या सर्व औषधांना समान न्याय मिळाला पाहिजे. केंद्र सरकारने ज्यावेळी हा व्हॅट लागू केला त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय श्री. चिदंबरम साहेबांना एक शिष्टमंडळ भेटले आणि तो व्हॅट 12.5 टक्क्यावरुन 4 टक्क्यावर आणला. मात्र तो माफ झाला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. महाराष्ट्राची परिस्थिती जर पाहिली तर महाराष्ट्रातील जनता खेडयामध्ये राहते आणि केवळ औषधासाठी पैसे नाहीत म्हणून औषधे घेत नाहीत आणि आपले प्राण गमावतात आणि जर यावर व्हॅट आला तर तो जिझिया कर असेल असे माझे वैयक्तिक मत आहे. महाराष्ट्रात या औषधांवर अनेक टॅक्सेस असतात. त्यामध्ये सी.एस.टी.टॅक्स असतो, ऑक्ट्राय असतो, सेस असतो, टीओटी असतो, प्रवेश कर असतो.ज्याप्रमाणे पश्चिम बंगाल आणि राजस्थानमध्ये अशा प्रकारचे टॅक्सेस माफ केले आहेत आणि औषधांच्या किंमती खाली आणलेल्या आहेत त्याप्रमाणे महाराष्ट्रात देखील हे सगळे कर माफ झाले पाहिजेत. मध्यंतरी केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे लोक मुख्यमंत्र्यांना भेटले होते. त्यांनी सांगितले त्यामध्ये व्हॅटची त्रिस्तरीय पध्दत होती. ज्या मेडिकल स्टोअर्सचे उत्पन्न 5 लाखापेक्षा कमी असेल त्यांना व्हॅटमधून वगळण्यात येईल. ज्यांचे उत्पन्न 5 ते 50 लाख रुपये असेल त्यांना एक टक्का उलाढाल कर लावण्यात येईल आणि 50 लाखाहून जास्त उत्पन्न असेल त्यांच्यावर 4 टक्के व्हॅट लावला जाईल. अशा प्रकारचे एक म्हणणे होते. यामुळे एक संभ्रमाचे वातावरण तयार होईल आणि औषधाच्या किंमती प्रत्येक मेडिकल स्टोअर्समध्ये वेगवेगळया होतील. अशा प्रकारची त्रिस्तरीय योजना जर आपण लागू केली तर त्यामुळे ग्राहकांना आणि जो गरजू माणूस आहे त्यांना वेगवेगळया दुकांनामध्ये वेगवेगळया किंमतीची औषधे मिळतील. त्यापेक्षा या व्हॅटमधून औषधांना मुक्त करावे आणि औषधावर व्हॅट लागू नये अशी शिफारस महाराष्ट्र शासनाने करावी अशी माझी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती आहे.

...3...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी. : राज्यातील प्राथमिक शाळेतील इयत्ता 4 थी व 7 वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये 10,000 लोकसंख्यावरील गावातील विद्यार्थ्यांना शहरी दर्जा दिल्याबाबत.

मु. शी. : राज्यातील प्राथमिक शाळेतील इयत्ता 4 थी व 7 वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये 10,000 लोकसंख्यावरील गावातील विद्यार्थ्यांना शहरी दर्जा दिल्याबाबत. सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य प्रा. शरद पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यातील प्राथमिक शाळेतील इयत्ता 4 थी व 7 वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेस बसणाऱ्या 10 हजार लोकसंख्येवरील गावातील विद्यार्थ्यांना शहरी दर्जा दिल्यामुळे त्यांचेवर झालेला अन्याय, शहरी विभागात समाविष्ट केल्यामुळे विष्यवृत्ती परीक्षेस उत्तम गुण मिळवूनही 10 हजार लोकसंख्येपेक्षा जास्त असलेल्या गावातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ, नवोदय विद्यालयामध्ये प्रवेश न मिळणे तसेच शिष्यवृत्तीची रक्कम अत्यल्प असणे, त्यामुळे विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये शिष्यवृत्ती परीक्षेबाबत निर्माण झालेली उदासिनता, 10 हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असली तरीही ग्रामपंचयती असलेल्या गावाचा शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ग्रामीण भागात समाविष्ट करणे व शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये भरीव वाढ करणे आवश्यक आहे, यासाठी याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष उल्लेख दाखल करीत आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. त्यासंबंधी मी हा विशेष उल्लेख करु इच्छितो. या परीक्षेमध्ये ग्रामीण आणि शहरी असे दोन वेगवेगळे विभाग केलेले असतात आणि सर्व खेडयांचा समावेश ग्रामीण भागामध्ये आणि सर्व शहरांचा समावेश शहरी भागामध्ये केला जात असे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

प्रा. शरद पाटील ....

परंतु सन 2004-2005 च्या परीक्षेच्या वेळी परीक्षा फॉर्म भरत असताना जिल्हा परिषदेने 10 हजार पेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे शहरी म्हणून फॉर्म भरुन घेतले. त्यामुळे ज्या गावची लोकसंख्या 10 हजारपेक्षा अधिक आहे अशा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी म्हणून मानण्यात आले आहे आणि शहरातील विद्यार्थ्यांबरोबर त्यांना स्पर्धा करावी लागत आहे. ग्रामीण भागातील शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या आणि गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या नवोदय विद्यालयामध्ये प्रवेश मिळतो. ज्या गावची लोकसंख्या 10 हजारपेक्षा जास्त आहे अशा गावातील विद्यार्थ्यांना या लाभापासून वंचित राहावे लागणार आहे. आमची अशी मागणी आहे की, जो ग्रामीण भाग आहे, ज्या ठिकाणी ग्रामपंचायत आहे,

यानंतर श्री. खंदारे .....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील..

ज्या गावची लोकसंख्या 10 हजारापेक्षा कमी आहे त्याला ग्रामीण म्हणावयाचे हे अन्यायकारक आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्व सुविधा त्यांना मिळत नाहीत. हा जो परीक्षा विभागाने निर्णय घेतला आहे तो रद्द करुन यावर्षीच्या परीक्षेत 10 हजारापेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येच्या शहरांना ग्रामीण मानण्यात यावे अशी विनंती यानिमित्ताने करतो. त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीच्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये येतात त्यांना अल्प म्हणजे 250 रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामध्ये किमान दुप्पट वाढ करावी. शिष्यवृत्ती अल्प असल्यामुळे विद्यार्थी व पालक या परीक्षेला बसण्यास उदासीन असतात तेव्हा या दोन्ही सूचनांचा शासनाने विचार करावा अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : किल्ल्यांचे व गडांचे जतन करणे.

मु.शी. : किल्ल्यांचे व गडांचे जतन करणे याबाबत श्री.अनिल परब यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कन्याकुमारीच्या विवेकानंद स्मारकाच्या धर्तीवर मुंबईत 100 कोटी रुपये खर्चून शिवस्मारक उभारण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी शासनाच्या "शिवजयंती" च्या दिवशी घेतला. परंतु महाराष्ट्रात वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या गडांची आज झालेली दुरावस्था लक्षात घेता महाराजांच्या काळातील हे वैभव आजच्या पिढीला दाखवावयास देखील मिळणार नाही. अशा शिवस्मारकांचे वैभव टिकविण्यासाठी या 100 कोटीपैकी अर्धी रक्कम खर्च करुन या किल्ल्यांचे/गडांचे जतन करण्याची आज गरज आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने कन्याकुमारीच्या विवेकानंद स्मारकाच्या धर्तीवर मुंबईत 100 कोटी रुपये खर्च करुन शिवस्मारक करण्याचे ठरविले आहे. या विशेष उल्लेखाद्वारे मी सांगू इच्छितो की, एक नवीन घोषणा शासन स्मारकासाठी करीत आहे. या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये व आजुबाजूला शिवकालीन गड आहेत आज त्यांची दुरावस्था झाली आहे. त्यांची डागडुजी करण्यासाठी कोणताही निधी उपलब्ध नाही. परंतु एक नवीन वास्तू बांधण्यात येत आहे. ज्या पुरातन वास्तू आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. म्हणून या 100 कोटींपैकी निम्मी रक्कम दुरावस्था झालेल्या गडकिल्ल्यांसाठी वापरण्यात यावी व उर्वरित निधी चांगल्या कामासाठी वापरण्यात यावा अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कशेडी घाटामध्ये अपघातांचे प्रमाण वाढणे.

मु.शी. : कशेडी घाटामध्ये अपघातांचे प्रमाण वाढणे याबाबत श्री.जयंत पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूरपासून सुरु होणा-या कशेडी घाटामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या घाटातून प्रवास म्हणजे मृत्यूला निमंत्रण अशाप्रकारचा समज प्रवासी वर्गामध्ये निर्माण होऊ लागला आहे. सहा महिन्यापूर्वी या घाटामधील भोगाव गावाच्या हद्दीमधील रस्ता खचला आहे. या खचलेल्या रस्त्यांवरील अर्धा भाग एक फुटाचा दगडी बांध घालून वेळ मारुन नेण्यात आलेली आहे. गेल्या सहा महिन्याच्या काळामध्ये याच परिसरामध्ये अपघाताच्या चार घटना घडलेल्या आहेत. कशेडी घाटामध्ये दरीच्या बाजूला लोखंडी संरक्षक कठडे बांधण्याचे तसेच गटारे बांधण्याचे काम सुरु आहे. कातळी बंगला ते भोगाव गावाच्या हद्दीपर्यंत लोखंडी कठडे बांधले आहेत. हे कठडे बांधताना काही ठिकाणी रस्त्याला दोन फुटांची साईडपट्टी शिल्लक राहिलेली नाही. तसेच संरक्षक कठडयांना दरीच्या बाजूला एक इंच जागाही शिल्लक ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे या कठडयांवर वाहन आदळले तर वाहन कठडयासह दरीत कोसळण्याची शक्यता आहे. जे सिमेंट कॉंक्रीटचे कठडे बांधण्यात आलेले आहेत ते काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. या कामांची चौकशी होणेही गरजेचे आहे. तरी या ठिकाणी होणा-या अपघातापासून वाहनांना संरक्षण मिळावे तसेच झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी व्हावी यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान योजनेचे लाभ न मिळणे.

मु.शी. : विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान योजनेचे लाभ न मिळणे याबाबत श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान योजना हे लाभ देण्याचे बंद केल्यामुळे त्यांचे होणारे आर्थिक नुकसान महाराष्ट्र शासनाने यासंबंधीचा कायदा त्वरीत पारित करण्याची गरज, त्यासाठी तिजोरीवर एक पैशाचाही भार पडणार नाही."

विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान योजना बंद करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे. विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान मिळाले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने 1966 पासून शासकीय कर्मचा-यांप्रमाणेच सेवानिवृत्तीवेतन व इतर सर्व लाभ खाजगी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दिला आहे. दुर्दैवाने हे लाभ विनाअनुदानित शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांना मिळत नाहीत. सन 1972 च्या उपदानाच्या ॲक्टनुसार शिक्षकेतरांना लाभ मिळतो पण शिक्षकांना मिळत नाही. दि.13.1.2004 च्या सुप्रीम कोर्टाच्या निवाडयामध्ये शिक्षकांचा समावेश नाही म्हणून त्यांना उपदान नाही असे सांगितले जात आहे. परंतु त्याच निवाडयातील शेवटच्या परिच्छेदाकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यात असे म्हटले आहे की,

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती संजीवनी रायकर पुढे सुरु...)

आमच्या या निर्णयामधून कोणीही असा विपरित अर्थ काढू नये की, विनाअनुदानित शाळेत काम करणा-या शिक्षकांना ग्रॅच्युइटी मुळीच देण्यात येऊ नये. भारतातील अनेक राज्यांनी याबाबतचा स्वतंत्र कायदा पारित करुन शिक्षकांना हा लाभ मिळवून दिला. म्हणून महाराष्ट्र, गुजरात या प्रगत राज्याच्या कायदे मंडळांनी या महत्वाच्या समस्येकडे लक्ष पुरवून स्वतंत्र कायदा करुन संबंधित शिक्षकांना सेवा उपदानाचा म्हणजे ग्रच्युइटीचा लाभ द्यावा. महाराश्ट्र शासनाने कायदा त्वरित पारित करावा. हे पुण्याकर्म करावे. यामुळे तिजोरीवर एक पैशाचाही भार पडणार नाही.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुरबाड येथील श्री. लियाखत शेख यांना झालेली अटक

मु.शी.: मुरबाड येथील श्री. लियाखत शेख यांना झालेली अटक याबाबत डॉ. अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपाध्यक्ष : माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडवी.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाच्या वेळेचा फायदा घेऊन मी निवेदन करणार आहे. माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत ही चांगली गोष्ट आहे. त्यांना हा विषय माहीत आहे. नागपूरला 7 डिसेंबरला विधानपरिषदेत विशेष उल्लेखाच्या तासिकेचा फायदा घेऊन मी श्री.लियाकत शेख यांच्या अटकेचा उल्लेख केला होता. मा. राज्यमंत्री महोदय, श्री. हसन मुश्रीफ यांनी देखील त्यांच्या कार्यालयातून पोलीस कचेरीला फोन केला होता. खरे म्हणाल तर श्री.लियाकत शेख यांची अटक ही कायद्याला सोडून होती. आपणा सर्वांचे दुर्दैव असे आहे की, विशेष उल्लेखाच्या बाबतीत गृहराज्यमंत्र्यांकडून माझ्याकडे जे उत्तर आलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. पण त्याच बरोबर मी आणखी काही सपोर्टिव्ह एव्हीडन्सही आणलेले आहेत. माझ्याकडे जिलहाधिका-यांचे पत्र आहे. मामलेदारांचे पत्र आहे. मी केवळ त्या पत्रातील आशय वाचून दाखवितो. सभापती महोदय, आता आपण मला सांगावे की, विशेष उल्लेखाला जर अशा त-हेने सरकारकडून ट्रिटमेंट मिळणार असेल तर या आयुधाचा उपयोग काय ? सभापती महोदय, या प्रकरणी काय झाले आहे ते कृपा करुन आपण समजून घ्यावे. श्री.लियाकत शेख हे शिक्षक आहेत. त्यांच्यावर आरोप करण्यात आला की, त्यांनी गौण खनिज चोरुन नेले. याबाबत खटला तहसिलदारांनी भरला नाही, जिल्हाधिका-यांनी भरला नाही. खटला ग्रामपंचायतीने भरला. विशेषत: 1967च्या विधिनियमानुसार यावर केवळ सरकारचाच हक्क असतो. असे असताना सुध्दा पोलिसांनी एका अर्थाने बेबंदशाही केली. मला गृहराज्यमंत्री श्री. सिध्दराम म्हेत्रे यांच्याकडून तेच उत्तर मिळाले आहे. "सदर गुन्ह्यातील आरोपी नामे लियाकत रब्बनी शेख यांच्या विरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांना 20.11.2004रोजी अटक करण्यात आली आहे." सभापती महोदय, विधिमंडळ सचिवांकडे जे पत्र आलेले आहे ती मी वाचून दाखवितो. त्यामधील रिलेव्हन्ट एक्स्ट्रॅक्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/

(डॉ. अशोक मोडक पुढे सुरु....)

असा आहे, - "पोलीस निरीक्षक मुरबाड यांच्याकडील दिनांक 7.2.2004च्या पत्रातील पॅरा क्रमांक 3 मध्ये कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश तहसिलदार, मुरबाड यांनी त्यांच्या दिनांक 6 नोव्हेंबर 2004च्या पत्रानुसार दिल्याचे नमूद केले आहे. परंतु अशा प्रकारचे कोणतेही आदेश तहसिलदार, मुरबाड यांनी दिलेले नाहीत". हे जिल्हाधिकारी सांगतात. मी आता तहसिलदारांचे पत्र वाचून दाखवितो. ते पत्र याहूनही धक्कादायक आहे. मुरबाडच्या तहसिलदार महिला आहेत. त्या सांगतात, "श्री. शेख यांच्यावर या कार्यालयाकडून गुन्हा नोंदविलेला नसून तो ग्रामविकास अधिकारी देहरी, तसेच सरपंच, ग्रामपंचायत देहरी यांनी नोंदविलेला आहे. तो कोणत्या नियमाच्या आधारे नोंदविलेला आहे हे सांगता येत नाही, समजून येत नाही. तसेच गुन्हा नोंदविताना या कार्यालयाला कोणीही आणि काहीही अवगत केलेले नाही."

सभापती महोदय, जर एका सामान्य शिक्षकाला तो कदाचित सत्तारुढ पक्षातील नसेल किंवा सत्तारुढ पक्षाच्या विरोधात जात असेल आणि त्याला जर पोलीस कोठडीत रहावे लागत असेल तर त्याच्या कुटुंबियांना, आसपासच्या नागरिकांना त्या लियाकत शेख विषयी काय इम्प्रेशन निर्माण होईल ? सभापती महोदय, याप्रकरणी आपण मला सांगावे की, अखेर माणसाने जावे कुठे ? विशेष उल्लेखाचा हा उपयोग आहे. It is as good as zero hour, आणि याचा फायदा जर सामान्य नागरिकाला मिळत नसेल तर एका अर्थाने मोगलाईचा, बेबंदशाहीचा अनुभव केवळ पोलिसांच्या अरेरावीमुळे श्री. लियाकत शेख माणसाला येत असेल तर याबाबतीत सभापती महोदय आपण आदेश द्यावेत अशी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करतो. कारण प्रकरण फार गंभीर आहे. माझ्याकडे जी कागदपत्रे आहेत ती देखील मी आपणास देतो. आपण ती कागदपत्रे कृपा करुन बघा.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी याठिकाणी पुनश्च मांडलेले प्रकरण अतिशय गंभीर आहे. श्री. लियाकत शेख हे शिक्षक आहेत. नागपूरच्या अधिवेशनामध्ये हा विषय मांडल्यानंतर पुन्हा तोच तोच विषय मांडवा लागत आहे. खरे म्हणजे सभागृहामध्ये विशेष उल्लेख उपस्थित झाल्यानंतर त्यासंदर्भात तीन महिन्यामध्ये दखल घेऊन कारवाई व्हायला पाहिजे होती. परंतु तसे न होता श्री. लियाकत शेख या शिक्षकाला पुन्हा पुन्हा सतावले जात आहे. गुन्हा कोणी, कसा आणि कोणत्या कायद्याखाली दाखल केला हे कळत नाही. तरी सुध्दा अशा त-हेने त्रास दिला जात आहे. तेव्हा मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाची आपण व्यक्तिश: दखल घेऊन शासनाला आदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांचे नेमके काय म्हणणे आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, गृहमंत्र्यांनी या संदर्भात काय समर्थन केले आहे ते पत्र मी आपल्याला सादर केलेले आहे. जिल्हाधिकारी सांगतात की, मी यासंदर्भात कोणताही आदेश दिलेला नाही, मामलेदारांनी कुठल्या नियमाच्या आधारे श्री.लियाकत शेख यांना अटक केली हे आम्हाला कळत नाही. मला या ठिकाणी असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ग्रामपंचायतीला लोकांना पकडण्याचे अधिकार दिल आहेत काय ? मामलेदारांना माहिती नाही, जिल्हाधिकारी यांना माहिती नाही. सन्माननीय श्री. मुश्रीफ साहेब,श्री. शिंगणे यांची मी या संदर्भात भेट घेतलेली आहे.हे दोघे माझ्या समक्ष मुरबाडच्या पोलीस अधिका-यांशी बोलले आहेत. अशी आरेरावी चालली आहे. मुरबाडचा एक पोलीस अधिकारी कोणाला जुमानत नसेल तर ते बरोबर नाही. उचलावयाचे आणि तुरुंगात टाकावयाचे असे वागत असेल तर त्याने आधार कोणाकडे मागावयाचा.

उप सभापती : मी शासनाला स्पष्टपणे सूचना देतो की, या संदर्भात पूर्ण माहिती घेऊन जर त्या व्यक्तीवर अन्याय झालेला असेल तर त्याचा ताबडतोब निवाडा होणे आवश्यक आहे. बेकायदेशीर कारवाई करणारा जो पोलीस निरीक्षक असेल त्याचेवर ताबडतोब पोलीस अधीक्षकांनी योग्य ती कारवाई करावी व त्याबाबतची माहिती सभागृहाला सोमवारी सायंकाळ पर्यन्त द्यावी.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अंबेजोगाई (जि.बीड) येथे शेळी मेंढी विकास महामंडळाच्या कार्यालयासमोर लाभार्थ्यांचे सुरु असलेले उपोषण.

मु. शी. : "अंबेजोगाई (जि.बीड) येथे शेळी मेंढी विकास महामंडळाच्या कार्यालयासमोर लाभार्थ्यांचे सुरु असलेले उपोषण"याबाबत सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, अंबेजोगाई(जि.बीड) येथे शेळी मेंढी विकास महामंडळाचे कार्यालय आहे. या कार्यालयासमोर जे लाभार्थी आहेत, ज्यांना कर्ज मंजूर झालेले आहे. परंतु त्या लाभार्थींना कर्ज उपलब्ध करुन न दिल्यामुळे ते लाभार्थी गेल्या सहा दिवसापासून अंबेजोगाई येथील शेळी मेंढी महामंडळाच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. हा मुद्दा आम्ही मागच्या अधिवेशनात देखील उपस्थित केला होता. या ठिकाणी सन्माननीय पशुसंवर्धन राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ उपस्थित आहेत. आज या लोकांचा उपोषणाचा सहावा दिवस आहे. या सभागृहाला उद्या आणि परवा अशी दोन दिवस सुटी आहे. सन्माननीय मंत्र्यांनी या सभागृहात या लाभार्थ्यांच्या अनुषंगाने काही आश्वासन दिले तर त्या लाभार्थ्याचे उपोषण सोडण्यास सांगण्याच्या कामी आम्हाला मदत होईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या सभागृहात हा विषय उपस्थित करण्यात आला होता. शेळी मेंढी विकास महामंडळाच्या शेळी,मेंढी आणि वाडे यांच्या वाटपामध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे आम्ही निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी मंत्री महोदयांनी वाडे वाटप आणि शेळी, मेंढी वाटप जे आहे ते कंत्राटी पध्दतीने देण्याविषयी समाजामध्ये अतिशय असंतोष होता. ती पध्दत थांबविण्यात यावी अशी विनंती आम्ही सभागृहात केली होती. त्या योजनेस स्थगिती देण्याचे आश्वासन आम्हाला देण्यात आले होते. या महामंडळात कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे याचीही चौकशी करण्याचे आश्वासन त्यावेळी दिले होते. आश्वासन दिल्याप्रमाणे वाडे वाटप आणि शेळी, मेंढी वाटप कंत्राटी पध्दतीने देण्याविषयी स्थगिती शासनाकडून देण्यात आली होती. परंतु अचानक ही स्थगिती उठविण्यात आली आहे. वाडे बांधकामाचे 30 हजार रुपयांचे कर्ज लाभार्थ्यांच्या माथी मारण्यात आलेले आहे. लाभार्थ्यांकडे वाडे देण्यात आले त्यात पाच ते सहा हजार रुपये किंमतीचे सामान त्यात आहे. वाडयांचे बांधकाम घेण्यास लाभार्थी तयार नाहीत. लाभार्थ्यांचे म्हणणे असे आहे की, आम्हाला 30 हजार रुपये द्या. आम्ही चांगले वाडे बांधू. कंत्राटदार शेळया, मेंढया हया 85 रुपये किलो भावाने लाभार्थ्यांना देत आहेत...

उप सभापती :सन्माननीय सदस्यांचा मुद्दा वेगळा आहे. तुम्ही वेगळे बोलता आहेत. तुम्हाला जे काही सांगावयाचे आहे ते थोडक्यात सांगा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, उपोषणकर्त्यांची मागणी अशी आहे की, त्यांना जे वाडे देण्यात आलेले आहेत ते महामंडळाने परत घ्यावेत. या वाडयांच्या बांधकामासाठी 30 हजार रुपये द्यावेत. लाभार्थ्यांना कंत्राटदार 85 रुपये किलो या भावाने शेळया,मेंढयांचा पुरवठा करु नका. आम्हाला त्याबदल्यात पैसे द्या. आम्ही बाजारभावाने शेळया, मेंढया खरेदी करण्यास परवानगी द्या. लाभार्थ्यांच्या जमिनी गहाण ठेवल्या आहेत. कर्जबाजारी होऊन नंतर आत्महत्त्या करण्यापेक्षा प्रथम उपोषणाचा मार्ग या लाभार्थ्यांनी अवलंबिलेला आहे. या उपोषणकर्त्यांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी काही आश्वासन दिले तर ते उपोषण सोडतील.

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी हा विषय उपस्थित केला होता. दरम्यान सभागृहामध्ये चर्चा झाली. ते लोक का उपोषणाला बसलेले आहेत याची नक्की माहिती मला आता देता येणार नाही. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, उपोषणकर्त्यांना उपोषण सोडण्यास सांगावे. सोमवारी किंवा मंगळवारी या महामंडळाशी असलेल्या सर्व अधिका-यांना बोलावून घेऊन त्यांचेसोबत माझ्या दालनात चर्चा करतो. जर या चर्चेत समाधान झाले नाही तर सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना व अन्य आयुधे वापरुन हा विषय पुन्हा सभागृहात उपस्थित करु शकतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : अधिका-यासमवेत बैठक घेऊन यासंबंधी माननीय मंत्र्यांना निवेदन करण्यास सांगावे.

उप सभापती : अधिका-यांशी बैठक घेऊन त्यात जो काही निर्णय होईल त्या निर्णयाच्या अनुषंगाने मंगळवारी किंवा बुधवारी निवेदन करावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

यानंतर श्री. उपरे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात सभागृहामध्ये निवेदन करण्याचे मान्य केले आहे. तरी मी त्यांना अशी सूचना करतो की, त्यांनी संबंधित जिल्हाधिका-यांना सांगावे की, याबाबतची बैठक सोमवारी किंवा मंगळवारी आम्ही घेत आहोत. तरी जे लोक उपोषणाला बसले आहेत त्यांनी उपोषण सोडावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिका-यांना कळविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाज- विधेयके

पृ.शी. : विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO.II OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित): अध्यक्ष महाराज, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 च्या कलम 25 अन्वये ज्या सात विद्याशाखा सिनेटमध्ये आहेत यामध्ये एखादी संघटना मतदारांना "अंध मतदान" करण्यास सक्ती करून संघटनेचे उमेदवार संघटनशाहीच्या आधारे निवडून आणते. संघटना नसलेले वा संघटनेच्या दाराशी न गेलेले, प्रामाणिक व तळमळीने काम करणा-या उमेदवारांना यामुळे निवडून येणे दुरापास्त होते.

एका विद्याशाखेतले मतदार त्याच विद्याशाखेतून उभ्या राहणा-या उमेदवारांना ओळखू शकणे शक्य आहे. दुस-या विद्याशाखेतल्या उमेदवारांना ओळखणे खरोखरच अवघड आहे. साधारणत: विद्याशाखांची एकूण संख्या 7 व महाविद्यालयांची एकूण संख्या 250 ते 300 च्या वर आहे. एकूण मतदारांची संख्या काही हजारांच्या वर आहे. त्यामुळे एखाद्या विद्याशाखेतील उमेदवाराला ओळखणे अवघड होऊन केवळ संघटनेने सांगितले म्हणून मतदान करणे भाग पडते. त्यामुळे अशा निवडणुकीत "अंध मतदान" फार मोठ्या प्रमाणात होते.

अधिनियमातील सदर तरतूद अनेक वर्षापूर्वी केलेली आहे व त्या काळात हाताच्या बोटावर मोजण्याइतकी महाविद्यालये होती व मतदारही फारच कमी होते. त्यामुळे उमेदवार हे सर्व-परिचित असण्याची शक्यता अधिक होती. परंतु आज अशी स्थिती नाही. असंख्य महाविद्यालये व हजारो मतदार शिक्षक आहेत त्यामुळे जर "शिक्षक प्रतिनिधींच्या जागा" विद्याशाखानिहाय व त्याप्रमाणात असतील तर "मतदानसुध्दा विद्याशाखानिहाय मतदार शिक्षकांव्दारे" होईल अशी तरतूद या कलमात असायला हवी. म्हणून हे विधेयक मी आणले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल परब : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 2 मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KTG/ SBT/

सार्वजनिक हिताच्या विषयावर चर्चा
अशासकीय ठराव

पृ.शी.: प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा खालावत चाललेला दर्जा.
मु.पृ. : प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा खालावत चाललेला दर्जा या विषयावरील श्री.मधुकर चव्हाण यांचा ठराव.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो :-

"राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता, या प्रकरणी अमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे."

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

सभापती महोदय, या ठिकाणी काही गोष्टी मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. गेली दहा-बारा वर्षे शिक्षण क्षेत्रामध्ये विशेषत: पहिली ते चौथी पर्यंत शिक्षणाची जी काही पध्दत चालू आहे त्यामध्ये सुधारणा करावी अशा त-हेच्या अनेक सूचना शिक्षण तज्ज्ञानी करूनसुध्दा याच्यामध्ये काही धडे आणि काही साहित्यिकांच्या कादंब-यांमधील आणि कवितांमधील भाग इकडचे तिकडे करून फक्त अभ्यासक्रमामध्ये बदल केला जातो. पण ते टाकावू आणि हस्यास्पद आहे आणि केवळ परिक्षार्थी अशा पध्दतीचे शिक्षण झालेले आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर दहावीच्या परीक्षेला 14 लाख विद्यार्थी बसतात. पण आता ही दहावीची परीक्षा कालबाह्य झाली आहे. कोणत्याही प्रकारचे व्यवसाय शिक्षण करायचे असेल किंवा उच्च शिक्षणाला जायचे असेल तर बारावीच्या गुणांचा विचार केला जातो. दहावीच्या परीक्षेच्या गुणांच्या आधारावर जीवनाला किंवा आपले पोट भरायला उपयोग होईल अशा संधी फारच कमी आहेत. पण त्यासाठी तुम्ही 17 ते 18 कोटी रुपये खर्च करीत आहात. 14 लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात आणि आज आपण सर्व वर्तमानपत्रामध्ये पाहिले आहे की, कॉपींचा खच पडलेला आहे. त्याला जबाबदार शिक्षक असतील, शाळा संचालक असतील किंवा गावाचा सरपंच असेल. तो सरळ येऊन सांगतो की, माझ्या मुलाला जरा सांभाळून घ्या. गेली दोन वर्षे तो नापास झालेला आहे. त्याने खिशातून पुस्तक आणले आहे त्यातून पाहून त्याला पेपर लिहू द्या. यापेक्षा दहावीची परीक्षाच तुम्ही रद्द करा. कारण आज वर्तमानपत्रामध्ये विदारक दृश्य महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेले आहे आणि 30 टक्के विद्यार्थी कॉपी करतात असा अहवाल आलेला आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

तेव्हा समोर पुस्तक ठेऊन उत्तरे लिहिण्याची या विद्यार्थ्यांना परवानगी देण्यात यावी आणि ज्याला 50 टक्के मार्क्स पडले असतील त्या विद्यार्थ्याला पास करण्यात यावे. या निमित्ताने तरी तो पुस्तके वाचील.सभापती महोदया,दुसरी गोष्ट अशी आहे की , आठवी, नववी आणि दहावीच्या परीक्षांमुळे मोठया प्रमाणावर क्लासेस सुरु झालेले आहेत आणि त्याची बांडगुळे माजलेली आहेत.चाटे क्लासेसच्या कोटयावधी रुपयांच्या जाहिराती वर्तमानपत्रात येत असतात..हे पैसे ते कोठून मिळवतात ? त्यांच्याकडे एवढे पैसे कसे येतात आणि चाटे क्लासेसमध्येच जाणा-या विद्यार्थ्याला 80 टक्के आणि 90टक्के मार्क्स कसे मिळतात ? तेव्हा या परीक्षेचे पुनर्विचार करण्याची वेळ आता आलेली आहे.20-25 वर्षापूर्वीचा काळ असा होता की, तेव्हा मॅट्रीकच्या परीक्षेला महत्व होते. आता महानगरपालिका असो वा पोलीस डिपार्टमेन्ट असो त्या ठिकाणी शिपायाची किंवा कॉन्स्टेबलची पदे भरत असतांनासुध्दा किमान शैक्षणिक पात्रता बारावीची ठरविण्यात आलेली आहे.पूर्वी दहावी पास असलेल्यांना या पदावर घेतले जात होते परंतु आता बारावी पास असलेल्यांना या पदावर घेण्यात येते. शिक्षणाची मर्यादा आता वाढविण्यात आलेली आहे.जी परीक्षा कालबाहय झालेली आहे त्याबाबतीत आपण विचार केला पाहिजे. त्या संदर्भात अनेक शिक्षण तज्ञ वारंवार सूचना करीत आसतात. त्याबाबतीत वर्तमानपत्रातून अनेक लेख प्रसिध्द होत असतात.इतकेच नव्हे तर त्याबाबतीत अनेक ठिकाणी चर्चा सत्रे आयोजित केली जातात परंतु प्रत्यक्षात मात्र निर्णय घेतला जात नाही डॉ.राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा 5 सप्टेंबर असल्यामुळे तो दिवस शिक्षक दिन म्हणून पाळला जातो. काही तरी कार्यक्रम आयोजित करुन विद्यार्थ्यांना बटाटा वडा खावयाला दिला जातो. दोन चार तास एखादा परिसंवाद आयोजित केला जातो.त्या परिसंवादामध्ये शिक्षण तंज्ञाना आपले विचार व्यक्त करण्यासाठी बोलावले जाते. त्या परिसंवादात शिक्षण तज्ञ आपले विचार अत्यंत पोटतिडकीने मांडत असतात परंतु त्यांनी मांडलेल्या सूचनांच्या बाबतीत मात्र काहीही अंमलबजावणी केली जात नाही.ही पध्दत काही बरोबर नाही असे मला वाटते. पुढची पिढी आय.ए.एस.अधिकारी होणार आहे. जी पिढी अठरा आणि वीस वर्षानंतर समाजामध्ये जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रात जाऊन कोणी शिक्षक होतील कोणी पोलीस अधिकारी होतील तर कोणी आय.ए.एस. अधिकारी होतील.निदान त्या मुलाला जे काही शिक्षण मिळालेले आहे त्या शिक्षणाच्या आधारावर त्याचे पोट भरले पाहिजे. म्हणजे पोट भरण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण त्याला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

दिले गेले पाहिजे असे मला या ठरावाच्या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे. दहावीच्या परीक्षेच्या बाबतीत विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते. दुसरी गोष्ट अशी आहे की एखादा विद्यार्थी दहावीची परीक्षा नापास झाला म्हणजे आयुष्यात तो नापास झाला असे आहे काय?. अशा विद्यार्थ्यावर एक प्रकारे उपेक्षेचा शिक्का मारला जातो.तो विद्यार्थी लाजत असे सांगतो की मी दहावी नापास आहे.आठवी, नववी ,दहावीच्या सर्व विद्यार्थ्याना इतिहास आला पाहिजे,गणित आले पाहिजे,भूगोल आला पाहिजे, त्याचबरोबर हवेमध्ये प्राणवायू किती आहे आणि कार्बन डॉक्स ऑक्साईड वायू किती आहे हे माहीत असले पाहिजे काय ? मला असे वाटते की त्याची काहीही गरज नाही. आपल्या देशाचा इतिहास कसा आहे,त्या देशाची भौगोलिक माहिती काय आहे, तेथील सामान्य ज्ञान काय आहे यासबंधीची प्राथमिक माहिती मात्र त्या विद्यार्थ्याला असली पाहिजे.एखाद्याला एक्सपर्ट व्हावयाचे असेल तर आठवी,नववी आणि दहावीच्या नंतर त्याला वेगवेगळे विषय दिले गेले पाहिजे.ज्याप्रमाणे आता महाविद्यालयातील पहिल्या वर्षी, काही कंपलसरी सब्जेक्ट असतात .त्यानंतर दुस-या आणि तिस-या वर्षी थ्री युनिटस, सिक्स युनिटस असतात.,एखाद्या विद्यार्थ्याला 600 मार्काचे एंटायर एकोनॉमिक्स, वा एंटायर जॉग्रफी वा एंटायर मराठी हा सबजेक्ट घ्यावयाचा असेल तर तो हा सबजेक्ट घेऊ शकतो.तेव्हा या प्रमाणे त्या विद्यार्थ्याला आपल्याला हवा तो विषय घेता आला पाहिजे आणि या बाबतीत विचार होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.माननीय शिक्षण मंत्र्यांना मी पाचवी आणि आठवीच्या पुस्तकातील एक दोन उदाहरणे मी देतो. पाचवीच्या पुस्तकात जे धडे आहेत ते जसेच्या तसे आठवीच्या पुस्तकात सुध्दा आहेत. आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकात "स्वातंत्र्याचे उपासक" हा धडा आहे तोच धडा पाचवीच्या इतिहासाच्या पुस्तकात पान नंबर दोनवर आहे. आठवीच्या पुस्तकात जे शब्द आहे तेच तंतोतंत शब्द पाचवीच्या पुस्तकात आहेत. फक्त त्या धडयाला "आधुनिक युगाचा आरंभ" असे नाव देण्यात आलेले आहे.त्यानंतर मी दुसरे उदाहरण देतो. पाचवीच्या पुस्तकात "नवे विचार नवी दृष्टी" हा धडा असून आणि हा धडा जशाच्या तसा आठवीच्या पुस्तकातील पान नंबर 51 वर देण्यात आलेला आहे.त्यामध्ये काहीही शब्दांचे व परिच्छेदाचे बदल करण्यात आलेले नाहीत. या ठिकाणी मी काही पुस्तके आणलेली आहेत आणि दोन दिवसामध्ये मी जवळजवळ 50-52 पुस्तके चाळून पाहिली आहेत .पाचवीच्या इतिहासाच्या पुस्तकात पान नंबर 25 वर न्यायमूर्ती महादेव

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

गोविंद रानडे, वीर शलिंगम पंतालु आणि स्वामी विवेकानंद यांचा धडा असून तो जशाच्या तसा आठवीच्या पुस्तकात सुध्दा आहे.पाचवीच्या पुस्तकात जी माहिती होमरुल चळवळीबद्दल चतु:सुत्रीबद्दल आहे तीच माहिती आठवीच्या पुस्तिकात पान नंबर 51 वर आहे.ही बाब शासनाच्या लक्षात आलेली नाही काय ? कोणत्याही मुख्याध्यापकानी वा शिक्षकांनी ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिली नाही काय ? भारताच्या स्वातंत्र्य लढयात ब्रिटीशांच्या लॉर्ड कर्झन याने काय केले याची माहिती दिली आहे. तेव्हा त्या माहितीशी आपल्याला काय करावयाचे आहे? पहिल्या महायुध्दात कोठल्या तरी अंडरसनचा खून झाला होता त्यासबंधी पंधरा पानावर असा प्रश्न विचारला जातो की पहिल्या महायुध्दाची बीजे कशात आहेत ?

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

त्याच्यापेक्षा या देशातील सवर्ण आणि दलित यांच्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चळवळ का करावी लागली हे लोकांना शिकवा. या देशामध्ये जवळजवळ हजारो एकर जमीन अहिल्याबाई होळकर यांनी केवळ पक्ष्यांना खायला मिळावे म्हणून त्यातील कणीसही काढायचे नाही हे का शिकविले ते लोकांना शिकवा . या देशामध्ये शाहू महाराजांनी कशा प्रकारे शैक्षणिक तुलना केली शिकवा. ठीक आहे जुजबी ब्रिटीशांनी या देशावर कसे अत्याचार केले ते काही नाही. ब्रिटीशांनी आम्हांला या देशामध्ये लोकशाही कशी शिकविली ते आहे. ब्रिटीशांनी आम्हांला तारायंत्र कसे दिले ते आहे.ब्रिटीशांनी आम्हांला ...

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. श्री. चव्हाण साहेब आता असे म्हणाले की, पहिल्या महायुध्दाची बीजे काय आहेत ते मुलांना कशासाठी विचारता ? लहानपणापासून असे विचारले नाही तर देशाला परराष्ट्रमंत्री कसा काय मिळेल ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा मुद्दा वेगळा आहे. ते जर त्यांना शिकवायचे असेल तर बी.ए. ला आर्ट विषय घेऊन शिकता येते. पहिल्या वर्षी इंटरला शिकता येते. 10 वी ला बी.ए.चा विषय घ्या, 11वी ला घ्या 8 वी मध्ये पहिल्या महायुध्दाची बीजे कशात आहेत हे शिकण्याची मला गरज नाही. मला 8 वी मध्ये माझ्या देशातील संतांची माहिती पाहिजे.मला 8 वी मध्ये या देशातील सामाजिक चळवळीची माहिती पाहिजे. मला 8 वी मध्ये आई-वडिलांशी कसे वागावे याची शिकवणी मिळाली पाहिजे.मला 8 वी मध्ये थोरा-मोठयांशी कसे वागावे हे शिकवायला आले पाहिजे.मला 8 वी मध्ये माझ्या वर्गातील दलित असलेल्या मुलाला घरी कधीतरी जेवायला आणले पाहिजे कारण त्याच्यासाठी जातीभेद मानता येणार नाहीत ही शिकवण मिळाली पाहिजे.मला 8 वी मध्ये या देशाच्या मातृभूमीची सेवा कशी करता आली पाहिजे ते शिकले पाहिजे. सकाळी आई-वडिलांना विनम्रतेने नमस्कार करुन बाहेर पडले पाहिजे. थोरा-मोठयांचा आदर केला पाहिजे हे शिकले पाहिजे. महायुध्दाची बीजे मला 8 वी मध्ये शिकण्याची गरज नाही. ती मी नंतर शिकेन. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ 5 वी च्या मुलांना शिकविलेला आहे. 6 वी , 7 वी, 8 वी, 9 वी आणि 10 वी च्या पुस्तकात एकही धडा छत्रपती शिवाजी महाराजांचा नाही. ब्रिटीश राणीने कशी संसदीय पध्दत दिली याचे अतिशय चांगले वर्णन आहे. पण अष्टप्रधानांच्या माध्यमातून सगळयांचे ऐकून घेऊन नंतर कल्याणकारी राज्य ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

कसे करावे हे शिवाजी महाराजांनी केले त्याबद्दल कुठेही त्याच्यामध्ये धडा नाही. याच्यामध्ये शांततेची चळवळ गांधीजींनी कशी चालविली हे शिकवायला पाहिजे. एकाही इतिहासाच्या पुस्तकात भगतसिंगांची माहिती नाही. सावरकरांची पूर्ण माहिती नाही. चंद्रशेखर आझादांची माहिती नाही. तात्या टोपेंची माहिती नाही. 1857 मधील झाशीच्या राणीचा पराक्रम माहिती नाही. या देशामधील क्रांतिकारांनी कशा त-हेच्या हालअपेष्टा सहन केल्या त्या माहिती नाहीत. सावरकरांना बारीने कसे हाल अपेष्टरा सहन करुन कसे मारले ते माहिती नाही. त्याच्यामुळे झालेल्या अन्यायाबद्दल चीड निर्माण होईल आणि पुन्हा मी या देशात ही स्थिती पुन्हा निर्माण करणार नाही हे संस्कार त्यांच्यावर व्हायला पाहिजेत. ज्याला आपला इतिहास माहिती नाही तो त्या ठिकाणी आपले भविष्य कधी घडवू शकणार नाही. नंतर 10 वी च्या इतिहासामध्ये... तुम्ही इतका खोटा इतिहास लोकांना सांगता. आपल्या संस्कृतीबद्दल काही सांगत नाही. 10 वी च्या इतिहासामध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना आणि वाटचाल,ब्रिटीश सत्ता स्थापनेपासून संपूर्ण भारत प्रथम एकछत्री अंमलाखाली आला. समान प्रशासन,समान शिक्षण पध्दती ,इंग्रजी भाषेचे समान सूत्र,सामाजिक सुधारणा चळवळ आम्हांला ब्रिटीशांमुळे मिळाली ? हे शिकविणार तुम्ही ? भारत कधी एकछत्र नव्हता ? सम्राट चंद्रगुप्ताच्या काळात नव्हता ? सम्राट समुद्रगुप्ताच्या काळात नव्हता ? भारत हा काही वेगवेगळया प्रांताचा देश होता आणि आम्हांला ब्रिटीशांनी शिकविली सामाजिक चळवळ ? या देशामध्ये त्याठिकाणी हिंदू धर्मियांच्यामध्ये असलेल्या अनेक वाईट चालीरीती याच्यामध्ये आम्हांला ब्रिटीशांनी शिकविल्या ? शबरीच्या तोंडची बोरे प्रभूरामचंद्रांनी खाल्ली ती एक भिल्लीणी होती. प्रभू रामचंद्र ईक्ष्वाकू कुळातील होते तरीसुध्दा शबरीची उष्टी बोरे त्यांनी खाल्ली हा एक सामाजिक चळवळीचा आणि समानतेचा संदेश देणारा एक धडा हा त्याठिकाणी आहे. हा संदेश देणारा धडा आहे तो शिकवा ना. गदिमा यांनी लिहिले आहे की,सीतेचे त्याठिकाणी लग्न झाले सीता परित्यक्ता होती जनक राजाला कुठे मिळाली ती माहिती नाही. "आकाशाशी जुळले नाते,धरणी मातेचे, स्वयंवर झाले सीतेचे". प्रभू रामचंद्र सूर्यवंशातले.तर त्या काळामध्ये आताच्या काळामध्ये जसे वर्णन केले जाते परित्यक्ता होती कुणाची होती माहिती नाही. शिकवा ना मुलांना. कसा मुलगा झाला याचे

....3

18-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) HH-3

SSK/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. गायकवाड 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

वर्णन नाही. आमचा इतिहासच शिकविला नाही. आणखी अनेक धडे मी सांगू इच्छितो की शकुंतलेच्या पोटी झालेला भरत त्याच्या नावाने भारत राज्य आले. आणखी अनेक धडे मी सांगू इच्छितो. 5 वी इयत्तेला अयोग्य रीतीने शिकविले जात आहे. नवे पर्व आणि सत्याग्रता आजची जी कोवळी मुले असतात त्यांना होमरुल चळवळ अतिशय डिटेलमध्ये आणि क्लिष्ट शब्दामध्ये 1900 साली इंग्रज राज्यकर्त्यांनी एका हाताने भारतीयांना काही अधिकार दिले...

यानंतर श्री. सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

तर दुसऱ्या हाताने भारतीयांना दडपून ठेवण्यासाठी शस्त्र उगारले आणि हे शस्त्र म्हणजे रौलट कायदा, त्याचे वर्णन केलेले आहे. हे सारे पाचवी इयत्तेतील मुलांसाठी. अध्यक्ष महोदया, कोठे त्या पाचवीतील मुलांच्या बुद्धीमत्तेची पातळी असणार आहे ते पाहून तरी आपण त्यांना शिकविले पाहिजे की नाही ? त्यानंतर व्याकरण आपण काय शिकवितो, कोणत्या इयत्तेतील मुलांना शिकवितो हेही पहा. व्याकरण हे 5वी ते 8वी-10वी पर्यंतच्या मुलांना शिकविले जाते. 20 गुणांचे व्याकरण असते. त्याबाबतचे उदाहरण मी आपणास देतो. 10 गुण कशासाठी दिले आहेत ? तर पुढील शब्द जसेच्या तसे लिहा .. सृष्टी, तृप्ती, तृषार्द, क्रूर, तृष्णा, पृष्ठभाग ... हे काय आपण 10 वी तील विद्यार्थ्यांना शिकविणार आहात ? 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आपण हे शिकवित नाही का? अध्यक्ष महोदया, अशा अनेक त्रुटी यामध्ये असल्याचे मी आपल्याला अगदी उदाहरणासह दाखवून देऊ शकतो. म्हणूनच यामध्ये आमूलाग्र बदल केला गेला पाहिजे. कारण पुढील एक पिढी घडवितो आहोत आपण. त्यानंतर अध्यक्ष महोदया, 4 थीच्या बालभारती पुस्तकामध्ये आपण काय दिले आहे त्याचे उदाहरण मी आपणापुढे ठेवतो. वीरांगना - हैद्राबादच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक पराक्रमी वीर धारातीर्थी पडले. अशा पराक्रमी वीरांच्या नामावलीत गोदावरीबाई टेके यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. आता हा जो डिटेल इतिहास आहे त्याबाबत साधारणपणे म्हटले जाते की, पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी इयत्तेमध्ये थोडा थोडा इतिहास शिकवला जावा. उदाहरणार्थ मी सांगेन की, शिवाजी महाराजांनी रोहिडेश्वराला शपथ घेतली. त्याचा थोडासा इतिहास या लहान मुलांना शिकवा. मग ती शपथ त्यांनी का घेतली ? त्यामागे त्यांना प्रेरणा कोणी दिली ? का दिली? हा इतिहास तुम्ही आठवी, नववी इयत्तेतील विद्यार्थ्यांना शिकवा. शिवाजी महाराजांनी त्या काळामध्ये कोठल्याही प्रकारे जात-पात न मानता आपल्या सैन्यामध्ये कशा प्रकारे माणसे घेतली हे चौथीच्या मुलांना कशाला, नववी-आठवीच्या मुलांना शिकवा. त्यातून त्याच्या त्या संस्कारित मनावर प्रभाव पडेल. शिवाजी राजा हा केवळ लढाया लढल्यामुळे, अफझलखानाचा कोथळा बाहेर काढून वा शाहिस्तेखानाची बोटे कापली एवढ्या पुरताच महान नाही तर त्यांच्या आयुष्यातील काही छोट्या छोट्या गोष्टी सांगून.. त्यांनी आपले सैन्य, आरमार कसे उभे केले, त्यांनी राज्य कसे उभारले, कसा कारभार केला, त्यांनी शेतकऱ्यांच्याबाबतीत कसे निर्देश दिले.. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला देखील हात लावू नका, विडी-काडी ओढताना इतकी काळजी घ्या की आयुष्यभर कष्ट करून त्या

.... आयआय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

शेतकऱ्यांनी जी वर्षभराची गंजी ठेवलेली असते ती तुमच्या चिलीम ओढताना पडलेल्या एका ठिणगीमुळे नष्ट होऊ शकते हे त्याने आपल्या सैन्यातील प्रत्येक माणसाला सांगितले आहे, त्या मागचे इंगित काय आहे हे आपण शिकविले पाहिजे. थोडक्यात आपला शिवाजीराजा कसा होता, त्यांनी राज्य कारभार कसा केला हे शिकवा. केवळ त्याने अफझलखानाचा कोथळा काढला हे तर शिकवताना सांगितलेच पाहिजे अगदी पिढ्यान् पिढ्यांना शिकवले पाहिजे. कारण दहशतवाद संपविण्याचा तो एकमेव मार्ग आहे. परंतु त्यापेक्षाही जास्त अनेक गोष्टी आपण या मुलांना शिकवू शकतो. त्यानंतर अध्यक्ष महोदया, नद्यांच्या खोऱ्यातील संस्कृती शिकविताना नाईल नदीच्या खोऱ्यातील संस्कृती तुम्ही आम्हाला सांगितली. इजिप्त नदीच्या खोऱ्यातील संस्कृती सांगितली, चीनच्या नदीकाठची संस्कृती सांगितली आहे.. हे सारे इयत्ता नववीच्या पुस्तकामध्ये आहे. पण आमच्या सिंधू नदीची संस्कृती आपल्याला आठवली नाही. ती आपण आपल्या मुलांना अगोदर शिकविणार नाही का ? गंगेच्या काठची संस्कृती शिकविणार नाही का ? भगिरथाने अतिशय प्रयत्नाने कशा प्रकारे कैलासावरून गंगा पृथ्वीवर आणली .. ही काही केवळ पुराणातील कथा नाही. तर ते सुद्धा त्या काळामध्ये केलेले एक महान काम होते, त्यानंतर कशा प्रकारे कालवे खोदले, कशा प्रकारे नदीचा प्रवाह बदलला हे सांगितले पाहिजे होते. पण आपण आमच्या मुलांना नाईल नदीच्या, चीनच्या नदीच्या काठची संस्कृती शिकविणार आणि आमच्या गंगेकाठची, सिंधू नदीची संस्कृती शिकविणार नाही का ? त्यानंतर अध्यक्ष महोदया, इयत्ता सहावी ला इतिहासाचा धडा आहे. पण अध्यक्ष महोदया, सुभाषचंद्र बोस यांच्या विषयीची माहिती वा महत्व सांगणारा धडा आपल्या पहिली पासून दहावी पर्यंत कोठेही नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांचे योगदान कसे महत्त्वाचे होते हे सांगणारा धडा कोठेही नाही. गांधीजींनी त्यांचा काही काळ कसा छळ केला, त्यालास कंटाळून ते कसे परदेशामध्ये गेले हे आपण नका सांगू. नेहरूंच्या प्रेमापोटी गांधीजींनी अन्य कोणाला पुढे येऊ दिले नाही हे नका सांगू. परंतु स्वातंत्र्यवीर सुभाषचंद्र बोस यांनी परदेशात जाऊन किती कष्ट घेऊन, किती हालअपेष्टा त्यांनी सहन केल्या हे आपण सांगितले पाहिजे होते ते काही आपण कोठेही सांगितले नाही. त्यांची माहिती असलेला धडा आपण बालभारतीमध्ये घेतलेला आहे. आता मराठीच्या बालभारतीमध्ये आपण काय शिकवितो ? कुसुमाग्रजांची एखादी कविता असेल, वाङ्मयीन माहिती आपण त्यामध्ये देतो, पण इतिहास काही सांगत नाही. पण त्या

.... आयआय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठिकाणी त्यांच्याबाबतचा एक लहानसा धडा दिला आहे. बाकी पहिली ते 10 पर्यंतच्या इतिहासामध्ये कोठेही आपण सुभाषचंद्र बोस यांचेविषयी माहिती वा धडा दिलेला नाही. ब्रिटीशांना केवळ 'चले जाव' सांगितल्यामुळे ब्रिटीश आपल्या देशातून गेलेले नाहीत, वा मुंबईच्या भाऊच्या धक्क्यावर आम्ही त्यांना टाटा केलेला नाही. तर त्यासाठी अनेकांनी आपल्या आयुष्याची होळी केलेली आहे तो इतिहास आपण आमच्या मुलांना शिकविणार आहोत की नाही ? फंद-फितुरीमुळे त्या ठिकाणी चंद्रशेखर आझादांना ब्रिटीशांकडून ठार मारले गेले हे आपण आमच्या मुलांना शिकविणार आहात की नाही ? कोणी तरी पैशासाठी ब्रिटीशांना त्यावेळी फितूर झाला, त्यानंतर राजगुरू, भगतसिंग, सुखदेव पकडले कसे गेले हे आपण मुलांना आज शिकविणार आहात की नाही ? 42 दिवसांच्या उपोषणामध्ये त्यांचे ब्रिटीशांनी कसे हाल केले हे आम्ही मुलांना शिकविणार आहोत की नाही ? तर ते न शिकविता, ब्रिटीश कसे चांगले होते, इंग्लंडच्या राणीने काय केले ? रौलट ॲक्ट काय होता, 1935 चा काय कायदा होता, लॉर्ड कर्झनने काय केले ? ... आता लॉर्ड कर्झनने आम्हाला काही चांगल्या गोष्टी जरूर दिल्या, पण त्याच कर्झनने 1905 साली बंगालची फाळणी करून या देशात हिंदू-मुसलमानांमध्ये धर्मद्वेषाची बीजे कशी पेरली हेही आपण मुलांना शिकविले पाहिजे. म्हणून मला असे वाटते की, या एकंदर परिस्थितीमध्ये आपण आमुलाग्र बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. दुसरे म्हणजे आपण किती मुलांना पैसे देता ? त्या ठिकाणी दोन सत्रे असतात. पहिलीच्या मुलांना 4 किलो वजनाचे दप्तर आहे. ...

(यानंतर श्री.जागडे ... जेजे 1 ..

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, मुलांना किती वह्या आणि पुस्तके घेऊन जावे लागतात ? दुसरीच्या मुलांना चार किलो, तिसरीच्या मुलांना पाच किलो, चवथीच्या मुलांना सहा किलो, पाचवीच्या मुलांना सात किलो, सहावीच्या मुलांना आठ किलो, सातवीच्या मुलांना नऊ किलो, आठवीच्या मुलांना दहा किलो, नववीच्या मुलांना अकरा किलो, दहावीच्या मुलांना बारा किलो, इतक्या वजनाची पुस्तके घेऊन शाळेत जावे लागते.. मला या निमित्ताने असे वाटते की, आपण दोन सत्रात शिक्षण शिकविले पाहिजे. पहिल्या तिमाहीत किती पोर्शन संपवावयाला पाहिजे, दुस-या तिमाहीत किती पोर्शन संपवावयाला पाहिजे आणि नंतर किती संपवावयाला पाहिजे हे अगोदर ठरलेले असेल तर त्या प्रमाणे मुलांना अभ्यास दिला पाहिजे. दुसरी गोष्ट मला अशी सांगावयाची आहे की, आठ तासाची शाळा घेण्याची गरज नाही. एक-एक तासाचे चार पिरियड आपण घेतले पाहिजे. आता आपल्या शिक्षणाचा दर्जा काय आहे, हे काल आपण या ठिकाणी जे उत्तर दिले आहे, त्यामध्ये दिसून आला आहे. आपण असे उत्तर दिले आहे की, " महाराष्ट्रासारख्या राज्याला भूषणावह नाही .विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने हितावह नाही, म्हणून मागे पडलेल्या मुलांना किमान लिहिता-वाचता येईल यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच मुलांना सरावासाठी वाचन-लेखन हमी कार्यक्रम पुस्तिका तयार करण्यात आली." सभापती महोदया, महाराष्ट्र राज्य 1960 साली स्थापन झाले आहे. आता ही अक्कल आपणाला 45 वर्षानंतर आली आहे काय ? कसे शिकविले पाहिजे ? काय शिकविले पाहिजे ? सभापती महोदया, मी एका शिक्षण संस्थेचा संचालक आहे. पहिली ते चवथीच्या मुलांना काहीच लिहिता येत नाही. पाचवीमध्ये येणारी मुले कच्ची येतात. परिणाम असा होतो की, ग्रामीण भागातील मुलांचे रिझल्ट 35 ते 40 टक्के लागतात. आठवी, नववी पास झाल्यानंतर त्याचे पालक सांगतात की, आता काही पुढे शिकू नकोस. धड तो मुलगा शिकत नाही. त्यामुळे धड त्याला नोकरीही मिळत नाही. त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचे उदरनिर्वाहाचे साधन मिळत नाही. कोकणासारख्या भागातील मुले शेतीही करीत नाही. ही मुले आपले पोट हातावर घेऊन मुंबई सारख्या शहरात येत असतात. आता परप्रांतियांमुळे आम्हाला कोठेही नोक-या राहिलेल्या नाहीत. आमची माणसं कोठेतरी हमाल होणार, पेपर विकणार. भाजी विकणार, टन टन अशी घंटी वाजवून बीईएसटीमध्ये नोकरी करणार. आता त्या ठिकाणी सुध्दा नोक-या शिल्लक राहिलेल्या नाहीत. 50 हजार ते 1 लाख रुपये दिल्याशिवाय, भ्रष्टाचाराचे शेण कोणाच्या तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

तोंडात घातल्याशिवाय तेथेही नोकरी मिळत नाही. सभापती महोदय, शेण हा शब्द असंसदीय असल्यामुळे मी तो मागे घेत आहे.

सभापती महोदय, मी मुळ विषयाकडे येतो. मला असे वाटते की, आपण तासिका ही 30 मिनिंटांऐवजी 40 मिनिटांची करा. आठ तासाच्याऐवजी चार तासाचा कालावधी करा. आज केवळ परीक्षेपुरताच अभ्यासक्रम दिला जातो. वर्षातील 365 दिवसापैकी 180 ते 185 दिवस शाळा भरली जाते. शहर भागातील पालक तर अतिशय जागरुक असतात. ते आपल्या मुलांना क्लासला पाठवितात. आई ऑफिसमधून कितीही दमून आली तरी संध्याकाळी मुलांचा अभ्यास घेत असते. साधारणत:पुरुष कधीही मुलांचा अभ्यास घेत नाहीत. कारण पुरुषांना रुबाबात चहाचा कप हवा असतो. परंतु ती महिलाच आपल्या मुलांची काळजी घेत असते. ग्रामीण भागातील लोक सकाळी 8 वाजता काम करण्यासाठी बाहेर पडत असतात. रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करण्यासाठी बाहेर पडत असतात. त्यांची मुले आठवी आणि नववीपर्यन्त देखील शिकत नाहीत. इतकी आपली अभ्यासाची पध्दत बरोबर नाही.

सभापती महोदय, काल मंत्रिमहोदयांनी अतिशय चुकीचे उत्तर दिले आहे. शिक्षकांना अनेक कामे दिली जातात. या ठिकाणी शिक्षक आमदार बसले आहेत, त्यांची क्षमा मागून मी हे सांगतो की, काही शिक्षक इंग्रजी घेऊन एम. ए. झाले आहेत. परंतु त्यांना इंग्रजीचेच ज्ञान नसते. आम्ही एकदा अशा शिक्षकांचा इन्टरव्यू घेतला होता. एका उमेदवाराला आम्ही असे विचारले होते की, तुम्ही तुमच्या गावावरुन येथपर्यन्त कसे आला आहात, ते आम्हाला इंग्रजीतून सांगा. त्यांचे शिवाजी विद्यापीठ होते. त्यांना 79 टक्के मार्कस् होते. त्यांचे इनटायर इंग्रजी होती. त्या शिक्षकाने इंग्रजीतून असे सांगितले की, " I caught bus at Ratnagiri, then I caught bus at Kolhapur." आता हे सगळे मी लिहून आणले आहे. इन्टरव्यूला देण्यात आलेली ही उत्तरे आहेत. ज्यांनी बी. ए. पूर्ण इंग्रजी घेतले असेल, ज्यांनी एम. ए. ला पूर्ण इंग्रजी घेतले असेल, त्यांनाच आपण इंग्रजी शिकवावयाला द्या. आज आपल्या अनेक शाळांमध्ये ज्या शिक्षकाला इंग्रजीचा गंध नाही, त्याला ॲडजेस्ट करण्यासाठी तो इंग्रजी हा विषय शिकवित आहे. आपली डी. एड. तसेच बी. एड. ची ग्रेड वेगळी आहे. त्यांनी अमुक शिकविले पाहिजे, त्यांनी तमुक शिकविले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

तुमचे पी.टी. चे शिक्षक 30 टक्के विषय शिकवित असतात. आता त्यांना तर काहीच येत नाही. जो 11 वी पास झाला, तो आठवी तसेच नववीचे इंग्रजी घेणार. म्हणून या बाबत आपण आपले सर्व निकष बदला. या बाबत एक कमिशन नेमा. जनतेकडून या बाबतच्या सूचना मागवा. तसेच हेडमास्तर व सर्व शिक्षण तंज्ञांचा एक परिसंवाद घ्या.. आज आपण पिढीच्या पिढी बरबाद करणारे परीक्षार्थी शिक्षण निर्माण केले आहे. यातून त्याचे पोट भरण्याची क्षमता
निर्माण करणारी तुमची एकही पदवी नाही. तसे आपले शिक्षणही नाही. दुसरी बाब म्हणजे आपण मेरिट लिस्ट जाहीर करण्याचे अजिबात बंद करा. मेरिट लिस्टमध्ये आपला मुलगा येण्यासाठी पालक मुलांना छळत असतात. 80 टक्के मार्कस् मिळालेच पाहिजेत, 90 टक्के मार्कस् मिळालेच पाहिजेत. त्यामुळे अनेक मुले आत्महत्या करीत आहेत. यामुळेच आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. म्हणून याचा कोठेतरी विचार झाला पाहिजे. जीवनाची दृष्टी मिळणारे शिक्षण आपण मुलांना द्या.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरफरे/ 15:00

श्री. मधुकर चव्हाण....

इयत्ता सातवी, आठवीपर्यंत जे आवश्यक शिक्षण आहे त्यामध्ये आपण त्याला देशाचा इतिहास शिकवा, ठराविक साहित्यिकांचे साहित्य शिकवा. त्याला विशिष्ट विषयामध्ये पारंगत व्हावयाचे असेल तर तो कॉलेजमध्ये गेल्यावर होईल. दुसरी गोष्ट अशी की, जी आपली संस्कृत भाषा, ती कुठेच कंपल्सरी केली नाही. आजपासून 20 वर्षापूर्वी नववी, दहावी, अकरावीला शंभर मार्काचे संस्कृत असायचे. ज्याच्यामुळे आज शाकुंतल कुणाला माहीत आहे? आज मालविका कुणाला माहीत आहे? संस्कृतचे इतके वाङमय कुणाला माहीत आहे? या संस्कृत वाङमयामध्ये अनेक गोष्टी आहेत. आपण दिडशे वर्षे ब्रिटीशांची गुलामगिरी स्वीकारली. आणि आपण आता कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढविल्या, त्या शिवाय दुसरे काहीही केले नाही. इंग्रजी शिकलो नाही, इंग्रजी विषयामध्ये पारंगत झालो नाही तर आयुष्यात काहीही नुकसान होत नाही. आणि मला असे वाटते की, मी दोन-तीन मुद्दे आपल्यासमोर मांडतो. एकेका वर्गामध्ये 100 मुले असतात, ती आपण बदला. खाजगी शाळा यांनी कारखाने चालविले आहेत . राजा शिवाजी विद्यालयामध्ये सकाळी 7 पासून शाळा सुरु होते. पहिलीचे वर्ग सातला, कोवळी मुले सकाळी पाचला उठवायची. 100-100 मुले असतात. मी आपल्याला याठिकाणी उदाहरण देतो. आणि म्हणून मला असे वाटते.तिसरा शेवटचा मुद्दा सांगून माझे बोलणे संपवतो. या मुंबई शहरामध्ये ज्या काही शाळा असतात. त्या शाळामध्ये बालमोहनची शाळा आहे, राजा शिवाजी ही चांगली शाळा चालते. अनेक शाळा आहेत. ते तुमच्याकडे भूखंड मागायला आल्यावर सांगता, आमच्याकडे शाळेसाठी, विकासासाठी भूखंड नाही. गेल्या दोन महिन्यात तुम्ही अठरा भूखंड प्राथमिक शाळेसाठी आणि माध्यमिक शाळेसाठी रिझर्व्ह असलेले बिल्डरच्या घशात घातले आहेत. झोपडपट्टया वाढविता, शाळा नाही वाढवत? लोकसंख्या वाढविता, हायस्कूल नाही वाढविणार? सगळे भूखंड बिल्डरला देणार? शाळा वाढविणार कुठे? शेवटी माझी आपणाला विनंती आहे की, अशासकीय प्रस्ताव याला वाटाण्याच्या अक्षता लावण्यासाठी असतो असे मी समजत नाही तर विरोधकांनी याठिकाणी काही विधायक सूचना केल्या असतील.... काल माननीय श्री. आर.आर. पाटील साहेबांनी सांगितले की, विरोधकांच्या सूचना आम्ही नेहमी.... त्यांच्या तोंडून इतके छान बोलतात, किर्तन देतात.... शाहू महाराज, आंबेडकर यांचे ते उगाच उपहासाने बोलले नाहीत. पण या सगळया लोकांनी आपल्या जीवनामध्ये, आर्थिक शैक्षणिक बाबतीमध्ये अतिशय आमूलाग्र क्रांतिकारक बदल केले. ते करण्यासाठी म्हणून तुम्ही काही कराल. म्हणून माझी शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरफरे/ 15:00

श्री. मधुकर चव्हाण....

सगळया शिक्षणाचा, अभ्यासक्रमाचा एक सर्वंकष विचार करुन महाराष्ट्राच्या पुढच्या पिढीला, या बालमनावर, असंस्कारीत असतील त्यांना संस्कारीत करणाऱ्यांना कसे शिक्षण द्यावे ज्याच्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होईल. पर्सनालिटी डेव्हलपमेंट होईल. जगाचे जाऊ देत कल्याण, देशाचे जाऊ देत कल्याण, ज्या आई-वडिलांच्या पोटी जन्म घेतला त्यांचा व स्वत:चा उदरनिर्वाह करण्याइतका या सगळया शिक्षणाचा उपयोग भविष्यात त्याला होईल. अशातऱ्हेची शिक्षण पध्दती आपण करावी अशी या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे

ठराव प्रस्तुत झाला.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण यांनी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेल्या दर्जाबाबत याठिकाणी अशासकीय ठराव दिला आहे त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभी आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये संख्यात्मक प्रगती खूप झाली परंतु गुणात्मक प्रगती खालावत गेली आहे. 1950 साली 2 लाख प्राथमिक शाळा होत्या त्या 2003 च्या दरम्यान 6 लाखावर गेल्या. 6 ते 14 वयोगटामधील दीड कोटी मुले आहेत त्यामध्ये बाल कामगारही आहेत. त्यांचे 14 लाख शाळांमध्ये स्थलांतर झाले. सततच्या स्थलांतरणामुळे ही मुले शाळेमध्ये येऊ शकत नाहीत. त्यामध्ये सरकार आणि अभिजन वर्ग, पालक वर्गाची कृपादृष्टी इंग्रजी माध्यमाकडे आहे. म्हणून लाखापेक्षा अधिक शुल्क घेणाऱ्या शाळा दिवसें दिवस वाढत आहेत. अशा शाळांमध्ये पालक आपल्या मुलांना घालतात. डॉ. राधाकृष्णन कमिशनपासून कोठारी कमिशनपर्यंत विविध समित्या नेमल्या. त्या नेमण्यामागे एक सामायिक शिक्षण पध्दती असली पाहिजे असा हेतु होता. परंतु त्या शिक्षण पध्दतीला हरताळ फासला जात आहे, 6 ते 14 वयापर्यंत मोफत व दर्जेदार शिक्षण 2015 सालापर्यंत देण्याची केंद्र शासनाची योजना आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर . . . .

घटनेने 1960 पर्यंत सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे अशी अपेक्षा होती, पण ती अपेक्षा पूर्ण झाली नाही. "प्रथम" या संस्थेने याबाबतीत सर्व्हेक्षण केले, त्यावेळी केवळ 20 टक्केच मुले सफाईदारपणे वाचू शकतात असे दिसून आले आणि ही गोष्ट फार चांगली आहे असे नाही. पण याला अनेक कारणे आहेत. शासनाची असलेली धरसोडवृत्ती देखील याला कारणीभूत आहे. कारण "नवी विटी नवा दांडू" यानुसार 1999 मध्ये युती शासनाच्या काळामध्ये 1ली ते 4थी मधील विद्यार्थ्यांवर ताण येतो, म्हणून परीक्षा पध्दती नको असे सूचविण्यात आले. त्यानंतरच्या काळामध्ये सर्व परीक्षा झाल्या पाहिजेत असा विचार पुढे आला, परंतु अभ्यासक्रमामध्ये काहीच बदल केला नाही. पुढच्या काळामध्ये पहिलीपासून इंग्रजी विषय सक्तीचा करण्यात आला. पण ग्रामीण भागातील, डोंगराळ भागातील झोपडपट्टीतील मुलांना लिहिता-वाचता येत नाही, त्यांना नीट मराठी येत नाही अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजी विषय सक्तीचा करुन कसे चालेल ? शिक्षणसेवक योजना, आज अशी स्थिती आहे की, वेतनेतर अनुदान मिळत नाही, शिक्षकांना तीन-तीन महिने पगार मिळत नाही. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धर्तीवर शालेय शिक्षण आयोग स्थापन करण्यात यावा. भारतीय घटनेने विकासाची समान संधी देण्याचा निर्धार केला आहे. समाजातील वंचित घटकांना संधी देण्यासाठी कल्याणकारी राज्याची निर्मिती केली गेली. पण गरीबांना दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळेल का ? अशी स्थिती आज धनिकांसाठी वेगळया शाळा निर्माण केल्यामुळे निर्माण झाली आहे. यासाठी राष्ट्रीय पातळीवर विचारमंथन होण्याची गरज आहे. म्हणून प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र आयोग निर्माण केला पाहिजे. तसेच जेव्हा आपण काही बदल करतो, तेव्हा शिक्षण तज्ज्ञ, त्या क्षेत्रातील विचारवंत, संघटनेचे लोक, शिक्षक आमदार, पदवीधर आमदार यांना चर्चेसाठी बोलविले पाहिजे आणि त्यावेळी त्यांनीही तेथे आपली निर्भीड मते, आपले विचार मांडण्याचे धाडस दाखविले पाहिजे. ऑक्टोबर 2004 च्या "टाईम्स ऑफ इंडिया" या वर्तमानपत्रामध्ये "जॉन कुरियन" यांचा एक लेख आलेला आहे. त्यात त्यांनी ब-याच गोष्टी सांगितल्या आहेत. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की, सरकारी शाळा 200 दिवस सुरु असाव्यात. पण प्रत्यक्षात त्या 150 दिवसच सुरु असतात. तसेच या शाळा रोज पाच-सहा तास तरी चालल्या पाहिजेत, पण ग्रामीण भागात त्या तीन-चार तासच भरतात. तसेच शिकवणी क्लासेस असू नयेत असे माझे प्रामाणिक मत आहे. जर हे क्लासेस नसतील तर शिक्षक अधिक जबाबदारीने शिकवतील. त्यांना वाटेल की, मी ज्याला

. . . .2 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर . . . .

शिकवतो, तो चांगल्या प्रकारे पास झाला पाहिजे. त्यामुळे हे क्लासेस बंद करावेत . गुजराथ शासनाने "एज्युकेशन इन गुजराथ- द स्टेट इंटरव्हेन्शनस् "अशी पुस्तिका तयार केलेली आहे. त्याचा मी उल्लेख करु इच्छिते. बरीचशी मुले शाळेत येत नाहीत, यासाठी गुजराथ सरकारने चांगला प्रयोग केला. शाळेमध्ये त्यांनी एक प्रवेशोत्सव सुरु केला आणि पटनोंदणी करताना ग्राम शिक्षण समिती, पालक-शिक्षक समिती, माता शिक्षक समितीच्या सहकार्याने गळती थांबावी व गुणात्मक सुधारणा व्हावी यासाठी आणि मुलींना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी "कन्या केळवणी रथयात्रा" सुरु केली. त्या रथयात्रेमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय शिक्षण मंत्री, इतर कॅबिनेट मंत्री, विभागाचे सचिव आणि सगळे गावकरी सामील होतात आणि जून मध्ये वाजतगाजत मुलांना घेऊन प्रवेशासाठी शाळेत जातात. त्यावेळी आनंददायी वातावरण असते, खरे म्हणजे एखादा सणवार असावा तसे नटूनथटून मुले जातात आणि पालकही जातात. या मुलांचे तेथील शिक्षक प्रेमभराने स्वागत करतात . त्यांना रंगीबेरंगी टोप्या दिल्या जातात, त्यांना टिळा लावतात, खाऊ दिला जातो. शाळा हे गमतीचे, आनंददायी असे काहीतरी आहे असे मुलांना वाटावे यासाठी प्रवेशाच्या वेळी चांगल्या गोष्टी करतात.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी देणगीदार जमवलेले आहेत. पुस्तके, दप्तरे अशा छान-छान भेटवस्तु त्यांना दिल्या जातात. वर्गखोल्या चांगल्या बांधलेल्या आहेत. ग्रामीण भागामध्ये विशेषत: प्राथमिक शिक्षणामध्ये स्त्रियाच जास्त संख्येने असतात.खेडयापाडयात पुरुष सुध्दा आहेत. पण ग्रामीण भागात राहण्याची अडचण जास्त प्रमाणात निर्माण होते, म्हणून त्यांच्यासाठी क्वाट्र्स दिलेले आहेत. शाळांना कंपाऊन्ड वॉल चांगल्या पध्दतीने बांधलेल्या आहेत. शुध्द पाण्याची व्यवस्था, वीज या सगळया गोष्टींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळा बघण्यासाठी आपण गेलो तर तेथे बाकेच नसतात. ती मुले जमिनीवरच बसतात. ज्यावेळेला आम्ही आश्रमशाळेला भेट दिली त्यावेळेला आपणसुध्दा आमच्या बरोबर होतात. त्या आश्रमशाळेत चिखलाचे पाय घेऊन तशाच अवस्थेत विद्यार्थी जमिनीवर बसले होते. अशी अवस्था तेथे नाही. तेथे विद्यार्थ्यांसाठी चांगल्यारीतीने बेंचेसची व्यवस्था केलेली आहे. खाजगी शाळांमध्ये या सगळया सोयी असतात. जिल्हा जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये तसेच खेडयातील शाळांमध्ये अशा प्रकारच्या सोयी नसतात, म्हणून मुलांना आकर्षण वाटत नाही. गळती थांबविण्यासाठी त्यांनी निरनिराळया योजना आखलेल्या आहेत. त्यामध्ये दुपारचे जेवण ही योजना त्यांनी 1984 पासून सुरु केलेली आहे. त्यासाठी मानधन देऊन संचालक, स्वयंपाकी, मदतनीस यांच्या मार्फत केंद्र निर्माण केलेली आहेत. आणि 79,140 लोकांची त्यांनी नियुक्ती केलेली आहे. इयत्ता पाचवीपासून इंग्रजी विषय सक्तीचा केलेला आहे. शिक्षण प्रशिक्षणाचा कार्यक्रमसुध्दा अत्यंत आकर्षक पध्दतीने आखण्यात आलेला आहे. त्यामध्ये भाषणबाजी नाही. लेक्चरबाजी नाही, तर त्यामध्ये एखादा रोल प्ले, पुस्तकातील एखाद्या धडयाचे नाटकीकरण वगैरे अशा प्रध्दतीने प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर मुले तसेच जास्त प्रमाणात मुली शाळेत याव्यात आणि त्या टिकाव्यात यासाठी महिला संमेलने भरवली जातात. मां-बेटी संमेलन तसेच निरनिराळे करमणुकीचे कार्यक्रम आखण्यात येतात. जेणेकरुन अधिकाधिक संख्येने मुले शाळेत यावीत, त्यांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांना आकर्षक पध्दतीने कसे शिकविता येईल, यादृष्टीने शिक्षकांना प्रशिक्षणही दिले जाते.आपल्याकडे सुध्दा मागे आनंददायी शिक्षण देण्यात येत होते, परंतु ते आनंददायी शिक्षण कुठे गेले आणि परत आता नव्याने मुलांसाठी लेखन,वाचनाचा कार्यक्रम कां करावा लागला हा मोठा प्रश्नच आहे. याच्यासाठी सर्व्हेक्षण करणारे सुपरवायझर वगैरे शाळांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तपासणी करणारे जे लोक आहेत त्यांची सुध्दा अधिक संख्येने नेमणूक केली गेली पाहिजे. आणि वेळोवेळी त्यांनी तेथे गेले पाहिजे आणि त्यांनी त्या शिक्षकांना मार्गदर्शन केले पाहिजे एवढेच मला या प्रसंगी सांगावयाचे आहे.एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभागृहाचे सन्माननीय सदस्य आमचे मित्र मधुकररावजी चव्हाण यांनी हा जो अशासकीय प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे. त्या संदर्भात आपले मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आपण मला या ठिकाणी बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. तसे पाहिले तर आपल्या राज्यामध्ये आणि या देशामध्ये शिक्षणाचे क्षेत्र म्हणजे एक मोठी प्रयोगशाळा समजली जाते. ज्या काही नवीन नवीन घटना घडत असतात, त्याबाबतीत शैक्षणिक क्षेत्रामध्येच, भविष्यात त्यांचे चांगले वाईट परिणाम काय होतील याचा विचार न करता अशा प्रकारचे प्रयोग केले जात असतात. शासन आणि प्रशासनामध्ये ठोकताळे पध्दतीने विचार करण्याची जी प्रवृत्ती आहे. एअर कंडिशनमध्ये बसणा-या मंडळींना एअर कंडीशनमध्ये न बसणा-या लोकांना जास्तीत जास्त कसा त्रास देता येईल अशा प्रकारची व्यवस्था या शैक्षणिक क्षेत्राच्या संदर्भात दिसायला लागली आहे. आमचे मित्र श्री. मधुकररावजी चव्हाण यांना मी धन्यवाद देतो. जरी अशासकीय ठराव मंजूर होत नसले, स्वीकृत होत नसले, तरी पण ठोकताळे पध्दतीने विचार करायला, शासन आणि प्रशासनाला प्रबोधन करण्याचे काम, त्यांना विचारप्रवण करण्याचे काम आणि दिशा देण्याचे काम, या प्रस्तावाच्या माध्यमातून. विद्यामान शिक्षणपध्दतीमध्ये निश्चितच त्याचा उपयोग होईल या बद्दल मला खात्री वाटते.

प्रथम सौ. रणदिवे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

अनेक चांगले मुद्दे सन्माननीय सदस्यांनी मांडले. त्या मुद्दयांचे रिपिटेशन करण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्यांनी पहिलीपासून दहावीपर्यन्तच्या वजनमापाच्या प्रकाराबाबत सांगितले. विद्यार्थ्यांनी किंती वजनाची पुस्तके घेऊ जावयाचे ? दप्त कसे असावयास पाहिजे ? ते विद्यार्थ्याना पेलवेल एवढे विद्यार्थ्यांचे वजन आहे की नाही ? या सगळया बाबी सांगितल्या. ही चाईल्ड सायकॉलॉजी आहे, स्टुडंट सायकॉलॉजी आहे, पेरंट सायकॉलॉजी आहे, सोशल सायकॉलॉजी आहे. या अनेक बाबींचा विचार करुन आमच्या शिक्षण तज्ञांनी शिक्षण व्यवस्था पध्दती तयार केली आहे काय हा महत्वाचा प्रश्न आहे. काल या ठिकाणी मूलभूत अशा प्रकारची चर्चा झाली. त्यामध्ये असे सांगण्यात आले की, दोन महिन्याचा क्रॅश कोर्स तयार करु. आमच्या राज्यातील 6 ते 14 वर्षे वयोगटातील प्राथमिक शाळेमध्ये शिकणारे दीड कोटी विद्यार्थी आहेत त्यातील 8 लाख 31 हजार विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही, त्यांना अंकांची ओळख नाही, त्यांना अक्षरांची ओळख नाही, अशा प्रकारची माहिती देण्यात आली. ही फार धक्कादायक माहिती आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी काल ही जी आकडेवारी सभागृहात सांगितली त्याबाबतीत या ठरावाच्या निमित्ताने मला त्यांना विचारावयाचे आहे की, आमच्या राज्यातील ज्या विद्यार्थ्यांना अक्षर ओळख नाही, अंकांची ओळख नाही, ज्यांना लिहिता येत नाही, वाचता येत नाही असे जे 8 लाख 31 हजार विद्यार्थी आहेत त्यामध्ये आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? त्यामध्ये आमच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? त्यामध्ये आमच्या ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? त्यामध्ये आमच्या मागासवर्गीय समाजाच्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? याची आकडेवारी त्यांनी सांगितली नाही. माझा असा दावा आहे की हे जे 8 लाख 31 हजार विद्यार्थी शाळेमध्ये जाऊन देखील निरक्षर राहिले यामध्ये मुद्दाम मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे भवितव्य काळवंडून टाकण्याचा पध्दतशीर प्रयत्न केला जात आहे काय याची सुध्दा तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्र हे प्रयोगाचे क्षेत्र आहे असे मी सांगितले. बाराव्या लोकसभेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार आणि मी सोबत होतो. सध्याचे विद्यमान मंत्री श्री. रघुवंश प्रसाद सिंग हे त्यावेळी श्री. लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचे खासदार होते. तेव्हा प्राथमिक शिक्षणाचा समावेश हा मूलभूत अधिकारांमध्ये करण्यात यावा अशा प्रकारचा प्रस्ताव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ RJW/ KGS/

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

श्री. रघुवंश प्रसाद सिंग यांनी मांडला होता. मला या ठिकाणी सांगत असताना अभिमान वाटतो की, त्या प्रस्तावाला मी समर्थन दिले. राज्य घटनेच्या मूलभूत अधिकारांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा समावेश करण्यात आला. ही आपल्या देशाची मोठी उपलब्धी आहे. आपल्या राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची काय अवस्था आहे हा एक गहन प्रश्न आहे. या क्षेत्रात अनेक विव्दान आहेत. अनेक मुख्याध्यापक आहेत. अनेक शिक्षण तज्ज्ञ आहेत. भाषातज्ज्ञ आहेत, इतिहास तज्ज्ञ आहेत. संस्कृतीचा विशेष अभ्यास करणारे लोक आहेत. संस्कृतचा नव्हे संस्कृतीचा अभ्यास करणारे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण साहेबांनी संस्कृत भाषेचा आग्रह धरला. त्यांनी सांगितले की, संस्कृत भाषा अतिशय जुनी भाषा आहे, पुरातन भाषा आहे, वैदिककालीन भाषा आहे, तिचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. हे सर्व आज आपण म्हणत आहात. परंतु ज्यांनी संस्कृत भाषा शिकण्याची बंदी घातली त्यांच्याबद्दल आपण काहीच बोलला नाहीत. इतिहासामध्ये हे शिकविले पाहिजे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या युगपुरुषाला संस्कृत भाषा शिकण्याची बंदी घालण्यात आली म्हणून त्यांना पर्शियन भाषा शिकावी लागली. हा इतिहास सांगा. आमच्या देशाच्या पिढया न पिढया कशा उध्वस्त करुन टाकल्या, बरबाद करुन टाकल्या हे आमच्या नवीन शिक्षण पध्दतीमध्ये मुलांना सांगितले पाहिजे. ज्या व्यवस्थेने आमच्या संपूर्ण देशाचे भवितव्य बरबाद केले ती व्यवस्था उध्वस्त करण्याची शक्ती विद्यार्थ्यांमध्ये कशी निर्माण होईल अशी शिक्षणाची व्यवस्था आम्ही करु शकलो नाही. समाज परिवर्तनाचे, देश घडविण्याचे एक मोठे काम आपल्याला निश्चितपणे करता येईल असे मला वाटते. संस्कृत भाषेचा आग्रह धरण्याचे काही कारण नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आपल्या देशामध्ये सर्वसामान्य लोकांची जी भाषा आहे ती चांगली झाली पाहिजे, मायमराठी जीवंत राहील की नाही असे प्रश्न विचारले जात आहेत, जेथे मायमराठीचे भवितव्य धोक्यात आहे. तेथे पुरातन भाषेचा आग्रह धरला जात आहे. काही लोकांना त्या भाषेतून शिकायचे आहे, त्यांनी जरुर शिकावे. जगामध्ये ज्यांना काही शिकायचे आहे ते त्यांनी शिकावे. त्यांना बराच वाव आहे, त्यांना अडविलेले नाही, त्यांची इच्छा असेल, आकांक्षा असेल, प्राविण्य प्राप्त करावयाचे असेल, विद्वत्ता प्राप्त करावयाची असेल त्यांनी शिकावे. परंतु त्याचा आग्रह धरता कामा नये. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात आमच्या वडीलधा-या ताईसाहेबांनी मुद्दा मांडला आहे. जसे विद्यार्थी शिक्षणासाठी केंद्रीय स्तरावर विद्यापीठ अनुदान आयोग आहे, युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन आहे, त्याप्रमाणे शालेय शिक्षण आयोग निर्माण करावा. जर आमच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण व्यवस्थेला आम्ही जर मॉनेटरिंग करु शकलो तर ज्या काही समस्या शिक्षणामध्ये निर्माण झाल्या आहेत आणि शिक्षणाचा दर्जा घसरण्याच्या पाठीमागची जी मुलभूत कारणे आहेत, यासंदर्भात तज्ज्ञांना बरोबर घेऊन बसले पाहिजे. ज्या कारणांमुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे ते कसे थांबविता येईल आणि दर्जा कसा वाढविता येईल त्याचा शोध घेतला पाहिजे. ज्या खाजगी कॉन्व्हेन्ट शाळा आहेत, जी कॉन्व्हेन्ट कल्चर सध्या निर्माण झाले आहे त्याच्या बरोबरीच्या दर्जाचे शिक्षण आमच्या महानगरपालिकेच्या शाळा असोत वा जिल्हा परिषदेच्या असोत त्यातून मिळाले पाहिजे. मा.सदस्य श्री.अरविंद सावंत हे नेहमी सांगतात की मी महानगरपालिकेच्या शाळेतून शिकलो आहे. हे ऐकून मला बरे वाटते. मी देखील नागपूर येथे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत महापालिकेच्या शाळेमध्ये शिकलो आहे. अलिकडे महाराष्ट्र शासन सहयोग अर्थशासित सहाय्यित विद्यापीठाच्या नावाखाली उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याच्या नावाखाली खाजगी विद्यापीठे लादण्याचा देखील प्रयत्न केला जात आहे अशा अनेक गंभीर बाबी आहेत. त्यामुळे या प्राथमिक शिक्षणामधून काही गोष्टींबाबत आमच्या विद्यार्थ्यांवर संस्कार झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भ्रष्टाचाराविरुध्द तिरस्कार निर्माण करता आला पाहिजे, अन्याय, अत्याचाराविरुध्द तिरस्कार निर्माण करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या मेंदूवर बिंबवता आला पाहिजे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

जातीभेदाविरुध्द, विषमतेविरुध्द चीड निर्माण करणारी शिक्षण पध्दती निर्माण केली पाहिजे. तेव्हा चांगला माणूस आणि चांगला समाज घडविता येईल. राज्याचे तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.मधुकरराव चौधरी यांनी शिक्षणासाठी श्वेतपत्रिका प्रकाशित केली होती. अधिकारी वर्गाला ते माहीत आहे. मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बरोबर सांगितले आहे की, 10 + 2 + 3 असा अभ्यासक्रम आहे. दहावीचे औचित्य काय आहे, बारावी पास झाल्याशिवाय पुढच्या शिक्षणाला कोणता अर्थ रहात नसेल, प्रगतीला कोणता अर्थ रहात नसेल तर तुमच्या दहावीचा हा अडथळा कशाला पाहिजे, ही दहावी चाळणी कशासाठी, इयत्ता पहिलीत गेल्यावर सरळ बारावीपर्यंत गेला पाहिजे. बारावीची परीक्षा द्या, विद्यापीठाचे शिक्षण द्या, महाविद्यालयाचे शिक्षण द्या, आपल्याकडे प्रथा अशी आहे की, एखादी सोपी गोष्ट कठीण करुन सांगेल त्याला विद्वान म्हटले जाते. विद्वत्तेची व्याख्या अशी आहे की साधारण गोष्ट, सोपी गोष्ट कठीण करुन सांगणे त्याला मोठे विद्वान समजले जाते पण अवघड गोष्ट साध्या, सोप्या भाषेत सांगितली तर त्याला मात्र मूर्ख समजले जाते. राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा सुधारण्यासाठी ज्या काही गोष्टी असतील त्या शासनाने केल्या पाहिजेत आणि आमच्या राज्यातील गोरगरीब, दलित, आदिवासी,शेतकरी, ओबीसी, अल्पसंख्यांक मागासवर्गीय, बहुजनसमाज आहे, अभिजनांबद्दल मी बोलत नाही, बहुजनांबद्दल बोलत आहे, त्यांच्या मुलांना पाल्यांना प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण उत्कृष्टपणे मिळाले पाहिजे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ RJW/ KGS/ प्रथम श्री.शिगम 15:25

प्रा. जोगेंद्र कवाडे...

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण उत्कृष्ट पध्दतीने मिळाले पाहिजे. त्यांच्या जीवनाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आकाशात प्रगतीची झेप घेणारे पंख आमच्या शिक्षण पध्दतीने आमच्या लेकरांना प्रदान केले पाहिजे अशी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : या प्रस्तावावरील चर्चेची वेळ ही 3.30 वाजेपर्यन्तच आहे. या प्रस्तावावर बोलण्यासाठी पाच सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. कृपया सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवूनच आपले मनोगत व्यक्त करावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) :सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.मुधकरराव चव्हाण यांनी सभागृहात जो अशासकीय ठराव मांडला आहे त्यास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहामध्ये शिक्षणावर, शिक्षण पध्दतीवर,शिक्षकांवर आणि शिक्षकांच्या कार्यपध्दतीवर नेहमीच चर्चा करीत असतो. शिक्षण कसे असावे, शिक्षणात काय दोष आहेत, शिक्षण पध्दतीत काय दोष आहेत, सध्या शासन राबवित असलेली शिक्षण पध्दती कशी चुकीची आहे हे सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव चव्हाण यांनी अतिशय मार्मिकपणे आणि जोशपूर्ण भाषणामध्ये सांगितले त्याबद्दल मी त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. सभापती महोदया, त्यांनी सांगितले की, गांधीजींचा इतिहास शिकला पाहिजे,शिवाजी महाराजांचा इतिहास पूर्णपणे शिकला पाहिजे,झाशीच्या राणीचा इतिहास शिकला पाहिजे, आपल्याला पाश्चात्य इतिहास माहिती पाहिजे की नाही, अमेरिकन इतिहास माहिती पाहिजे की नाही, त्याची गरज आहे काय असाही त्यांनी एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला. आज आपण 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत आहोत. आपण व आपली मुले जग टी.व्ही.च्या पडद्यावर पहात असतात. मग ते कोणतेही चॅनल असू दे. टी.व्ही. मी देखील बघतो. इजिप्त काय आहे हे त्यावेळी कळते. आपण मुलांना पिक्चर्स दाखवत असतो तर त्यास इजिप्तचा इतिहास का दाखवू नये. आपल्याला मुले सर्वगुणसंपन्न बनवावयाची असतील तर नव्या आणि जुन्या जगाची माहिती देणे गरजेचे आहे. पहिले महायुध्द का झाले? 1857 चे बंड का झाले? या घटनांची आपल्याला माहिती पाहिजे. कारण आपल्याला बंडाची भूमिका समजून घ्यावयाची असेल तर या सगळयातून ती मिळू शकेल. आपण फक्त आपल्या मुलांना आपल्या इतिहासापूरतेच मर्यादित ठेवावे असे माझे म्हणणे नाही. जगाचा इतिहास काय आहे, भारताचा इतिहास कसा श्रेष्ठ आहे हे जर आपल्याला मुलांना पटवून द्यावयाचे असेल तर या इतिहासाची आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे. आज जगात क्रांतीची सुरुवात ही रोमन संस्कृतीपासून झाली. रोमन चर्च, त्यातील संस्कृती का उदयाला आली ? तर पोप विरुध्द बंड पुकारले गेले. त्यामुळे ही संस्कृती उदयास आली. पोप विरुध्दचे बंड हे जगातील सर्वात मोठे बंड होते. प्रोटेस्टंट विरुध्द कॅथलिक असे ते बंड होते. या बंडाचा उद्रेक जुलूमशाहीमुळे निर्माण झाला. संस्कृती नष्ट करण्यासाठी पहिल्यांदा उद्रेक झाला होता हे आपल्या मुलांना कळले पाहिजे. सभापती महोदया, शालेय शिक्षणात इतिहास जेवढा महत्वाचा आहे तितकाच भूगोल देखील

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

महत्वाचा आहे. कुठल्या भौगोलिक रचनेमुळे काय होते हे मुलांना आज कळणे आवश्यक आहे. जसे आपण भारताचा इतिहास शिकतो,तसा जगाचा इतिहास आपण शिकला पाहिजे असे माझे प्रांजळ मत आहे.सभापती महोदया, मराठी मुलांना जे शिकविले जाते तसेच इतर माध्यमांच्या मुलांना जो इतिहास शिकविला जातो, जो भूगोल शिकविला जातो, जे दोष काढले जातात ते बरोबर आहेत की नाहीत हे पाहिले पाहिजे. आपल्याकडे ब-याच वेळा आंदोलने होतात की, इंग्रजी माध्यमाच्या मुलांना चुकीचा इतिहास सांगितला जातो. शिक्षण खात्याला माझी विनंती आहे की, आपण सगळयांची पुस्तके तपासून पहा.मग ती श्रीमती तिस्ता सेटलवाडची असो वा आणखी कोणाची पुस्तके असू द्या. जो इतिहास शिवाजी महाराजांच्या विषयी लिहीला गेला, औरंगजेबा विषयी लिहीला गेला, अकबर बादशहा विषयी जे स्टेटमेंट केले गेले आहे ते बरोबर आहे की चुकीचे आहे का उदात्तीकरणाचा प्रयत्न केला जातो आहे? हेही आपल्याला तपासून पाहिले पाहिजे...

यानंतर श्री.उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत)

आज जर गुजराती माध्यमाच्या विद्यार्थ्याला विचारले की, आमदार म्हणजे काय ? तर त्याला सांगता येत नाही. अनेक विद्यार्थ्यांना हे सांगता येत नाही. कारण नागरीक शास्त्राचे त्यांना ज्ञान नाही. हा दैनंदिन अनुभव आहे. उर्दू माध्यमातून काय शिकविले जाते, मदरसामधून काय शिकविले जाते, हे आपण पाहिले पाहिजे. आदिवासी भागामध्ये मुलांची गळती आहे. मुले शाळेत येत नाहीत. त्या ठिकाणी मुलांची गळती का आहे ? त्यांना आपण क्रमिक पुस्तकांमधून जे ज्ञान देतो ते त्यांच्या परिचयाचे नसते. त्यांच्या भोवतालचा निसर्ग आपण त्यांना सांगत नसतो. त्यांच्या भोवतालची परिस्थिती सांगत नसतो. त्यांना आपण दोन अधिक दोन चार असे शिकविण्यापेक्षा त्यांना जर सुरूवातीला शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांना भोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान दिले, पर्यावरणाचे ज्ञान दिले, वाघ, सिंह, मोर, लांडोर कसा असतो, याचे ज्ञान दिले तर ती मुले अतिशय आत्मियतेने शिकतील. त्यांच्या भोवतालचा निसर्ग त्यांना समजावून सांगितला, झाडांची ओळख करून दिली, झाडांचे फायदे समजावून सांगितले तर ती अतिशय चांगल्या प्रकारे शिकतील आणि शिक्षणात रस घेतील. त्यामुळे आपली शिक्षण पध्दती ही त्यांच्या भाषेतून सांगितली पाहिजे. आपण मराठीतून शिकतो तसे आदिवासींना देखील त्यांच्या भाषेतून शिकविण्याचा शासनाने प्रयत्न केला तर सर्व गोष्ट निश्चतपणे चांगल्या होतील. मी या ठरावाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नानासाहेब बोरस्ते (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदया, एक अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा सुरू आहे. राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा यासंदर्भात मी माझे मत या ठिकाणी मांडण्यासाठी उभा आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक सर्वोत्तम साधन आहे, प्रभावी साधन आहे. परंतु ते प्रभावी साधन कधी होऊ शकते ? शिक्षक जर प्रभावी असतील तर शिक्षण प्रभावी होऊ शकते. मग शिक्षक केव्हा प्रभावी होऊ शकेल ? त्याला ज्या मुलभूत गरजा आहेत त्या परिपूर्ण दिल्या तर त्याचे संपूर्ण लक्ष अध्यापनाच्या प्रक्रियेवरती केंद्रीत होऊ शकते. परंतु तो विना वेतन, अल्प वेतन किवा कायम स्वरुपी विना वेतनावर काम करीत असेल तर अशा प्रकारचे शिक्षक हे ज्ञानदानाचे काम करण्याला पूर्णपणे असमर्थ ठरू शकतात. तेव्हा शैक्षणिक दर्जा घसरण्याला विना अनुदानीत संस्कृती हेसुध्दा एक प्रमुख कारण घडलेले आहे. स्वातंत्र्याचे अर्ध शतक उलटून गेले. शिक्षणावर जो खर्च होतो तो 3.8 टक्क्यांच्या वर नाही. तरी किमानपक्षी 6 टक्के तरी खर्च शिक्षणावर झाला पाहिजे. म्हणजे आपण परिपूर्ण अशा शैक्षणिक सुविधा शाळांमधून उपलब्ध करून देऊ आणि विद्यार्थी त्यांचा लाभ घेऊ शकतील. विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्र बिंदू आहे असे आपण म्हणतो. पण पूर्वीचा जमाना गेला आणि आता इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे युग आलेले आहे. याची संवेदना आणि जाणीव शिक्षकांना निश्चितच झालेली आहे. शिक्षकांनासुध्दा त्यादृष्टीने परिपूर्ण अशा सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. कोणीही येते आणि शिक्षकाच्या डोक्यावर टपली मारते हे काही बरोबर नाही. तरी शिक्षणाची गुणवत्ता ढासळण्याचे कारण जे आहे त्याच्यामध्ये समाज, शिक्षक, शाळा आणि पालक हे सर्व घटक जबाबदार आहेत. म्हणून समाज धुरीणांनीसुध्दा यादृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. शिक्षण परिक्षार्थी झालेले आहे ही गोष्ट बरोबर आहे. आनंददायी शिक्षण व्हावयाला पाहिजे ते होत नाही. म्हणून मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, " गाणी गोष्टी रंग न भरती, चिमणी पाखरे फडफड करती, इथे झाल्या परीक्षा थोर, आंब्याच्या बनात नाचेना मोर." अशा प्रकारच्या कविता पूर्वी अनेक होत्या. "नाचरे मोरा आंब्याच्या बनात" अशाही कविता होत्या. पण त्या आता राहिलेल्या नाहीत. आता परीक्षेमध्ये पहिला नंबर कसा येईल हे पाहिले जाते. मुदलियार कमिशन , राधाकृष्णन् कमिशन, कोठारी कमिशन यांची निर्मिती झाली. परंतु प्राथमिक शिक्षणासाठी आतापर्यंत एकही कमिशन नेमले गेले नाही ही फार मोठी शोकांतिका आणि दुर्दैव आहे. म्हणून या निमित्ताने मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नानासाहेब बोरस्ते)

अशी मागणी करीत आहे की, एकंदरीत या शिक्षणाच्या व्यवस्थापनाची पुनर्रचना करण्यासाठी आणि सर्वधर्म समभावाची त्याच्यामध्ये संकल्पना प्रेरीत होण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करून याची पुनर्रचना झाली पाहिजे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. बोरस्ते ..

त्याचबरोबर शिक्षकांना शाळाबाहय जी कामे करण्यास आज सांगितले जाते ते बंद करण्यात आले पाहिजे.विना अनुदानित संस्कृती पूर्णपणे बंद करण्यात आली पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणाच्या क्षेत्रात एक चांगल्या प्रकारचा उठाव समाजधुरीणांनी केला पाहिजे. केवळ सभागृहात किंवा व्यासपीठावर त्याबाबतीत बोलून हे काम होणार नाही. तेव्हा याबाबतीत समाजप्रबोधन आणि जनजागृती झाली पाहिजे आणि शासनाला हे काम करण्यास समाजधुरीणांनी भाग पाडले पाहिजे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदया, सन्माननीयसदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्याला मन:पूर्वक पाठिंबा देण्यासाठी मी येथे उभा आहे.सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक असा हा ठराव मांडला असल्यामुळे मी प्रथम त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.केवळ दोन्ही पुस्तकातील मुद्दे न मांडता त्या पुस्तकातील उदाहरणे पुराव्यानिशी आणि सारासार विवेकाने त्यांनी या ठिकाणी मांडले आहेत.शिक्षणात आमुलाग्र बदल घडावा यासाठी त्यांनी हा ठराव येथे मांडलेला आहे.या सदर्भात मी फक्त एक दोन सूचना या ठिकाणी करणार आहे.

सभापती महोदया, इंग्रजी माध्यमाच्या संदर्भात बोलत असतांना सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी काही शिक्षण तज्ज्ञांची माहिती दिली होती. सर्व शिक्षण तज्ज्ञ हे इंग्रजी होते व शिक्षण तज्ज्ञांनी जी काही माहिती दिली होती ते सर्व इंग्रजीत छापून आली होती..ही माहिती मराठीतून छापून आलेली नव्हती. मला असे सांगावयाचे आहे की, ही सगळी माहिती इग्रजीतून न देता मराठीतून दिली पाहिजे व मराठीतून ती छापून आली पाहिजे. कुसमाग्रजांनी असे सागितले होते की, जशी आपली माता आहे त्याप्रमाणे जगाच्या ज्ञानाची खिडकी ही इंग्रजी भाषा आहे.तेव्हा इंग्रजीची माहिती असली पाहिजे. पहिली पासून इंग्रजी शिकविण्यास आता आपण सुरुवात केली आहे ती पध्दत आता तशीच राहू द्यावी.प्राथमिक शिक्षणामध्ये काय शिकविण्यात यावे असा मुद्दा आज येथे मांडण्यात आलेला आहे. या विद्यार्थ्यांना जागतिक इतिहासाची गरज आहे काय ?असे सुध्दा या ठरावाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी सागितले होते. जागतिक इतिहासाची माहिती सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी दिली होती.तेव्हा ही माहिती देण्यात येऊ नये असे त्यांना म्हणावयाचे नव्हते तर त्या बाल विद्यार्थ्यांना ही माहिती देण्यात येऊ नये असे त्यांना म्हणावयाचे होते.चौथी पाचवीच्या विद्यार्थ्यांना हा विषय न शिकवता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना या विषयात स्पेशलायझेशन करु द्यावे असे त्यांना सांगावयाचे होते.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे त्याला मी दुजोरा देतो व पुढे असे सांगतो की, इंग्रजी माध्यमामध्ये आपण अलेक्झांडर,हिटलर संबंधी शिकवतो परंतु मराठी माध्यमामध्ये मात्र या विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजासबंधी शिकवतो.इंग्रजी माध्यमाच्या मुलांना शिवाजी महाराजासंबंधीची माहिती आहे काय ? या देशाच्या संस्कृतीशी निगडीत असलेला इतिहास या मुलांना शिकवण्यात

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आला पाहिजे असे मला वाटते. इंग्रजी भाषेबद्दल राग असता कामा नये परंतु इंग्रजी शाळेवर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. त्या ठिकाणी सुध्दा समांतर अभ्यासक्रम असला पाहिजे भाषा फक्त वेगळी असली पाहिजे.मराठी माध्यमासाठी जो अभ्यासक्रम आहे तोच अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमासाठी असला पाहिजे. सभापती महोदया, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेन्द्र कवाडे यांनी असे सांगितले की, जातीभेद नष्ट करणारी शिक्षण व्यवस्था असली पाहिजे. त्याही पलिकडे जाऊन माझे असे म्हणणे आहे की,जात आहे म्हणून जातीभेद आहे.जात प्रथम नष्ट करण्यात आली पाहिजे परंतु राजकारण आणि समाजकारण करावयाचे असल्यामुळे जात हवी आहे. जात असल्याशिवाय राजकारण करता येत नाही.तेव्हा "जातच गाडू या" हा विचार घेऊन जर शिक्षण देण्यात आले तर अधिक बरे होईल. त्यामध्ये राष्ट्रभक्ती सुध्दा दिसली पाहिजे. त्या दृष्टीने सुध्दा विचार करण्यात आला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. या अशासकीय ठरावावर बोलत असतांना मी एक उदाहरण देऊ इच्छितो. या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश देवळे यांनी साईबाबाचे एक मंदिर बांधले होते म्हणून मी त्या ठिकाणी गेलो होतो. तेव्हा त्यांनी मला असे सागितले की मंदिर पहाण्यापेक्षा आश्रमशाळा पहा.तेव्हा मी त्यांना असे विचारले की, तुम्ही आश्रमशाळा का बांधली ? तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, मी आश्रमशाळा बांधण्यापूर्वी येथे बिर्लाची एक खाजगी शाळा होती आणि तेथे हजारो रुपयांचे डोनेशन देऊन विद्यार्थी प्रवेश घेत होते..माझी आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे माझ्या आश्रमशाळेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यावर अशी वेळ येता कामा नये. असा विचार माझ्या मनात आला होता.मार्क्स का जन्माला आला ? याचा आपण विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की, त्याने भोगवादी परिस्थिती पाहिली होती.एका बाजूला सगळया प्रकारचे सुख उपभोगणारे विद्यार्थी होते तर दुस-या बाजूला सगळया प्रकारच्या सुखापासून वंचित असणारे विद्यार्थी होते.अशा परिस्थितीतून मार्क्स जन्माला आला होता. असे होता कामा नये तसेच भेद दिसता कामा नये म्हंणून श्री.प्रकाश देवळे यांनी त्यांच्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्याना टाय असलेला युनिफार्म दिला होता. त्या विद्यार्थ्याला असे वाटता कामा नये की,इंग्रजी शाळेतील विद्यार्थी कोणी तरी वेगळे आहेत. जे काही डिस्क्रीमिनेशन आहे ते नाहीसे झाले पाहिजे त्या दृष्टीने विचार केला पाहिजे आणि विद्यार्थ्याचा दर्जा वाढवला पाहिजे. शिक्षकांवर कोणाचाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

राग नाही. जर विद्यार्थ्याचा दर्जा वाढवावयाचा असेल तर शिक्षकांचा दर्जा आपोआपच वाढविला पाहिजे.विद्यार्थ्याच्या पाठीवर पुस्तकांचे ओझे देऊन नवीन हमाल आपण निर्माण करता कामा नयेत .आज मोठया प्रमाणावर स्पर्धा वाढत असल्यामुळे क्लासेसची संख्या वाढत आहे.या ठिकाणी चाटे क्लासेसचे उदाहरण दिले गेले होते. खाजगीकरण आणि उदारीकरणामुळे स्पर्धा सुरु झाल्या.या स्पर्धेमध्ये फक्त मीच पुढे जाईन असे प्रत्येकाला वाटते. माझ्याबरोबर दुस-या व्यक्तीला पुढे घेईन ही संस्कृती आता राहिली नाही.या स्पर्धेतून फक्त मलाच पुढे जाता आले पाहिजे इतरांनी पुढे जाता कामा नये अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे प्रत्येक पालकांना असे वाटते की जर माझ्या मुलाला कमी मार्क्स मिळाले तर तो मागे राहील. म्हणून आपल्या मुलाला जास्तीत जास्त मार्क्स मिळाले पाहिजेत दुस-या मुलाचे काहीही झाले तरी चालेल. हा सुध्दा संस्कृतीचा एक भाग आहे.तो भाग आपल्या संस्कृतीमधून जातो की काय अशा प्रकारचे चित्र आज दिसत आहे. त्या दृष्टीने शिक्षण पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याचे मी समर्थन करतो. या ठरावावर बोलत असतांना सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी अशी सूचना केली की, याकरिता शालेय शिक्षण आायोग नेमण्यात यावा या आयोगाची खरोखर गरज आहे.तेव्हा हा आयोग नेमण्यात आला तर ब-याच गोष्टी घडतील असे मला वाटते एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मा. सदस्य श्री. मधु चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव याठिकाणी मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून अतिशय चांगल्या चांगल्या योजना या महाराष्ट्रामध्ये शासनाने आखलेल्या आहेत आणि म्हणून आजही शैक्षणिक दृष्टया महाराष्ट्र हे देशात अग्रेसर राज्य आहे. शिक्षणाचा दर्जा कसा उंचावेल आणि शिक्षणाचा स्तर कसा कायम राहील यासाठी नेहमी प्रयत्न होत असतात. असे असताना सुध्दा शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे ही वस्तुस्थिती आहे. पहिली ते 10 वी पर्यंतचे जे विद्यार्थी आहेत त्यांना निरनिराळया विषयानुसार शिक्षण देत असतो आणि या सर्व मुलांना सर्व भाषांचे तसेच सामाजिक ज्ञान दिले जाते. श्री. मधु चव्हाण यांनी खंत व्यक्त केली की मुलांना जो अभ्यासक्रम दिला जातो तो त्यांना मानसिकदृष्टया पेलवत नाही. मानसिकदृष्टया अभ्यासक्रम सुटसुटीत,समजण्यासारखा आणि सोपा असा पहिलीपासून दहावीपर्यंत असावा . अभ्यासक्रम तयार करीत असताना कोणतीही शिक्षण संस्था,संस्था चालकांना किंवा तज्ञ शिक्षकांनाकक,शिक्षक प्रतिनिधींना बोलाविले जात नाही. प्रत्यक्षात जो अभ्यासक्रम पुस्तकात येतो तो वेगळाच येतो. पहिली ते चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमात सामाजिक विषयासारखे अभ्यासक्रम येत नाहीत. काही वेळा कठीण प्रश्न विचारले जातात आणि दहावीच्या पुस्तकामध्ये सोपे अभ्यासक्रम अ सतात. ही विसंगती आहे ती दूर केली पाहिजे. हे करीत असताना विद्यार्थ्यांना मेरीटमध्ये आलो किंवा त्यांना चांगले मार्क मिळाले म्हणजे दर्जा उंचावला असे नाही. विद्यार्थी,शिक्षक आणि प्रशासन या तीनही गोष्टींबाबत दर्जा वाढला पाहिजे. शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. जे शिक्षक शिकवितात त्यांना सुध्दा चांगले प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्यांना जे प्रशिक्षण देणार आहेत त्यांचाही विचार केला पाहिजे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, राज्यामध्ये आठ लाख एकतीस हजार विद्यार्थी असे आहेत की ज्यांना लिहिता वाचता येत नाही. याला फक्त शिक्षकच जबाबदार आहेत असे नाही. प्रशासनही जबाबदार आहे. शिक्षक काही प्रमाणात जबाबदार असतील हे आम्ही मान्य करतो. याठिकाणी शासनाकडून यासंदर्भात विविध उपाययोजना केल्या जात आहेत. परंतु तूप खाल्ले की लगेचच रुप येते असे नाही. काही निर्णय घेतले आहेत ते दुर्देवी आहेत असे म्हणावे लागेल. आमचे म्हणणे असे आहे की या मुलांना शिकविण्यासाठी अभ्यासक्रम अतिशय सुटसुटीत असला पाहिजे. समजण्यासारखा असला पाहिजे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. खोटरे...

सोपा असला पाहिजे. अनेक वर्गांमधून आज 70 पेक्षा सुध्दा जास्त विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांची पटसंख्या सुध्दा कमी असली पाहिजे. प्रत्येक वर्गामध्ये साधारणपणे 30-40 मुले असावीत असा निकष आहे. मुलांकडून होमवर्क करुन घेतले जाते. त्यांना अनेक गोष्टी सांगितल्या पाहिजेत. मुलांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. शाळा हे विद्यामंदिर आहे. त्याचा विकास झाला पाहिजे. देशाचा विकास झाला पाहिजे. त्याला सर्व समजले पाहिजे. राष्ट्रप्रेम असले पाहिजे. अनेक गोष्टी त्याला समजल्या पाहिजेत. यादृष्टीने अभ्यासक्रम ठरविण्याची आवश्यकता आहे. या मुलांना जर चांगले घडवायचे असेल तर वर्गातील पटसंख्या अतिशय कमी असली पाहिजे....

यानंतर श्री. सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अन्यथा एका एका वर्गामध्ये 80-100 विद्यार्थी असतात. तेव्हा पटसंख्या कमी असेल तर त्या विद्यार्थ्यांची तयारी शिक्षकांना चांगल्या प्रकारे करून घेता येऊ शकते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. दुसरे म्हणजे शिक्षकांना देखील चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण, विशेष प्रशिक्षण दिले पाहिजे. आपण सर्व शिक्षा अभियानमध्ये शिक्षकांनाही प्रशिक्षण देता. पण त्याबाबत पुन्हा चौकशी केली जात नाही. त्यातून दिले जाणारे प्रशिक्षण योग्य होते की नाही हेही पाहिले पाहिजे. शिक्षकांना जेथे प्रशिक्षण दिले जाते त्या केंद्राच्या ठिकाणी त्या दिवशी नेमके कोणते प्रशिक्षण आहे, कोण प्रशिक्षण देणार आहे याची शिक्षणाधिकाऱ्याला देखील माहिती नव्हती ही वस्तुस्थिती आहे. असे असेल तर मग आपण यासाठी कितीही पैसे खर्च केले तरी त्या शिक्षणाचा आणि शिक्षकांचादेखील दर्जा कमीच राहणार आहे. तेव्हा शिक्षकांना देखील योग्य असे प्रशिक्षण दिले पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे आपण जे मुले पास होण्याबाबत निकष लावता तेही योग्य नाहीत. अमुक इतक्या टक्केवारीमध्ये मुले उत्तीर्ण झाली पाहिजेत असे म्हटले जाते तसेच एका बाजूला परीक्षाच नकोत असेही म्हटले जाते तेही बरोबर नाही. किंबहुना पहिली ते नववी पर्यंत परीक्षा आवश्यक आहेत. परीक्षा असतील तरच मुलांचे मूल्यमापन चांगले होऊ शकते. मुलांचा बौद्धिक स्तर किती वाढला आहे हेही समजू शकते. अन्यथा नापास होणाराही पास दाखविला जातो. तसेच अमुक इतका टक्के निकाल लागलाच पाहिजे अशीही सक्ती केली जाते तेही बरोबर नाही. सक्ती केली की त्यातून पळवाटा, चोरवाटा काढल्या जातात. त्यातून मग क्वालिटी कमी कमी होत जाते. म्हणून सक्ती असू नये. अध्यक्ष महोदया, मला बोलण्यासाठी वेळ कमी आहे याची जाणीव आहे त्यामुळेच मी आपला जास्त वेळ घेणार नाही. पण जो काही अभ्यासक्रम आपण ठरवितो तो ठरविताना शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञां बरोबरच शिक्षकांना देखील विचारले जावे एवढीच विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... टीटी 2 ...

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदया, माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठरावावर माझ्या अगोदर बऱ्याच सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत त्यामुळे कदाचित काही मुद्यांचे रिपिटेशन होण्याची शक्यता आहे पण तरीही ते टाळण्याचा प्रयत्न मी करणार आहे. वेळ कमी असल्याने केवळ 2-4 मुद्यांवरच मी माझे विचार येथे मांडणार आहे. अध्यक्ष महोदया, हल्ली नेहमीच बोलले जाते की, सध्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे. याबाबतीत मी म्हणून की, या संबंधात आपण एक सूत्र लक्षात ठेवावे की, राष्ट्रहितासाठी शिक्षण, शिक्षण हितासाठी शिक्षक आणि शिक्षक हितासाठी समाज. या त्रिसूत्राच्या आधारे काम करण्याचा आपण प्रयत्न केला तरी त्यातून चांगल्या प्रकारे काम होऊ शकते असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. अध्यक्ष महोदया, दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपण आज विद्यार्थ्यांच्या मनामध्ये परीक्षांचे ओझे निर्माण केलले आहे, पुस्तकांचे, दप्तराचे ओझे अगोदरच त्याच्यावर असते. तेव्हा परीक्षांचे जे ओझे आहे त्याबाबतीत शासनाचे जे काही धोरण आहे त्यात बदल होणे गरजेचे आहे. पहिली ते सातवी पर्यंत परीक्षांसाठी वेगळे धोरण, 8वी आणि 9 वी च्या विद्यार्थ्यांसाठी वेगळे धोरण आणि पुन्हा 10 वी साठी एकदमच वेगळे धोरण अशी आज आपली स्थिती आहे. पाचवी ते नववी पर्यंत सेमिष्टर पध्दत असल्याने एक सेमिष्टर पूर्ण झाले की दुसऱ्या सेमिष्टरचाच केवळ अभ्यास करावयाचा आणि मागील सारे विसरून गेले तरी चालेल. आणि पुन्हा 10 वी मध्ये गेल्यानंतर एकदम पूर्ण वर्षाच्या अभ्यासावर आधारित परीक्षा घेतली जाते आणि ती देखील शालांत परीक्षा स्तरावर. त्यामुळे देखील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या परीक्षेची प्रचंड भीती निर्माण होते. तेव्हा ही जी आपली परीक्षा घेण्याची पध्दत आहे ती बरोबर नाही असे मला वाटते.

(यानंतर श्री. जागडे ....यूयू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

यामध्ये कोठेतरी बदल करणे गरजेचे आहे. आज परीक्षा पध्दत चुकीची झाली आहे. आज आपण परीक्षेला अवाजवी महत्व दिले आहे. यात काही बदल करता येईल काय ? याचा शासनाने कोठेतरी विचार करणे गरजेचे आहे. तसे झाले तरच खालावलेला दर्जा वर येऊ शकेल.

सभापती महोदय, मी 1969 साली एस.एस. एस. पास झालो. त्या काळात विद्यार्थ्यांना ज्या विषयात गोडी असेल, तोच विषय घेण्याची परवानगी होती. त्यावेळी आणि आताही गणित आणि इंग्रजी या विषयाबाबत विद्यार्थ्यांची अडचण असते. आज त्या विषयाचा सर्वात कमी निकाल लागत आहे. ज्यांना डॉक्टर आणि इंजिनियर व्हावयाचे आहे, त्यांनी गणित आणि इंग्रजी हे विषय घ्यावेत. परंतु जे विद्यार्थी या विषयामध्ये पास होऊ शकत नाहीत, या विषयामध्ये त्यांना गोडीच नाही, त्यांना आपण हे विषय कशाला सक्तीचे करीत आहांत ? आपणाला यामध्ये काही ऑप्शन्स ठेवता येणार नाहीत काय ? 10 वी ला विद्यार्थ्यांना गणित आणि इंग्रजी विषय घेणे गरजेचे आहे काय ? त्याऐवजी त्याला एखादा व्यावसायिक अभ्यासक्रमाचा किंवा त्याच्या आवडीचा विषय देता येईल काय? आमचा धनराज पिल्ले हा आंतरराष्ट्रीय किर्तीचा हॉकीपटू आहे. त्याचे शिक्षण किती झाले आहे, याची जरा माहिती काढा. म्हणून विद्यार्थ्यांना कलेची आवड आहे काय ? त्याला चित्रकलेची आवड आहे काय ? आज आमच्या अभ्यासक्रमात माध्यमिक स्तरावरील संगीत विषयच गायब झाला आहे. क्रीडा विषयाला कमी महत्व दिले जात आहे. चित्रकला विषयच गायब झाला आहे. सातवीपर्यन्त तर चित्रकलेचा शिक्षकच भरला जात नाही. आता कशा प्रकारे आपण विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणार आहांत ? कशा प्रकारे त्यांचा विकास करणार आहांत ? प्राथमिक शाळांत तर अजिबातच कला शिक्षक नेमले जात नाहीत. आता त्याच वयात त्यांच्या कलागुणांना वाव द्यावयाचा असतो. त्या विद्यार्थ्यांना संगीताची आवड निर्माण करावयाची असते. काही बोटावर मोजण्याइतक्या माध्यमिक शाळा असतील, त्या ठिकाणी आपणाला संगीत शिक्षक दिसतील. 90 टक्के शाळांत संगीत शिक्षकच नाहीत.

सभापती महोदय, आपण फक्त एकाच गोष्टीकडे लक्ष देत आहोत. विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास आपण करीत आहोत. आमचे तीन एच अत्यंत महत्वाचे आहेत. हेड, हार्ट आणि हेल्थ. आम्ही या ठिकाणी फक्त त्याच्या हेडकडे लक्ष दिले आहे. हार्ट आणि हेल्थकडे आमचे अजिबात लक्ष नाही. आज मैदाने नाहीत, साहित्य शिक्षक नाहीत. कोणत्या वातावरणात आमचे शिक्षक काम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

करीत आहेत, हे कृपया मा. मंत्रिमहोदयांनी पहावे. सभापती महोदय, शिक्षकांना दिली जाणारी अशैक्षणिक कामे कमी करणे अत्यंत गरजेचे आहे. सभापती महोदय, खाजगी शिकवणीबाबत बोलावयाचे झाले तर आज पालकांची अशी मानसिकचा झाली आहे की, मुलगा शाळेत गेला, त्याचा ॲटेन्डस लागला की पुरे झाले. क्लासमधून आपल्या मुलाला सर्व काही मिळणार आहे. आता ही क्लासचीच संस्कृती आपणाला कोठेतरी मोडून काढावी लागणार आहे. यासाठी शासनाला काही खास प्रयत्न करावे लागणार आहेत. आम्ही मुलांकडून दुस-या काही कार्यक्रमांसाठी 10 रुपये मागितले तर ते मिळू शकत नाहीत. परंतु क्लासची फी मात्र भरली जाते. 10 हजार पर्यन्तची रक्कम क्लासला दिली जाते. तेव्हा या बाबतचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पूर्वी दर दोन ते तीन महिन्याने शाळेचे इन्स्पेक्शन होत होते. त्यामुळे एक प्रकारचा वचक निर्माण झाला होता. आज 10- 10 वर्षे शाळेचे इन्सपेक्शन होत नाही. पूर्वी जो कर्मचारी वर्ग होता, तो आजही आहे. 1200 शाळा झाल्यानंतरही तेवढाच कर्मचारी वर्ग आजही आहे. जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी वर्षातून एकदाही शाळेत भेटीसाठी जात नाहीत. तेव्हा ज्याप्रमाणे इतर क्षेत्रातील स्टाफींग पॅटर्न शासनाने बदलला आहे, त्याप्रमाणे शिक्षण क्षेत्रातील स्टाफींग पॅटर्न आपण बदलणार आहांत काय ? मला वाटते की, हा स्टाफींग पॅटर्न बदलला आणि शाळांची तपासणी वेळेवर झाली तर ब-याचश्या समस्या दूर होऊ शकतील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

(यानंतर श्री. सरफरे..

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण यांनी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसें दिवस खालावत चाललेला दर्जा हा एक चांगला विषय चर्चेला आणला आहे. त्यामध्ये विशेषत: प्राथमिक शिक्षणावर मी थोडेसे बोलणार आहे. गेली 40 वर्षे मी प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले आहे. जिल्हा परिषदेकडे शिक्षण खाते आल्यापासून शिक्षणाचा दर्जा दिवसें दिवस घसरत चालला आहे. यामध्ये राजकारण घुसले आहे हे याचे प्रमुख कारण आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे 13 खात्यांचा कारभार असतो परंतु ते शिक्षणामध्ये तज्ज्ञ नाहीत. त्यांना शिक्षणाकडे पुरेसे लक्ष द्यायला वेळ नसतो. शासनाच्या विकासाच्या नवनव्या आलेल्या योजना शिक्षकांकडे ढकलून द्यायच्या, त्यांच्या मानगुटीवर लादायच्या, आणि वर्षातून दोन-तीन महिने त्यांना इतर कामांना जुंपायचे. याठिकाणी शिक्षणाचा दर्जा कां खालावतो, किती टक्के खालावला याची आकडेवारी सांगितली ती नाकारुन चालणार नाही. परंतु याबाबत माझे अनुभवांती असे मत बनले आहे की, जिल्हा परिषदेकडून प्राथमिक शिक्षण विभाग काढून घेतल्याशिवाय शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही. शिक्षण खात्याने धोरण ठरवायचे आणि त्यांची अंमलबजावणी ग्राम विकास विभागाने करायची यामध्ये सुसूत्रता रहात नाही. जिल्हा परिषदेकडून शिक्षण खाते काढायचे म्हटलेतर त्याला प्रचंड राजकीय विरोध होतो, कडाडून विरोध होतो. तेव्हा याबाबतचा उपाय म्हणजे प्रत्येक जिल्हयात स्वायत्त शिक्षण मंडळ नेमण्याची आवश्यकता आहे. त्या अंतर्गत नगरपालिका, जिल्हा परिषद आणि इतर खाजगी प्राथमिक शाळा आणल्या, आणि त्या मंडळावर जिल्हा परिषदेतून निवडून आलेले लोकप्रतिनिधी, नगरपालिकेतील लोकप्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी यांना स्थान दिलेतर शिक्षणाचे धोरण वर पासून खाल पर्यंत राबविले जाईल. त्याशिवाय शिक्षणामध्ये सुधारणा होणार नाही.

आज जिल्हा परिषदेकडे विषय शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत. काही कॅटेगरीतील शिक्षक मिळत नाहीत.त्यामुळे पाच-पाच वर्षे त्या जागा रिक्त रहातात. विद्यार्थी अप्रगत रहाण्यामागील हे देखील एक प्रमुख कारण आहे. मी 1962 सालापासून पहात आहे. जुन्या काळात शिक्षकाला फक्त शिकविण्याचेच काम दिले जात होते, दुसरे कोणतेही काम दिले जात नव्हते. उद्याचा समर्थ भारत पायाभूत शिक्षणातून तयार करावयाचा आहे त्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये वेगवेगवळे विषय आहेत ते शिकविले गेले पाहिजेत. परंतु आज ते विषय शिकविले जात नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव पाटील ...

माननीय सदस्य श्री. मोते यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे कोणतेही शिक्षण दिले जात नाही. कारण त्यासाठी तरतूद नाही. त्याठिकाणी चित्रकला, संगीत यापैकी कोणतेही कलेचे विषय शिकविले जात नाहीत. त्यामुळे कलेचा विकास कसा होणार? म्हणून कलात्मक शिक्षण हा मूलभूत शिक्षणाचा भाग केल्याशिवाय शिक्षण सुधारणा नाही. जिल्हा परिषदेतील शिक्षकांचा बराचसा कालावधी ईकडे-तिकडे जाण्यात वाया जातो. त्यांच्यावर अतिरिक्त कामांचा भार टाकला जातो. या शिक्षकांना विविध सुविधा आपण उपलब्ध केल्या नाहीतर ही टक्केवारी आणखी वाढत जाईल. म्हणून जिल्हा परिषदेकडून शिक्षण खाते काढून ते स्वायत्त केल्याशिवाय शिक्षणाची घसरणारी प्रक्रिया थांबणार नाही असे माझे मत आहे. प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील शिक्षण शास्त्र, मानसशास्त्र शिकलेला उच्च अधिकारी नेमणे आवश्यक आहे. एकेकाळी राज्याचे शिक्षण संचालक हे आय.ए.एस. असावेत कां असा प्रश्न उपस्थित झाला होता.त्यावेळी अनुभवांती माझे असे मत आहे की, त्याठिकाणी आपण बी.ए. बी.एड., एम.ए. बी.एड. झालेली अनुभवाची शिदोरी पाठीशी असलेली माणसे आपण राज्याचे शिक्षण संचालक म्हणून नेमावेत. संपूर्ण जिल्हयाचे शिक्षण खाते ज्याच्याकडे सोपवायचे आहे ते डेप्युटी डायरेक्टर आपण या क्षेत्रातून आलेले नेमा.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव पाटील . . . .

डेप्युटी डायरेक्टरच्या दर्जाची शिक्षण मंडळावर माणसे नेमावीत. त्यांच्या हाताखाली प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी नेमावेत. परंतु शिक्षण खात्याचा हा कारभार जिल्हा परिषदेच्या अंतर्गत देण्याची व्यवस्था केली तर शिक्षणाचा दर्जा घसरणार नाही. शिक्षणाचा दर्जा सुधारेल आणि मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळेल अशी माझी या मागची भावना आहे. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

. . . .2 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाणसाहेबांनी एक अत्यंत महत्वाचा अशासकीय ठराव चर्चेसाठी आणलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच त्यांनी आपल्या भाषणामध्ये ज्या मुलभूत सूचना केलेल्या आहेत, त्याचे स्वागत करतो. याठिकाणी ठरावामध्ये म्टटल्याप्रमाणे "राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता, या प्रकरणी अमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी" अशी विधानपरिषदेने शिफारस करण्याइतपत हा ठराव निश्चितच आहे आणि तसे करणे गरजेचे आहे.सर्वांगीण विकासाची गंगोत्री म्हणजे शिक्षण आणि शिक्षण या विषयाचे महत्व कोणाला समजावून सांगावे इतपत प्राथमिक स्वरुपाची स्थिती आता राहीलेली नाही.ज्ञानदेवाने विचार करावा, "ज्ञानाचे बोलाने बोलावे" किंवा "इये मराठीचिये नगरी", "ब्रम्हविद्येचा सुकाळू करी" हा सर्वांनी संकल्प साधावा. यापेक्षा "अगत्य नाही जनरंजनाचे, लागे सदा ध्यान निरंजनाचे" असा साम्राजांनी विचार करावा किंवा "ज्ञानदीप लावू जगी, नाचू किर्तनाचे रंगी" म्हणून नामदेवांनी विचार करावा किंवा "आम्हा घनघन शब्दाचे शस्त्र न करु, शब्दची आमुच्या जिवाचे, जीवन शब्द धन वाटू जनलोका." तुका म्हणे"पहा शब्दची हा देव, शब्दची गौरव पूजा करु." या सर्व संत-महंतांनी ख-या अर्थाने शिक्षणाचे महत्व स्पष्ट केले, किंबहुना कर्मवीर भाऊराव पाटीलसाहेबांनी, टिळक, आगरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि इतर अनेक मान्यवरांनी शिक्षणाची महती तुम्हा-आम्हाला समजावून सांगितली आहे. त्याची पुनरपि या सभागृहामध्ये चर्चा होत आहे, याचे मी मनापासून स्वागत करतो. या विषयावर केवळ दीड-दोन तास चर्चा होऊन चालणार नाही. मी या घटकाकडे अनुत्पादक घटक म्हणून पहात नाही. कारण ओरीजनल डेव्हल्पमेंट कोणती असेल तर ते एज्युकेशन आहे. म्हणून या बाबीकडे राज्याने अतिशय गांभीर्याने पहावे, किंबहुना देशाने सुध्दा पहावे इतपत हा महत्वाचा विषय आहे. एवढेच नव्हेतर ख-या अर्थाने आपण विशेषत: अभ्यासक्रमाच्या स्वरुपाकडे लक्ष दिले पाहिजे आणि त्याचा मी विचार करणार आहे. पण 750 वर्षापूर्वी जन्माला आलेल्या कबीराने म्हटलेले आहे की,

"साधु की जाति न पूछिये, पूछिये उनका ज्ञान,
तलवार की कीमत कीजिए,पडा रहने दो म्यान."

मला आश्चर्य वाटते की, 750 वर्षापूर्वी या लोकांनी याचा विचार करावा ? तसेच श्री.एम.सी.छगला

. . . .2डब्ल्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

यांच्यासारख्या माणसाने म्हटलेले आहे की, "Man must be respected on account of his merit and not on the basis of his caste or religion." कारण गुणवत्ता ही सार्वभौम आहे. याचा देखील ख-या अर्थाने विचार करावा. माझ्या भाषणाच्या सुरुवातीला एक मुद्दा सांगावयाचा राहून गेला आहे की, या ठरावाच्या अनुषंगाने ज्या-ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला आहे आणि त्या माध्यमातून ज्या अमुलाग्र सूचना केल्या आहेत, त्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत याठिकाणी उल्लेख करणे मी अत्यंत क्रमप्राप्त समजतो, कर्तव्य समजतो. या ठरावावर सन्माननीय सदस्य श्री.मोतेसरांनी, दोन्ही सावंतानी, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरेसाहेब, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकरमॅडम, सन्माननीय सदस्य श्री.नानासाहेब बोरस्तेसाहेबांनी अत्यंत अमुलाग्र सूचना सूचविल्या आहेत. तसेच सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसाहेब, आता येथे उपस्थित नाहीत, पण त्यांनी काही सूचना केल्या आहेत, तसेच सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटीलसाहेब यांनी सुध्दा काही सूचना केल्या आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. परंतु जर गुणवत्ता निश्चित करावयाची असेल तर ते काही एकटया-दुकटयाचे काम नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. वसंत पुरके....

सभापती महोदय,. इयत्ता पाचवीचा सहावीचा अभ्यासक्रम कसा असावा, वयोगटानुसार अभ्यासक्रम कसा असावा, तो कालबाहय नसावा, कालोचित कसा असावा, हया बाबतीत आपण अमुलाग्र सूचना केलेल्या आहेत. त्याचे मी निश्चितच अभिनंदन करतो. स्वागत करतो. तत्पूर्वी हे ही मान्य करतो की,नवीन अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना, या सभागृहात निश्चीतच काल काही अधिकारवाणीने बोलले गेले त्याचाही आम्ही गांभीर्याने विचार करणार आहोत. या राज्यात एक शिक्षण सल्लागार समिती असावी असा माझा सुध्दा मानस आहे. आपल्या सगळयांच्या बोलण्यातून एकच जाणवले, ते मी नंतर विसरुन जाईल म्हणून पहिल्यांदा तो मुद्दा घेणे मी गरजेचे समजतो. जसे युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन आहे.वेळोवेळी कालपरत्वे कालबाहय ठरलेल्या गोष्टी निदर्शनास आणून देणे, कालोचित गोष्टींचा आदर करणे, अशा प्रकारचा सगळयांच्याच बोलण्यातून एक महत्वाचा सूर आढळून आला. मी संगीताचा रसिक म्हणून सूर आणि स्वर याचा मी विचार करतो. तो सूर अत्यंत आवश्यक आहे. त्याचा गौरव करणे, त्याचे स्वागत करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. कमिशन हे कुठल्याही रजकीय दबावाखाली न येता टोटली शिक्षणाला काय अपेक्षित आहे? मला केव्हा तरी आठवले होते की, शिक्षणाला नेमके हवे तरी काय? "मी भरुन घेतो सारे, हृदयाच्या काठोकाठ." आमच्या शिक्षकांना ही भुमिका खरे म्हणजे समजून सांगण्याची गरज नाही. परंतु "मी भरुन घेतो सारे, हृदयाच्या काठोकाठ, शब्दातून देतांना का पाझरता होतो माठ" स्टीलचे भांडे कधी पाझरत नाही. परंतु मातीचे भांडे मात्र निश्चित पाझरुन त्या भांडयातील पाणी थंड झाल्या शिवाय राहात नाही. योग्य संस्कार करणे हे मातीचे काम आहे. म्हणून मातीमध्ये असलेली ही सृजनशीलता मातीमध्ये असलेली क्रियेटिव्हिटी ही सुध्दा आमच्या शिक्षकांमध्ये जबरदस्त ताकदीची आहे. काल मी जेव्हा बोलत होतो तेव्हा आपण सभागृहातून उठून गेलात, आपण ख-या अर्थाने सभागृहाचा त्याग केला असेल. कारण सनदशीर मार्गाने आपल्या भावना व्यक्त करणे, शिक्षकांचे संरक्षण करणे हे क्रमप्राप्त आहे. ते केलेच पाहिजे. पण मी हे मान्य केलेले आहे की, गुणवत्ता ही सार्वभौम जर असेल तर "Top priority should be given to merit." आणि हे जर द्यावयाचे असेल, तर याच्यामध्ये जे जे जबाबदार आहेत त्याचा तुम्ही, आम्ही सगळयांनी साकल्याने विचार करणे गरजेचे आहे. आमचा शिक्षक जबाबदार आहे. आमच्या शिक्षकांची निर्णयक भुमिका आहे. पण त्याही पेक्षा खोटरे साहेब मी हे मान्य केलेले आहे की, महाराष्ट्रात हजारो शिक्षण संस्था आहेत. या शिक्षण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके.....

संस्थेचे संस्थाचालक त्यांची भूमिका, त्यांची जबाबदारी, त्यांचे कर्तव्य, त्यांचे हक्क, याचा आपण विचार केला पाहिजे. त्यानंतर शिक्षकांची भूमिका, त्यांची जबाबदारी, त्यांचे कर्तव्य, त्यांचे हक्क आणि समाजाशी असलेले त्यांचे नाते नव्हे, समाजातील एक दीपस्तंभासारखा कोणालाही मार्गदर्शन करु शकेल, अशा प्रकारचा एक मूलभूत घटक शिक्षक सुध्दा आहे. ज्या एकनाथांनी सुदर असा अभंग सादर करावा. "ओम्कार स्वरुपा, सदगुरु समर्था, अनाथाच्या नाथा." ज्या गुरुजंनाची अशी महती स्पष्ट करावी त्या गुरुजनांच्या संदर्भात आम्ही अतिशय डोळसपणे विचार करीत आहोत. जर वेतनेत्तर अनुदान दिले जात नसेल, वेतन किंवा पगार वेळेवर मिळत नसेल, निवडश्रेणी, वरिष्ठश्रेणी हे कोर्टाने निर्णय देऊनही होत नसेल तर त्याची दखल घेणे हे आमचे स्वत:चे कर्तव्य आहे. मी मान्य करतो. एवढेच नव्हे तर आमच्या देशाच्या राष्ट्रपतींनी एका ठिकाणी म्हटलेले आहे. श्री. चव्हाण साहेब थोडेसे विषयांतर होईल, पण आपल्या प्रस्तावाची दखल मी घेतो. "If the political leaders of the Nation empower the people through the visionary policy, the prosperity of the nation is certain" आमच्या राजकीय पुढाऱ्यांनी ही पदे भोगत असतांना या शिक्षणाचा सर्वांगीन विकासाची गंगोत्री म्हणून आम्ही विचार करतो, त्याचा प्राथम्यक्रमाने विचार करणे गरजेचे आहे. म्हणून शिक्षण संस्था चालक असेल, दर्जा विषयी मी नंतर बोलणार आहे. पण हा दर्जा केवळ पुस्तकाचे स्वरुप कसे असावे यावर अवलंबून नाही. ज्यावेळी एज्युकेशनल सायकॉलॉजीचा आपण विचार करतो, त्यावेळी शाळा प्रशस्त असली पाहिजे. इलेक्ट्रिसिटी, फॅन, पाणी, छान ग्राऊंड आणि हे फक्त ग्राऊंड असता कामा नये. पी.टी., संगीत शिक्षक, कला शिक्षक, ड्रॉइंग टिचर हे सगळया प्रकारचे मूलभूत घटक आवश्यक आहेत. म्हणून शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे, वाचनालया सारखी महत्वाची बाब उपलब्ध करणे, प्रयोग शाळा असणे, मी हजारो शाळेत जातो त्यावेळेला मला कुठे प्रयोग शाळा दिसत नाही. ज्या ठिकाणी मी स्वत: दहा वर्षे शिकविले त्या ठिकाणी टेबलाला राऊंड मारुन जात असतांना ख-या अर्थाने विद्यार्थ्यांना फिजिकल बॅलन्स देखील करता येत नाही. अशा प्रकारच्या लॅब्रॉटरीज असतील तर त्याचाही गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. कंपाऊन्ड वॉल नसेल तर आपण आता अनेक जी कॉपीची प्रकरणे पाहतो. कॉपीची प्रकरणे ख-या अर्थाने चेक करावयाची असतील तर त्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके....

शाळेची इमारत सुरक्षित असली पाहिजे. नाही तर विद्यार्थी वरुन उडया मारुन येतात. जो मुलगा मॅट्रीक आयुष्यभर नापासच झाला, तो दहावीच्या मुलांना कॉप्या पुरवितो. अशा प्रकारची ही स्थिती निश्चीतच भूषणावह नाही. त्याचा आम्ही विचार करणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर शिक्षण संस्था चालकानीही स्वत:ची जबाबदारी पार पाडावी असे म्हणत असतांना त्यांचे वेतनेत्तर अनुदान दिले की नाही, याचाही शासनाने विचार करणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर सगळयात महत्वाची भूमिका शासनाची आहे. शासनाने वेळोवेळी ठरविलेले आराखडे आणि त्याला दिलेले अनुदान हा महत्वाचा भाग आहे. या ठिकाणी कोणी तरी मान्य केलेले आहे. राईट फ्रॉम द बिगिनिंग. शिक्षणासाठी राज्याच्या बजेटच्या किमान 6 टक्के निधीची उपलब्धता करणे गरजेचे आहे. याच्याही संदर्भात मी स्वत: लक्ष देण्याचा प्रयत्न करीन. पण प्रश्न असा आहे की, सदस्यांनी केलेल्या सूचनांची दखल घ्यावयाची असेल तर या शिक्षणाच्या बाबतीत मी निश्चित नम्रपणे सांगेन की, समाजाने काही जरी केले तरी या शिक्षण प्रक्रियेमध्ये गुणवत्ता प्राप्तीसाठी शिक्षकांची भूमिका ही अत्यंत निर्णायक आहे. आणि म्हणून 8,31,075 विद्यार्थी जर निरक्षर राहात असतील तर यामध्ये फक्त आमच्या शिक्षक बांधवांची जबाबदारी नाही.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

यामध्ये फक्त एका शाळेची जबाबदारी नाही. ही साकल्याने तुमची आमची सगळयांची जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडणे हे तुमचे आमचे काम आहे अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो. सुरुवातीपासून ज्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले त्याबाबत थोडासा आढावा घेण्याचा प्रयत्न करतो. हा ठराव निश्चितच चांगला आहे. तो मलाही पटण्यासारखा आहे. पण तांत्रिक बाब म्हणून आपण हा ठराव मागे घेण्याची मी विनंती करणे हे क्रमप्राप्त आहे. आपण ठराव मागे घेणार हेही आम्हाला अपेक्षित आहे. परंतु आपण या ठिकाणी असे सूचित केले की, दहावीचे व्याकरण कोणाला शिकवावे ? सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण साहेब, माझी आपल्याला विनंती आहे. शेवटी या अभ्यासक्रमात बदल व्हावा म्हणून अभ्यासक्रमात बदल करताना येणारा जो अभ्यासक्रम आहे त्याबाबत मी आपल्याला आश्वासन देतो, मी आपल्याला ग्वाही देतो की, नवीन अभ्यासक्रमाची प्रक्रिया सुरु झालेली आहे. मी जेव्हा विभाग स्तरावर प्रत्येक ठिकाणी शिक्षण संस्था चालक, शिक्षण तज्ज्ञ, आमचे शिक्षक, पालक आणि आपल्यासारखे जाणकार लोक यांच्या बैठका घेईन तेव्हा आपल्यासारख्यांना निश्चितपणे बोलवीन. पुढच्या वर्षी सिलॅबस येत आहे. कारण रिलेव्हंट आणि यूजफूल अभ्यासक्रम येणे गरजेचे आहे. त्या वयाच्या मुलांना उचित अशा प्रकारची इतिहासाची, भूगोलाची, नागरिक शास्त्राची किंवा फिजिक्स, केमेस्ट्री, बायोलॉजी, जॉमेट्री, अल्जेब्रा या सगळयाच विषयाचे काठिण्य हे मुलांच्या वयोगटानुसारच असावे हे निश्चितपणे आम्हाला मान्य आहे. यासंदर्भात आम्ही आपला निश्चितच सल्ला घेऊ. पण आपणा सगळयांच्या बोलण्यातून मला निश्चितपणे हे जाणवलेले आहे की जे खाजगी क्लासेस आहेत ते बंद व्हावेत. ते बंद करण्यामध्ये काहीही अडचण नाही पण एखाद्या गावातील अतिक्रमण हटविताना मात्र जी स्थिती येते ती आपण पाहतो. पण ही थोडी नाजूक बाब आहे आणि लोकांच्या गरजेचीही आहे. कारण या शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये क्वालिटीची जाण असलेलेही अनेक लोक आहेत. ज्यांना अक्षर म्हणजे काय हे माहीत नाही त्यांना साक्षर करणे आणि त्या साक्षर झालेल्यांना गुणवत्तेपर्यन्त पोहोचविणे हे सुध्दा महत्वाचे काम आहे. याचा सुध्दा निश्चित गांभीर्याने विचार करु. पण शिक्षण शास्त्रज्ञांच्या शिफारशी मात्र आम्ही घेणार आहोत हे मान्य करतो. आपल्या बोलण्यातून एक जाणवले की, ज्या एतद्देशीय लोकांनी लोकोत्तर कामे केली असतील, जे एतद्देशीय मोठे मोठे नेते असतील, समाज सुधारक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. वसंत पुरके ....

असतील, खऱ्या अर्थाने राज्यकर्ते असतील त्या अनेक एतद्देशीय लोकांचे सुध्दा विचार लोकांपर्यन्त जावेत. ज्यांनी "गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार " म्हणून स्वत: क्रांतीची स्फुलिंगे स्वत:हून पेटविली आणि संपूर्ण देशाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्यासाठी ज्यांनी स्वत:च्या प्राणाची आहुती दिली त्याही लोकांचे विचार आमच्या लोकांपर्यन्त पोहोचविणे हे निश्चितच क्रमप्राप्त आहे. एवढेच नव्हे तर या शिक्षण क्षेत्राचा प्रभाग स्वीकारताना मला कुसुमाग्रजांच्या ओळी आठवतात.

" कोटयवधी जगतात जिवाणू जगती अन् मरती,
जशी ती गवताची पाती |
नाविक आम्ही परंतु खेळतो सात नभांखाली,
निर्मितो नव क्षितिजे पुढती | "

हा या शिक्षण क्षेत्राचा ठसा आहे. हा महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र आहे. चीनच्या नंतर सगळयात चांगले शिक्षण जर कोठे असेल तर ते आपल्या देशामध्ये आहे. त्याचा सुध्दा गौरव करणे आवश्यक आहे. परंतु क्वालिटी सुधारणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी आपणा सगळयांचे सहकार्य मिळावे अशी विनंती करतो. एतद्देशीय लोकांचा इतिहास आणि परदेशी लोकांच्या संदर्भात मला वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. सावंत साहेबांनी ते मान्य केलेले आहे की, जर मी 60 टक्के किंवा 50 टक्के गुण घेऊन माझ्या खेडयामध्ये, माझ्या गावामध्ये अज्ञानातला आनंद उपभोगत असेन तर तो आनंद अज्ञानातला आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे. जर मला तुलनात्मकदृष्टया पुढे जावयाचे असेल तर माझी दृष्टी ही निश्चितच विश्वव्यापक होणे अत्यंत गरजेचे आहे. हे मी म्हणतो म्हणून नव्हे. चांगदेवपासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, विराण्या, अभंग सादर करणाऱ्या लोकोत्तर तज्ञांनी, अलौकिक प्रतिभा प्राप्त करणाऱ्या ज्ञानेश्वरांनीही विचार केला. त्यांनीही हाच विश्वव्यापक विचार केलेला आहे. म्हणून ते म्हणाले की,

" आता विश्वात्मके देवे | येणे वाग्यज्ञे तोषावे |
तोषोनी मज द्यावे | पसायदान हे ||

मला तर आश्चर्य वाटते की, इतक्या कमी वयामध्ये त्यांनी हे सांगितले. जगाला आश्चर्य वाटेल की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. वसंत पुरके .....

एवढा विस्तृत विचार करणारा, जगात नंबर वन माणूस आपल्या देशामध्ये कसा आहे. त्यांनी हाही विचार केला की,

" किंबहुना सर्व सुखी | पूर्ण होऊनि तिन्ही लोकी | "

अशा प्रकारची उदार दृष्टी आपल्याही ठिकाणी यावी. मी हा विचार करतो की,

" भव्य हिमालय तुमचा आमचा, केवळ माझा सह्यकडा |
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजीन रायगडा ||.
कबीर माझा, तुलसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच |
जयदेवाचा जय बोला परि माझ्या नाम्याचा नाच || "

असे म्हणता म्हणता विश्वभारती प्रवृत्ती आणि आंतरभारती प्रवृत्ती, मी मराठीचे गुणगाण केलेच पाहिजे हे मला वेगळे सांगण्याची गरज नाही. पण त्याचवेळेस मी जेव्हा दिल्लीला जातो...

श्री. अरविंद सावंत : मी आपल्याला असे म्हणालो नाही. विश्वव्यापक तर असलेच पाहिजे. मी कुसुमाग्रजांच्या खिडकीचा उल्लेख केला. मी फक्त एवढेच म्हणालो की, इंग्रजी माध्यमामधील शिक्षणक्रम किंवा तेथील अभ्यासक्रम आणि मराठी माध्यमातील अभ्यासक्रम हा समांतर असावा. फक्त भाषा बदललेली असावी.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

जर मला माझा दृष्टिकोन व्यापक, मर्यादित आणि विश्वव्यापी करावयाचा असेल तर मी किती पाण्यात आहे हे जाणून घेण्यासाठी तौलनिकदृष्टया आपण विचार करणे गरजेचे आहे. म्हणून इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू या सगळया भाषा आहेत. कारण भाषा हे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम आहे. म्हणून जगात कोणत्याही माणसाला स्वत:चे विचार व्यक्त करण्यासाठी, प्रकट करण्यासाठी भाषा येणे अत्यंत आवश्यक आहे. मराठी हे मूळ असले पाहिजे. परंतु मी जेव्हा राज्याच्या बाहेर जातो तेव्हा किंवा देशाच्या बाहेर जातो तेव्हा इंग्रजीशिवाय पर्याय नसतो. माझ्या शिक्षकांनी ज्युनियर कॉलेजमध्ये का असेना पण आयुष्यभर क्वेशन टॅग, ॲक्टीव्ह, पॅसीव्ह, डायरेक्ट, इन्डायरेक्ट, प्रेपोझिशन, आर्टिकल्स शिकविले. मा.सदस्य श्री.अरविंद सावंत हे फ्ल्यूएन्टली, हायप्रोन लँग्वेज वापरुन इंग्रजी बोलतात. मी जेव्हा एन्रॉन प्रकल्प पाहण्यासाठी गेलो तेव्हा मला प्रश्न पडतो की, चेअरमन असताना सुध्दा मला इंग्रजी जमत नव्हते. परंतु मा.सदस्य श्री.अरविंद सावंतांनी इंग्रजीचा आधार घेऊन आपले सुंदर विचार व्यक्त केले होते. माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, जगात कोणतीही भाषा ही नाकारण्यासारखी नाही. ती भाषा स्वीकारलीच पाहिजे. म्हणून इंग्रजीही आवश्यक आहे, मराठीही आवश्यक आहे. नव्हे खरेच दुर्दम्य आत्मविश्वास तुमच्या आमच्या मनामध्ये निर्माण व्हावा असे वाटले पाहिजे. कधी कधी मला असे वाटते की,

मेरा अज्म इनता बुलंद है
कि पराये शोलों का डर नहीं
मगर खूब आतिशें गुलों से है
ये चमन तो जलाना होगा |

हा उर्दूतील शेर मला पहिल्यांदा समजत नाही, दुस-यांदा समजत नाही, तिस-यांदा समजत नाही. परंतु भाषा हे अभिव्यक्तीचे माध्यम आहे. मी कोणत्याही भाषेला कमी लेखता कामा नये. मा.सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी सांगितल्याप्रमाणे संस्कृत आवश्यक आहे. परंतु मला असे वाटत नाही. संस्कृत का आवश्यक आहे ? भगवद्गीतेमध्ये असे म्हटले आहे की,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सम: शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयो: |

शीतोष्णसुखदु:खेषु सम: संगविर्जित: |

परंतु कोणतीही भाषा का असेना त्या भाषेची खोली आणि त्या भाषेमध्ये केले गेलेले विचारमूल्य हे जर स्वीकारावयाचे असेल तर कोणत्याही भाषेविषयी प्रेमच असावे अशी माझे अपेक्षा आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मा.शिक्षणमंत्री अतिशय चांगल्या भाषेत उत्तर देत आहेत. त्यांच्याबद्दल आदर आहे, त्यांच्याकडे ज्ञान आहे. परंतु इतिहासाच्या पुस्तकामध्ये 10 धडे महात्मा गांधीजींवरच आहे. त्यांनी एकटयानेच स्वातंत्र्य मिळविले का ? बाकीच्यांनी स्वातंत्र्य मिळविले नाही ?

प्रा.वसंत पुरके : या सभागृहातील जे जाणकार, तज्ज्ञ सदस्य असतील त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करुन त्यांच्याकडून नवीन अभ्यासक्रम कालोचित कसा असावा यासाठी आपल्याकडून आम्ही डायरेक्शन्स घेणार आहोत. हा अभ्यासक्रम ठरविणारे अधिकारी आहेत हा काही त्यांचाच ठेका नाही. स्थलकालपरत्वे, रिजनपरत्वे लोकांच्या समस्या वेगवेगळया आहेत. म्हणून या अभ्यासक्रमामध्ये कालोचित अशा बाबी याव्यात असे वाटते. भुगोलाच्या विषयामध्ये शेती हा विषय का येता कामा नये, वॉटर कन्झर्व्हेशनचा विषय का येता नये, ॲक्च्युअल वॉटर युटिलायझेशनचा विषय का येता कामा नये ? पर्यावरणाचा विषय का येता कामा नये ? मी फक्त बारावी झालो असेल तर किमान शेती करताना मोसमी वा-यापासून पाऊस पडतो हे माहीत असते. परंतु नैऋत्य मोसमी वा-यापासून पाऊस पडतो की ईशान्य मोसमी वा-यापासून पाऊस पडतो हे माझ्या लक्षात आले पाहिजे. एन्रोलमेंटच्या संदर्भामध्ये सेटलाईटद्वारे अद्ययावत असलेली माहिती आहे ती उपयोगात आणता आली पाहिजे आणि त्याचाही आम्ही विचार करीत आहोत. म्हणून अभ्यासक्रम ठरविणे ही एकटयादुकटयाची जबाबदारी नसते. तरीही साकल्याने विचार करुन आम्ही अभ्यासक्रम ठरविणार आहोत आणि विभागीय पातळीवर आम्ही बैठक घेऊ त्यावेळी मा.सदस्यांनी निश्चितपणे यावे अशी मी आपल्याला विनंती करतो. याठिकाणी कोणीही ब्रिटिशांचे गोडवे गायची

अशुद्धलेखन प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

प्रा.वसंत पुरके..

गरज नाही. परंतु " पात्र सोन्याचे असो वा मृत्तिकेचे वेड मजला आतील अमृताचे । " माणूस कोणत्या गावाचा आहे, धर्माचा, पंथाचा, वर्णाचा आहे हे महत्वाचे नाही. परंतु त्याने दिलेला विचार जर युनिव्हर्सल आणि स्वीकारण्याजोगा असेल तर येथे सुध्दा राजकीय पक्षपात होण्याचे कारण नाही. येथे ब्रिटिशांचे गोडवे कोणी गाणार नाही. परंतु आपण प्रभूरामचंद्राचा दाखला दिला आहे, शबरीचे उदाहरण दिले आहे, शाकुंतल असेल, अनेक पुराण काव्यांमध्ये जे जे दाखले असतील त्यांचा नीतिमूल्येमध्ये पेरणी करण्यासाठी आपण पुस्तकांचा आधार घेतोच. एखाद्या मर्ढेकरांच्या कवितेवर कोणकोणाचा प्रभाव आहे.

नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

किंबहुना मराठीचे व्याकरण पहिल्यांदा कोणी लिहीले आहे..

श्री. मधुकर चव्हाण : रामायणातील शबरीचा धडा इतिहासात घेणार काय ? महाभारतातील आणि रामायणातील धडे आपण इतिहासात घेणार काय ? तुम्ही आम्हाला या ठिकाणी इंग्लंडची संस्कृती कशाला शिकविता आहात ?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण संपल्यानंतर आपल्याला बोलण्याची संधी आहे. त्यावेळी आपण आपले म्हणणे पुन्हा मांडावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, मी नम्रपणे मान्य करील की, मराठीचे व्याकरण आणि मराठीच्या व्याकरणाविषयीची कॉमेंट्री ही महाराष्ट्रातील माणसाने करावयास नको. मी जेंव्हा लिंग्विस्टीक अभ्यासले तेंव्हा मला व्याकरणाचे महत्व कळाले. मराठी माणसाने ते व्याकरण लिहावे? म्हणजेच लिंग्विस्टीक शब्दांची निर्मिती, स्वरांची निर्मिती ही कशी कशी झाली हे दुस-यांनी सांगावे ? म्हणून मराठीचे व्याकरण कोणत्या धडयात असावे, कुठे असावे, कोणत्या वर्गात असावे, एवढेच नव्हेतर मी आपल्याला जबाबदारीने सांगतो की, सामान्य लोक आणि शब्दशक्ती, कल्पेची विभक्ती एम.ए.मध्ये शिकत असताना किंवा शिकवितांना सुध्दा अनेक लोकांच्या पायामध्ये आढया पडतात. इयत्ता 1 ली पासून, इयत्ता 4,5,6 वी पासून व्याकरणाचे पुस्तक होते.अजूनही माझा दावा आहे की, सगळयानांच व्याकरण जमते अशातला भाग नाही. परंतु जो माणूस त्या विषयातील पारंगत असेल किमान त्याने तरी त्या विषयाचे संदर्भ चांगले बोलले पाहिजे ही आपली किमान अपेक्षा आहे. खरे म्हणजे व्याकरण हे तर मी मराठीचा ताल आहे असे मी समजतो. मालकंस,चंद्रकंस,मधुमासारंग,बिहार,भिगरावनसारंग गावयाचे असेल तर तालाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी दादरा, त्रिताल, केरळाची आवश्यकता आहे. म्हणून मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना,लोकांना सांगतो की, आपण व्याकरण अभ्यासा. परंतु पाठ्यपुस्तके हा आपला आदर्श असतो. पाठ्यपुस्तकामध्ये "आणि" हा शब्द कसा लिहीलेला आहे यासाठी वेगळे व्याकरण शिकण्याची गरज नाही. ज्या ठिकाणी चूक होते ती आपण दुरुस्त केली पाहिजे यामध्ये कोणाचेही दुमत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांसह इतर अनेक सन्माननीय सदस्य यांनी ज्या चूका निदर्शनास आणून दिल्या आहेत, त्या चुकांचे निश्चितच निर्मूलन केले जाईल, एवढेच

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके..

नव्हे तर त्यांचे शुध्दीकरण केले जाईल. तसेच अभ्यासक्रम हा विशुध्द असला पाहिजे याचीही दखल घेतली जाईल अशा प्रकारची मी आपल्याला ग्वाही देतो. या ठिकाणी दप्तराचे ओझे किती किलो असते हे देखील सांगण्याचा या ठिकाणी प्रयत्न झालेला आहे. 4 किलो,5 किलो,6 किलो अशा प्रकारे 12 किलो पर्यन्त दप्तराचे ओझे गेलेले आहे. त्यातल्या त्यात परीक्षा दखील विद्यार्थ्यांना ओझे व्हावयास लागले आहे.या गोष्टीचा कोठे तरी विचार करण्याची वेळ आज आलेली आहे. सनमाननीय सदस्या श्रीमती रायकर यांना सांगू इच्छितो की, मी इयत्ता पहिली,दुसरी मध्ये होते तेंव्हा खूप अडाणी होतो. त्यावेळी जेंव्हा परीक्षा सुरु होत असे तेंव्हा शिक्षणाचे औरंगजेब ज्यांना म्हणता येईल ती माणसे अरे बाबा परीक्षा आली जरा हातात पुस्तक तरी घे असे म्हणावयाचे. परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. म्हणून आम्ही इंग्रजीची इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यन्तची परीक्षा सुरु केलेली आहे. भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये परीक्षा हेच महत्वाचे माध्यम आहे. भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये परीक्षेच्या माध्यमातून काय खरे आहे आणि काय खोटे आहे हे जाणून घ्यावयाचे महत्वाचे कोणते स्कील असेल तर ते फक्त परीक्षा आहे. परीक्षा ही असलीच पाहिजे हे सर्वांनी मान्य केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. खोटरे यांनी देखील ही बाब मान्य केलेली आहे.परीक्षे शिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही. आय.एस.एस.ची परीक्षा कशाला ठेवता ? एम.पी.एस.सी.ची परीक्षा कशाला ठेवता ?यु.पी.एस.सी., आय.पी.एस., आय.एफ.एस. याची परीक्षा कशाला ठेवता ? मला काय ग्रास्प करता आले हे जाणून घेण्यासाठी महत्वाचे माध्यम कोणते असेल, यासंबंधी मोजमाप करणारी स्केलपट्टी कोणती असेल तर परीक्षा पध्दती ही होय. आणि त्यामुळे परीक्षा पध्दती आवश्यक आहे. म्हणून या परीक्षा पध्दतीस कोणीही विरोध करुन नये अशी मी विनंती करतो. आपण हेही मान्य केले की, ज्या माणसाने एम.ए.इंग्रजी करावे, एम.ए.मराठीही करावे.काल-परवा माझ्या समोर एक म्युझीक शिकलेला विद्यार्थी आला. त्याने मला सांगितले की, सर,मी 12 वी पासून म्युझीक केलेले आहे. मी म्युझीकच्या संदर्भात खूप रियाझ केला त्यामुळे मला वेळ मिळाला नाही. त्याला मी एकच प्रश्न विचारला की, भुपाली राग हा कुठल्या थाटातला आहे ? भुपालीचा कोणता थाट तुला आवडतो ? भुपाली रागातील छोटा थाट कोणता ? तो केंव्हा गायला जातो ? भुपाली रागाचा गानसमय कोणता? ही माहिती मुलाला सांगता आले नाही. कल्याण थाट, भैरवी थाट कोणत्या रागाचा आहे ? हे जर माहीत नसेल तर ते परीक्षा पध्दती शिवाय येणे शक्य

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत पुरके..

नाही. ही कसोटी अत्यंत आवश्यक आहे आणि ती आपण स्वीकारावी अशी मी विनंती करतो. सर्व सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून असे जाणवले आहे की, शैक्षणिक धोरण आखताना विविध प्रकारच्या विविध स्तरावरच्या चर्चा आणि चर्चासत्रे हाणे आवश्यक आहे ही बाब मी निश्चित मान्य केलेली आहे. यासंदर्भात आपण सुध्दा मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. या ठिकाणी असेही सांगण्यात आले की, मुंबईतील ज्या जागा शाळांसाठी होत्या, पब्लीक पर्पजसाठी होत्या परंतु त्या कोणी तरी ताब्यात घेतल्या अशा प्रकारचा मुद्दा मांडला गेला, मला तो मुद्दा क्लिअर झाला नाही. मी त्या निमित्ताने सांगू इच्छितो की, त्याचाही विचार करु. राष्ट्रीय पातळीवर चर्चा व्हावी, खाजगी वर्ग बंद करावे असे सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी सांगितले आहे.

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.वसंत पुरके)

त्यानंतर हे मान्य केलेले आहे की, 30 टक्के मुले अशी आहेत की, ती मुले वाचू शकतात. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छियतो की, स्वयंसेवी संस्थांनी आमच्या शाळांमध्ये जाऊन पहिली ते चौथी, पाचवी ते सातवीमध्ये शिकणा-या मुलांचे रिडींग-रायटिंग ज्यावेळी तपासले त्यावेळी असे आढळूण आले की, 30 टक्के मुलेच फक्त वाचू शकतात. अन्यथा 70 टक्के मुलांचे काय ? आपला आकस असेल , आपल्याला वाईट वाटले असेल आणि आपल्याला विश्वासात घेतलेही नसेल पण आमचा हेतू मात्र सरळ आहे. म्हणून रिडींग-रायटिंग गॅरेंटी प्रोग्रॅम राबविला. सन्माननीय सदस्य श्री.नानासाहेब बोरस्ते यांना मी सांगू इच्छितो की, आपली तळमळ लक्षात घेऊन आणि शिक्षक बांधवांविषयीची कळकळ लक्षात घेऊन आम्ही निश्चितपणे अमुलाग्र बदल केलेला आहे. आम्हांला पालथ्या घागरीवर पाणी घालायचे नाही. शिक्षण प्रथेतला सगळ्यात महत्वाचा भाग कोणता असेल तर शिक्षक. ज्यांना आपण गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णू गुरूर्देवो महेश्वर: म्हणून त्याच्या खांद्यावर ओझे देत असतो. एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरांनी हे मान्य केले आहे की, चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका. सांगण्याचा हेतू एवढाच आहे की, गुरुच्या खांद्यावर फार मोठे ओझे आहे त्यांच्यावर आम्ही अन्याय करणार नाही. वर्गामध्ये शिकणारी जी चाळीस-पन्नास मुले असतील त्या सर्व मुलांना न्याय मिळाला पाहिजे. त्याबरोबरच माझ्या शिक्षकांवर अन्यायही होता कामा नये. एज्युकेशनल सायकॉलॉजी फक्त आमच्या शिक्षकांनी विचारात घ्यायची. लहान मुलांचा दर्जा सुधारला पाहिजे यासाठी जबरदस्ती असली पाहिजे. पण कोठल्याही मुलाला साधी थापडसुध्दा मारायची नाही हेही बंधन आमच्यावर आहे. अशा प्रकारची तारेवरची कसरत करणा-या शिक्षकांना न्याय मिळाला पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे. तरी हा दर्जा सुधारण्यासाठी आपण आम्हांला सहकार्य करावे आणि 8 लाख 31 हजार 75 निरक्षर मुले आहेत त्यांच्या उत्थापनासाठी आपण सगळ्यांनी मदत करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. पहिली ते अकरावीपर्यंत परीक्षा नसावी असे या ठिकाणी कोणी तरी सांगितले हे जरी आपल्याला बरे वाटत असले तरी हे मोठ्या शहरामध्ये शक्य आहे. पण सर्वसामान्यपणे मात्र हे शक्य नाही. या ठिकाणी एक आत्मविश्वास निर्माण करणारी शिक्षण पध्दती असावी. क्रांतीच्या मोठ्या झेपा आपल्याला घेता आल्या पाहिजेत असे आपल्याला वाटत असेल तर सगळ्या समाजाची शिक्षकांकडून एकच अपेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.वसंत पुरके)

आहे आणि ती म्हणजे शब्दांतून देऊनी थोडे, जे उरात उरते काय, ती गोरख शक्ती मजला, जगण्याची देते ग्वाही . सभापती महोदय, नोकरी नाही मिळाली तरी हरकत नाही पण किमान सेल्फ एम्प्लॉयमेंट निर्माण करता येईल. स्वत: मिळालेल्या शिक्षणाच्या भरश्यावर त्याला संपूर्ण समाजाला फेज करता येईल अशा प्रकारची शिक्षण पध्दती यावी. आत्मविश्वास निर्माण करणारी शिक्षण पध्दती यावी.ही आमचीसुध्दा अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नानासाहेब बोरस्तेसाहेबांचा आणखी एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, शिक्षणावर किमान 6 टक्के हा खर्च झाला पाहिजे. तरी मी या ठिकाणी आपल्याला सांगे इच्छितो की, राज्यामध्ये साडेआठ हजार कोटीचे बजेट जर कोणत्या खात्याचे असेल तर ते शिक्षण खात्याचे आहे आणि आऊट पूट मिळत नसेल तर याचासुध्दा आपण गांभीर्याने विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो. दुसरे असे की, सहा टक्के खर्चापेक्षा अधिक खर्च करण्याच्या संदर्भात आम्हीही आग्रही असू. यासंदर्भात माननीय मुख्य मंत्र्यांना आणि माननीय वित्त मंत्र्यांना आम्ही निश्चितपणे विनंती करू. अधिकाधिक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आम्ही निश्चितपणे पुढाकार घेऊ. परीक्षेचे ओझे नको असे या ठिकाणी बोलले गेले. तसेच सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे आणि श्री. रामनाथ मोते यांनी महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. आपण हे मान्य केले की, मिड डे मिल पेक्षासुध्दा मुलांच्या मनामध्ये खाण्याच्या संदर्भात केवळ आकर्षण निर्माण करून चालणार नाही. आपण ख-या अर्थाने आदिवासींच्या मनामध्ये आणि अन्य काही लोकांच्या मनामध्ये शिक्षणाविषयीची अभिरूची निर्माण केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापूरे यांना मी सांगू इच्छितो की, आतापर्यंत कशी तरी दहावी पास झालेली मुले आपण डी.एड.ला घेत होतो. पण आजच्या घडीला बारावीमध्ये 70, 75, 80 किंवा 90 टक्के मार्कस् मिळविणारी जी मुलें आहेत तीसुध्दा आता डी.एड.ला यावयाला लागली आहेत. त्यामुळे निश्चितपणे आऊट-पूट चांगला आहे. म्हणून ही गुणवत्ता सध्या तरी डावलता येणार नाही.

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदया, कालबध्द कार्यक्रम काय आखण्यात येणार आहे ?

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सर्वांना विश्वासात घेऊन यासंबंधीचे धोरण ठरविण्यात येईल असे माननीय मंत्रीमहोदय सुरुवातीपासून सांगत आहेत..

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदया, मी हे पहिल्यांदा हे मान्य केलेले आहे की कोणत्याही एका व्यक्तीची ही जबाबदारी नाही.कोणताही माणूस परिपूर्ण नसतो. सन्माननीय सदस्य सुध्दा आम्हाला सहकार्य देण्याकरता आमच्या बरोबर आहेत.आपल्यातील ज्येष्ठ,जाणकार,तज्ञ,निष्णात सदस्य हे धोरण ठरविण्यामध्ये निश्चितपणे असतील.त्यातून ते शासनाला निश्चित दिशा दिग्दर्शक सूचना करतील. त्या सूचनांचा विचार करण्यात येईल. क्रीडा आणि कला या विषयाला वाव देणे अत्यंत महत्वाचे आहे त्यामुळे कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल ,कुस्ती,लांब उडी,उंच उडी,बास्केट बॉल,क्रिकेट इत्यादी खेळ जर मुलांना यावे असे आपल्याला वाटत असेल तर त्यासाठी त्यांच्यामध्ये शारीरिक शिक्षणाविषयीची अभिरुची निर्माण करणे गरजेचे आहे.त्याचा शासन गांभीर्याने विचार करीत आहे. सन्माननीय सदस्यांना कदाचित हे माहिती असेल किंवा नसेल परंतु या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की , मंत्री म्हणून या विभागाचा कार्यभार सांभाळल्यानंतर एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी स्पोर्टसमनसाठी 5 टक्के जागा शासकीय सेवेत राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.हिदुस्थानातील सर्वच गेम खेळणा-यांना याचा फायदा होणार आहे.

श्री.नानासाहेब बोरस्ते : 250 विद्यार्थ्यामागे एक क्रीडा शिक्षक असला पाहिजे.

प्रा.वसंत पुरके :आपण 1970 साली क्रीडा धोरण स्वीकारले होते आणि क्रीडा शिक्षकांच्या बाबतीत 1995 सालापासून मी सुध्दा आग्रही भूमिका घेतलेली आहे.एवढे जरी करता आले नाही तरी 4 हजार 860 जी केन्द्रे आहेत त्या त्या ठिकाणी पी.टी.आय. असावेत अशा प्रकारचा आमचा देखील मानस आहे.त्या बाबतीत आम्ही निश्चितपणे कॅबिनेटला विनंती करु आणि सन्माननीय सदस्यांच्या भावना त्यांना सांगू. हेल्थ , हार्ट व हयुमॅनिटी या तीन "एच "सबंधी सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला आहे. तेव्हा हे साध्य करण्याच्या दृष्टीने आम्ही गांभीर्याने विचार करीत आहोत.

श्री.अनंत तरे : शासकीय नोक-यांमध्ये पाच टक्के जागा खेळाडूंसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत तेव्हा खोखो,कबड्डी या सारखे खेळ खेळणा-या खेळाडूंसाठी या जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

प्रा.वसंत पुरके :मंत्रिमंडळाने त्याला मान्यता दिली आहे. काळाच्या ओघात त्यात जे काही बदल करावयाचे असेल त्याप्रमाणे बदल करण्यात येतील.तरीसुध्दा आपल्या भावना कॅबिनेटला निश्चितपणे मी कळवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे : मला असे विचारावयाचे आहे की ..

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय मत्रिमहोदयांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. सन्माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरासाठी अजून किती वेळ लागणार आहे ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदया, मी माझे भाषण संपवितो. सन्माननीय सदस्यांच्या जर काही सूचना असतील तर त्या निश्चितपणे विचारात घेण्यात येतील.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी जी पर्यवेक्षण यंत्रणा संपूर्ण राज्यात मोठया प्रमाणावर अस्तित्वात आहे.त्या यंत्रणेला ॲक्टीव्हेट करणे आणि तिला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.क्लास ऑब्जरव्हेशन्समधून जर काही आढळून आलेले असेल, फाईन्डीग्ज्मधून काही आढळून आलेले असेल तर त्याही बाबतीत प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ठीक ठिकाणी जे काही लोक आहेत त्यांना सक्षम करणे गरजेचे आहे त्या ठिकाणी पर्यवेक्षण यंत्रणा असणे आवश्यक आहे व ती अधिक चांगल्या प्रकारे राबविण्यात येईल असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांनी असे सांगितले की हे खाते जिल्हा परिषदेमध्ये असल्यामुळे आम्हाला स्वातंत्र्य नाही. त्यांनी याबाबतीत जी खंत व्यक्त केलेली आहे त्याबाबतीत काय बदल करता येईल यासाठी आम्ही आपल्याला निश्चितपणे विश्वासात घेऊ.यामध्ये चटकन बदल करता येत नसले तरी आपले विचार आम्ही निश्चितपणें संबंधितांना कळवू एवढेच नव्हे तर शिक्षकांवर जर राजकीय दबाव येत असेल, त्यांना कोणी प्रेशराईज करीत असेल तर त्याही बाबतीत आम्ही निश्चितपणें गांभीर्याने विचार करु. शिक्षकांना देण्यात आलेल्या शिक्षकेतर कामाच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे काल माननीय शिक्षण राज्यमंत्र्यानी हे मान्य केलेले आहे की,जनगणना आणि निवडणुकीचे तसेच अन्य एखादे काम अशा तीन कामा व्यतिरिक्त इतर कामे आम्ही शिक्षकांवर सोपविले जाणार नाही.शिक्षकेतर कामे त्यांच्याकडून निश्चितपणे काढून घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत जेणे करुन याशिक्षकांना अध्यापनाच्या कामामध्ये स्वत:ला वाहून घेता येईल. शिक्षकांनी आपल्या कामाला वाहून घ्यावे अशा प्रकारची अपेक्षा माझी या शिक्षक बांधकाकडून आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे.सन्माननीय सदस्यांनीसुध्दा हा विषय या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून या ठिकाणी माडलेला आहे.तो अभिनंदनास्पद आणि

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कौतूकास्पद आहे आहे. या निमित्ताने मी आपल्याला एक विनंती करतो. माझ्या उत्तरामुळे आपले 100 टक्के समाधान झालेले नसेल परंतु अभ्यासक्रम ठरवत असतांना आपल्या सर्वाची मदत घेण्यात येईल आणि पुढच्या काळात आम्ही कालोचित व योग्य असा अभ्यासक्रम आणू .त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावेल आणि सर्वसामान्य माणसाचे उत्थापन होईल.अशी ग्वाही मी आपल्याला देतो. तसेच सन्माननीय सदस्यांना पुन्हा अशी विनंती करतो की आपण आणलेला ठराव चांगला आहे त्याचे मी कौतूक केलेले आहे. त्या ंसदर्भात आम्ही निश्चित विचार करु परंत आता सन्माननीय सदस्यांनी हा अशासकीय ठराव मागे घ्यावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझ्या ठरावाच्या सदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी अनेक गोष्टीचा स्वीकार केलेला आहे असे त्यांचे भाषण ऐकल्यानंतर वाटते. पुढच्या वर्षा पासूनच्या अभ्यासक्रमात त्या गोष्टी समाविष्ट केल्या जाणार आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी अत्यंत प्रामाणिक पणाने या गोष्टी मान्य केल्या आहेत.दिलेला शब्द माननीय मंत्री महोदय पाळतील आणि पुढच्या वर्षीच्या पहिली ते दहावीच्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये निश्चित सुधारणा होतील असे मला वाटते. माननीय मंत्रिमहोदयांनी जो शब्द दिला आहे त्या शब्दावर विश्वास ठेवून मी हा ठराव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.हा ठराव मागे घेत असतांना दिलेला शब्द विसरु नका अशी माझी मंत्रिमहोदयांना कळकळीची विनंती आहे.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला .

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु करणे.

मु.शी.: ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु करणे या विषयावरील डॉ.निलम गो-हे यांचा ठराव.

डॉ. निलम गो-हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

" राज्यात प्रत्येक वर्षी ऑक्टोबर ते मे या कालावधीत लाखोंच्या संख्येत स्थलांतरीत होणा-या ऊसतोड कामगारांबरोबरच त्यांची लहान मुले देखील कारखान्याच्या क्षेत्रात स्थलांतरीत होत असल्याने या मुलांचे प्रथम शैक्षणिक सत्र गावात झाल्यानंतर दुसरे शैक्षणिक सत्र वाया जाऊन त्यांच्या शिक्षणात खंड पडणे,अशाप्रकारे ऊसतोड कामगारांच्या मुलांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ज्याप्रमाणे "जनार्थ" ही स्वयंसेवी संस्था साखर कारखान्याच्या क्षेत्रात "साखर शाळा" उपक्रम राबवीत आहे त्याच धर्तीवर शासनाने राज्यातील सर्व साखर कारखाने क्षेत्रात "साखर शाळा" सुरु कराव्यात,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, याविषयावर सदनामध्ये अनेक वेळेला वारंवार चर्चा झालेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झालेली आहे. अतिशय खेदपूर्वक आणि माणुसकीला कलंक अशा प्रकारची ऊसतोड कामगारांच्या मुलांबाबत शिक्षणाची अवस्था आहे. शिक्षणमंत्र्यांनी आताच विद्वत्तापूर्ण भाषण केले. परंतु आजही लक्षावधी मुले शिक्षणाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहतात. ही मुले या राज्यामध्ये ज्या सहकार क्षेत्राचे नांव घेतले जाते त्या क्षेत्रातील आणि खास करुन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राचे नांव उज्ज्वल असताना साखर कारखान्याच्या माध्यमातून जी कुटुंबे स्वत:चा रोजगार शोधतात अशा ऊसतोड कामगारांच्या मुलांना मात्र शिक्षणापासून वंचित रहावे लागते याचा अर्थ दिव्याखाली अंधार आहे अशी परिस्थिती दिसते. यासंदर्भात मी फार पूर्वीची आकडेवारी सांगू इच्छित नाही. परंतु सेंटर फॉर डेव्हलपमेंट रिसर्च ॲन्ड डाक्युमेंटेशन या संस्थेने दोन वर्षापूर्वी महाराष्ट्रातील सहा जिल्हयांमधील 25 साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन ऊसतोड कामगारांच्या मुलांचे सर्वेक्षण केलेले आहे. ऊसतोड कामगारांची 2 लाख मुले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षणापासून वंचित आहेत. प्राथमिक शिक्षणापासून वंचित असणा-या ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची संख्या 1 लाख 84 हजार 341 एवढी आहे. राज्यामध्ये स्थलांतरीत होणा-या कुटुंबांची संख्या गेल्या 2 वर्षामध्ये 49 टक्क्यांनी वाढलेली आहे. दरवर्षी 8.30 टक्के वाढ होते आहे. म्हणजे दरवर्षी कित्येक हजार मुलांची त्यामध्ये भर पडते आहे. औरंगाबाद,अहमदनगर,कोल्हापूर,नाशिक,पुणे,सातारा,सांगली या जिल्हयातील 25 साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात काम करणा-या ऊसतोडणी कामगारांचे प्रत्यक्षात जेथे अड्डे आहेत त्याठिकाणी जाऊन अहवाल तयार करण्यात आलेला आहे. प्रथम सत्र संपल्यानंतर 50 टक्के मुलांना शाळा सोडून जावे लागते. एक वर्षापेक्षा कमी काळ शाळेत गेलेल्या मुलांचे प्रमाण 45 टक्के आहे. मुलांचे प्रमाण 54 टक्के आणि मुलींचे प्रमाण 46 टक्के आहे. महाराष्ट्रामध्ये साखर कारखान्यांची संख्या मोठी आहे. वेगवेगळया जिल्हयामध्ये साखर कारखाने आहेत याची शासनाला कल्पना आहे.

यानंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे (पुढे चालू ...

कोल्हापूरमध्ये 18, सांगलीमध्ये 16, साताऱ्यामध्ये 10, पुण्यामध्ये 12, सोलापूरमध्ये 17, अहमदनगर मध्ये 18 असे विविध साखर कारखाने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यात आहेत. अध्यक्ष महाराज, या साखर कारखान्यांच्या ठिकाणी काही काळापुरते येणाऱ्या स्थलांतरीत मुलांचे शालेय शिक्षण व्हावे म्हणून अनेक योजना केंद्राने आणि राज्य सरकारने देखील केलेल्या आहेत. शासन असा दावा देखील सातत्याने करीत असते की, आम्ही अशा मुलांसाठी काही योजना राबवित आहोत. महात्मा फुले शिक्षण हमी योजना 2002 सालापासून सुरू करण्यात आली. मला आठवते की, याच सदनामध्ये या विषयावर जेव्हा लक्षवेधी सूचना आली होती तेव्हा तत्कालीन सभापती सन्माननीय श्री.ना.स.फरांदे यांच्या दालनामध्ये तीन वेळा साखर शाळांच्या संदर्भात बैठक झाली होती. त्या बैठकांना अर्थमंत्री, सहकार मंत्री, शालेय शिक्षणमंत्री आणि मी स्वत: देखील उपस्थित होते त्याशिवाय शिक्षण संचालक आणि संबंधित विभागांचे सचिव आणि जनार्थ, औरंगाबाद येथील संस्थेचे प्रतिनिधी श्री.प्रवीण महाजन आणि श्री.गौतम लांडगे हेही उपस्थित होते. त्यावेळेस या संबंधात काही निर्णय शासनाने सांगितले होते. त्यात पहिला एक मुद्दा असा आला होता की, ही जी सगळी स्थलांतरित मुले जी साखर कारखाना परिसरामध्ये काही कालावधीसाठी वास्तव्याकरिता येत असतात त्यांना आपल्या मूळ गावच्या शाळेतून साखर कारखान्याच्या परिसरातील शाळेत जाण्यासाठी आणि त्या शाळेतून पुन्हा मूळ गावच्या वा अन्य गावातील शाळेत जात असताना, त्यांना स्थलांतरित झाल्याबद्दलचे 'मायग्रेशन सर्टिफिकेट' मिळावयास पाहिजे. परंतु असे हे मायग्रेशन सर्टिफिकेट अजूनही मिळत नाही आणि ते मायग्रेशन सर्टिफिकेट उपलब्ध नसल्यामुळे कोणतेही रेकॉर्ड या मुलांकडे नसते की ते कोठल्या शाळेतून आले व कोठे गेले. समजा ऊसतोड कामगारांच्या ज्या टोळ्या असतात .. म्हणजे कंत्राटदाराने त्यांना एका कारखान्यापासून दुसरीकडे नेले तर त्यांची शाळा देखील बदलू शकते आणि मायग्रेशन सर्टिफिकेट नसल्यामुळे या मुलांना तांत्रिकदृष्ट्या अतिशय अडचण येते. अध्यक्ष महोदय, दुसरा महत्त्वाचा भाग असा होता की, या मुलांना शालेय पाठ्यपुस्तके मोफत देण्यात यावीत. या विषयीची सूचना शासनाकडे आली होती आणि तिसरा मुद्दा म्हणजे या मुलांना शालेय पोषण आहार देण्यात यावा. कारण प्रत्येक ठिकाणी ऊसतोड कामगार जेथे राहतात ती जागा आणि मुले शाळेत जातात ती जागा यामध्ये खूप मोठे

..... 3इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंतर असते. अशा वेळेला अगोदरच जे स्थलांतरित झालेले आहेत त्यांची मुले डबा कोठून घेऊन जाणार, म्हणून या मुलांना शालेय पोषण आहाराच्या योजनेमध्ये समाविष्ट करून घ्यावे. अध्यक्ष महाराज, 2003 आणि 2004 जो हंगाम गेला त्यामध्ये या 'जनार्थ' संस्थेने पुणे, नासिक, औरंगाबाद, अहमदनगर, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्ये साखर शाळा चालविल्या आणि त्याचे प्रस्ताव देखील शिक्षण विभागाकडे वेळेवर दाखल केले. यामुळे जवळपास 7 हजार मुलांना या शाळांचा फायदा झालेला आहे. अध्यक्ष महाराज, मी या संदर्भातील आकडेवारी या ठिकाणी मुद्दाम वाचून दाखवित आहे जेणे करून मला काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होऊ शकेल. उदाहरणार्थ, अहमदनगर जिल्हयातील ज्ञानेश्वर साखर कारखान्यामध्ये 305, मुळा साखर कारखान्यामध्ये 100, संजीवनी साखर कारखान्यामध्ये 159, औरंगाबाद येथील गंगापूर साखर कारखाना आणि इतर साखर कारखान्यांमध्ये 748 याप्रमाणे विद्यार्थ्यांना फायदा झालेला आहे. नाशिक मध्ये निफाड साखर कारखान्यातील 890, कादवा साखर कारखान्यातील 405, वसंतदादा साखर कारखान्यात 361 अशा पध्दतीने विद्यार्थी तिकडे गेलेले आहेत आणि पुण्यामध्ये भीमापाटस, सोमेश्वर, छत्रपती आणि इंदापूर या चार साखर कारखान्यांतील अनुक्रमे 261, 261, 322 आणि 156 या प्रमाणे विद्यार्थ्यांना त्याचा फायदा मिळालेला आहे. कोल्हापूरमध्ये छ.शाहू साखर कारखान्याच्या परिसरामध्ये 329, तात्यासाहेब कोरे साखर कारखान्यात 317, राजाराम साखर कारखान्यात 71, दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्यात 215 आणि गुरुदत्त मध्ये 200 तर साताऱ्यामध्ये कृष्णा साखर कारखान्यामध्ये 270 याप्रमाणे वेगवेगळ्या मुलांना फायदा मिळालेला आहे. थोडक्यात सांगावयाचे तर साधारणत: 5 ते 6 हजार मुलांपर्यंत ही संस्था पोहोचलेली आहे. शासनाची मदत म्हणतानाही खेद आणि दु:ख असे आहे की, एवढा चांगला कार्यक्रम स्वत:हून ही संस्था राबवित असताना आणि त्याबद्दल सरकारकडे पाठपुरावा करूनही पुणे, सातारा, सांगली आणि औरंगाबाद जिल्ह्यामध्ये यासाठी जे शिक्षण स्वयंसेवक नेमावे लागतात त्यांचेसाठीचे अनुदान काही प्राप्तच झाले नाही. अध्यक्ष महाराज, गेल्या वेळच्या बैठकीमध्ये त्यांनी दुसरी मागणी अशी केली होती की, आम्हाला शाळा घेण्यासाठी एखादी शेड बांधून मिळाली पाहिजे. साखर कारखान्यांची परिस्थिती तेवढी चांगली नाही. पण ही मुले बसणार कोठे ? प्रत्येक वेळेस त्यांच्या शाळा लांब असतात. काही

..... 3इ 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

साखर कारखान्यांनी आपल्या परिसरामध्ये शेड बांधून दिल्या पण बाकी बहुतेक ठिकाणी ही मुले झाडाखाली बसतात. या शेड बांधण्यासाठीचा जो दीड दोन हजाराचा खर्च आहे तोही काही ठिकाणी साखर कारखान्यांनी उपलब्ध करून दिला आहे, काही ठिकाणी शालेय शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिला आहे. मात्र त्यावेळेस समाजकल्याण खात्याने अहमअहमिका दाखविली होती की, आम्ही अशा शेडस् बांधतो, वसतीगृहे बांधतो पण त्यांनीसुध्दा शेडस् बांधून दिलेल्या नाहीत. खेदाची गोष्ट अशी की, पुणे, सांगली सातारा हे जिल्हे तसे पुढारलेले आहेत. ..

(यानंतर श्री. जागडे ....3इ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

असे असताना पुणे जिल्ह्याने गेल्या वर्षी मंजूर केलेले अनुदान दिलेले नाही. दर वेळेला वेगवेगळी कारण देऊन अनुदान अडवून ठेवले जाते. साखरशाळा पुणे, नाशिक, अहमदनगर, सांगली, सातारा, कोल्हापूर इ. जिल्ह्यातून चालविल्या गेल्या. परंतु शालेय पाठ्यपुस्तके पहिले सत्रे संपले तरी मुलांना मिळालेली नाहीत. शालेय पोषण आहार साखरशाळेत मुलांना देण्यात यावा, असा आदेश असताना अहमदनगर जिल्हा आणि पुणे जिल्ह्यातील दौंड व बारामती हे दोन तालुके वगळता अनेक जिल्ह्यातून पोषण आहार दिलेला नाही. यामध्ये जे शिक्षण सेवक आहेत, त्यांना प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. आता सहा महिन्यासाठी ही शाळा असल्यामुळे शिक्षक सेवक शोधायचे आणि नेमायचे. त्यांना जर कोणतेही प्रशिक्षण नसेल तर ते योग्य प्रकारचे शिक्षण देवू शकत नाहीत. शिक्षण सेवकांना मासिक 2 हजार रुपयाचे वेतन दिले पाहिजे. मुलांना पोषण आहार दिला पाहिजे. परंतु या बाबतची कोणतेही अंमलबजावणी झालेली नाही. सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत इनोवेटीव्ह, अल्टरनेटीव्ह एज्युकेशन या योजनेअंतर्गत केंद्र सरकारची पैसे देण्याची तयारी आहे. त्या संदर्भात या विभागाचे केंद्राचे सचिव यांनी या संस्थेकडे तसेच शासनाकडे तयारीही दाखविली आहे. परंतु या बाबत शासनाकडून ताबडतोबीने तीन गोष्टी होण्याची आवश्यकता आहे. या बाबतचा प्रस्ताव ताबडतोबीने केंद्र शासनाकडे सादर होण्याची आवश्यकता आहे. तसेच साखर कारखान्याच्या परिसरात किती मुले येतात, याची माहिती घेतली पाहिजे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळा, जनार्थ किंवा तत्सम संस्था पाहून या सर्व संस्थांना वेळेवर पाठ्यपुस्तके मिळाली आहेत की नाही हे पाहिले पाहिजे. सभापती महोदय, शालेय पोषण आहार मिळण्यामध्ये काय अडचणी आहे, हे मला समजू शकत नाही. एका बाजुला धान्य उपलब्ध आहे. असे सांगत असतानाही ऊसतोड कामगारांच्या मुलांना शालेय पोषण आहार मिळत नाही. या ठिकाणी जिल्ह्याची नांवे त्यांनी सांगितलेली आहे. अहमदनगर आणि नाशिक तसेच पुणे जिल्ह्यात दौंड आणि बारामती या ठिकाणी शालेय पोषण आहार मिळालेला आहे. सभापती महोदय, आज इंदापूर तालुक्यात जे काही प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याची पाहणी ताबडतोबीने शासनाने करण्याची आवश्यकता आहे. गेल्या वर्षी सामाजिक न्याय खात्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता, तेव्हा असे सांगण्यात आले होते, आम्ही ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी एक आयोग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गो-हे...

आणि महामंडळ निर्माण करु. त्याप्रमाणे बालहक्क आयोग आपण निर्माण केला आहे. आता या आयोगावर तसेच महामंडळावर या बाबतचे चांगले काम करणा-या शैक्षणिक संस्था तसेच स्वयंसेवी संस्थांना घेतले पाहिजे. गेल्या वर्षी शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींनी आम्हाला असे सांगितले की, आम्ही अनुदान द्यावयाला तयार आहोत, परंतु आमच्याकडे प्रस्तावच येत नाहीत. आता याबाबतचा थोडासा विचार केला पाहिजे. एखाद्या शैक्षणिक संस्थेला ते परवडतही नसेल. त्यावेळी आम्ही असे सांगितले होते की, राज्यात ज्या नावाजलेल्या शाळा असेल, त्यामध्ये जीवन प्रसारक मंडळ असेल, रयत शिक्षण संस्था असेल, मराठा समाज शिक्षण प्रसारक मंडळ असेल, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाने असलेली संस्था असेल, या सर्व नावाजलेल्या संस्थांची आपण एक रिजनल बैठक घ्या. त्यामध्ये या बाबतची विचारणा करा. अशा प्रकारच्या शाळा चालविण्यासाठी ते काय करु शकतील, याची विचारणा त्यांना करा. सभापती महोदय, अर्थमंत्री जयंत पाटील त्या बैठकीला उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की, शिक्षकांच्या अनुदानासाठी जो पैसा लागेल, ते देणे या वर्षी शक्य होणार नाही. परंतु पुढील वर्षी मात्र देवू. आता या वर्षाचे बजेट सोमवारी जाहीर होणार आहे. यामध्ये याचा अंतर्भाव झाला आहे की, नाही याची मला माहिती नाही. साधारणपणे याचा अंतर्भाव बजेटमध्ये झाला नसावा, असे मला खात्रीने वाटते. या बाबत पुन्हा आम्ही विचारणा केली की, आम्हाला असे सांगितले जाईल की, आमच्याकडे बजेट कमी आहे. म्हणजे शासन त्यांना जेवायला देत नाही आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते पुढे कोठेही जाऊ शकत नाहीत. सभापती महोदय, ही मुले आईवडिलांबरोबर जेव्हा जात असतात, त्यावेळी ही मुले त्या ठिकाणी बाल मजूर म्हणूनही काम करीत आहेत. कारण आईवडील जेव्हा कामावर जातात, तेव्हा पाणी आणणे, लाकडे गोळा करणे, जेवण तयार करणे इ. कामे ही मुले करीत असतात. म्हणून साखर कारखान्याशी संबंधीत असणा-या या कुटूंबाचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

खरा प्रश्न असा की, साखर कारखाने डबघाईला आले आहेत, त्यामध्ये काय सुधारणा करावयाची हा जसा एक विषय आहे, त्याप्रमाणे साखर कारखान्याशी संबंधित जी कुटुंबे आहेत त्यांच्या सक्षमीकरणाची, त्यांच्या प्रगतीची आम्ही जबाबदारी घेतली नाहीतर उद्या दुर्दैवाने ही मुले शैक्षणिक व आर्थिक प्रगतीपासून वंचित होऊन नंतरच्या काळात त्यांना फार मोठया वैफल्याचा मुकाबला करावा लागेल. तो अपघात नाही. ज्या ज्या भागातून ऊस तोडणी कामगार येतात त्या भागामध्येच प्रचंड दरोडे पडत आहेत. बीड, नगरच्या संपूर्ण भागामध्ये, वैजापूर, औरंगाबाद, नाशिक व आसपासच्या जिल्हयात फार मोठया प्रमाणात बेबंदशाही झाली आहे. हा अपघात नाही. त्यामध्ये कुटुंब संस्थेवर होणारा विपरीत परिणाम, आर्थिक दृष्टया मिळणाऱ्या फटक्यामुळे आणि शिक्षणापासून मुले वंचित राहिल्यामुळे निर्माण होणारे वैफल्य हे कारण आहे. याकरिता आई-वडिलांकडे पर्याय आहे की, ते मुलांना लांब ठेवून त्यांना शिक्षण देऊ शकतात. त्याकरिता हॉस्टेल्स असलीतरी त्याठिकाणी मुलांना ठेऊन त्यांची देखरेख करणे शक्य नाही. कारण ऊस तोडण्याचे काम करीत असतांना त्यांना या मुलांची मदत होते. म्हणून त्या मुलांना बरोबर घेऊन प्रवासाला निघण्याची त्यांची मानसिकता आहे. त्यामध्ये जर छोटी मुलगी असेल तर तिचा स्वयंपाक पाण्यासाठी उपयोग होतो. म्हणून तिला कुणीच हॉस्टेलवर ठेवायला तयार नसते. त्यामुळे मुली शिक्षणापासून नक्कीच वंचित रहातात. त्यामुळे चार-सहा महिने त्यांची भ्रमंती चालू रहाते. प्रश्न असा आहे की, त्यांच्या भ्रमंतीच्या काळात ती मुले साखर शाळेत असतात, व भ्रमंतीनंतर ते लोक गावामध्ये आल्यानंतर ती मुले पुन्हा आपल्या शाळेच्या मध्यवर्ती प्रवाहात जात आहेत की नाही याचे सनियंत्रण शून्य होत आहे याचा मला खेद होत आहे. एका बाजूला आपण मोठया पुढाऱ्यांची नावे घेतो. आता माननीय शिक्षण मंत्र्यांनी सुंदर कविता वाचून दाखविली. कवि नारायण सुर्वे यांची "तुमचेच नाव लिव्हा मास्तर" अशी कविता आहे, असेच तुम्हाला म्हणावयाची वेळ आली आहे. त्या मुलांच्या प्रगती पुस्तकाची जबाबदारी कुणावर आहे? म्हणून खरा प्रश्न असा आहे की, "तूही यत्ता कंची" असे कवि नामदेव ढसाळ यांनी विचारले आहे त्याप्रमाणे आपल्याकडे स्त्री मुक्ती संघटनेचे गीत आहे "शिक्षणाची गाडी चालली" "मुली किती ग चढती निम्म्या खाली उतरती" तशी ही मुले शिक्षणाच्या गाडीतून दरवर्षी फेकली जात आहेत. साखर कारखान्यांनी काही ठिकाणी शाळा चालविल्या काही ठिकाणी चालविल्या नाहीत. त्यांच्यावरील जबाबदारी आपण काढून घेतली. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

जबाबदारी अंतिमत: शिक्षण विभागाची आहे असे मला वाटते. म्हणून आपण त्यांना मायग्रेशन सर्टिफिकेट, शालेय पोषण आहार, वेळेवर पुस्तके मिळणे, त्याच प्रमाणे प्रत्येक विभागात ही मुले जात आहेत, त्यापैकी कोणत्या जिल्हयातील मुले कोणत्या जिल्हयात जात आहेत याचे आपण ट्रॅकींग केले आहे कां? ते ट्रॅकींग तुमच्याकडे असेलतर त्यांच्यासाठी शासनाने केलेल्या सुविधांची माहिती आम्हाला समजली पाहिजे. त्या त्या विभागातील लोकप्रतिनिधींना त्याची माहिती समजली पाहिजे.त्या भागातून येणाऱ्या पालकांना माहीत असले पाहिजे की, अशापध्दतीच्या शाळा आपल्या मुलांसाठी उपलब्ध आहेत. म्हणून माझी विनंती आहे, की या सदनाच्या प्रथेप्रमाणे हा ठराव मागे घ्यावा लागत असतो. परंतु खरा प्रश्न ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत 1995-96 ला जी.आर. काढला आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेमार्फत प्राथमिक शाळा सुरु केल्या असे म्हटले आहे. पुणे जिल्हा परिषदेचे उदाहरण मी आपल्याला दिले की, जिल्हा परिषदेने वेळेवर पैसे दिले नाही. मग प्रश्न असा आहे की, जिल्हा परिषदेकडून या सर्व योजना चालवायच्या म्हटल्या तर जिल्हा परिषदांनी नीट काम केले नाही तर त्यांच्या बाबतीत आपण कोणती भूमिका घेणार? मी पुढे जाऊन म्हणेन की, ज्या जिल्हा परिषदा ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी काही मदत करीत नाहीत त्याबाबत आपण जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकींना उपस्थित रहातांना याबाबत आपण जिल्हा परिषदांचा आढावा घेतला पाहिजे. त्या जिल्हा परिषदांनी या मुलांसाठी कोणत्या प्रकारचे काम केले आहे याबाबत त्यांना विचारले पाहिजे. ऊस तोड कामगारांप्रमाणेच महाराष्ट्रात जे फिरते मजूर आहेत त्या सर्वांच्या मुलांशी संबंधित हा प्रश्न आहे. त्यामध्ये भटक्या विमुक्त, धनगर समाजाची माणसे, वीट भट्टीवरील कामगार, बांधकामावरील मजूर या सर्वांच्या मुलांसाठी ही योजना लागू झाली पाहिजे अशी माझी शिफारस आहे. ज्यावेळी अर्थसंकल्पावर चर्चा होईल त्यावेळी ठोस स्वरुपात आपले निर्णय प्रत्यक्षात आले पाहिजेत. ते प्रत्यक्षात येत असतांना ज्या चांगले काम करणाऱ्या संस्था आहेत त्यांना त्यामध्ये जोडून घेऊन यामध्ये जी दोन लाख मुले आहेत त्यांना पुढील दोन वर्षात शिक्षणाच्या अधिकारापर्यंत नेऊन सामाजिक व आर्थिक वातावरण निर्मिती आपण करु शकाल, अशाप्रकारची भूमिका शासनाने स्वीकारावी असे मला वाटते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

अशा प्रकारची भूमिका शासनाने स्विकारावी असे मला वाटते. याठिकाणी मी जो ठराव मांडलेला आहे, त्यावर इतर सन्माननीय सदस्यांची भाषणे होणार आहेत आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तरही होणार आहे. पण येथे मुद्दाम नमूद केले पाहिजे की, गेल्या वेळेला लक्षवेधी सूचना दिली होती, त्यावेळी शासनाने आश्वासन दिले होते. त्यानंतरही आम्ही परत-परत जेव्हा या प्रश्नावर आवाज उठवितो, तेव्हा त्याबाबतीत आश्वासनच मिळते. या सदनाच्या थोर परंपरा आहेत, त्यामध्ये सनसनाटी किंवा राजकीयदृष्टया ज्या गोष्टी आहेत, त्याला अग्रक्रम आहे, अशा वेळी या प्रश्नाची घुसमट होते की काय असे मला वाटते. कारण जोपर्यंत आम्ही आरडाओरडा करीत नाही, तोपर्यंत काही होत नाही. जर शासनाने याबाबतीत सकारात्मक भूमिका घेतली तर या समाजातील लोकांना न्याय मिळेल असे मला वाटते. यासाठी हा सगळा सव्यापसव्यय आहे. ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या प्रश्नाबरोबरच, बाकीच्या ज्या संस्था आहेत, बाकीची जी महामंडळे आहेत, त्याबाबतीत आपल्या विभागाने पुढाकार घेऊन, शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना त्याठिकाणी जोडून घेण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावेत. असे केले तर उद्या आपल्याला चांगले काम केल्याचे समाधान मिळू शकेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

ठराव प्रस्तुत झाला.

. . . . 3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी ऊस तोडणी कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी "जनार्थ" ही स्वयंसेवी संस्था साखर कारखान्याच्या क्षेत्रात जशी "साखर शाळा" चालवित आहे, तशा प्रकारच्या "साखर शाळा" शासनाने राज्यातील सर्व साखर कारखान्यांच्या क्षेत्रात सुरु कराव्यात यासंबंधात जो अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्याला मनापासून प्रतिसाद देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फार बोलणार नाही. फक्त सुरुवातीलाच महात्मा फुले यांनी जे सांगितलेले आहे, ते सांगू इच्छितो.

विद्ये विना मती गेली
मती विना नीती गेली,
नीती विना गती गेली,
गती विना वित्त गेले,
एवढे सारे नुकसान एका अविद्येमुळे झाले.

सभापती महोदय, या चार ओळींमध्ये त्यांनी विद्येचे महत्व सांगितलेले आहे. मध्यंतरी विद्यापीठाचे विधेयक सदनासमोर आले होते. त्यावेळी असे मत मांडण्यात आले की, समाजातील धनाढय वर्गासाठी हे सर्व सुरु केलेले आहे असे वाटते. साधारणपणे 16 लाख मुले शिक्षणापासून वंचित आहेत आणि त्यातील 1 लाख 84 हजार मुले ऊस तोडणी कामगारांची आहेत. खरे म्हणजे या लोकांची अवस्था विंचवाच्या पाठीवरचे बिऱ्हाडासारखी असते. हे बिऱ्हाड जसजसे फिरत राहील, तसतशा या मुलांच्या शाळा बदलत राहतात. पण अशा वेळी त्यांना मायग्रेशन सर्टीफीकेट वेळेवर मिळत नाही, त्यामुळे पहिल्या ठिकाणी ही मुले कोणत्या इयत्तेमध्ये शिकत होती आणि दुसरीकडे गेल्यानंतर त्यांना कोणत्या इयत्तेमध्ये प्रवेश द्यावयाचा हे कळत नाही. म्हणजे या मुलांनी पुढे शिकावयाचे नाही, त्याने तसेच रहावे या दृष्टीकोनातून सर्व सुरु असते. याकरता "जनार्थ" स्वयंसेवी संस्था साखर कारखान्याच्या क्षेत्रात "साखर शाळा" उपक्रम राबवित आहे, "साखर शाळा" हा शब्द अतिशय सुंदर आहे. पण या मुलांच्या मुखात साखर जाणार आहे की नाही हे मला माहिती नाही. ही मुले ऊस खात असतील पण ऊसापासून तयार होणारी साखर मात्र त्यांना मिळत नाही, ही साखर दुसरेच खात असतात.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

विद्येची सुध्दा एक साखर आहे. ताक घुसळायचे, लोणी सगळयांनी घ्यायचे] उरलेले ताक यांच्या नशिबी. ते ही त्यांना मिळते की नाही मला माहीत नाही. त्या ताकातसुध्दा मिठ असल्याशिवाय त्याला चव येत नाही. सर्वांपासून हे वंचित आहेत. सभापती महोदय, अतिशय चांगला ठराव या ठिकाणी मांडलेला आहे. खरे तर या मुलांच्या बाबतीत मला आतून अतिशय दुःख होते. त्या मुलांना विद्यमान त्या गावात असलेल्या जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये शिकविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. पण जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वर्गखोल्या नाहीत. सभापती महोदय, आमच्याकडे कोकणात नेमकी उलटी परिस्थिती आहे. कोकणात वर्ग खोल्या आहेत मात्र त्या ठिकाणी विद्यार्थी नाहीत. येथे वर्ग खोल्या नाहीत, मात्र विद्यार्थी आहेत. थाडया वेळापूर्वी श्री. मोते साहेबांनी मला विचारले की, त्याच्या गावात काही तरी काम करावयाचे आहे त्यासाठी थोडा निधी द्याल कां?त्यावेळेला मी त्यांना पत्र दिले. सभापती महोदय, आम्हाला कधी कधी वाईट वाटते. ठीक आहे, आम्हाला एका मतदारसंघातून निवडून येण्याचे बंधन आहे. पण निदान एक सात लाख, दहा लाख रुपयाची सुट द्यावी. कारण समाजातील अशा वंचित वर्गासाठी कुठल्या तरी बंधनामुळे आम्हाला त्यांना तातडीने पैसे देता येत नाहीत. आपल्या निधीतून त्यांना पैसे द्यावेत, पटकन दोन खोल्या बांधून द्याव्यात, असे आमच्या सारख्यांना वाटते. सभापती महोदय, वाईट याचे वाटते की, इतकी सगळी परिस्थिती पाहिल्या नंतरही शासन याबाबतीत तातडीने काहीही उपाययोजना करीत नाही. आता या शासनाचे बजेट येईल, परंतु त्या बजेटमध्ये नेमकी याबाबतीतील प्रोव्हिजन नसणार. असे जेवढे साखर कारखाने आहेत त्या सर्व साखर कारखान्यांचा सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी पाढाच याठिकाणी वाचला आहे. प्रत्येक जिल्हानिहाय साखर कारखान्याचा पाढा वाचला. जिल्हानिहाय साखर कारखान्यांच्या परिसरात तशी व्यवस्था आहे काय? हे शासनाने पहावे. ती जर व्यवस्था नसेल तर किमानपक्षी वर्गखोल्या उभ्या करण्याची गरज आहे किंवा तेथे कुठे जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये त्यांना वर्गखोल्या देता येतील काय याचा विचार करावा. कारण काही ठिकाणी खाजगी संस्था आणि खाजगी शाळा निघाल्यामुळे साखर कारखान्यांच्या सम्राटांची मुले त्या जिल्हा परिषदेच्या शाळेत जातील असे मला वाटत नाही. जात असतील तरी साखर कारखान्यांच्या सम्राटांच्या मुलांची संख्या तेथे कमीच असण्याची शक्यता आहे. अशा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत. . . .

ठिकाणी या मुलांना त्या शाळांमध्ये सामावून घेता येईल काय? आणि सामावून घेतल्यानंतर सहा महिन्यांनतर जेव्हा दिवाळीची सुटी पडते किंवा डिसेंबरमध्ये सुटी पडते तेव्हा ही मुले परत जातात तेव्हा या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण अभ्यासक्रमाचा कालावधीच वेगळा ठरवावा. कारण या ऊसतोड कामगाराचे काम एका विशिष्ट वेळेला, एका सिझनमध्येच असते. त्यादृष्टीने सनमाननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी या ठिकाणी ठराव मांडला आहे. मला वाटते आम्हाला आमच्या निधीच्या बाबतीतसुध्दा काही तरी सुट द्या. म्हणजे आम्हाला या वंचित वर्गासाठी काही तरी करता येईल. या ठरावाला मी पाठिबा देतो. 1,84,000 मुले शासन कोणतीही व्यवस्था त्यांना देऊ शकत नाही म्हणून शिक्षणापासून वंचित राहात असतील तर त्यामध्ये असलेल्या सर्व तृटींचा श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी मांडलेल्या ठरावाच्या माध्यमातून विचार करुन त्या तृटी दूर कराव्यात अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो, आणि माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्यावरमाझे मत व्यक्त करण्यासाठी मी या ठिज्ाजी उभा आहे. मी या ठरावावर जास्त बोलणार नाही. श्रीमती नीलमताईंनी आणि श्री. अरविंद सावंत यांनी या ठरावाच्यासंदर्भात अतिशय व्यवस्थित माहिती दिलेली आहे, आणि सरकारला सूचना सुध्दा केलेल्या आहेत. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधू इच्छितो की, 1995-96 सालामध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे हे बीड जिल्हयाचे असल्यामुळे आणि मीही बीड जिल्हयाचा असल्यामुळे बीड जिल्हयातील ऊसतोड कामगार आणि एकंदरीतच सगळया महाराष्ट्रातील जो ऊसतोड कामगार आहे,त्यातील अर्धाअधिक किंबहुना जास्त कामगार हा बीड जिल्हयातील आहे. जेव्हा तो कामगार दिपवाळीच्या दरम्यान त्याच्या गावाकडून ऊसतोड करण्यासाठी, पोट भरण्यासाठी निघतो तेव्हा त्यांच्या मुलांबद्दल, त्यांच्या शिक्षणाबद्दल किंवा त्यांच्या भविष्याच्या काळजीबद्दल त्याची होणारी तडफड ही आम्ही आमच्या डोळयांनी अनेक वर्षापासून पाहात आहोत. याच्यामधून मार्ग काढण्याकरिता सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी त्या वेळेला डिक्लेअर केले होते की, या मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे त्यांचे भविष्य चांगले झाले पाहिजे, यासाठी त्याच गावात, काही ठराविक गावे मिळून आश्रमशाळेच्या धर्तीवर निवाशी शाळा सरकार स्थापन करील, आणि ताबडतोब त्याची अमलबजावणी करील, ही घोषणा केली होती. आणि त्याची ताबडतोब बीडपासून सुरुवात करु असेही त्यांनी सांगितले होते. पण दरम्यानच्या काळामध्ये त्यांचे सरकार गेले तरी ते त्यां जिल्हयाचे असल्यामुळे आणि ऊसतोड कामगार हे त्यांचे काय आमचे काय, बांधवच आहेत. पण तरीही त्या निवाशी शाळा सुरु होऊ शकलेल्या नाहीत. नंतर सरकार दुसरे आले . त्यानंतर जे जे शिक्षण मंत्री झाले, त्यांच्यापुढे आम्ही हा प्रश्न सातत्याने मांडला. गेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये मी यासंबंधात एक लक्षवेधी सूचना दिली होती. श्री. अमरिशभाई पटेल हे त्यावेळी तत्कालीन शिक्षण मंत्री होते. या विषयावर सभागृहात बराचवेळ चर्चा झाली आणि शेवटी या सभागृहात भांडण
झालेले सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

तेव्हा त्यांनी रागारागाने सांगितले की, एक वर्षाच्या आत आम्ही निश्चितपणे मार्ग काढू आणि निवासी शाळा सुरु करु. परंतु त्यावेळचे सरकार गेले आणि तेही गेले. आता दोन्ही शिक्षणमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी या माध्यमातून आपल्याला विचारु इच्छितो. संस्थेच्या माध्यमातून किंवा शासनाच्या माध्यमातून साखर शाळा चालवितात ती अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु ते त्या ठिकाणी गेल्यानंतर परत त्यांचे स्थलांतर होते. म्हणून खरा पर्याय म्हणजे जी मूळ गावे आहेत अशी पाच गावे, दहा गावे जी काही संख्या नॉमिनेटेड करण्यात येईल ती गावे अधोरेखित करुन त्या ठिकाणी निवासी शाळा निर्माण करणे हा त्यावर खरोखरचा कायमस्वरुपी उपाय आहे. ते करण्याच्या संदर्भात या अधिवेशनात तरी शासनाने त्याची घोषणा करुन, अंमलबजावणी करुन त्यासंदर्भात बजेटेड तरतूद शासन करील काय ? ती तरतूद शासनाने करावी अशी मी अतिशय नम्रपणे शासनाला सूचना करतो. एवढी सूचना करुन जास्त न बोलता सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. जी. एल. अैनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या ठरावाच्या माध्यमातून साखर शाळेच्या मुलांसबंधीच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचे काम सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी केलेले आहे. त्यामुळे हा ठराव आणल्याबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. हा सगळयात दुर्लक्षित असा विषय आहे. मी ज्या विभागातून आलेलो आहे त्या सांगली, सातारा, कोल्हापूर या भागामध्ये साखरशाळेत जाऊ इच्छिणारी मुले फार आहेत. त्यांची आजची एकंदरीत हालत मला चांगली माहीत आहे. अनेक स्वयंसेवी संस्था यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु बऱ्याचशा स्वयंसेवी संस्था या फक्त उत्साहमूर्त्याच आहेत. पुढे ती कंटीन्युटी राहात नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक सूचना केल्या. मी जास्त बोलणार नाही. त्यांची परिस्थिती फार वाईट आहे. आज सगळयात मोठा प्रश्न हा आहे की, त्या मुलांना शिकविण्यासाठी जाणारे जे शिक्षक आहेत ते वेळेत जात नाहीत. काही ठिकाणी शिक्षक नेमलेले आहेत. ते वेळेत जात नाहीत. ते साखर कारखान्याच्या चेअरमनबरोबर कोठे तरी बसलेले असतात. त्याला शिक्षक होण्याची आवड नसते पण त्याची सोय व्हावी म्हणून त्याला त्या ठिकाणी नेमलेले असते. त्यामुळे तो त्या भानगडीत पडत नाही. दुसरी जी गोष्ट आहे त्याकडे आपण कोणी लक्ष दिले नाही किंवा आपण उल्लेख केला नाही त्यामुळे मी त्याचा उल्लेख करतो. आता या मुलांचा उपयोग शेजारच्या गावातील काही गुंड माणसे वेगवेगळया कामासाठी करीत आहेत. त्यासाठी त्यांना चांगले पैसे मिळत आहेत. उदा. दारुचे फुगे ठराविक ठिकाणी पोहचविणे या कामासाठी त्यांचा उपयोग करीत आहेत. आई-वडील ऊस तोडावयास गेले की, ही मुले मोकळी असतात. दिवसभर ऊस तोडून, काम करुन जेवढे पैसे मिळत नाहीत तेवढे पैसे यांना मिळतात. या मुलांना सायकलीवर डबलसीट बसवून त्यांच्याकडे दारुचे फुगे देऊन कराडसारख्या शहरात, कोल्हापूरच्या काही भागात, सांगलीच्या काही भागात पाठवतात. त्या ठिकाणी ती मुले येत आहेत. ते फुगे ठराविक लोकांना दिले की ती मुले परत जातात. त्यांना पैसे मिळतात. अशा वाईट उद्योगाला ही मुले लागलेली आहेत. त्या ठिकाणी शाळा सुरु करुन त्यांच्यावर कंट्रोल ठेवायला कोणीही नाही. आणखी एक दुसरा प्रश्न आहे. विशेषत: ज्या 11, 12, 13 वर्षे वयाच्या मुली आहेत त्या कामाला सुध्दा जात नाहीत. त्या त्याच ठिकाणी असतात. त्यांची छेड काढण्यासाठी किंवा त्यांचा विनयभंग करण्याच्या वाईट हेतूने शेजारच्या गावातील जी टारगट मुले आहेत ती मोटारसायकल घेऊन त्या वस्तीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. जी. एल. अैनापूरे .....

भोवती फिरत असतात. बऱ्याचवेळा पैशाचे किंवा घरी काम देण्याचे आमिष दाखवून अशा मुलींच्या बाबतीत वेगळा प्रकार घडू शकतो. आपण सर्व्हे केला तर लक्षात येईल. आपण दररोज वर्तमानपत्र वाचतो त्यावरुन आपल्या लक्षात येईल. साखर उद्योगात ज्यावेळी बीडवरुन किंवा मराठवाड्यातून हे कामगार येतात त्या काळामध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे हे खरे आहे. त्याचबरोबर मुलींचे विनयभंग, बलात्कार अशा केसेस सुध्दा वाढलेल्या आहेत. त्यांना ना दाद ना फिर्याद. शेवटी त्यांना तेथून निघून जायचे असते. त्यांना दोन तीन महिन्यात, पाच महिन्यात जायचे असते. त्या केसचा पाठपुरावा कोणीही करीत नाही. अशी काम करणारी जी मंडळी असतात ती गावातील दहशतवादी मंडळी असतात. त्यांचा पाठपुरावा कोणी करीत नाही. त्यामुळे या केसेस पचल्या जातात आणि पुढच्या वर्षी पुन्हा येरे माझ्या मागल्या असे आजही चालू आहे. पोलीसही कोणी लक्ष देत नाही. यासाठी दोन तीन व्यवहारी सूचना कराव्यात असे मला वाटते. एक म्हणजे मुंबई, पुणे या भागामध्ये निरनिराळे उद्योगधंदे येत आहेत. त्या ठिकाणी जे कारखाने आहेत त्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांच्या बाबतीत शिक्षणासाठी बसेस ठेवलेल्या आहेत. त्यांना शहरामध्ये कामगार वसाहतीमधून एक एक सगळ्यांना गोळा करुन शाळेत नेऊन पोहचविले जाते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापूरे...

पुन्हा कारखाने तसेच असतात. तशी जर साखर कारखान्यामार्फत व्यवस्था केली व जवळच्या चांगल्या शाळेमध्ये त्या मुलांना दिवसभर शिकण्याची सोय केली तर ती मुले योग्य दिशेने जातील. ती मुले चांगली शिकली नाही तरी बिघडणार तरी नाही. जे वाईट उद्योगाला लागले आहेत ते होणार नाही. त्यामुळे मुलांवर बंधन राहील, शालेय वातावरणामध्ये राहतील. दुसरा प्रश्न त्यांच्या एन्रोलमेंटचा आहे. हा वाद जिल्हा परिषदेचा आहे. तेथून ती मुले इयत्ता चौथी किंवा पाचवीत शिकत होतास कशावरुन ? अशी शंका व्यक्त केली जाते. त्या पालकांकडे वेळ नसतो, त्या मुलाला शाळेत आणून टाकले की ऊस तोडण्यासाठी जातात. पुन्हा त्या गावात जाऊन प्रमाणपत्र आणत नाहीत. त्यामुळे तेथील गुरुजी त्यांना घेत नाहीत. त्याऐवजी विद्यार्थ्यांची एल.सी.आणली की पुन्हा एन्रोलमेंट करावे लागते. माझी सूचना अशी आहे की, म्हणून एल.सी. न काढता ज्या शाळेत विद्यार्थी शिकत होता त्या शाळेच्या मुख्याध्यापकाने शाळेच्या एका पत्रावर शिक्क्यानिशी हा मुलगा अमुक ते अमुकपर्यंत या शाळेत या इयत्तेमध्ये शिकत होता असे लिहून दिले तर त्याला दुस-या शाळेत त्याच इयत्तेमध्ये तात्पुरता प्रवेश मिळू शकेल व त्याच इयत्तेची परीक्षा देता येईल. आता परिस्थिती अशी आहे की, मुले 4-4, 5-5 महिने त्या शाळेत जात नाहीत, गुरुजी घेत नाहीत, जरी साखर शाळेत शिकत असले तरी ती 50 टक्के मुले गावाकडे गेल्यामुळे शाळेत जात नाहीत. म्हणून त्यांच्या जाण्या-येण्याची सोय केली तर ते शिकू शकतील. गावापासून 2-3 कि.मी.इतके अंतर असते, त्या मुलांना जरी ऊसाच्या ट्रॉलीमधून नेले आणि सोडले आणि तांदुळ शिजवून देण्याची व्यवस्था केली तर कमीत कमी खर्चामध्ये ते विनासायास व इतर मुलांप्रमाणे शिकतील. ती मुले रेग्युलर शाळेत जातील, त्यांना शिक्षणाची चटक लागेल, त्यामुळे ती नव्या वातावरणात रमून जातील आणि या मुलांचा बराचसा प्रश्न सुटू शकेल असे मला वाटते शासनाने या सूचनेचा जरुर विचार करावा एवढेच मी यानिमित्ताने बोलून मी येथे थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय एका चांगल्या विषयासंबंधी अशासकीय प्रस्तावाच्या माध्यमातून वाचा फोडली आहे. मला वाटते की, हा विषय पूर्वी होऊन गेला आहे. त्यावेळीही मी या विषयावर बोललो आहे. त्यामुळे मी 2-3 गोष्टींचा उल्लेख करणार आहे. मा.सदस्य श्री.विनायक मेटे भाषण करुन उत्तरासाठी थांबले नाहीत. एकूणच गांभीर्याने या विषयाकडे पाहण्याची आवश्यकता आहे. मागील चर्चेला उत्तर दिले होते की, आम्ही या विषमध्ये लक्ष घालू, या मुलांकडे दुर्लक्ष होणार नाही, त्यांची काळजी घेऊ. परंतु ये रे माझ्या मागल्या. एक मंत्री जातात दुसरे येतात, एक शासन जाते दुसरे येते. आपली जबाबदारी संपली. मागील वेळचे मंत्री आज नाहीत आणि आजचे उद्या नाहीत. येथे येणारे विषय असे असतात की, सर्वसामान्य माणसांच्या मुलांसाठी, गरीब मुलांसाठी चर्चा होत नाही. जी चर्चा चालली आहे ती श्रीमंत लोकांसाठी चालली आहे. दुर्लक्षित, उपेक्षित अशा लोकांसाठी वेळ नाही. आजही सकाळी एकूण साखर कारखान्यांपैकी 114 कारखाने आजारी होत चालल्याची माहिती देण्यात आली आहे. कारखाने आजारी आहेत तर मग मुलांकडे काय लक्ष देणार ? याचे कारण ऊसाचे प्रमाण कमी होत चालले आहे, याचे कारण पाण्याचे प्रमाण कमी आहे, ऊसाचे प्रमाण कमी त्यामुळे ऊस तोडणा-या कामगारांचे काम कमी आहे, काम कमी म्हणून त्याचा परिणाम त्यांच्या मजुरीवर होतो. त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न उभा राहतो. असे एकात एक गुंतलेले सामाजिक प्रश्न आहेत त्यावर काहीतरी इलाज केला पाहिजे. आज साखर कारखानदारी धोक्यामध्ये आली आहे, अशाप्रकारचा सिग्नल मिळत आहे. अनेक लोक साखर कारखाने काढतात, या लोकांचा उपयोग करुन घेतात, साखर कारखान्याच्या कामगारांचा उपयोग करुन घेतात, पैशाचा अपव्यय करतात.

नंतर श्री.गिते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

साखर संचालकांकडून सांगितले जाते की,साखर कारखाने आजारी आहेत. साखर कारखाने आजारी आहेत अशी संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा चालली आहे. साखर कारखाने आजारी झाले त्याचे मूळ कारण म्हणजे व्यवस्थापन चांगले नाही. व्यवस्थापनांनी साखर कारखान्यांचा पैशांचा जास्तीत जास्त दुरुपयोग केला अशा प्रकारचा उल्लेख वृत्तपत्रांच्या बातम्यामधून केला जात आहे. साखर कारखान्यांवर मोठया प्रमाणात कर्ज आहेत त्या कर्जाचे व्याज जास्त आहे, ते कर्ज फेडण्याचे काम साखर कारखान्यांकडून होत नाही म्हणून साखर कारखाने आजारी पडले असे सरकारकडून सांगितले जाते. एक साखर कारखाना उभारणीसाठी साधारणत: 45 ते 50 कोटी रुपये खर्च येत असतो. त्यानंतर त्या कारखान्याची कर्ज फेडण्याची क्षमता नसते असे म्हटले जाते. आज महाराष्ट्रात अनेक साखर सम्राट तयार झालेले आहेत त्यांची एक यादीच तयार करावी लागेल. या सर्व साखर सम्राटांना सरकारने समोर बोलवावे आणि त्या स्पष्टपणे विचारावे की, जे ऊस तोडणी कामगार आहेत त्यांच्या बळावर तुम्ही उभे आहात, ज्यांच्या बळावर तुमचे साखर कारखाने चालले आहेत. ऊस तोडणी कामगारांनी ऊस तोडणी बंद केली तर केली तर तुमचे साखर कारखाने कसे चालणार ? ऊस तोडणी कामगारांच्या मुलां विषयी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकांनी काय व्यवस्था केलेली आहे ? मागच्या वेळी सभागृहात चर्चा करण्यात आली होती त्यावेळी या दोन-तीन सूचना होत्या त्या अंतर्भूत होत्या. सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांनी आपले मत व्यक्त केले. त्यांनी बीड जिल्हयाचे या ठिकाणी उदाहरण देण्यात आले. ऊस तोडणी कामगार हे ऊस तोडणीसाठी आपापल्या गावातून येतात आणि ऊस तोडणीचा हंगाम संपल्यानंतर ते परत आपल्या गावी जातात. ऊस तोडणी कामगार ज्या गावामध्ये रहातात त्या ठिकाणीच अशा साखर शाळा उघडणे आवश्यक आहे. त्यांच्या मुलांची शिकण्याची व्यवस्था त्यांच्या गावीच करण्याची आवश्यकता आहे. ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची कायम स्वरुपी व्यवस्था व्हावी. या साखर शाळा सुरु करण्यासाठी शासनाने अनुदान उपलब्ध करुन द्यावे. शाळेसाठी लागणारी इमारत तयार करुन द्यावी. तेथे शिक्षक नेमावेत. या सर्व गोष्टी शासन करु शकते. शासनाला ही व्यव्यस्था करणे अशक्य नाही. परंतु शासनाची तशी इच्छा पाहिजे. शासनाला खरोखर इच्छा होणार आहे काय ? ऊस तोडणी कामगारांचे प्रश्न सुटले पाहिजेत. ऊस तोडणी कामगारांची मुलै गैर मार्गास लागू नये, अशिक्षीत राहू नये अशी शासनाची इच्छा असेल तर ऊस तोडणी कामगार ज्या गावातून येतात त्या विभागात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

दोन तीन केंद्रे करुन त्या ठिकाणी शिक्षक व इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन त्या मुलांना सुध्दा जीवन जगण्याचा अधिकार आहे तो त्यांना द्यावा. ऊस कामगारांच्या मुलांनी चुकीच्या मार्गाने जीवन जगण्यापेक्षा योग्य मार्गांनी जीवन जगावे अशी व्यवस्था शासनाने निर्माण करुन दिली पाहिजे. ऊस तोडणी कामगारांच्या मुलींच्या बाबतीत गैरप्रकार होतात अशा प्रकारची माहिती या सदनात दिली गेली. असे प्रकार आजही होत आहेत. पोलीस सुध्दा त्याचा दुरुपयोग करीत आहेत. अशा प्रकारच्या असमाजिक कृत्यांचा पगडा इतका वाढता चालला आहे की. रोज वृत्तपत्र उघडले तर कुठे ना कुठे याच बातम्या वाचावयास मिळतात. दुस-या बातम्या वाचावयास मिळतच नाही. या राज्यातील कायदा व सुव्यवस्था रसातळाला गेली आहे. कोणाचा कुणावर वचकच नाही. मंत्र्यांचे कोणी ऐकत नाही. अधिकारी कोणाचे ऐकत नाही. कोणी कोणाचे ऐकत नाही अशी परिस्थिती या राज्यात निर्माण झालेली आहे. आज वृत्तपत्रात फोटो आलेला आहे. एक लहान मुलगा इयत्ता 10 वी च्या विद्यार्थ्यांस कॉपी देण्यासाठी खिडकीवर चढलेला आहे. हा फोटो बघून मला दु:ख झाले. या राज्यात सामाजिक असुरक्षितता निर्माण झालेली आहे. राज्यात सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहे. शिक्षण, संरक्षण, कायदा व सुव्यवस्था व बेकारी अशी कारणे हा प्रश्न निर्माण होण्याची आहेत. या सगळया माध्यमातून हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्याच्यावर इलाज केल्या शिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत. ऊस तोडणी करणारा कामगार आहेत त्यांचे हंगामी प्रश्न निर्माण होतात त्यांचा तात्पुरता इलाज करुन चालणार नाही. त्यांच्यासाठी कायम स्वरुपी इलाज करावयास पाहिजे. या विषयावर चर्चा खूप झाली. नुसती चर्चा करुन काहीही उपयोग नाही. ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी काय करणार आहात हे आपण आपल्या उत्तराच्या भाषणात सांगितले तरच ख-या अर्थाने डॉ. निलम गो-हे यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास न्याय मिळाला असा त्याचा अर्थ होईल. फक्त चर्चा करुन काही निष्पन होईल असे मला वाटत नाही. यासंदर्भात ठोस असा मार्ग शासनाने काढावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सन्माननीय सदस्या डॉ.निलमताई गो-हे यांनी ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु कराव्यात अशा प्रकारचा अशासकीय प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाला सहमती दर्शविण्यासाठी मी उभी आहे.अनेक मुद्दे या ठिकाणी मांडले गेले त्यामुळे मी त्या मुद्दयांची पुनरावृत्ती करणार नाही. या सभागृहात महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आह.या चर्चेच्या वेळी सहकार मंत्री व इतर अन्य मंत्री जे साखर कारखान्याचे संचालक आहेत ते उपस्थित राहिले असते तर बरे झाले असते. ऊस तोडणी कामागारांच्या जिवावर साखर कारखाने चालतात. ऊस तोड कामगारांनी ऊस तोडला नाही तर कारखान्यांना ऊस उपलब्ध होऊ शकणार नाही. कारखान्यांना ऊस मिळाला नाही तर साखर तयार होऊ शकणार नाही. ऊस तोड कामगांरांच्या अनेक व्यथा आहेत. ऊस तोड कामगारांच्या कुटुंबियांना भेटावयास गेलो तर त्यांच्या कुटुंबियांच्या व्यथा आणि वेदना आपल्याला ऐकावयास मिळतील.

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे)

ही "जनार्थ" नावाची स्वयंसेवी संस्था आहे आणि अनेक साखर कारखान्यांच्या ठिकाणी या संस्थेने शाळा चालू केल्या आहेत. त्यांच्या शाळा कोणत्या जिल्ह्यामध्ये आणि कोणत्या ठिकाणी आहेत याचा उल्लेख सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी केलेला आहे. सातारा जिल्ह्यातील कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या ठिकाणी या संस्थेची एक शाळा आहे त्या ठिकाणी मी गेले होते. तेथे गेल्यानंतर मला असे दिसून आले की, मुलांना धड जेवायलासुध्दा मिळत नाही. त्यांना गणवेश नाही. त्यांच्या अंगावर मळके कपडे असतात त्यावरच ती मुले शाळेत बसलेली असतात. त्यांना लिहायला पाटी नाही, पुस्तक नाही, वह्या नाहीत. तसेच बसायला जागा नसल्याने झाडाखाली बसावे लागते. अशी अवस्था त्या शाळेची आहे. त्यामुळे शालेय पोषण आहार या मुलांना मिळाला पाहिजे. त्याप्रमाणे गणवेशसुध्दा मिळाला पाहिजे. पाठ्यपुस्तके आणि वह्यासुध्दा त्यांना शासनाकडून मोफत मिळाल्या पाहिजेत. सभापती महोदय, बीड जिल्ह्यातून अनेक ऊस तोड कामगार या साखर कारखान्यांवर येतात. कोठेवाडी प्रकरण आपणा सर्वांना माहिती आहे. ते प्रकरण का घडले होते आणि कोणाच्या बाबतीत ते घडले होत ? याची आपल्याला कल्पना आहे. या कोठेवाडी गावामध्ये सगळ्या महिलाच होत्या. ऊस तोड कामगारांच्या त्या कुटुंबिय होत्या. त्यामुळे त्यांच्यावर घाला घातला आणि त्यांच्यावर बलात्कार झाले होते. खूनही झाले होते. त्या महिला त्या ठिकाणी का थांबल्या होत्या ? त्या आपल्या लहान मुलांना शिक्षण मिळावे, त्यांचे संगोपन व्हावे म्हणून त्या ठिकाणी थांबल्या होत्या. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, गावामध्येसुध्दा त्याना रोजगार मिळत नाही. त्यामुळे आपल्या मुलांना घेऊन त्या साखर कारखान्यांवर जात असतात. या मुलांची अवस्था काय आहे ? खर म्हणजे घटनेचे पंचेचाळीसावे कलम आहे त्याने असे मार्गदर्शक तत्व घोषित केले आहे, 14 वर्षापर्यंतच्या मुलामुलींना शिक्षण दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण हा तर मुलभूत हक्कच आहे. परंतु या दुर्लक्षित घटकांकडे आतापर्यंत लक्ष द्यावयाला पाहिजे होते ते दिलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे यांनी अनेक मुद्दे या ठिकाणी मांडले. ते मुद्दे मीही मांडणार होते. हे सर्व वास्तव मुद्दे आहेत. ज्या ठिकाणी साखर कारखाना असतो त्याच्या जवळपास एक-दोन किलो मीटर अंतरावर गाव असते. पण तेथील शाळेमध्ये त्या मुलांना प्रवेशच मिळत नाही. त्याचे कारण शाळा सोडल्याचा दाखला त्यांच्याजवळ नसतो. त्यामुळे त्या मुलाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे)

शाळेमध्ये घेतले जात नसल्यामुळे गावात येऊन ती इकडे तिकडे भटकतात. अशी मुले गुन्हेगारी क्षेत्रातील लोकांच्या नजरेमध्ये येतात आणि त्यांचा उपयोग गुन्हे करण्यासाठी केला जातो. त्यामुळे त्यांनी अशी सूचना केली आहे की, गाव सोडताना ज्या शाळेत तो मुलगा शिकत असेल त्या शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांचे असे प्रमाणपत्र दिले पाहिजे की, तो अमूक अमूक वर्गामध्ये शिकत होता आणि या शाळेतून तो दुसरीकडे चालला आहे. असे प्रमाणपत्र दिले तर त्या मुलांना न्याय मिळू शकेल. मुलींच्या बाबतीत त्यांनी असे सांगितले की, 12 ते 13 वर्षाच्या ज्या मुली आहेत त्यांच्या संदर्भात काही घटना घडलेल्या आहेत. पण त्यांचे पालक तक्रार करावयाला पुढे येत नाहीत. ते सांगतात की, तक्रार करून उपयोग काय ? आम्हांला न्याय मिळणारच नाही. तक्रारीसाठी येणे-जाणे आणि पोलीसांचा ससेमिरा हा काही आम्हांला जमणार नाही. ऊस तोडणी कामगारांच्या अनेक मुलींचे विनयभंग झालेले आहेत. कारखान्यामध्ये काम करणारे अधिकारी किंवा कामगारांकडून अशा दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. ग्रामीण भागातील मुलामुलींनासुध्दा दूरदर्शनसारख्या प्रभावी माध्यमामुळे एक फायदा झाला आहे आणि त्यांना असे वाटायला लागले आहे की, आपण शिकले पाहिजे. पण अर्ध्यावरच शाळा तुटली गेली तर पुढे काय ? तरी मला या ठिकाणी असे सुचवावयाचे आहे की, समाज कल्याण सल्लागार बोर्डाच्या माध्यमातून कंडेन्स कोर्स चालतात. ज्या लग्न झालेल्या महिला असतात त्यांचे लग्नाच्या अगोदर अर्धवट शिक्षण झाले असेल तर ते पूर्ण करण्यासाठी त्या रजिस्टर्ड एन.जी.ओ. असतात त्या ठिकाणी या महिलांना शिक्षण दिले जाते. त्यांच्या परीक्षा घेतल्या जातात आणि त्यांना प्रमाणपत्रही दिले जाते.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

सभापती महोदय, ज्या रजिस्टर्ड एन.जी.ओ.ज आहेत त्यांच्यावतीने जे कन्डेन्स कोर्स चालविले जातात त्याकरता त्यांना केन्द्र सरकारकडून आणि राज्य सरकारकडून अनुदान दिले जाते. तेव्हा अशा एन.जी.ओ.ज ना आणखी अनुदान दिले आणि त्यांना अशा प्रकारच्या शाळा चालविण्यासाठी परवानगी दिली तर ही मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत असे मला वाटते. सभापती महोदय याठिकाणी वसती शाळेच्या बाबतीत एक मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.ऊस तोड कामगार ज्या गावात राहतात तेथून ते दुस-या गावाला ऊस तोडणीसाठी जातील परंतु त्याच गावात जर मुलांसाठी वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या तर आरोग्य, शिक्षण इत्यादीच्या बाबतीत हलगर्जीपणा होणार नाही.त्या विद्यार्थ्याचे सामाजिक व्यक्तिमत्व सुधारण्यासाठीसुध्दा यामुळे पुष्कळ मदत होईल असे मला वाटते. सभापती महोदय, या ठरावावर बोलत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु मला एक महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे. मी ज्यावेळी त्या शाळेत गेले होते तेव्हा तेथील चार पाच मुली मला भेटल्या आणि त्यांनी मला असे सांगितले की , आम्हाला शाळेत जाऊन खूप शिक्षण घेऊन मोठे व्हावयाचे आहे. याबाबतीत मला एक कविता आठवते आणि त्या कवितेमध्ये ती मुलगी आपल्या आईला असे सांगते की , मला शिक्षण घ्यावयाचे आहे त्यामुळे तू मला शाळेतून काढू नकोस. ती कविता पुढीलप्रमाणे आहे :

" माये ग माये नग तोडू माजी साळा
लई लई शिकुन मोठं व्हावचंय मला
परवा आमच्या बाई म्हनल्या का नाई ?
तुमची पोरगी डोक्यानं लई बेस हाई
तवापूर एकच सपान पडतय मला,
लई लई शिकून मोठं व्हायचंय मला //

या कवितेवरुन असे दिसून येते की शिक्षण घ्यावे अशी त्या मुलीची मनस्वी इच्छा आहे.तेव्हा यामुला मुलीना शिक्षण मिळाले पाहिजे त्या दृष्टीकोनातून आम्ही ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा शासनाने विचार करावा.या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी वस्ती शाळा असाव्यात त्याचबरोबर एन.जी.ओ.ज ना अनुदान देऊन त्यांना या शाळा सुरु करण्याच्या बाबतीत परवानगी देण्यात यावी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

याचबरोबर त्या मुलांना मायग्रेशन सर्टिफिकेट देण्यात आले पाहिजे. या ठरावाच्या निमित्ताने ज्या काही सूचना मांडण्यात आलेल्या आहेत त्यावर शासन सारासार विचार करील आणि ऊस तोड कामगारांच्या मुलांना योग्य न्याय देईल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर या ठिकाणी ठराव माडंत असतांना राज्यातील एक विदारक प्रश्न या सभागृहात उपस्थित केलेला आहे आणि सर्व सभागृहाचे लक्ष त्याकडे वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल शासनाच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरवावरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत,विनायकराव मेटे,जी.एल.ऐनापुरे,मधुकर सरपोतदार,श्रीमती कांता नलावडे यांनी भाग घेतला आणि शासनाला अनेक सूचना केल्या आहेत.त्यांनी असे सांगितले की, या विषयावर अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे.परंतु शासनाने कोणतेही धोरण राबविलेले नाही.त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले आहे. सभापती महोदय, खालच्या सभागृहातील बी.जे.पी.चे गटनेते श्री.गोपीनाथ मुंडे यांनी आपले जीवन चरित्र सांगतांना असे सांगितले होते की , मी ऊस तोड कामगाराचा मुलगा आहे माझ्या शत्रुच्या वाटयालासुध्दा हा जन्म येऊ नये अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या होत्या. त्यांनी .कशा पध्दतीने शिक्षण घेतले होते याचे विदारक चित्र त्यांनी आपल्यासमोर उभे केले होते. मी सुध्दा कोल्हापूर जिल्हयातून म्हणजेच ऊस असलेल्या क्षेत्रातून आलेलो आहे. मराठवाडयातील बीड आणि इतर जिल्हयातून ऑक्टोबर - नोव्हेंबर महिन्यात मोठया प्रमाणावर ऊस तोड कामगार कारखान्याकडे कसे येतात , आपले कुटुंब ते कसे आणतात, त्यांची मुले कशी राहतात,ज्या कारखान्याच्या परिसरात ते राहतात तेथे पाल्याच्या झोपडया ते कसे बांधतात हे मी गेल्या अनेक वर्षापासून पाहत आलेलो आहे. सभापती महोदय, श्रीमती कांता नलावडे यांनी मघाशी .....

नतर श्री.कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला गेला. वयोगट 6 ते 14 मधील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करणे ही जबाबदारी शासनाने घेण्याचे ठरले आणि अशी मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत म्हणून शासनाने जबाबदारी घेण्याची गरज आहे. यासाठी शासनाकडे दोन पर्याय आहेत. 1996-97 पासून साखर शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. 15 साखर कारखान्यांच्या परिसरामध्ये गेल्या वर्षी साखर शाळा सुरु झाल्या. परंतु अनेक साखर कारखाने सुरु झाले नाहीत. सर्व साखर कारखान्यांनी शाळा सुरु करावयाच्या काय हाप्रश्न आहे. मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांची संख्या 15 झाली तर त्या साखर कारखान्याच्या परिसरात साखर शाळा काढलीच पाहिजे किंवा आमची जी दुसरी योजना आहे जी 2003 पासून सुरु करण्यात आली आहे त्या महात्मा फुले शिक्षण हमी योजनेनुसार शाळा काढली पाहिजे त्याशिवाय साखर कारखान्याला क्रशिंग लायसन दिले जाणार नाही असे आम्ही सहकार खात्याला कळवू आणि तसा आमच्या विभागाचा अट्टाहास राहील. साखर शाळेची कल्पना अशी आहेकी, जिल्हा परिषदेने एक शिक्षक सहा महिन्याकरिता द्यावयाचा. साखर कारखान्याने शेड उभी करण्याची जबाबदारी उचलावयाची आहे. डॉ. गो-हे यांनी सांगितले की, कारखाने शेड उभी करीत नाहीत. याबाबतीत सुध्दा साखर कारखान्यांवर सक्ती केली जाईल. शेड उभी केल्याशिवाय क्रशिंग लायसन दिले जाणार नाही. तशी अट घालण्यासाठी सहकार खात्याला सूचना करु. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेचा उल्लेख झाला. त्यानुसार वीटभट्टी कामगारांची मुले ,दगडखाणीमध्ये काम करणा-या कामगारांची मुले,भटक्या समाजातील मुले या मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना सुरु केली. ही योजना साखर कारखान्यांनी सुध्दा चालू करावयाची. स्वयंसेवी संस्था किंवा साखर कारखान्यांनी ही योजना घेतल्यावर 11800 रु. दिले जातात. 9 हजार रुपये मानधन, 1 हजार रुपये प्रशिक्षणासाठी,1 हजार रुपये शिक्षकाला आणि 800 रुपये संस्थेला दिले जातात. 11800 एवढी रक्कम पुरेशी आहे असे नाही त्यामध्ये वाढ करु. परंतु दोन प्रकारे मुलांच्या शिक्षणासाठी सक्ती केली जाईल. महात्मा फुले शिक्षण हमी योजना किंवा साखर शा ाळा असेल त्यामध्ये सहा महिन्यांसाठी मुले राहतील. साखर कारखान्यांची शाळा पहिली ते 5 वी पर्यंत आणि महात्मा फुले शिक्षण योजनेअंतर्गत पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण आहे. या योजनेत 129 संस्था

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

काम करीत असून 4700 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी कारखान्यांच्या क्षेत्रात चांगला ऊस झालेला आहे. श्री. मधुकर सरपोतदार यांनी कारखान्यांची व्यथा बोलून दाखविली. परंतु पाऊस चांगला झाल्यामुळे यावर्षी कारखान्यांची परिस्थिती चांगली आहे. चालू वर्षी ऊसाचे उत्पादन वाढलेले आहे. जून ते ऑक्टोबर या कालावधीत ही मुले आपल्या गावाकडे शिक्षण घेतात आणि ऑक्टोबरपासून साखर कारखान्यांच्या क्षेत्रामध्ये शिक्षण घेतात. परंतु मुले शाळेत येतात किंवा नाही याचे सुध्दा मॉनेटरींग झाले पाहिजे. तालुका गट शिक्षणाधिकारी असेल मग तो बीडमधील असेल किंवा इतर कोणत्याही जिल्हयातील असेल त्या तालुक्यातून किती मुले निघाली याची जबाबदारी त्याने घेतली पाहिजे. साखर कारखाना क्षेत्रातील गटशिक्षणाधिकारी असेल त्याने जशी मुले तेथून निघतील तशी शाळेत येतील याबाबत मॉनेटरींग केले पाहिजे. याबाबतीत लिव्हींग सर्टिफिकेट किंवा मायग्रेशन सर्टिफिकेटची अडचण येईल ती निश्चितपणाने आम्ही दूर करु. सगळया सुविधा पुरवू आणि समाजातील मोठा घटक शिक्षणापासून वंचित राहणार नाही आणि शासनाला हे भूषणावह नाही याची आम्हांला जाणीव झालेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीफ .....

अध्यक्ष महाराज, यामध्ये सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न मांडले आहेत. या मुलांना मोफत पाठ्य पुस्तके देता येतील काय असाही मुद्दा मांडला गेला. आता कालच आम्ही येथे मोफत पाठ्य पुस्तकांची घोषणा केलेली आहे. ही सगळी मुले दारिद्र्यरेषेखालील आहेत, एन.टी.आहेत. मोफत पुस्तक योजनेमध्ये पहिली ते 8 वी पर्यंतच्या सर्व मुलींना आपण मोफत पाठ्यपुस्तके देणार आहोतच आणि ही मुले देखील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असल्याने त्यांनाही आपण मोफत पाठ्य पुस्तके देणार आहोत. त्यासाठी जूनमध्ये शाळा सुरू झाल्यावर ती ज्या गावामधील शाळेतून येणार आहेत तेथेच त्यांना ही पाठ्यपुस्तके मोफत देणार आहोत. तशी त्यांना ती मिळाली नाही तर त्याची जबाबदारी देखील आम्ही गटशिक्षण अधिकारी यांचेवर सोपवू आणि त्यांना आपण आदेश देऊ. शालेय पोषण आहार देण्याची योजना देखील आपण 16.1.2002 मध्येच केलेली आहे. या मुलांनाही शालेय पोषण आहार द्यावा यासाठीचा शासन निर्णय देखील आपण काढलेला आहे आणि हा शालेय पोषण आहार त्यांचेपर्यंत पोहोचतो की नाही याबद्दल देखील निश्चितपणे शासन लक्ष देईल. तेव्हा या सगळ्या मुलांना पाठ्य पुस्तके मोफत मिळणे, शालेय पोषण आहार मिळणे तसेच ती मुले शाळेत कशी जातील आणि शिकतील, ज्याप्रमाणे आपल्या गावी ती शिकत असतील तशीच ती स्थलांतरित झाल्यानंतर जेथे जातील तेथेही कशी शिकतील यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी शासन म्हणून आम्ही घेत आहोत. त्यासाठी याचे मॉनेटरींग करीत आहोत. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न पुन्हा या सभागृहामध्ये येणार नाही याची जाणीवपूर्वक निश्चितपणे जबाबदारी आम्ही घेऊ एवढे वचन या निमित्ताने मी या सभागृहाला देतो. अध्यक्ष महाराज, आता ही जी 'जनार्थ' स्वयंसेवी संस्था आहे तिचे काम पाहण्याची संधी काही आजवर मला मिळालेली नाही. मात्र सगळ्या सदस्यांनी तिचा उल्लेख केला आहे त्यावरून ती चांगली संस्था असावी असे मी मानतो. माझे असे मत आहे की, अशा संस्था चालविणाऱ्यांसाठी आपण एक बक्षिसाची योजना करू. ज्या संस्था अशा साखर शाळा चांगल्या प्रकारे चालवितील, यामध्ये भटक्या-विमुक्तच नव्हे तर सर्व जातीच्या मुलांसाठी 6-6 महिन्यांसाठी ज्या शाळा चालवितात, त्यातून ज्या संस्था चांगले काम करून दाखवितील त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे एक गौरवपर बक्षिस देण्याचा देखील शासन विचार करील आणि त्यासाठी आम्ही बजेट कमी पडू देणार नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..... 3पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीफ ....

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.ऐनापुरे यांनी सांगितले की, या मुलांसाठी स्कूलबसची देखील व्यवस्था व्हावी. पण ही मुले अनेक गावांमध्ये विखुरलेली असतात. त्यामुळे मला प्रॅक्टिकली ते शक्य वाटत नाही. कारण मी देखील एक कारखाना चालवितो आहे, साखर शाळा देखील चालवितो आहे त्यामुळे मला याबाबत माहिती आहे. आमच्याकडील अशा मुलांना दोन्ही वेळचे जेवण आणि कपडेलत्तेदेखील आम्ही देतो आहोत. सन्माननीय सदस्यांना आमचा तो कारखाना कदाचित माहिती असेल. तेव्हा सांगण्याचा मतलब हा की, अनेक ठिकाणी ही मुले विखुरलेली आहेत आणि त्या सगळ्या ठिकाणी काही आपण बस सेवा पुरवू शकणार नाही. मात्र सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सूचना केली की, त्या गावामध्ये आश्रमशाळा किंवा निवासीशाळा कशा करता येतील ते पहा. तर ती सूचना मात्र मला चांगली वाटते आणि त्या दृष्टीने प्रयत्न करून पहावयास हरकत नाही. मात्र यातील पालक आपली मुले कितपत तेथे ठेवतील हा एक प्रश्नच आहे. तरीही त्या गावामध्ये निवासी शाळा कशी चालविता येईल या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाने 10 निवासी शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रामुख्याने त्या शाळा बीड आणि मराठवाडा विभागामध्ये करण्याचा प्रयत्न आपण करू. मात्र कोठल्याही परिस्थितीत ही मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची निश्चितपणे जबाबदारी शासन जरूर घेईल एवढेच मी या प्रसंगी सांगतो. या उपरही आणखी काही प्रश्न, अडचणी असतील तर मी डॉ.गोऱ्हे यांना विनंती करीन की, आपण त्या संदर्भात पुन्हा एकदा बसू आणि त्यातून मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू. तेव्हा आपला हा जो ठराव आहे त्याची अमलबजावणी शासनाने सुरू केलेलीच आहे तरी आपण हा ठराव मागे घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

***

..... 3पी 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी जवळजवळ 10 अतिशय ठाम आणि चांगली आश्वासने दिलेली आहेत. माझी हा ठराव मांडत असताना अपेक्षा होती की, या मुलांना शालेय पोषण आहार मिळावा, त्यांना मायग्रेशन सर्टिफिकेट वेळेवर मिळावीत, विशेषत: निवासी शाळा आहेत किंवा साखर शाळांच्या बाबतीत असलेल्या सोयी सुविधा असतील या सगळ्यांसाठी आपण 10 आश्वासने ठामपणे दिलेली आहेत. जनार्थ संस्थेचे आपण कौतुक केले त्याबद्दल देखील मी आपले आभार मानते. अशा ज्या संस्था काम करीत असतात त्यांची अपेक्षा काही आपल्याकडे पुरस्कार मिळेल अशी नसते. त्यांची अपेक्षा एवढीच असते की, त्यांनी जो प्रश्न मांडलेला आहे त्याबाबतीत योग्य ती मान्यता आणि सहकार्य मिळावे. म्हणून माझी मागणी आहे की, पुढील एक महिन्याच्या काळामध्ये अशा संस्थांची एक बैठक बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले गेले आणि सातत्याने दोन-तीन महिन्यांनी वेगवेळ्या विभागांच्या मध्ये अमलबजावणी होत असताना.. आणि केंद्रीय नियोजन विभागाची जी सूचना आहे -- सल्ला मसलत, अमलबजावणी आणि मूल्यमापन या तिनही स्तरांवर एकमेकांच्या विश्वासाच्या आधाराने हे काम तुम्हाला करता आले तर ते चांगले होईल असे मला वाटते. तरी आपल्या विनंती नुसार हा ठराव मागे घेण्यास मी आपली परवानगी मागते. ...

(यानंतर श्री.जागडे .....3क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गो-हे....

माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला असे आश्वासन दिले आहे, आम्हाला पुन्हा या विषयासाठी सदनात येण्याची वेळ पडणार नाही. पराभवातही विजय असतो. तेव्हा मी माझा ठराव मागें घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुतीने ठराव मागे घेण्यात आला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पाचवी ते दहावीच्या अभ्यासक्रमांत योगाभ्यास हा विषय अनिवार्य करणे

मु.शी.: पाचवी ते दहावीच्या अभ्यासक्रमांत योगाभ्यास हा विषय अनिवार्य करणे या विषयावरील श्री. संजय दत्त वि. प. स. यांचा ठराव

श्री. संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" कोवळ्या वयातच बालकांचा बौध्दिक व शारीरिक विकास साधून त्यातून एक सुदृढ व निकोप नागरिक तयार होण्याच्या दृष्टीने इयत्ता 5 वी ते 7 वी आणि 8 वी ते 10 वी च्या अभ्यासक्रमांत योगाभ्यास हा विषय अनिवार्य करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

सभापती महोदय, महाराष्ट्र रोग मुक्त व सुदृढ करावयाचा असेल तर योगाभ्यास शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आज गरज आहे. कारण बालवयातच योग्य ते संस्कार आपण घडवू शकतो आणि अशा वयात मुलांनी योगाभ्यास सुरु केल्यास ते त्यांच्या अंगवळणी पडते. लहानपणी झालेले संस्कार सहसा सुटत नसतात व त्यांचे वय हे संस्कारक्षम व वाढते असल्यामुळे स्नायू, सांधे, आतील अवयव यांची पूर्ण वाढ होण्यास मदत होते. आणि अशा वयात योगाभ्यासाचा अंतर्भाव शालेय व महाविद्यालयीन स्तरावर केल्यास शालेय जीवनातच योगाची आवड लागून शरीर व मनाची वाढ होईल.

सध्याची शिक्षण प्रणाली पाहता आज लहान वयातच पुस्तकांचे प्रचंड ओझे वाहून नेणारी कोवळी मुले आम्हांस पहावयास मिळतात. ज्या वयात त्यांचा बौध्दिक व शारीरिक विकास होणे गरजेचे आहे त्या वयात त्यांना कोणताही शारिरीक व्यायाम न मिळता प्रचंड ओझी वाहून नेण्यातच त्यांचा वेळ फुकट जात आहे. त्यांच्या अभ्यासक्रमात अनेक विषयांचा जरी समावेश करण्यात आला असला तरी त्यापासून त्यांचा बौध्दिक विकास न होता फक्त यंत्रमानव निर्माण करण्याचे काम आजची शिक्षण प्रणाली करीत आहे. आजची शिक्षण पध्दती ही काहीशी मर्यादीत आहे असे मानण्यास हरकत नाही. आपल्यातील अंतरमनाचा अथवा सुप्त गुणांचा विकास होत असेल तरच ते खरे शिक्षण होईल. योगाभ्यासाने आतील सुप्त गूण आपोआप प्रकट होतात. आचार, विचार, कृती यामध्ये शुध्दता, पवित्रता व कलात्मकता येते. शालेय जीवनात योगाची आवड लागून शरीरमनाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त.....

वृध्दी व्हावी या हेतूनेच सुलभ सहज योगाभ्यासाची रचना 10 वर्षावरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे. 5 वी च्या वर्गात योगाची सुरुवात करुन दहावी पर्यन्त त्याचाच सराव घ्यावा.

मानवी जीवनातील तीन अवस्थांपैकी कुमार अवस्था ही सर्वात महत्वाची होय. याच अवस्थेत मुलांना योगसंस्कार देणे आवश्यक आहे. योगशास्त्र मानवी जीवन पूरीपूर्ण करणारे, शारीरिक व मानसिक विकास साधण्यास मदत करणारे, जीवन सुखी व समृध्दी करणारे प्राचिन व प्रगत असे एकमेव शास्त्र आहे. सर्वात सोपे सहज जमणारे, मन:शांती देणार, आत्मविश्वास वाढविणारे, रोगमुक्त करणारे, सुख - दु:खावर विजय मिळवून देणारे, निरोगी ठेवणारे, कार्यक्षमता व उत्साह वाढविणारे, शरीर व मनाला शिस्त लावणारे, शरीर व मनाची शुध्दी व विचाराची वृध्दी करणे, खर्चिक नसणारे, सुखी समृध्दी, आरोग्य देणारे एकमेव असे शास्त्र म्हणजेच योगशास्त्र होय. लहान वयात योगाभ्यासास सुरुवात करुन देह संपादनापासून पुढे आत्मदर्शनापर्यन्त पोहचणे केव्हाही योग्य होईल. भगवतगीतेत सांगितल्याप्रमाणे बालवयात मुलांना आसनाभ्यास करण्यास शिकविल्यास पुढे त्याचे चांगले फळ त्याला आपोआप मिळेल. योगाभ्यासामुळे देहाला योग्य शिस्त लागेल. त्यामुळे मुलांवर योग्य संस्कार होऊन जीवन सुरळीत होईल. हे सर्व लक्षात घेता बाल वयापासूनच योगाभ्यास शिकविला पाहिजे.

महाराष्ट्रातील काही शाळांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्याचा प्रयोग केल्यानंतर त्यातून आलेले अनुभव पुढीलप्रमाणे पहावयास मिळतात.

1) मुलांना मानसिक संतुलन प्राप्त होऊन रागावर नियंत्रण आले.

(यानंतर श्री. सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त....

2) मुलांच्या मनाची एकाग्रता वाढून चंचल वृत्तीवर नियंत्रण आले. 3) मुलांचे मनोबल वाढल्यामुळे भितीवर नियंत्रण आले 4) मुलांचे मनोबल वाढून स्मरणशक्तीची वाढ झाली 5) मुलांचे आळस जाऊन मुले उत्साही वाटत आहेत 6) त्यांच्यातील कंटाळा कमी होऊन अभ्यासाला जास्त वेळ बसण्याची इच्छा होऊ लागली 7) त्यांच्या परिक्षेचा ताण कमी होऊन गुणात वाढ झाली 8) त्यांच्या मनाची आकलन शक्ती वाढून आत्मविश्वास वाढला 9) मुलांना झोप शांत लागत आहे 10) त्यांची उंची वाढू शकते 11) मुले आजारी पडत नाहीत 12) मुलांमधील दंगामस्ती कमी झाली. असे अनेक अनुभव येत असल्याचे दिसून येत आहे असे योग्याभ्यास शिकविणाऱ्यांचे म्हणणे आहे. योगाभ्यास ही काळाची गरज आहे. योगाभ्यास विशिष्ट धर्माची, नितीची अथवा पंथाची साधना नव्हे. शास्त्रशुध्द, नियमित योग अभ्यास केल्यामुळे फायदे जाणवतील, हे वादातीत सत्य आहे. आजचा विद्यार्थी तो उद्याचा मानव आहे. योगशास्त्रामुळे तो उद्याचा आदर्श नागरिक बनेल. भारतीय संस्कृती टिकवून ठेवण्याचा योग शास्त्र राजमार्ग आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात मानवाला खरा आधार योगच ठरणार आहे, जो जो म्हणून मनुष्य प्राणी आहे, त्याला सुखाची तळमळ आहे, अपेक्षा आहे, त्यासाठी मनुष्याचे सर्व प्रयत्न चालू असतात. या प्रयत्नाला फळ येईल ते योगानेच. याची अनुभूती घेण्यासाठी बाल वयापासूनच नियमित योगाभ्यासाची सवय शरीराला लावणे आवश्यक आहे. योगाने मानव नक्कीच सुखी होईल, अशी माझी खात्री आहे, निरोगी राहण्यासाठी योगाशिवाय तरणोपाय नाही. विद्यार्थ्यांसाठी योग ही गुरुकिल्ली आहे. "योग: कर्मसु कौशलम" म्हणजेच योग मानवाला एक वरदानच आहे. म्हणून योग शिका अन योग जगा.

सभापती महोदय, शरीर स्वास्थ्यासाठी योग विद्या अभ्यासक्रम शाळा व महाविद्यालयात सुरु करण्याचे सूतोवाच नुकतेच मा. मुख्यमंत्री यांनी आदरणीय स्वामी रामदेव महाराज यांच्या मुंबईत संपन्न झालेल्या योग शिबिरात केले आहे. त्याबद्दलही त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो. आणि माझा हा अतिशय महत्वाचा ठराव शासनाने स्वीकारावा व या ठरावाला सर्वांनी पाठींबा द्यावा अशी सभागृहाला विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र. धन्यवाद.

ठराव प्रस्तुत झाला.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी योग शिक्षणाविषयीचा जो ठराव मांडला त्याचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. त्यांनी उत्कृष्ट, अस्खलित मराठीमध्ये पहिलाच ठराव उत्तम रितीने मांडला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. योग शास्त्राचे आयुर्वेदापासून भारतीय संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्व सर्वत्र पहायला मिळते. आपण पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करतांना योग शास्त्राकडे दुर्लक्ष करता कामा नये हा या भूमिकेमागचा दावा आहे. योगामुळे काय काय फायदा होतो, त्याचे गुणधर्म माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी आपल्या भाषणातून सांगितले आहेत. मुलांचा बौध्दिक विकास, शारिरीक विकास व्हावा ही त्याच्या पाठीमागची भूमिका आहे. आणि म्हणून एकही पैसा खर्च न करता आपण योग शास्त्राचा अभ्यास आत्मसात करु शकलो तर त्यासारखी आयुष्यात दुसरी पर्वणी नाही. कारण योग हे जसे माणसाचे शारिरीक संतुलन साधते तसे मानसिक संतुलन साधते. आजच्या धकाधकीच्या जीवनात आई-वडिलांना मुलांना मॅड बॉक्ससमोर बसून विविध चॅनेल्सची बटने दाबण्यापेक्षा योगामध्ये कॉन्सन्ट्रेशन केलेतर आपली स्मरणशक्ती वाढते ही गोष्ट खरी आहे. त्याचप्रमाणे मनाची एकाग्रता वाढते. मनामध्ये स्वच्छंदी विचार येतात. मन एकाग्र करण्यासाठी मेंदूला मदत होते. योग केल्यानंतर मेंदू प्रफुल्लित होतो, तजेलदार होतो. आणि स्मरणशक्ती वाढण्यासाठी सुध्दा त्याची मदत होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्याप्रमाणे मेंदूची वाढ होते, मेंदूला पाहिजे ते सत्व मिळते, त्याप्रमाणे शारीरीक वाढीसाठी देखील योगाची विविध आसने केल्यामुळे शरीरामध्ये जोम, स्फूर्ती आणि शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असणारे घटक मिळतात. व्यायाम आपल्या शरीरासाठी अत्यंत पोषक मानला जातो. आजकाल योगाभ्यासाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. लोकांना 40 वय उलटल्यानंतर योगाची आठवण होते. चाळीशीनंतर जेव्हा बी.पी.चा त्रास सुरु झाला किंवा माईल्ड हार्ट अॅटॅक आला किंवा दोन-तीन जिने चढल्यानंतर दम लागत असेल तर लोकांना योगाची आठवण होते आणि ते त्याकडे वळतात. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठरावाव्दारे योगाभ्यासाच्या बाबतीत जी सूचना केली आहे, ती स्वागतार्ह आहे. पण माननीय शिक्षण मंत्री हा विषय अभ्यासक्रमामध्ये कशा प्रकारे बसवितात, त्याबाबतीत त्यांचे कौशल्य आम्हाला पहावयाचे आहे. पण मुलांकडे एवढे तास असतात का ? योगासाठी पहाटेचे, सकाळचे वातावरण चांगले असते. त्यामुळे त्या वेळेमध्ये योगा केला तर ते जास्त उपयुक्त होते. काही लोक संध्याकाळी सुध्दा योगा करतात. पण काही ठिकाणी दोन शिप्टमध्ये शाळा चालतात. मुंबईतील, इतर शहरांमधील शाळांची अवस्था, जागेची टंचाई याचाही विचार करावा लागेल. तसेच योगा शिकविण्यासाठी चांगले प्रशिक्षित योगा शिक्षक असावयास पाहिजेत. सध्या स्वत:ला योगा शिक्षक म्हणवणारे अनेक लोक आहेत. त्यांना कितपत योगाभ्यास येतो हे माहिती नाही. पण योगा करणे हे श्रीमंतीचे लक्षण मानले जाते. लोक योगा शिकण्यासाठी ट्रेनर ठेवतात आणि घरात योगा करतात. पण सन्माननीय सदस्यांनी आपल्या ठरावाव्दारे जी सूचना केली आहे, ती जर आपल्याला मान्य करावयाची असेल तर योगाभ्यास हा एक विषय म्हणून त्याचा शिक्षणामध्ये अंतर्भाव करावा लागेल आणि ते मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. यासाठी शाळेमध्ये एक वेगळा दिवस ठरवावा. शनिवारी अर्धा दिवस शाळा असते. तेव्हा शनिवारी जर दोन तास योगासाठी ठेवले तरी देखील आपल्या अभ्यासक्रमामध्ये याचा अंतर्भाव करता येऊ शकतो किंवा शाळेमध्ये पी.टी.चा तास असतो, तेव्हा अल्टरनेट योगाचा अभ्यास ठेवला तर मुलांचा बौध्दीक आणि शारीरीक विकास होऊ शकतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिला आहे, तो अतिशय स्वागतार्ह आहे. माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत जरुर विचार करावा आणि योगाभ्यासाचा शिक्षणामध्ये अंतर्भाव करावा अशी माझी विनंती आहे.

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी मुलांच्या कोवळया वयामध्ये त्यांचा बौध्दीक आणि शारीरीक विकास साधण्यासाठी अभ्यासक्रमात योगाभ्यासाचा अंतर्भाव करावा यासाठी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपले विचार मांडले आहेत आणि ते स्वागतार्ह आहेत. योगामुळे बौध्दीक आणि शारीरीक विकास होतो, पण योगाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे यातून संयम आणि मानसिक शांती किंवा मानसिक संतुलन या दोन गोष्टी अतिशय प्रभावीपणे प्राप्त होतात. ज्याप्रमाणे युती शासनाच्या, शिवशाहीच्या काळामध्ये शाळेत पहिला तास संस्कृतचा ठेवण्याचे ठरविले होते, जेणेकरुन मुलांना या विषयाची माहिती व्हावी. तसा शाळेमध्ये शारीरीक शिक्षणाचा तास असतो, तेव्हा हा विषय शिकविण्याच्या दृष्टीने विचार करता येईल. यामध्ये गटवारी करावी लागेल म्हणजे कोणत्या वयात, कोणता योगाभ्यास करावा हे देखील ठरविण्याची आवश्यकता आहे. कारण लहान वयामध्ये सर्वच प्रकारची योगासने करता येत नाहीत. तसेच ही योगासने शिकविण्यासाठी हुशार प्रशिक्षक असावयास पाहिजे, त्याला याबाबतीत ज्ञान असले पाहिजे आणि अशाच प्रशिक्षकाची निवड केली पाहिजे. आम्ही शाळेमध्ये असताना सामूहिक प्रार्थना असावयाची आणि सामूहिक शारीरिक शिक्षणाचा तास असावयाचा.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

जसा शारीरिक शिक्षणाचा तास आहे. मला याची कल्पना आहे की, शारीरिक शिक्षणाचा सुध्दा खुप मोठा अभ्यासक्रम आहे. पण आपल्याला त्यामध्ये गटवारी करता येईल. सर्वच योगासने काही त्या बालवयात करावी लागत नाहीत. कोणत्या वयात कोणती योगासने करण्याची आवश्यकता आहे, याचा विचार करुन ती योगासने शिकविण्यासाठी हुशार, ज्याला त्यातील चांगले ज्ञान आहे, असाच शिक्षक निवडण्याची आवश्यकता आहे. किंबहुना मी या संदर्भात सांगेन की, आम्ही शाळेत असतांना आमच्याकडे असे होते की,सामुहिक प्रार्थना असायची किंवा सामुहिक शारीरिक शिक्षणाचा तास असायचा. सामुहिक शारीरिक शिक्षणाचा तास झाल्यानंतर पुन्हा दुस-या आठवडयात तो तास नसायचा. त्या आठवडयात पहिल्या आठवडयात जे शिकविले गेले असेल तो पाठ मुले बरोबर करीत आहेत की नाही, हे पाहिले जायचे. यातील आणखी एक वैशिष्ट असे की, जसे आता मॅड बॉक्स बद्दल या ठिकाणी सांगण्यात आले. सध्या या योगाभ्यासाकडे दुर्लक्ष नाही. याच्या दोन पिढया आहेत. मॅको-मॅन अशी एक नवीन पिढी आलेली आहे. सगळया सिनेमातून आपण पाहिले तर सगळे उघडे असलेले आपल्याला दिसतात. स्नायुंना बळकटी आणून दाखवण्याची मॅको-मॅनची स्टाईल आलेली आहे. पण ही मॅको-मॅन स्टाईल टिकाऊ नाही. ती टाकाऊ आहे. आणि योगाभ्यास हा टिकाऊ आहे. त्यांनी एकदा जर व्यायाम सोडला तर त्यांची वाट लागते. ते बेढभ दिसतात. म्हणून मॅको-मॅन हे फक्त पाहण्यासारखे असते पण योगाभ्यास हा टिकाऊ आहे. हा जर आपण विद्यार्थ्यांना लहान वयातच शिकविला तर फार चिरंतन काळ प्रकृतीला पोषक अशी ती गोष्ट होईल. याचे आणखीन एक वैशिष्ट असे की, यासाठी जागा लागत नाही. व्यायामशाळा म्हटले की, आता नवीन मशीनरी आलेल्या आहेत. सगळयांच्या घरी धावन्याची मशीन, चालन्याची मशीन आलेली आहे. बाहेर चालावयाचे नाही. घरातच चालावयाचे. योगाभ्यासात असे काही नाही. आपण जेवढे आहोत, जेवढी काय आपली साईज आहे, तेवढीच आपल्याला जागा लागते. अगदी शवासन केले तरी तेवढीच जागा लागते. त्यात पुन्हा हात पसरले तर आणखी दोन फुट जास्त जागा लागेल. म्हणून जागेच्यादृष्टीने सुध्दा योगाभ्यास अडचणीचा आहे काय? तर तसेही नाही. म्हणून याचा अंतर्भावर शिक्षणक्रमात करता येईल की, नाही मला शंका आहे. परंतु शिक्षणक्रमात पी.टी.च्या तासाला पुरक असा अभ्यासक्रम म्हणून, खेळांच्या बरोबर पुरक अभ्यासक्रम म्हणून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

योगाभ्यास घेता येईल. म्हणून मी शेवटी एकच सूचना करीन की, हा योगाभ्यास शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असाला पाहिजे. याबाबतीत श्री. नवलकर हे नेहमी एक चांगले उदाहरण देतात. ते असे म्हणतात की, "माती ही त्या वयातच तिला आकार दिला तर ती घडते. पण ती माती घडविण्यासाठी सुध्दा मुर्तीकार लागतो. मातीची मडकी पण होतात आणि मुर्तीपण होते. म्हणून ही माती कुणाच्या हातात जाईल त्यावर ते अवलंबून आहे. अर्थात त्या मातीचा स्वतःचा एक गुण असतो. तो गुणही आवश्यक आहे." यादृष्टीने ती माती मुर्तीकाराच्या हातून घडवा. जेणेकरुन तो योगाभ्यास शिकून त्यांचे शरीर चांगले होईल. नाही तर कुठे तरी आळोखे-पिळोखे दिले आणि अपंग झाला,अशी परिस्थिती होता कामानये एवढी काळजी घ्यावी, अशा प्रकारची सूचना करतो आणि पुन्हा एकदा श्री. संजय दत्त यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मनापासून पाठिंबा देतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्याला मनापासून धन्यवाद देतो. चांगला विषय त्यांनी या ठिकाणी मांडलेला आहे. शालेय अभ्यासक्रमाममध्ये योगाभ्यास या विषयाचा समावेश करावा अशा प्रकारची एक चांगली सूचना त्यांनी केलेली आहे. या ठिकाणी आदरणीय शिक्षणमंत्री समोर बसलेले आहेत. सध्या शिक्षणक्षेत्रामध्ये जे वेगवेगळे विषय येत आहेत, त्या विषयाचा कार्यभार देण्यासाठी आज आमच्याकडे कार्यभार शिल्लक नाही. आज अनेक विषय हे शाळेच्या कामकाजानंतर शाळेच्या वेळेनंतर शिक्षकांना शिकवावे लागतात. इयत्ता पाचवी ते सातवीसाठी किंवा इयत्ता आठवी ते दहावीसाठी 25 तासांचा आणि 26 तास 45 मिनिटांचा जो काही कार्यभार ठरलेला आहे. त्यामध्ये हे सगळे विषय बसवायचे आहेत. आज जे जे विषय शासनाने नमूद केलेले आहेत किंवा घेणे बंधनकारक केलेले आहेत ते विषय आम्ही 25 तासात किंवा 26 तास 45 मिनिटांत घेऊ शकत नाही. म्हणून मग शाळा सुटल्या नंतर त्या शिक्षकांना थांबून त्या विषयाच्या तासिका घ्याव्या लागत आहेत. त्यामुळे या ठिकाणी हा योगाभ्यासाचा जो विषय आहे, तो शाळेच्या अभ्यासक्रमामध्ये घेतला तर तो खरोखरच आंनदाची बाब होईल. तो फार चांगला विषय आहे आणि आवश्यकही आहे.पण कल-परावाच मी वाचले की, सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार पर्यावरण हा एक नवीन विषय बंधनकाकर केलेला आहे. म्हणून काही विषय जे 150 मार्कांचे आहेत ते 100 मार्कांचे करुन तिकडचे 50/50 मार्क्स कमी करुन 100 मार्कांचा हा पर्यावरण विषय अभ्यासक्रमामध्ये आणण्याचे बंधन सुप्रिम कोर्टाने शासनावर टाकलेले आहे. त्यामुळे तो ही विषय अभ्यासक्रमामध्ये येण्याची शक्यता आहे. योगाभ्यास हा विषय मूळातच शारीरिक शिक्षण या विषयाच्या अंतर्गत येतो. या विषयाचे जे क्रीडा शिक्षक आहेत ते या विषयाचे प्रशिक्षण देत असतांना किंवा माहिती देत असतांना योगाभ्यास हा त्यातीलच एक भाग असल्यामुळे विद्यार्थ्यांना योगाचेही शिक्षण त्याठिकाणी सध्या दिले जात आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

परंतु सर्व शिक्षक यासंदर्भात अगदी प्रशिक्षित आहेत अशातील भाग नाही. बी.पी.एड. मध्ये त्यांनी कदाचित योगाचा अभ्यास केलेला असेल. परंतु खऱ्या अर्थाने या विद्यार्थ्यांना योगाच्या शिक्षणाची माहिती द्यावयाची असेल तर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जो उल्लेख केला त्यानुसार त्या ठिकाणी प्रशिक्षित शिक्षक येणे आवश्यक आहे. शासनाला अशा प्रकारे फक्त योगाचे प्रशिक्षण घेतलेले शिक्षक प्रत्येक शाळेमध्ये नेमणे किंवा काही शाळांमिळून एक शिक्षक नेमणे हे शक्य होणार नाही याची मला जाणीव आहे. परंतु किमान आमचे जे क्रीडा शिक्षक आहेत त्यांना दहा पंधरा दिवसांचे जर वेगळे प्रशिक्षण दिले तर हे क्रीडा शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये योगाभ्यासाचे चांगले शिक्षण देऊ शकतील. शासनाच्या अडचणींमुळे किंवा धोरणामुळे समजा अभ्यासक्रमामध्ये हा विषय येऊ शकला नाही तरी किमान आताच्या अभ्यासक्रमामध्ये याला नेहमीच्या वेटेजपेक्षा जास्त प्रमाणात वेटेज दिले आणि प्रत्येक शाळेमध्ये योगाभ्यासाचे शिक्षण जर बंधनकारक केले आणि त्याची पडताळणी करण्याची जर काही योजना शासनाने राबविली तर मला वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावाची खऱ्या अर्थाने प्रतिपूर्ती होऊ शकेल. त्यांच्या या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ RJW/ SBT/ KTG/

श्री. जी. एल. अैनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी हा जो ठराव आणलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. योगाभ्यास किंवा योग शास्त्राचे शिक्षण बालवयात मिळणे यासारखी विद्यार्थ्यांसाठी दुसरी चांगली सद्भाग्याची गोष्ट नसते. इतिहास, भूगोल किंवा मराठीचे काही धडे शिकून सुध्दा मुलगा तयार होणार नाही किंवा त्यांचा सर्वांगीण विकास होणार नाही. तो विकास योगाभ्यासाने होतो. मी जेव्हा शाळेत शिकत होतो तेव्हा आमच्या अभ्यासक्रमामध्ये दररोज शेवटचा एक तास पी.टी. चा असावयाचा. प्रत्येक वर्गाचा वेगवेगळा तास असावयाचा. आम्हाला सर्वांगसुंदर व्यायामाचे 16 प्रकार शिकविले जावयाचे. शास्त्रशुध्द योगासनावर आधारलेले 8 उभे आणि 7 बैठकीचे प्रकार असावयाचे आणि सगळयांसाठी टाळया वाजविण्याचा एक कॉमन प्रकार करमणुकीसाठी असावयाचा. त्यातून योगासनाचे कमीत कमी सोळा प्रकार शिकविले जात होते. मिरज येथील अंबाबाई तालीम ही जी व्यायाम संस्था आहे, त्या संस्थेला शंभर वर्षे होऊन गेलेली आहेत. त्यांनी हा अभ्यासक्रम तयार केलेला होता. तो अभ्यासक्रम त्यावेळी बऱ्याचशा शाळा राबवित होत्या. आजही बी.पी.एड. पदवीच्या अभ्यासक्रमामध्ये योगाभ्यास किंवा योगशास्त्राचे प्रशिक्षण प्रत्येक शिक्षकांना दिलेले असते. ते शिक्षकही प्रशिक्षित आहेत परंतु सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी सांगितल्याप्रमाणे वेळापत्रकामध्ये शिकवावयाचे आणि आणखी दोन दोन तास काम करुन सुध्दा ते आटोपत नाही. पुन्हा हे शिकवा, ते शिकवा अशा नवीन सूचना यावयास लागल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये हे कसे बसवावयाचे हा महत्वाचा प्रश्न आहे. मी शासनाला विनंती करतो की, पूर्वीचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन पी.टी. चा तास असतो त्या तासामध्ये सोमवार ते शुक्रवार थोडे थोडे एका एका योगाचे, एका एका सर्वांगसुंदर प्रकाराचे शिक्षण देत गेलो आणि शनिवारी ज्यावेळी मास पी.टी. असते त्या दिवशी संपूर्ण शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन प्रात्यक्षिक देत शिकवत गेलो तर दोन ते तीन महिन्यांमध्ये विद्यार्थी चांगले तयार होतात, गुटगुटीत होतात. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त साहेबांनी जे फायदे सांगितले ते सर्व फायदे मिळतात असा माझा स्वत:चा अनुभव आहे. कारण मी त्या अभ्यासक्रमातून गेलेलो आहे. शरीरप्रकृती चांगली राहते, कॉन्संट्रेशन चांगले होते, स्मरणशक्ती चांगली होते आणि सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे परीक्षेच्या वेळी आत्महत्या करण्याचा विचारही मनात येत नाही. आज मुलांमध्ये हे जे प्रकार सुरु झाले आहेत त्याचे कारण या सर्व गोष्टींचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापूरे .....

अभाव हे आहे. त्यामुळे ही मुले इतकी गडबडून जातात की, त्यांना काही कळत नाही. योगाभ्यासामुळे ती मुले शारिरीकदृष्टया "साऊंड माईन्ड इन साऊंड बॉडी" अशी होतात. जर साऊंड बॉडी असेल तर साउंड माईन्ड येईल. साउंड माईन्ड आले की या बाकीच्या गोष्टी येतात. ज्याला आपण स्टुडंट मेकींग म्हणतो किंवा व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण अशी जी शिक्षणाची व्याख्या आहे त्यामध्ये त्याच्या सर्वांगीण विकासामध्ये शारीरिक आणि मानसिक हे जे दोन विभाग आहेत ते एका विषयामुळे भरुन निघतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापूरे...

इतिहास एखाद्यावेळेस समजला नाही तर चालेल, पण आपले शरीर चांगले राहिले तर तो मुलगा नेहमी सद्गुणीच राहील. निरोगी माणूसच सद्गुणी असू शकतो, ज्याचे आरोग्य चांगले नाही तो माणूस सद्गुणी असू शकत नाही असे ॲरिस्टोटलपासून सगळयांचे मत आहे, तज्ज्ञांचे मत आहे, माझे एकटयाचे मत नाही. ज्याची प्रकृती चांगली तो सद्गुणी मनुष्य असू शकतो. म्हणून सद्गुणांची जोपासना करण्याचे जर ध्येय असेल तर योगाभ्यास हा असलाच पाहिजे, अतिशय चांगल्या विषयाला मा.सदस्यांनी हात घातलेला आहे. हा विषय शासनाने गांभीर्याने घ्यावा. सरकारी अधिका-यांमध्ये मध्यंतरी हा योगाभ्यास अडकला होता. त्याला टाईमटेबलचे स्वरुप आले आहे. त्यामुळे त्याचे वाटोळे झाले आहे, म्हणून हा विषय शारीरिक शिक्षण अंतर्गत आणावा, पूर्वी शाळेचे निरीक्षण होत असे, त्यावेळी संपूर्ण शाळा मास्क पिटीसाठी धडपडत असे. मास्क पिटीच्यावेळी शिक्षणाधिकारी येऊन उभे रहावयाचे. संपूर्ण मास्क पिटी चांगली झाली म्हणजे आमची शाळा फार चांगली असे समजले जात आहे. आज निरीक्षण तर बंदच झाले आहे, मास्क पिटीचा पत्ता नाही आणि क्रीडा शिक्षकांना नको ते उद्योग लागलेले आहेत म्हणून हे सर्व झालेले आहे. शासनाने याचा विचार जरुर करावा आणि ताबडतोब योगाभ्यासावर आधारलेले मनोरंजनात्मक अशापध्दतीचे सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार आहेत ते किमान 16 जरी अंतर्भूत केले तर वर्षभर जरी या मुलांना प्रशिक्षण दिले तर अतिशय सुदृढ पिढी तयार करण्याचे भाग्य या शासनाला मिळेल म्हणून या कारणांसाठी मा.सदस्य श्री.संजय दत्त यांनी जो ठराव आणला आहे त्याला मन:पूर्वक पाठिंबा देतो आणि शासनानेही तो ठराव स्वीकारावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "कोवळया वयातच बालकांचा बौध्दिक व शारीरिक विकास साधून त्यातून एक सुदृढ व निकोप नागरिक तयार होण्याच्यादृष्टीने इयत्ता 5 वी ते 7 वी आणि 8 वी ते 10 वीच्या अभ्यासक्रमात योगाभ्यास हा विषय अनिर्वाय करावा" या विषयाचा अशासकीय ठराव आणला आहे. एक अतिशय चांगल्या विषयाकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या विषयावर मा.सदस्य श्री.दत्त यांच्याबरोबरच मा.सदस्य श्री.अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते आणि श्री.जी.एल.ऐनापूरे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मा.सदस्य श्री.संयज दत्त यांनी आपल्या भाषणामध्ये योगाभ्यासाचे आणि योगाचे महत्व सांगताला मला वाटते की, मराठीतील सगळया गोष्टींचा उल्लेख केला, रागावर नियंत्रण, चंचल स्वभावावर नियंत्रण, भीतीवर नियंत्रण, आत्मविश्वास वाढला, आळसपणा संपला, आकलनशक्ती वाढली, झोप शांत लागली, दंगामस्ती कमी झाली असे सांगितले आहे. 1986 सालापासून महाराष्ट्र शासनाने प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. त्याच्यामध्ये 52 तासिका प्रत्येक आठवडयाला आहेत. मा.सदस्यांकडून सुप्रीम कोर्टाचा उल्लेख करण्यात आला आहे. पर्यावरण शिक्षण, ग्राहक शिक्षण आणि उद्योजकता शिक्षण हे विषय शासनाच्या शिफारशीने पुन्हा समाविष्ट केले आहेत ते स्वतंत्र विषय आपण घेणार नाही. परंतु वेगवेगळया विषयांचा योग्य ठिकाणी उपयोग करावा आणि शिक्षण द्यावे असा शासनाचा आग्रह आहे. यशपाल समितीच्या अहवालात स्वतंत्र विषय म्हणून समाविष्ट करीत असताना विद्यार्थ्यावर अभ्यासाचे ओझे नको असे नमूद केलेले आहे. ज्याचा उल्लेख मा.सदस्यांनी केला आहे. शाळेमध्ये एक तास शारीरिक शिक्षण अनिवार्य केले आहे. त्याच्यामध्ये हे शिक्षण द्यावे. मी दिसायला दांडगा असलो तरी याच्यामध्ये मी परिपूर्ण नाही. आज मी काय शिकतो या शारीरिक शिक्षणामध्ये काय घ्यावे ते सांगतो.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. मी उपस्थित आहे.2006 या वर्षापासून अभ्यासक्रम बदलतो आहे.त्यामध्ये ही तज्ज्ञ मंडळी आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या सारखी तज्ज्ञ मंडळी यामध्ये आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे योगा करीत असावेत असे मी समजतो. या विषयाच्या संदर्भात सगळया तज्ज्ञांचे तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षणाचा दर्जा कसा चांगला करता येईल यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. अैनापूरे यांनी उल्लेख केला. ते 16 व्यायामाचे धडे घेत होते. आताच्या अभ्यासक्रमात काय आहे ते मी सांगू इच्छितो.इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांसाठी शारीरिक अभ्यासक्रमात हृदसंवहन क्षमता, दमश्वास क्षमता आणि सूर्यनमस्कार यानंतर मानसिक ताण कमी होण्यासाठी योगप्रक्रियेत एकटक पाहणे,डोळयांची उघडझाप,शरीर ताणणे,सदंत प्राणायाम,त्राटक आणि उजळणी, आसन करणे आणि टिकवणे, सहावीच्या विद्यार्थ्यांसाठीचा अभ्यासक्रम हृदसंवहन क्षमता,दमश्वास क्षमता, सूर्यनमस्कार, माणसिक ताण कमी करण्यासाठी योगप्रक्रिया व योगासनामध्ये भ्रमरी,फुंकर मारणे,त्राटक भस्त्रिका, पूरका व्यायाम,त्राटक,आसन करणे आणि टिकवणे. सातवीच्या विद्यार्थ्यांसाठीचा अभ्यासक्रम हृदसंवहन क्षमता,सूर्यनमस्कार घालणे,योगप्रक्रिया व योगासने यामध्ये फुंकर मारुन तोंडाने श्वास घेणे,उजळणी,भत्रिका,चिंतनात्मक स्मरण,आसन करणे व टिकविणे, इयत्ता आठवीला सूर्यनमस्कार, क्रीयायोग व योगासने, उजळणी,होकार लांबविणे, भ्रमरी, अनुलोम, विलांम प्राणायाम,शिथिलीकरण, इयत्ता नववीला धनुरासन, कुक्कुटासन, मयुरासन, सुप्तवजीरासन,पश्चिमोत्तासन,सूर्यनमस्कार, श्वासन, मुर्लीसाठी धुनरासन, मच्छिद्रासन, सुप्तवजीरासन,पश्चिमोत्तासन,सूर्यनमस्कार, नौकासन आणि श्वासन, आणि इयत्ता दहावीसाठी शलभासन, गोभासन, नौकासन, शिरशासन, वृशभासन, इ ुलासन, सूर्यनमस्कार इत्यादि शारीरिक शिक्षणामध्ये काय घ्यावे याचा अंतर्भाव केलेला आहे. आमचा बी.पी.एड.झालेल्या शिक्षकास येते की नाही यासंदर्भात मला शंका आहे. माझा असा प्रस्ताव आहे की, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी आपल्या भाषणामध्ये वेगवेगळया योगांच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे.पूर्वपरंपरागत योगाचे महत्व आम्हाला पटलेले आहे.व शारीरिक शिक्षणामध्ये बळकटीकरण कसे येईल याचा आम्ही विचार करीत आहे. या संदर्भात आज सकाळी अधिका-यांबरोबर बोललो. त्यावेळी अधिकारी सांगत होते की, योगाभ्यास हा लहान वयात घ्यावयाचा नसतो. वय थोडे जास्त झाले की,योगासनाचा अभ्यास-

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ..

घ्यावयाचा असतो. ते काही तज्ज्ञ नाहीत. परंतु त्यांनी मला सांगितले. आम्ही कोणीच परिपूर्ण नाही. माझे मत असे आहे की, यासंबंधीचा सगळाच अभ्यास करावा. योगाभ्यास घेण्यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. किती वयापासून योगाभ्यास शिकवावा या अनुषंगाने देखील सूचना केली गेली. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, मातीला आकार देणारे कसे आहेत हे आम्हाला देखील माहिती नाही. नाही तर वेगळेच व्हावयाचे. चांगला अभ्यास करुन सगळया पिढीला आपण व्यायाम शिकविणार आहोत. हा अतिशय चांगला विषय आहे. याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील. 2006 या वर्षी नवीन अभ्यासक्रम येणार आहे. त्यात या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने सगळयांना विश्वासात घेऊन हा अभ्यासक्रम आणण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु एवढेच आश्वासन यावेळी मी सभागृहाला देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना विनंती करतो की, त्यांनी मांडलेला अशासकीय ठराव परत घ्यावा.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी मांडलेल्या अशासकीय ठरावाला सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, अरविंद सावंत, श्री.जी.एल.अैनापूरे,श्री. रामनाथ माते पाठिंबा देऊन अतिशय चांगले मनोगत व्यक्त केले त्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम आभार मानतो. या सभागृहाचे जेष्ठ सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, तसेच श्री. मधूकर चव्हाण हे या ठरावाच्या चर्चेच्या वेळी उपस्थित राहून माझा उत्साह त्यांनी वाढविला त्याबद्दल मी त्यांचे सुध्दा आभार मानतो. माननीय मंत्री महोदयांनी ही सूचना तत्वत: मान्य केल्याबद्दल आणि त्यांनी फार प्रांजळपणे आपले मत व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे....

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.संजय सतीशचंद्र दत्त)

माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी आश्वासन दिलेले आहे. तरी त्यांनी दिलेले आश्वासन ते निश्चितपणे पाळतील आणि पुढील अभ्यासक्रमामध्ये याचा समावेश करतील अशी मला खात्री आहे. तरी माननीय मंत्री महोदयांच्या विनंतीला मान देऊन मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

तालिका सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 21 मार्च 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 6 वाजून 16 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 21 मार्च 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही